# <u>मिरा भाईंदर महानगरपालिका</u>

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. ०५/०९/२०१८**

मा. महासभा मंगळवार दि. ०४/०९/२०१८ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत विषय क्र. ५४ ते ७० या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा बुधवार, दिनांक ०५/०९/२०१८ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता महापालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

<u>उपस्थित सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| १) | **डिम्पल विनोद मेहता** | **महापौर** |
| २) | **चंद्रकांत सिताराम वैती** | **उपमहापौर** |
| ३) | **धृवकिशोर मन्साराम पाटील** | **सभापती, स्थायी सामिती** |
| ४) | **पाटील रोहिदास शंकर** | **सभागृह नेता** |
| ५) | **भोईर राजू यशवंत** | **विरोधी पक्षनेता** |
| ६) | **भोईर सुनिता शशिकांत** | **सदस्या** |
| ७) | **शाह रिटा सुभाष** | **सदस्या** |
| ८) | **तिवारी अशोक सूर्यदेव** | **सदस्य** |
| ९) | **पांडेय पंकज सूर्यमणि** | **सदस्य** |
| १०) | **गोहिल शानू जोरावर सिंह** | **सदस्या** |
| ११) | **कांगणे मीना यशवंत** | **सदस्या** |
| १२) | **सिंह मदन उदितनारायण** | **सदस्य** |
| १३) | **शेट्टी गणेश गोपाळ** | **सदस्य** |
| १४) | **ढवण निलम हरीश्चंद्र** | **सदस्या** |
| १५) | **नलावडे दिनेश दगडु** | **सदस्य** |
| १६) | **भोईर गणेश गजानन** | **सदस्य** |
| १७) | **पाटील प्रभात प्रकाश** | **सदस्या** |
| १८) | **गुप्ता कुसुम संतोष** | **सदस्या** |
| १९) | **पाटील धनेश परशुराम** | **सदस्य** |
| २०) | **पाटील वंदना मंगेश** | **सदस्या** |
| २१) | **रावल मेघना दिपक** | **सदस्या** |
| २२) | **शाह राकेश रतिशचंद्र** | **सदस्य** |
| २३) | **सिंग श्रीप्रकाश जिलेदार** | **सदस्य** |
| २४) | **जैन गीता भरत** | **सदस्या** |
| २५) | **जैन सुनिता रमेश** | **सदस्या** |
| २६) | **जैन राजेंद्र भवरलाल** | **सदस्य** |
| २७) | **भूप्ताणी रक्षा सतीश (शाह)** | **सदस्या** |
| २८) | **मोकाशी दिपाली आनंदराव** | **सदस्या** |
| २९) | **व्यास रवि वासुदेव** | **सदस्य** |
| ३०) | **रकवी वैशाली गजेंद्र** | **सदस्य** |
| ३१) | **अग्रवाल सुशील गोपीकिशन** | **सदस्य** |
| ३२) | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | **सदस्य** |

| | | |
|---|---|---|
| ३३) | **परदेशी गिता हरीश** | **सदस्या** |
| ३४) | **पाटील नरेश तुकाराम** | **सदस्य** |
| ३५) | **शेख अमजद गफार** | **सदस्य** |
| ३६) | **पाटील जयंतीलाल गुरूनाथ** | **सदस्य** |
| ३७) | **घरत तारा विनायक** | **सदस्या** |
| ३८) | **पांडे स्नेहा शैलेश** | **सदस्या** |
| ३९) | **आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र** | **सदस्य** |
| ४०) | **शिर्के अनंत गेणू** | **सदस्य** |
| ४१) | **पाटील वंदना विकास** | **सदस्या** |
| ४२) | **पाटील संध्या प्रफुल्ल** | **सदस्या** |
| ४३) | **पाटील प्रविण मोरेश्वर** | **सदस्य** |
| ४४) | **डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश** | **सदस्या** |
| ४५) | **गेहलोत हसमुख मोहनलाल** | **सदस्य** |
| ४६) | **शिंदे रुपाली वसंत (मोदी)** | **सदस्या** |
| ४७) | **थेराडे संजय अनंत** | **सदस्य** |
| ४८) | **मुखर्जी अनिता बबलू** | **सदस्या** |
| ४९) | **हसनाळे ज्योत्सना जालींदर** | **सदस्या** |
| ५०) | **पारधी सुजाता यशवंत** | **सदस्या** |
| ५१) | **म्हात्रे सचिन केसरीनाथ** | **सदस्य** |
| ५२) | **यादव मिरादेवी रामलाल** | **सदस्या** |
| ५३) | **सोनार सुरेखा प्रकाश** | **सदस्या** |
| ५४) | **भोईर विणा सुर्यकांत** | **सदस्या** |
| ५५) | **पाटील अनिता जयवंत** | **सदस्या** |
| ५६) | **म्हात्रे परशुराम पदमाकर** | **सदस्य** |
| ५७) | **भोईर भावना राजू** | **सदस्या** |
| ५८) | **मांजरेकर आनंद दत्ताराम** | **सदस्य** |
| ५९) | **अरोरा दीपिका पंकज** | **सदस्या** |
| ६०) | **बेलानी हेमा राजेश** | **सदस्या** |
| ६१) | **दळवी प्रशांत ज्ञानदेव** | **सदस्य** |
| ६२) | **गजरे दौलत तुकाराम** | **सदस्य** |
| ६३) | **नाईक विविता विवेक** | **सदस्या** |
| ६४) | **सोंस नीला बर्नाड** | **सदस्या** |
| ६५) | **राय विजयकुमार सिस्थन नारायण** | **सदस्य** |
| ६६) | **शेख रुबीना फिरोझ** | **सदस्या** |
| ६७) | **सावंत अनिल दिवाकर** | **सदस्य** |
| ६८) | **मेहरा राजीव ओमप्रकाश** | **सदस्य** |
| ६९) | **परमार हेतल रतिलाल** | **सदस्या** |
| ७०) | **भट दीप्ती शेखर** | **सदस्या** |
| ७१) | **कासोदारिया अश्विन शामजीभाई** | **सदस्य** |
| ७२) | **जैन दिनेश तेजराज** | **सदस्य** |
| ७३) | **भावसार वंदना संजय** | **सदस्या** |

| | | |
|---|---|---|
| ७४) | **शाह सीमाबेन कमलेश** | **सदस्या** |
| ७५) | **दुबे मनोज रामनारायण** | **सदस्य** |
| ७६) | **विराणी अनिल रावजीभाई** | **सदस्य** |
| ७७) | **सपार उमा विश्वनाथ** | **सदस्या** |
| ७८) | **अहमद साराह अकरम** | **सदस्या** |
| ७९) | **इनामदार जुबेर अब्दुल्ला** | **सदस्य** |
| ८०) | **शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम** | **सदस्य** |
| ८१) | **भोईर जयेश भानुदास** | **सदस्य** |
| ८२) | **म्हात्रे नयना गजानन** | **सदस्या** |
| ८३) | **भानुशाली वर्षा गिरधर** | **सदस्या** |
| ८४) | **म्हात्रे विनोद काशिनाथ** | **सदस्य** |
| ८५) | **गोविंद हेलन जॉर्जी** | **सदस्या** |
| ८६) | **बगाजी शर्मिला विन्सन्ट** | **सदस्या** |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १) | **कदम अर्चना अरुण** | **सदस्या** |
| २) | **रॉड्रीकस मोरस जोसेफ** | **सदस्य** |
| ३) | **परेरा कॅटलीन एन्थोनी** | **सदस्या** |
| ४) | **सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन** | **सदस्या** |
| ५) | **शेट्टी अरविंद आनंद** | **सदस्य** |
| ६) | **म्हात्रे मोहन गोपाळ** | **सदस्य** |
| ७) | **भोईर कमलेश यशवंत** | **सदस्य** |
| ८) | **डिसा मर्लिन मर्विन** | **सदस्या** |
| ९) | **बांड्या एलायस दुमिंग** | **सदस्य** |

**रजेचा अर्ज - निरंक**

**मा. महापौर :-**

सचिव साहेब सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगपालिकेची मा . महासभा मंगळवार दि . ०४/०९/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र . ०४ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.** सर्वप्रथम प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. ११.५५ झालेले आहेत. श्री. अनिल सावंत यांचा प्रश्न आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम या प्रश्नावर मला वाटते मागच्या मिटींगमध्ये चर्चा झालेली आहे. कम्प्युटर सेक्शन आयुक्त साहेबांनी सांगितले होते की मी याच्यासाठी स्टेट डेट फॉर दी इम्प्रमेन्ट त्यामुळे चर्चा झालेली आहे आणि मला उत्तर सुध्दा मिळालेले आहे. तुम्ही पुढचा प्रश्न घ्या.

**नगरसचिव :-**

पुढचा प्रश्न आहे सौ. निलम ढवण यांनी विचारलेला प्रश्न आहे.

**निलम ढवण :-**

मा. महापौर माझा जो प्रश्नोत्तराचा विषय आहे. मिरा भाईंदर शहरामध्ये शहराला काही अंशी बखारपणा ज्याच्यामुळे येतो ते शहरामध्ये वाढत असलेले अतिक्रमण आणि अतिक्रमणासंदर्भात वेळोवेळी चर्चा होतात. वेळोवेळी तक्रारी होतात परंतु त्याच्यावर कुठचीही कारवाई न होता मोठ्या प्रमाणात

झाल्यानंतर त्यावर जेव्हा तोडायला जाणे किंवा त्याच्यावर कारवाई करणे त्यावेळी बऱ्याच समस्या आपल्यासमोर नेहमी येत असतात यासाठी प्रथमतः प्रशासनाला मी काही प्रश्न विचारले होते. त्याची उत्तरे प्रशासनाने दिली परंतु शासनाच्या जी.आर नुसार प्रत्येक विभागामध्ये किंवा प्रभागामध्ये जेव्हा जेव्हा अशी काही कामे होत असतील त्या कामांचा तपशील किंवा त्यावर केलेल्या कार्यवाहीचा तपशिल ८ दिवसांत आयुक्तांपर्यंत पोहोचविणे बंधनकारक असते. परंतु आपल्या इथे अशा कार्यवाही होतात का? किंवा प्रशासन एवढ्या ॲक्टीव्हली काम करतात का? ह्यासंदर्भात आपण देखील मला याचे उत्तर द्यावे अशी मी आपणांस विनंती करते आणि त्याच पध्दतीने प्रत्येक प्रभागांमध्ये ह्या संदर्भातील नोंदवही ठेवणे देखील बंधनकारक असते. परंतु मी हा प्रश्न घेऊन पण मला वाटते ७-८ महिने होऊन गेले आहेत. काही कारणास्तव किंवा इतर प्रश्नांमुळे हा प्रश्न चर्चेसाठी आता आलेला आहे. तर एवढ्या वेळात देखील ह्या कुठल्याही विचारलेल्या प्रश्नांची काही अंशी उत्तरे दिली गेली आहेत. परंतु ती उत्तरे थातुरमातुर आहेत हे माझ्या निदर्शनास आलेले आहे आणि त्यासंदर्भातली कारवाई देखील प्रत्येक प्रभागांची व्हायला पाहिजे. ती अद्यापी झालेली नाही आणि अशा ह्या प्रत्येक प्रभागामध्ये प्रभाग १ ते ६ प्रभाग आहेत प्रत्येक प्रभागामध्ये अशी अतिक्रमण वाढल्यामुळे आज जे आपल्यासमोर, पालिकेसमोर, प्रशासनासमोर ह्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. आज इथे छोट्या प्रमाणावर असतील परंतु हायवे पट्टा असु देत किंवा इतर ठिकाणी चाळीच्या चाळी आजपर्यंत उभारल्या गेल्या आहेत. आज त्या लोकांना सर्वसामान्य जी लोक आहेत आपली कष्टाने मिळवलेली कमाई असो त्या कमाई कुठेतरी घर निवारा मिळवण्यासाठी अशा ठिकाणी घरे घेतात आणि नंतर त्याठिकाणी जेव्हा तोडण्यासाठी जातात तेव्हा ती लोक बेघर होतात. त्या लोकांना पाण्याची सोय केली जाते. त्या लोकांना टॅक्स लावला जातो आणि त्यानंतर मग त्याच्यावर तोडक कारवाई होते. अशा पध्दतीने नाहक जी लोक आपली गोरगरिब लोक ते रस्त्यावर येतात मग जेव्हा सुरुवात असते त्यावेळी प्रशासन काय करते? त्यावेळी जर बांधकाम करु दिले नाही तर अशी लोकांची होरपळ होऊ शकेल का? आपण ह्या सगळ्या गोष्टींचा ऊहापोह करावा आणि नंतर मग काही गोष्टी भले त्यात कुठच्या पक्षाचा असु द्या, कोणी असु देत. मग त्यावेळी परत एवढ्या वर्षापर्यंतच्या झोपड्या आपण कायम करायच्या आहेत. आणि त्यामुळे पूर्वीपासून लोकं जी टॅक्स रुपाने सगळ्या सोयीसुविधा जे मागत असतात. त्यांना पाणी असु दे, इतर सोयी असु दे त्या मिळणे फार मुश्कील होतात आणि वंचित राहतात. मग अशावेळी पुर्वीच्या लोकांना आपण सुविधा योग्यप्रकारे पुरवू शकत नाही तर मग अशा अनधिकृत बांधकामांना का द्यायचे. त्यांना का परवागनी देऊन त्यांच्यावर पांघरुण घ्यायचे. त्यानंतर विविध बिल्डींग बांधलेल्या आहेत. छोट्या मोठ्या गोरगरिब लोकांनी एखादे फुट जरी वाढवले किंवा पुढे छप्पर टाकले तर ते ताबडतोब तोडले जाते. मोठमोठ्या बिल्डींग बांधलेल्या आहेत त्या बिल्डींगवर काही कारवाई केल्या जात नाहीत. बलाढ्यांना फक्त आश्रय दिला जातो. काही वेळा असे झालेले आहे की मागे रोड वाईंडींगमध्ये काही लोकांना आपण वरती वाढविण्यासाठी महासभेमध्ये परवानगी दिलेली आहे. आज ३-३, ४-४ वर्ष झाली आहेत. काही लोकांनी तर त्याचा फायदा ३-३ मजले वाढविलेले आहेत. परंतु काही लोकांनी त्याच्यानुसार वरती फक्त वाढविलेले आहेत. त्यांना आज देखील तोडण्यासाठी तिथे अधिकारी पोहोचतात किंवा त्यांचा पाठपुरावा चालू असतो. मग ह्या कारवाई फक्त सर्वसामान्य गोरगरिब जनतेसाठी आहेत का? कारवाई जरुर कराव्यात आम्ही त्यांना कुठेही पाठीशी घाला असे म्हणत नाही. परंतु खरोखर ज्या ठिकाणी अशा इमारती असु देत किंवा इतर ठिकाणी चाळींची बांधकामे चालू आहेत. आज १२२ आरक्षण तिथे कुठेही वास्तु किंवा बाळासाहेबांचे वस्तु संग्रहालय जेव्हा बांधायची वेळ येते तेव्हा तिथल्या अतिक्रमण हटविताना आपल्याला त्रास होतो. हा त्रास कशामुळे होतो तिथे करत असताना कोणाला माहिती नव्हत का? अशा पध्दतीने बऱ्याच ठिकाणी आपणच समस्या निर्माण करतो आणि त्यावर परत ते कारवाई करण्यासाठी पालिकेचा अवाढव्य पैसा आपण खर्च करतो. त्यावेळी पोलिस बंदोबस्त घ्यावा लागतो त्यावेळी इतर कर्मचारी बाकीची फोर्स मागवावी लागते. ह्या सगळ्यांसाठी पालिकेचा अनाठायी खर्च हा लोकांच्या टॅक्समधुन आलेला पैसा आपण त्याच्यावर खर्च करतो. का ह्या सगळ्यांची जाणीव होत नाही आणि प्रशासन ह्या बाबतीत किती कार्यशील राहणार आहे याची मॅडम आपण ह्यासंदर्भात माहिती द्यावी आणि ह्यापुढे देखील ह्या संदर्भातल्या ज्या कार्यवाही होतील आणि याच्यामध्ये जी जी उत्तरे दिलेली आहेत अशा पध्दतीने ज्यांनी हे केलेले नाही त्याचे मला उत्तर देखील दिलेले नाही. पदनिर्देशित अधिकारी यांच्यावर अनधिकृत बांधकामाबाबत कोणत्या कायद्यानुसार व कोणती कारवाई होऊ शकते ह्याबाबत तपशिल आजपर्यंत पदनिर्देशित अधिकाऱ्यांवर केलेल्या कारवाईचा तपशिल देण्यात यावा. त्याची माहिती देखील मला मिळालेली नाही. मग याच्यावर कारवाईचे काही नाही का?

**मा. महापौर :-**

तुम्हाला उत्तर दिलेले आहे पण प्रशासनाने त्याचा खुलासा करावा.

**निलम ढवण :-**

उत्तर दिलेले नाही इथे डॉट केलेले आहे. उत्तर नाही.

**दिपक पुजारी :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, आपल्याला जी माहिती दिलेली आहे ती प्रभाग व्हाईज अनधिकृत बांधकामे किती झालेली आहेत. त्याबाबत दिलेली आहेत. ते जे पदनिर्देशित अधिकारी यांच्यावर काय कारवाई केलेली आहे याचे डिटेल आम्ही आस्थापनेकडून घेऊन माहिती देतो तर ह्याबाबत किती अधिका-यांवर काय कारवाई झालेल्या आहेत आजपर्यंतच्या त्याची सविस्तर माहिती मी आपल्याला देतो.

**निलम ढवण :-**

साहेब हा प्रश्न मी विचारला त्याला जवळ जवळ ८ ते ९ महिने होऊन गेले. त्यानंतर अद्यापी मला ह्या विषयावर कोणी काही उत्तर दिलेले नाही. आणि ही जी प्रभाग निहाय बांधकामे दिलेली आहेत जी बांधकामे ही आतापर्यंतची नाहीत हे पुस्तक तुम्ही वाटत आहेत. आजपर्यंतची माहिती याच्यात आली पाहिजे होती. मला ३-४ महिन्यात जे उत्तर मिळाले तिच संख्या याच्यामध्ये दिलेली आहे. त्यानंतर कारवाई झाल्या नाहीत का? बांधकामे झाली नाहीत का?

**दिपक पुजारी :-**

आपला प्रश्न झाल्यानंतर मागील ५ वर्षात आढळून आलेली प्रभागव्हाईज जी माहिती आहे. अनधिकृत बांधकामाची ती आपणांस देण्यांत आलेली आहे.

**निलम ढवण :-**

कधी पर्यंतची दिली?

**दिपक पुजारी :-**

आपल्याला आजपर्यंतची पाहिजे असेल तर.............

**निलम ढवण :-**

साहेब आज तुम्ही हे पेपर वाटले पण अपेक्षित होते की तुम्ही आजपर्यंत म्हणजे ठिक आहे. १५ दिवसांपूर्वी पर्यंतची तरी माहिती आली पाहिजे होती.

**दिपक पुजारी :-**

मॅडम आजपर्यंतची माहिती आपणाला देऊन टाकतो.

**निलम ढवण :-**

मला देण्यापेक्षा इथे उत्तर द्या कारण हा शहराचा प्रश्न आहे.

**दिपक पुजारी :-**

आम्ही पदनिर्देशित अधिका-यांवर किती कारवाई केली हा जो प्रश्न होता त्याबाबत आपण एकूण ४ पदनिर्देशित अधिका-यांवर कारवाई आजपर्यंत झालेले आहेत.

**निलम ढवण :-**

कुठल्या पध्दतीने कारवाई झालेल्या आहेत?

**दिपक पुजारी :-**

पदनिर्देशित यांच्यावर अनधिकृत बांधकामासंदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ नुसार कारवाई केलेली आहे.

**निलम ढवण :-**

कोणावर? कोणावर कारवाई झाली आणि काय घडले.

**दिपक पुजारी :-**

४ आहेत श्री. दिलीप जगदाळे, श्री. स्वप्नील सावंत, श्री. दादासाहेब खेत्रे आणि श्री. बाबुराव वाघ यांच्यावर निलंबनाची कारवाई केली गेली.

**निलम ढवण :-**

कारवाई करता आणि पुन्हा सेवेत रुजू करुन घ्यायचे अधिका-यांवर कारवाई कशासाठी करायची.

**दिपक पुजारी :-**

संबंधित विभागीय चौकशी प्रस्तावित करुन त्यांना परत कामावर घेतलेले आहे.

**निलम ढवण :-**

कारवाई करायची आणि पुन्हा त्याच पदावर बसवायचे ते कशासाठी?

**दिपक पुजारी :-**

विभागीय चौकशी करुन दोषआरोप पत्र दाखल करुन त्यांना शिक्षा ही केलेली आहे.

**निलम ढवण :-**

दोषातुन ते फ्री झालेले आहेत का?

**दिपक पुजारी :-**

संबंधितांना शिक्षा आपण सभागृहासमोर ठेऊन दिलेली आहे.

**निलम ढवण :-**

सगळी थातुरमातुर उत्तरे आहेत. दुसरी गोष्ट ज्यांच्यावर तुम्ही कारवाई करता त्यावेळी तात्पुरती कारवाई करता कुठेतरी होल मारायचे आणि आपले आणि तुम्ही पाठ फिरविल्यानंतर पुन्हा ते होल भरले जातात आणि पुन्हा तीच बांधकामे केली जातात. त्याच्यावर तुमची काय कारवाई आहे ती माहिती मिळत नाही का?

**दिपक पुजारी :-**

मॅडम स्पेसिफिक कुठले असेल तर आपण जर माहिती दिली...........

**निलम ढवण :-**

प्रशासन काय करत आहे, प्रशासनाला माहिती नाही. एवढे कोणी वेडे नाहीत. प्रत्येक गोष्टी आम्ही जर निदर्शनास आणुन दिल्या की पुन्हा सांगायचे मी जाहिरपणे बोलते पुन्हा सांगायचे की सेटींग करण्यासाठी यांनी हा विषय काढला. म्हणून आम्ही सगळ दाखवून दिल्यानंतर प्रशासन करणार का तेही पूर्णपणे करत नाही, का करत नाही? सगळीकडे अंधाधुंद कारभार चालू आहे. विकासाची जर कामे पाहिजे असतील तेव्हा निधी नसतो.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, आपण जो प्रश्न विचारलेला आहे काही माहिती आपणांस दिलेली आहे. याच्यामध्ये प्रभागनिहाय जे अतिक्रमण आढळून येतात जी माहिती देतात. त्याची रजिस्टरला नोंद केली जाते. पुढे त्याच्यावर वॉर्ड ऑफिसर कारवाई करतात.

**निलम ढवण :-**

कुठच्याही वॉर्डला अशी तुमच्याकडे नोंदवही नाही. साहेब जरा माहिती घ्या.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

नोंदवही ठेवलेली आहे............

**निलम ढवण :-**

जेवढ्या तक्रारी येतात त्या तक्रारींवर कारवाई का होत नाही. अशा तक्रारीवर की खरोखर तिथे रोड वाईंडींगमध्ये गेले आहेत. महानगरपालिकेच्या सहमतीने ते रोड वाईंडींगचे काम केलेले आहे किंवा तिथे वाढविलेले आहे. त्यांना त्रास द्यायला त्यांचे तोडायला गेले होते.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

तो रोड वाईंडींगचा वेगळा विषय आहे.

**निलम ढवण :-**

मला तेच म्हणायचे होते की त्यांच्यावर कारवाई करायला जायला होते. परंतु अशा पध्दतीने २-२, ३-३ मजले उभे राहतात त्यांच्यावर कारवाई का होत नाही.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

नोंदवही जी आहे ती प्रभाग निहाय ठेवलेली आहे. त्यात काही कमतरता असेल तर...........

**निलम ढवण :-**

बरीच हॉटेलांची कारवाई करायला घेतलेली होती. त्याच्यावर काय झाले? इललिगल सर्व हॉटेल होती ती सगळी मध्ये घेतली होती ती का थांबली?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मॅडम तुम्ही स्पेसिफिक माहिती असेल ती विचारली तर आम्हाला सांगता येईल.

**निलम ढवण :-**

साहेब सर्व तुम्ही सांगितले तर प्रशासन काय करणार.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

प्रशासन कारवाई करत आहे.

**निलम ढवण :-**

काय करत आहे. आपल्या मर्जीतले नसतील ते करायचे आणि मर्जीच्या बाहेरचे असतील त्यांच्यावर काहीतरी थोडीशी थातुरमातूर कारवाई करायची, हेच चालले आहे का?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

असा काही प्रकार नाही.

**निलम ढवण :-**

नाही कशाला सर्वांच्यासमोर हा प्रकार आहे. साहेब तिथे बसून जरी तुम्ही नाही म्हणत असतील ह्या सगळ्या गोष्टी समोरच्या आहेत. नियम लावायचे असतील तर सर्वांना सारखे लावा.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

अतिक्रमण विभागाच्या कामामध्ये काही कमतरता असेल त्याच्यात नक्की दुरुस्ती केली जाईल.

**निलम ढवण :-**

जास्तीत जास्त कमतरता आहे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

प्रश्न विचारले त्याची अतिरिक्त माहिती आम्ही सभागृहाला पुढच्या वेळी देऊ.

**निलम ढवण :-**

ज्यांच्यावर कारवाई केली म्हणून त्यांनी दिलेले आहे. ती बांधकामे परत जाऊन बघावी. जर परत झालेली असतील तर परत त्याच्यावर कारवाई करा. नियम सर्वांसाठी सारखे ठेवा.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो निलम ढवण मॅडमच्या प्रश्नाला प्रशासनाने उत्तर दिलेले आहे. बाकी इतर डिटेलमध्ये जात नाही ताईने जे स्पष्ट केलेले आहे. त्या उत्तरामध्ये महापौर मॅडम प्रभाग क्र. ६ निदर्शनास आलेले बांधकाम शुन्य आणि निष्काशीत केलेली बांधकामे २००० अधिकृत बांधकामे केली की काय निष्काशीत नक्की काय आहे. महापौर मॅडम अशाप्रकारे हे प्रशासन आणि पालिकेचे काम आहे. फक्त काय करायचे. नगरसेवकांनी इथे येऊन फक्त टाहो फोडायचा कधी फेरिवाल्यांच्या विरोधात कधी अनधिकृत बांधकामाच्या विरोधात कधी लॉजिंग बोर्डिंगजच्या विषयात मॅडम आपके सुध्दा एक इंटरव्ह्यू वाचला. शहरामध्ये वाढलेले लॉजिंग बोर्डिंग्ज कारवाईच्या बाबतीत मध्यंतरी कारवाई चालू होती. आता त्याचे पूढे काय झाले? परवा एस.के.स्टोनच्या बाजूला कुठेतरी लॉजिंग बोर्डिंग्ज आहे आणि डान्सबार आहे. ठाण्याचे एस.पी. डॉ. राठोड नविन आलेले आहेत यांनी त्याच्यावर कारवाई केली आणि संपूर्ण आतमध्ये अनधिकृत बांधकामे. त्यांनी निर्दशनास आणून दिले परंतु प्रशासनाने त्यांची इच्छा होत नाही ह्या विरोधात कुठची कारवाई करायची. आज शहराचे नाव त्यामुळे किती बदनाम होत आहे. कधी हे लॉजिंग बोर्डिंग्ज असतील कधी तुमचे बी.पी.ओ. सेंटर असतील आणि हा किती निष्काळजीपणा अनधिकृत बांधकामे काहीच नाही. ६ नंबर प्रभाग किती मोठा आहे. पूर्ण हायवे पट्टा सर्वांत जास्त अनधिकृत बांधकामे मला वाटते ६ नंबर मध्येच आहेत. आणि मला वाटते एक महापालिकेने निवृत्त अधिकारी नेमलेले होते. राज्य शासनाचे ह्या सर्वांवर कारवाई करण्यासाठी त्याचे ह्याबाबतीत रिपोर्ट कुठे आहेत. साहेब तुम्ही माहिती ह्यानंतर द्या ज्यावेळी सभागृहामध्ये जनरल बॉडीमध्ये एखादा प्रश्न एखादा सदस्य विचारतो त्यावेळी ती माहिती फक्त त्या सदस्याला मिळणे अपेक्षित नसते. आज जे ९५ नगरसेवक आहेत शहराच्या दृष्टीकोनातून ते प्रश्न असतात प्रत्येकाशी त्यांच्या प्रभागामधले वॉर्डमधले असतील हे निगडीत प्रश्न असतात. त्यामुळे सर्वांना त्याचे उत्तर मिळणे अपेक्षित आहे. म्हणून महासभेमध्ये प्रश्न विचारले जातात. ढोबळ उत्तर देऊन काही फायदा नाही. मॅडम माझी ह्या अनुषंगाने एक लक्षवेधी आहे तुम्ही घेणार असाल तर मी चर्चा करत नाही कारण आज मला वाटते दोन लक्षवेधी आलेल्या आहेत. नाहीतर मी थोडक्यात बोलतो तुम्ही घेणार असाल तर हरकत नाही. शहराचा प्रश्न आहे.

**दिपक पुजारी :-**

प्रभाग ६ ची जी माहिती आहे निदर्शनास आणलेली बांधकामे फिगर चुकून द्यायची राहिलेली आहे मी तुम्हाला देतो.

**निलम ढवण :-**

प्रभाग ६ नाही साहेब मी पर्टिक्युलर एका प्रभागासाठी नाही बोलत आहे. प्रभाग ६ ची तर नाहीच आहे. परंतु इतर प्रभाग कुठे आहेत? कुठली माहिती योग्य मिळाली आहे? इथे सरळ उत्तर दिलेले आहे. कुठचा प्रश्न आहे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मागील ५ वर्षापासून मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झाली असून प्रभाग अधिका-यामार्फत अनधिकृत बांधकामांची माहिती बाबत नियमानुसार ठेवण्यात येणारी नोंदवही ठेवण्यात आली आहे का? त्याला उत्तर आहे प्रत्येक प्रभाग निहाय नोंदवही ठेवण्यात आली आहे.

**दिपक पुजारी :-**

त्याच्या नोंदवह्या ठेवलेल्या आहेत.

**निलम ढवण :-**

ठेवली आहे?

**दिपक पुजारी :-**

ठेवलेली आहे. आपल्याला त्याआधारेच माहिती दिलेली आहे. मागील ५ वर्षांची.

**निलम ढवण :-**

साहेब जरा चेक करा.

**दिपक पुजारी :-**

आपल्याला दाखवून देऊ.

**निलम ढवण :-**

कुठेही नोंदवही नाही आहे आणि त्या नोंदवहीमध्ये जेवढी झालेली आहेत त्या बांधकामाची लिस्ट त्याच्यात नाही. आणि जी बांधकामांना अभय देण्यासाठी कोणी जवळचे असतील बाकी काही असेल तर त्यांना ताबडतोब स्टे मिळण्यासाठी तेवढी वेळ दिली जाते आणि त्यावर स्टे घेतला जातो. काहीवेळा त्यांना सुचना दिल्या जातात की २-३ दिवसांचा गॅप देतो एवढे याच्यात तुम्ही त्यांना स्टे घ्या म्हणून हे काम प्रशासनाचे आहे का?

**दिपक पुजारी :-**

आपण जिथे स्टे दिलेले आहेत किंवा कोर्टमॅटर आहे तिथे विधी अधिकारी यांच्यामार्फत आपण कोर्टाच्या अंडर टेकींग दिलेले आहेत. ड्यू प्रोसेस ऑफ लॉ मुळे बऱ्याच ठिकाणी ते दिलेले आहे.

**निलम ढवण :-**

मग आता १०-१० वर्ष का ते स्टे उठत नाही.

**दिपक पुजारी :-**

आता जी आपण कारवाई केलेली आहे ड्यू प्रोसेस ऑफ लॉ आपण पूर्ण केलेले आहे. २६० ची नोटिस देऊन आणि कारवाईसाठी आपण आता पावसाळ्यानंतर हाती घेत आहोत.

**निलम ढवण :-**

साहेब काय उत्तर देत आहात पावसाळ्यानंतर हाती घेत आहेत. इतक्या वर्षात ८-८, १०-१० वर्षांची जी मोठमोठ्या बलाढ्य बिल्डींग झाल्या आहेत. त्यांच्यावर स्टे घेऊन त्यांना इलेक्ट्रीसिटी बाकीच्या टॅक्स पावत्या सगळ्या गोष्टी तिथे झालेल्या आहेत त्याला जबाबदार कोण?

**दिपक पुजारी :-**

स्टे जिथे मिळालेले आहेत ते व्हॅकेंट करण्यासाठी आम्ही................

**निलम ढवण :-**

इतकी वर्ष का झाले नाही. त्याचा पाठपुरावा प्रशासनाने केला नाही का? की त्यांना अभय द्यायचे आहे.

**दिपक पुजारी :-**

मागील दीड वर्षापासून आम्ही सतत पाठपूरावा करत आहोत. बऱ्याच याच्यामध्ये आपण ऑन ड्यूटी केस सुध्दा दिलेल्या आहेत. ड्यु प्रोसेस ऑफ लॉ करतो त्याची स्टे व्हॅकेंट केलेले आहे.

**निलम ढवण :-**

काही ठिकाणी मॅडम अनधिकृत इमारत बनलेली आहे. एका वॉर्डमध्ये आणि दुसऱ्या वॉर्डातुन प्रभागातुन त्यांना टॅक्स पावती लावून दिली गेलेली आहे. हे निदर्शनास आणून देखील त्यांच्यावर अद्यापी कारवाई झाली नाही याला काय म्हणायचे. फक्त इथे येऊन आम्ही बोलायचे इथे तुमच्या निदर्शनास आणून द्यायचे हे पण काम आपण करायचे परंतु प्रशासनाने त्याची गंभीर दखल घेऊ नये. याच्यासारखे दुर्देव ह्या मिरा भाईंदरमध्ये नाही.

**मा. महापौर :-**

निलम ढवण मॅडमला सर्व माहिती देऊन टाका.

**निलम ढवण :-**

माहिती नाही मला कारवाई पाहिजे. आणि यापुढे कुठेही एखादे अनधिकृत बांधकाम होणार नाही याची काळजी प्रशासनाने घ्यावी. नसेल तर त्यांच्यावर गुन्हे दाखल करा. ज्या सगळ्या बिल्डींग आहेत त्यांना नाहीतर ते लहान सहान लोकांवर कारवाई करायला जातील आणि मोठे असेच मोकाट सुटतील. ते आम्ही चालू देणार नाही. आणि याची खरी सत्य माहिती द्या. पुढच्या महासभेत सर्व माहिती मला यांनी

द्यावी. खरी माहिती महासभेसमोर ठेवावी किती याच्यावर कारवाई केली किती लोकांवर आजपर्यंत स्टे दिलेले आहेत प्रशासनाच्या मदतीने स्टे घेतलेले आहेत ते किती काढले आणि त्याच्यावर काय कारवाई केली याची माहिती पुढच्या महासभेत देण्यात यावी अशी आपणांस विनंती आहे.

**मा. उपमहापौर :-**

ताई आपल्याला माहिती दिलेली आहे. अपेक्षित माहिती अतिक्रमण विभागाकडून आपणाला मिळणार आहे. आपले जे दुखणे आहे ह्या सभागृहात त्या प्रत्येक नगरसेवकांचे दुखणे आहे. कुसेकर साहेब आपल्याला विनंती आहे आणि पुजारी साहेब आपण अतिक्रमणचे प्रमुख आहात निदान जी जुनी कामे झाली आहेत त्याच्यावर तुम्ही कारवाई करण्यात येईल असे बोलतात एवढे तर लक्षात ठेवा की मोकळ्या जागा तिथे आता इललिगल कामे होऊ देऊ नका कारण आपल्या चुकीमुळे ही कामे होत असतात. जो दुरुस्ती करतो एखाद्याचे तुटफुट झाले तो करत असेल तर त्याला जाऊन त्रास देतात. परंतु नव्याने जे बांधकाम होतात त्याच्या ह्या शहरावर अतिरिक्त ताण पडतोय ते होऊ देऊ नका आणि असा प्रश्न आल्यानंतर आपली तयारी नसेल तर दुर्भाग्य आहे. आम्ही लोकप्रतिनिधी प्रश्न विचारलेला आहे तेव्हा प्रशासनाकडून आम्हाला अपेक्षित होते की आपल्याकडे पूर्ण उत्तर तयार पाहिजे होते. त्याच्यानंतर ह्या गोष्टी आपण व्यवस्थित सांभाळून घ्या आणि ते करा नाहीतर मग सभागृहासमोर प्रश्न आहे मग तुमची तयारी नाही का? किंबहुना त्या डिपार्टमेंटचे जे इन्चार्ज असतील किंवा सचिव महोदय असे प्रश्न असतील ते आपण त्या-त्या डिपार्टमेंटच्यापर्यंत पोहचवा आणि त्यांना पूर्ण ह्या विषयाची तयारी करायला सांगा.

**निलम ढवण :-**

धन्यवाद साहेब.

**नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ संपलेली आहे. आजच्या महासभेसाठी दोन लक्षवेधी प्राप्त झालेल्या आहेत. पहिली लक्षवेधी अनिल सावंत यांची आणि दुसरी लक्षवेधी प्रशांत दळवी यांची आहे. दोन्ही लक्षवेधी मी मा. महापौर यांच्याकडे सुपुर्त करतो.

**मा. महापौर :-**

प्रशांत दळवी यांची लक्षवेधी मी घेत आहे.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने मी बोलतो प्रथमतः आपण माझी लक्षवेधी स्विकारली त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो. आयुक्त महोदय, उपमहापौर साहेब, महापौर मॅडम आज दि. २६/७/२०१८ रोजी झालेली बैठक त्यानंतर आजची बैठक त्याही वेळेला आपण सभागृहाचे लक्ष वेधण्याकरिता फेरिवाल्यांची समस्या आपण बघितलेली आहे आणि म्हणून रस्त्यावरील फेरिवाले अतिक्रमण हटविण्याबाबत आपण विषय घेतलेला होता. त्याही वेळेला मिरा भाईंदरला भेडसावणारी ही अत्यंत ज्वलंत असा हा प्रश्न आम्ही सभागृहामध्ये पोटतिडकीने मांडला होता. त्याही वेळेला इंतभुत माहिती आयुक्त महोदयांनी दिली होती. आज उपायुक्त आहेत, आयुक्त महोदय रजेवर आहेत. उपायुक्त साहेब मी आपल्या निदर्शनास आणु इच्छितो तो आज अडतीस दिवस झाले. मी आपणाला विनंती केली होती आपण ज्या-ज्या वेळेला मिरा भाईंदर शहराला जे भेडसावणारे प्रश्न आहेत फेरिवाल्यांचा त्याबाबत आपण काय कारवाई करत आहात. महापौर मॅडम गेल्या दि. ३१/७/२०१८ रोजी मी यांना पत्र दिले ३ पानी मी यांना वेळोवेळी सांगत आलो की आजपर्यंत ह्या सभागृहामध्ये ९ ते १० वेळा मी लक्षवेधी मांडलेली आहे. ८४ वेळा पत्रव्यवहार केलेला आहे. महापौर मॅडम, आयुक्त महोदय यांना ह्या प्रश्नाची जाणीव नसावी. सभागृहामध्ये गेल्या महासभेमध्ये सर्व सन्मा. सदस्य एवढ्या पोटतिडकीने बोलत होते ते ह्या शहराला अत्यंत ज्वलंत असा प्रश्न आहे. ज्या रस्त्यावरती नो हॉकर्सचे फलक लावण्यांत आले. महापौर मॅडम परंतु त्या फलकाच्या बाजुलाच आयुक्त साहेब फेरिवाल्यांनी अतिक्रमण केलेले आहे. मग हे फलक आपण लाखो रुपये खर्च करुन का लावतो. महापौर मॅडम आयुक्त महोदय आपणास कल्पना असेल की मी त्याही वेळेला विनंती वजा ईशारा दिला होता परंतु मी आज तुम्हाला ठणकावून ह्या सभागृहामध्ये सांगतो मी आता रडणार नाही तर लढणार आहे. कारण आता रडण्याचे दिवस नाही आणि म्हणून हे जे प्रशासनाने गेंड्याची कातडी परिधान केलेली असेल तर ह्या प्रशासनाला कसे वठणीवर आणायचे आणि ह्या जनतेसमोर जनतेच्या सामोरे कसे जायचे सदस्य म्हणून मी त्या सभागृहामध्ये आणि ज्या मतदारांनी मला निवडून दिले त्या मतदार संघात फिरून वावरुन दाखविणार आहे. आयुक्त महोदय आपणांस कल्पना नसेल ३०-३० दिवस महापौर मॅडम पत्र देऊन झाल्यानंतर एखाद्या सदस्याला पत्राचे उत्तर देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे की नाही? आयुक्त महोदय मी आपल्याशी बोलत आहे. मी आज लक्षवेधी टाकलेली आहे. ती लक्षवेधी वाचली असेल मला ठाऊक नाही. तुम्ही वाचली असेल किंवा नाही वाचली असेल परंतु मला एक कल्पना आहे की ज्या-ज्या

वेळेला मी लक्षवेधी टाकायचो गेल्यावेळेला गेल्या ५ वर्षांमध्ये त्यावेळेला तत्कालीन नगरसेवक आदरणीय आमदार यांची पण लक्षवेधी होती. एखाद्या लोकप्रतिनिधी आमदाराला सभागृहामध्ये नगरसेवक म्हणून लक्षवेधी मांडावी लागते याच्यापेक्षा दुर्भाग्य असे काय आणि म्हणून महापौर मॅडम, आयुक्त महोदय तुम्हाला मी तत्कालीन नगरसेवक आमदारांनी टाकलेली लक्षवेधी वाचून दाखवतो. म्हणजे हे प्रशासन आमदारांची कशी दिशाभूल करत आहे ते बघा. अनधिकृत फेरिवाल्यांवर कारवाई करण्याबाबत दि. ७/५/२०१६ रोजी आमदार तत्कालीन नगरसेवकांची लक्षवेधी आहे. पण लक्षवेधीमध्ये म्हणत आहेत की मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात विविध प्रभागात फेरिवाले वाहतुक कोंडीच्या विषयाबाबत नागरिकांच्या तसेच सन्मा. सदस्य यांच्या मोठ्याप्रमाणे समस्या आहेत. ह्या समस्येचे निराकरण होत नसल्या कारणाने समस्या सदस्यांना जनतेच्या रोशास सामोरे जावे लागत आहे. याबाबत सन्मा. सदस्यांनी वेळोवेळी महासभेत आवाज उठवून देखील प्रशासनाने त्याची कोणती प्रकारे दखल घेतलेली नाही. महापालिका प्रशासनाने फेरिवाला विरुध्द कारवाई करण्याचे लेखी आश्वासन देऊन देखील कारवाई होत नसेल समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याने सन्मा. सदस्यांमध्ये तीव्र नाराजी पसरलेली आहे. तसेच नागरिकांच्या समस्या त्यांची कामे होत नसल्याने सन्मा. सदस्य त्यांना उत्तर देणे अवघड होत आहे. महापालिका प्रशासनाने फेरिवाला विरुध्द कारवाई करण्याचे लेखी आश्वासन देऊन देखील रस्त्यावरील अतिक्रमण हटविणेबाबत आवश्यक ती कारवाई होत नसून ह्याबाबत महापालिकेचे आयुक्त हे भाजपाची दिशाभूल करत असल्याने सन्मा. सदस्यांचा गंभीर आरोप आहे. असे असुन देखील याबाबत सदस्यांना दिलेल्या आश्वासनाप्रमाणे या विषयावर योग्य ती कारवाई करुन सन्मा. सदस्यांचे निवारण करावे. याकरीता मी लक्षवेधी मांडत आहे. शरमेची बाब आहे. महापौर मॅडम तत्कालीन नगरसेवक सध्या मिरा भाईंदर शहरामध्ये आमदार असलेले मा. नरेंद्रजी मेहता यांची लक्षवेधी दि. ७/०५/२०१६ ला दिलेली आहे. अक्षरशः लोकप्रतिनिधी म्हणून ह्या सभागृहात बसुन ह्या सभागृहाचे लक्ष वेधुन वारंवार ज्या-ज्या लक्षवेधी टाकल्या गेल्या जे-जे पत्रव्यवहार केला गेला त्या-त्या वेळेला ह्या पत्रकाराने त्याला वाचा फोडलेली आहे. आपल्याकडे फक्त पत्रकारांचे पेपरमध्ये काही बातम्या छापुन आल्या की त्यांच्या कटींग कशा रजिस्टरमध्ये जपवून ठेवाव्या हे काम प्रशासन करत आहे. त्यांचे कधी कोणते वाईट परिणाम होतील याच्याकडे लक्ष दिले नाही. मी फक्त माझा वॉर्डपुरता महापौर मॅडम बोलत आहे. अशातला भाग नाही. आज महापौर मॅडम तुम्हाला सांगु इच्छीतो गेल्या दोन वर्षांपूर्वी आपण सोमवार बाजार बंद करण्याचा ठराव झाला होता. आयुक्त साहेब आपल्याला त्याची जाणीव असेल. उपमहापौर साहेब ह्या ठरावाची अंमलबजावणी होणार नसेल तर आपण ह्या सभागृहामध्ये सन्मा. सदस्यांनी यायचे ठराव करायचे सुचक अनुमोदक द्यायचे आणि जर ते ठरावच होणार नसतील ठरावाची अंमलबजावणी होणारच नसेल तर ह्या सभागृहात लोकप्रतिनिधी म्हणून का वावरायचे. आयुक्त महोदय एक शेवटचे सांगतो. महापौर मॅडम ह्या ज्या लोकप्रतिनिधींना आयुक्त महोदयांना प्रशासनाला जर उत्तर देता येत नसेल तर त्यांनी राजीनामे द्यावेत. मी यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहे. महापौर मॅडम एखाद्या लोकप्रतिनिधींनी किती वेळा यांच्याकडे फेऱ्या मारायच्या. महापौर मॅडम त्याच्याही पूढे जाऊन सांगतो. जैन समाजाचे सेक्टर झोनला एक देऊळ आहे तो देवळातला रस्ता शांतीनगर हे एकमेव वसाहत आहे. तिथे शांतीनगर ही फार मोठी शाळा आहे. १० वी पर्यंतची शाळा आहे. त्या शाळेचा दर्जा एवढा उत्तम आहे की जिथे एस.सी.सी. चा रिझर्ल्ट वर्षानुवर्षे १०० टक्के लागत आलेला आहे. त्या रस्त्यावर ये-जा करणाऱ्या लहान मुलांना पालकांना त्या गाडीवाल्यांचा नाहक त्रास होत आहे. आयुक्त महोदय एवढ्या मोठ्या गरम कढईमध्ये गरम तेल असते. ज्या-ज्या वेळेला आपले पालिकेचे अधिकारी तिकडे फक्त देखावा निर्माण करण्याकरिता ती जी गाडी फिरवतात त्या-त्या वेळेला तो फेरिवाला मागे पुढे कसली ही शहानिशा न करता आपली गाडी त्या ठिकाणाहून पळवत असतो. आणि पळवताना सोसायटीच्या आवारात जिथे जागा मिळेल तिकडे रस्त्यामध्ये जे कोणी पालक वर्ग असतील जे कोणी विद्यार्थी असतील त्यांना धक्का मारुन आयुक्त महोदय मी तुम्हाला एक प्रश्न विचारतो की, तो जर तेलाचा डाग किंवा ते जर तेल कोणावर सांडले गेले तर त्याला जबाबदार कोण? आणि म्हणून महापौर मॅडम अशा जर घटना घडत असतील तर अशा अधिकाऱ्यांवरती गुन्हा दाखल करा. माझी ती मागणी आहे. कारण एवढ्या गेंड्याची कातडी परिधान केलेली आहे. सभागृहात एवढ्या वेळोवेळी बोलून सुध्दा यांना त्याची जराही जाणीव होणार नसेल आणि जर कारवाई करणार नसेल एखादा फेरिवाला आपण एवढे वर्ष बोलत होतो. आमच्याकडे पोलीस प्रोटेक्शन नाही. पोलीस प्रोटेक्शनची मागणी करतो पण पोलीस आपल्याला पोलीस प्रोटेक्शन देत नाही. त्याच्यानंतरही आपण बाऊंसर ठेवले गेले. आज प्रत्येक वॉर्डनिहाय बाऊंसर आहेत. परंतु आयुक्त महोदय यांची जराही दखल घेतली जात नाही. आपण कधी बघितले का सभागृहामध्ये येऊन त्या एरियामध्ये येऊन खरोखर एखाद्या लोकप्रतिनिधी जो एवढा पोटतिडकीने जर बोलत असेल तर आपण तिकडे येऊन फिरुन बघावे ना. रस्ते १०० मीटरचे

आहेत. ६-६ फुट दोन्ही बाजुने व्यापलेले आहे मध्ये हातगाड्या चालतात, रिक्षावाले चालतात, दुपारी शाळेच्या वेळेला शाळेच्या बसेस येतात. तर आयुक्त महोदय अशा वेळेला तिथे पादचारी लोक जी काम धंद्यावरुन येतात त्यांनी कुठून चालायचे आणि म्हणून महापौर मॅडम ह्या विषयाची गंभीरपणे परत पुन्हा एकदा आपण दखल घ्यावी. ह्या शासनाला काटेकोरपणे पालन करायला सांगावे. मी जास्त ह्या विषयावर बोलणार नाही परंतु आम्हाला कायदा हातात पण नाही घ्यायचा आहे. मी परत एकदा सभागृहाला विनंती करतो आयुक्त महोदय ह्या विषयावरती मला तुमच्याकडून हवे आहे. आणि आपणही त्याठिकाणी आयुक्तांनाही घेऊन यावे आणि बघावे तिकडची काय परिस्थिती आहे. ह्या ठिकाणी महापौर मॅडम माझी लक्षवेधी स्विकारली आणि आपणही ह्या विषयात निवेदन करावे अशी आशा व्यक्त करतो. धन्यवाद.

**हेतल परमार :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने याबाबतीत एक गोष्ट बोलायची आहे. निवडून एक वर्ष व्हायला आले आहे. एक वर्षात आम्ही ४-५ पत्र टाकलेली आहेत. आतापर्यंत एकही उत्तर आलेले नाही. काही कार्यवाही होत नाही. होते तर फक्त एवढीच होते की इथे येतात दाखवतात आणि त्यांना अगोदर माहित पडते नेहमीप्रमाणे की येणार आहेत म्हणून ती लोक ऑलरेडी सेफ होऊन जातात. तेच नुसते चालत येते. आम्ही नविन आहोत लोकांना आमच्याकडून काही अपेक्षा आहे. आणि आम्हाला तुमच्याशी अपेक्षा आहे की तुम्ही काहीतरी तिथे चांगले दाखवाल तर आमचेही नाव होणार. तुमचेही होणार आणि सर कालची एक गोष्ट तुम्हाला सांगायची आहे. काल फेरिवाले कोणी २५ लोक आले सेक्टर २ आणि एकच्यामध्ये तिथे खुप मोठे भांडण झाले. आम्हाला फोन येत आहे आणि काय करायचे आम्ही तिथे जायचे?

**निलम ढवण :-**

तो मिरारोडचा विषय आहे नवघर पट्ट्याची पण सेम परिस्थिती आहे. आम्हाला तेच सांगायचे आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

ह्या इतिहासात आजपर्यंत कधी ना होती ती फेरिवाल्यांची परिषद त्या विषयासाठी आपण आयोजित केलेली होती. त्यादिवशी प्रत्येक नगरसेवकाने आपली मते मांडली होती. प्रशांत दळवी साहेब आपण जो विषय मांडला त्या विषयावरती आपण ह्या सभागृहात हजर होते. त्या विषयामध्ये प्रशासनाकडून म्हणजे आपण गंभीर आहोत नाहीत अशातला प्रश्न नाही तर ह्या महाराष्ट्राच्या इकडचा हायकोर्टचा, राज्य शासनाचा प्रस्ताव आहे. त्याच्यावरती फेरिवाला समिती नियुक्त करणाच्या कारवाईला सुरुवात केलेली आहे. प्रत्यक्ष कामकाज सुरु आहे. मागच्या सभेत ते निवेदन केले होते की, आपण दोन जागा ह्या शहरामध्ये जे नाले आहेत त्या नाल्यांवरती किंवा मोकळ्या जागा आहेत त्याठिकाणी शेड उभारुन आपण जेवढे लोक ॲडजस्ट करतील ते करु. आपले पुढचे धोरण असेही असणार आहे की हा सर्व्हे झाल्यानंतर शहराच्या बाहेरुन तुम्ही दोन्ही स्टेशनला पाहिले तर मोठ्या प्रमाणात वसई विरारपासून डहाणू पासून, भिवंडी, अंधेरी, डोंगरी, ठाणे अशा विविध परिसरातून बाहेरचे फेरिवाले येत असतात. आणि ते इथे फेरिचा व्यवसाय करुन जात असतात. फेरिवाल्यांच्या ठिकाणी रहदारीला, वाहतुकीला सगळ्याला अडथळा आहे. काही लोकांना पुसण्याचे सांभाळण्याचे काम देखील त्यांच्याकडून केले जाते. परंतु आपण आता अंतिम चरणामध्ये आहोत. काही १५-१ स्पॉट आपण महिन्याभरात डिक्लेअर करणार आहोत. कुठे बसवता येईल. आपल्या निदर्शनास तसे काही असेल तेही करु आणि प्रशांत दळवी यांनी आणखीन एक सुचना केली की ह्या संबंधीत वॉर्ड ऑफिसरने ती गोष्ट लक्षात घ्यावी की नेमकी कुठची गाडी आहे. शाळेच्या मुलांना जर त्रास होणार असेल तर त्याठिकाणी कारवाई करावी. आमचे आपल्या सर्वांचे धोरण नक्की आहे की आपल्याला फेरिवाल्यासाठी नियोजीत जागा ज्या आहेत त्या द्यावयाच्या आहेत. आपण ज्या पध्दतीने कामकाज सुरु आहे. मला वाटते लवकरच एक चांगला लोकप्रिय असा निर्णय ह्या मिरा भाईंदरमध्ये होणार आहे. अजूनही काही स्पॉट आपण शोधत आहोत. तो लोकप्रिय निर्णय याच्यासाठी असेल ही लक्षवेधी याच्यामध्ये प्रश्नोत्तराचे काही कारण नाही. अनिल सावंत साहेब आपल्याकडून एक लक्षवेधी होती. लक्षवेधीमध्ये आपण जो उल्लेख केलेला आहे की त्या ग्रीन वूड इमारतीचा त्याच्याबाबतीत महापालिकेच्या अधिकारी, पोलिसांनी, अग्निशमन दलाने फार प्रभावी भुमिका घेतली. आपले बरेच लोकप्रतिनिधी त्याठिकाणी पोहचले. तातडीने त्या लोकांना खाली करुन घेण्याचा त्यांना राहण्याची व्यवस्था करुन देण्याचा, राहण्याची जेवणाची आणि गाद्यांची सोय करुन दिली होती. त्यात २० लोक ओनर होते. ८० पैकी ६० जण भाडेकरु होते. भाडेकरुंना देखील आज आपण अकोमट केलेले आहेत. आणि २० लोक जे ओनर आहेत त्यांनाही अकोमेट केलेले आहे. भाडेकरु यांना आपण सांगितले आहे की तुम्ही तुमची व्यवस्था करुन तुमच्यासाठी निवारा शोधावा आणि १५ दिवसांमध्ये आपल्याला आय.आय.टी. चा रिपोर्ट

येणार आहे शनिवारपर्यंत निश्चित पणे ती बिल्डींग राहण्यासाठी किती पार्ट धोकादायक आहे हे होणार आहे. त्याच्यामध्ये ज्यांच्यावरती दोष येईल त्यांच्यावरती कारवाई महापालिकेमार्फत केली जाणार आहे. उद्या त्या इमारतीच्या डेलिगेशनला आयुक्त साहेबांकडे महापौर मॅडमकडे ११ वाजता बोलावण्यात आले आहे. त्यांच्यामध्ये ह्या विषयामध्ये चर्चा होणार आहे. प्रशासन आपली जबाबदारी पूर्ण ताकदीने निभावणार आहे.

**अनिल सावंत :-**

मा.श्री. प्रशांत दळवी यांनी जी लक्षवेधी मांडली महापौर मॅडम आता मला फोन आला होता नुपुरची गल्ली जिथे चर्च आहे, शाळा आहे. चालायला रस्ता नाही आता एक लहान मुलाचा ॲक्सीडन्ट झाला. फेरिवाल्यामुळे हातगाडीवाला ढकलत गाडी नेत होता. त्याने मुलीला उडवले तक्रार करुन करुन थकलो आम्ही.

**मा. महापौर :-**

आताच्या आता आयुक्तांनी तक्रार करावी.

**अनिल सावंत :-**

कारवाईला पाठवा उपमहापौर साहेब तुम्हाला ह्या शहराची चांगली जाण आहे. माझ्यामते साहेब आपल्याला उपाययोजना करणे गरजेचे आहे. शांतीनगरचा सेक्टर झोन ४ तुम्ही तो नाका बघाल त्याठिकाणी परिवहनच्या मिनी बसेस चालु करा. तसेच मच्छीमार्केट आहे. शबरी माता चौक आहे सेक्टर १ आणि २ तिथे तुम्ही महापालिकेच्या बसेस आहेत. ज्या टी.एम.टी चे सर्कल आहे तिथुन टन घेतात. त्यापुढे घेऊन टन करा म्हणजे काय होईल महापालिकेच्या बसेसची वर्दळ वाढली तर फेरिवाले ॲटोमॅटिक तेथुन उठतील. दुसरा महत्वाचा विषय असा आहे साहेब तुम्ही जो उल्लेख केलात हॉलीवुड कॉम्पलेक्सचा साहेब प्रशासन ह्या विषयाच्या बाबतीत गंभीर असले असते तर ही परिस्थितीच उद्‌भवली नसती. त्याठिकाणी मी जाऊन आलो. आपण जी लोकांना व्यवस्था करुन दिलेली आहे ते लोक अक्षरशः रडत आहेत. लोकांचे सर्व सामान बिल्डींगमध्ये आहे आणि लोकांना त्यांनी घातलेल्या कपड्यानिशी ती घरे खाली करावी लागली याला सर्वस्वी जबाबदार आपली महापालिका आहे. साहेब हा जबाबदारीने आणि गंभीरपणे मी आरोप करत आहे. आज त्या इमारतीची परिस्थिती जाऊन बघा. लोढा कॉम्पलेक्स, लोढा बिल्डरचे कन्स्ट्रक्शन फाईलिंग चालू आहे. त्या बिल्डींगच्या इमारतीला लागुन फाईलींग चालू आहे. साहेब लोढा बिल्डरवरचे जेवढे कंस्ट्रक्शन चालू असतील त्याच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे. तीन महिन्यांपूर्वी त्यांनी पत्र दिलेले आहे आणि प्रशासन बघत सुध्दा नाही.

**मा. महापौर :-**

उनपे कारवाई की जाए..............

**अनिल सावंत :-**

त्याच्यामुळे त्या फाईलींगमुळे त्या बिल्डींगला तडे गेलेले आहेत.

**मा. उपमहापौर :-**

आपण त्यांच्यावर कारवाई करणार आहोत.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम याला लागुन एक विषय आहे लक्षवेधी आली त्या अनुषंगाने बोलतो असा विषय नाही. ही परिस्थिती का उद्‌भवली प्रशासन साहेब अपल्याकडून आता आपण टाऊन प्लानिंग डिपार्टमेंट परमिशन देते. बिल्डींग तयार होते त्याचे प्लिंथ सर्टिफिकेटपासून सुरुवात होते. वेगवेगळ्या प्रकारचे त्यांना आपण सर्टिफिकेट देतो. पण त्याची खरी परिस्थिती तांत्रिक चाचपणी कोण करतो. साहेब मुंबईमध्ये इंग्रजांनी बांधलेल्या इमारती अजून उभ्या आहेत. आणि आपल्याकडच्या इमारती अशाप्रकारे कोसळतात आणि घेणाऱ्यामध्ये आपला शहराचा नागरीक हा विकासक पैसे घेऊन गेला त्याच्या ह्या अशा घाणेरड्या कृतीला बळी पडत आहेत म्हणजे आपल्याला याच्यामध्ये कुठेतरी सुधारणा................

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

उपमहापौर साहेब तुम्हाला सांगतो, एक लक्षवेधी आलेली आहे आणि आम्हाला ज्यावेळेला सदस्यांना संधी फक्त अशावेळेला एखादा विषय येतो त्याचवेळेला एक मिनिटासाठी आणि तो जर आपल्याकडून देत नसेल हा सदस्याचा अपमान आहे. महापौर मॅडम मी आपल्याला सांगतो की सगळे बोलत आहेत आमच्या सारख्याला एक मिनिट बोलायला देत नसाल ते अयोग्य आहे. नवघरच्या बाबतीमध्ये

१५ दिवसांपूर्वी फेरिवाल्यांच्याबाबतीमध्ये मी पत्र दिलेले आहे. तिकडे ठिकठिकाणी नवघर रोड कसा आहे उपमहापौर साहेब तुम्हाला माहित आहे. छोट्या छोट्या गल्लीमध्ये १०० शाळा आहेत. लहान लहान मुलांना चालायला जागा नाही. सगळे फेरिवाले..........

**मा. महापौर :-**

सभी जगह पे कारवाई करने को बोला है।

**दिनेश नलावडे :-**

प्रभाग अधिकाऱ्याला ज्यावेळी फोन करतो प्रभाग अधिकारी म्हणतात आम्हाला रोज फोन येतात. प्रभाग अधिकाऱ्यांना कोणाचे फोन येतात. इकडे प्रभाग अधिकाऱ्यांना बोलवा. आज नवघर रोडला लहान मुलांना चालायला जागा नाही. लहान मुलांना चालायला फुटपाथ खुले नाही, फुटपाथ कोणासाठी ठेवलेले आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

आपल्या इतिहासामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेत महापौर मॅडम आपण मिटींग बोलावलेली सकाळी ८ वाजता त्याचा परिणाम आम्हाला इकडे दिसला पाहिजे. सभा घेऊन चालत नाही. महापौर मॅडम तिथे विषय मार्गी लावा आणि त्याचा रिपोर्ट दर वर्षाला दाखवा.

**निलम ढवण :-**

मगाशी जो विषय यांनी काढला होता की बिल्डींग खचली होती त्याच्यावर काही सुचना देत आहेत. अशाप्रकारे जेव्हा जेव्हा आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये बिल्डींग खचतात किंवा त्यांच्यावर काही प्रसंग येतात त्यावेळी त्या लोकांना राहण्याची सोय किंवा आपत्कालीन जी व्यवस्था असते ती आपल्या मिरा भाईंदरमध्ये महापालिकेमार्फत अजून केलेली नाही. त्यामुळे त्यांना कुठेतरी हॉलमध्ये झोपवा. व्यवस्था कुठे ना कुठे करत आहोत असे तुम्ही मगाशी उत्तर दिले.

**मा. उपमहापौर :-**

व्यवस्था केली आहे. त्या दिवशी तातडीने त्यांना हॉलमध्ये राहायला दिले होते. आता त्यांना रहायची व्यवस्था केलेली आहे.

**निलम ढवण :-**

मला तेच सांगायचे आहे आता तुम्ही केलीत काही लोकांना सांगितले तुम्ही रुम बघा त्यानंतर त्यांची व्यवस्था मला म्हणायचे आहे महापालिके अंतर्गत आपण आपत्कालीन व्यवस्थेसाठी एखादी बिल्डींग किंवा काहीतरी अशी व्यवस्था काही रुम ठेवावेत जेव्हा जेव्हा अशा काही आपत्ती येतात त्या-त्या वेळी त्यांच्यावर हे करावे लागेल.

**मा. उपमहापौर :-**

हा चर्चेचा विषय नाही.

**निलम ढवण :-**

चर्चेचा विषय त्यांनी घेतला.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

लक्षवेधी घेतलेली नाही. तो महत्वाचा विषय होता चर्चा केली.

(सभागृहात गोंधळ)

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

रात्री १२ वाजेपर्यंत तुम्ही पण होते मी पण तीथे होतो. ज्या ठिकाणी मिनाताई ठाकरे सभागृह आपण बांधलेले आहे तिथे त्यांना गाद्यांची व्यवस्था नव्हती. जेवण नव्हते. १२ वाजता जेवण दिले. त्या सभागृहात तुम्ही पण होतो. त्याच्यानंतर आपण दुसऱ्या ठिकाणी व्यवस्था केली बोलता त्या ठिकाणी त्या बिल्डींगमध्ये लिफ्ट नाही, पाण्याची व्यवस्था नाही. त्यांना कपडे नाहीत, सर्व साहित्य त्यांचे रुममध्ये पडलेले आहे. मा. आमदार प्रताप सरनाईक साहेब स्वतः लागणाऱ्या वस्तु पुरवून गेले. मग महापालिकेला अधिकार काय आणि तुम्ही सांगतो व्यवस्था केली.

**मा. उपमहापौर :-**

कपडे पुरवण्याचे काम नव्हते.

(सभागृहात गोंधळ)

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

तुम्ही पण तिथे होते.

**मा. उपमहापौर :-**

मी होतो आणि सकाळी नाश्ता घेऊन आम्हीच गेलो होतो.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

गेले होते ही खरी गोष्ट आहे. पण तिथे आता अवस्था काय आहे बघितली का?

**निलम ढवण :-**

आपत्कालीन व्यवस्था केली पाहिजे. राहण्यासाठी व्यवस्था मिरा भाईंदरमध्ये केली पाहिजे.

**मा. महापौर :-**

आपके सभी रहिवासी मेरे पास आए थे। उनकी कल मिटींग है तो कल उसपर चर्चा होगी आप सब बैठ जाइए। सचिव पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५४, **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे . तसेच स्थायी समितीच्या सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागी प्रकरण २ कलम २३ अन्वये सदस्यांची नेमणूक करणे .** स्थायी समितीमध्ये निवृत्त होणारे सदस्यांची नावे आहेत १) श्री. धृवकिशोर मन्साराम पाटील २) श्री. हसमुख मो. गेहलोत ३) श्री. अशोक सुर्यदेव तिवारी ४) श्री. अनिल विराणी ५) श्रीम. मेघना रावल ६) श्रीम. अनिता ज.पाटील ७) श्रीम. दिप्ती शे. भट ८) श्रीम. वंदना वि. पाटील तसेच राजीनामे दिलेल्या सदस्यांची नावे आहेत १) श्री. सुरेश ज. खंडेलवाल २) श्री. प्रशांत ज्ञा. ग़ळवी ३) श्रीम. सय्यद नुरजहाँ न. हुसेन ह्या आठ निवृत्त होणाऱ्या सदस्याच्या जागी ५ भारतीय जनता पार्टीचे आहेत. ३ शिवसेनेचे आहेत आणि राजीनामे दिलेले सदस्य आहेत २ भारतीय जनता पार्टी, १ काँग्रेस लोकशाही आघाडी आणि त्या पक्षाच्या सदस्यांचे नावे त्यांच्या गटनेत्यांनी द्यायची आहेत. भारतीय जनता पार्टीच्या ७ सदस्यांची नावे प्राप्त झालेली आहेत. १) श्री. हसमुख गेहलोत २) श्री. धृवकिशोर मन्साराम पाटील ३) श्री. राकेश शहा ४) श्रीम. निला सोन्स ५) श्री. श्रीप्रकाश सिंग ६) श्रीम. वर्षा भानुशाली ७) श्रीम. वंदना पाटील. शिवसेनेच्या ३ सदस्यांची नावे प्राप्त झालेली आहेत. १) श्रीम. अनिता ज.पाटील २) श्रीम. दिप्ती शे. भट ३) श्रीम. वंदना वि. पाटील. काँग्रेस लोकशाही आघडीच्या १ सदस्याचे नाव प्राप्त झालेले आहे १) श्री. राजीव मेहरा. आता नावाचे वाचन केलेले आहे. सदस्य म्हणून अधिकृतरित्या एक ऑक्टोबर नंतर कार्यरत होतील आणि राजीनामा दिलेल्या सदस्यांच्या जागी जे सदस्य आलेले आहेत ते तातडीने लगेचच होणाऱ्या स्थायी समितीमध्ये उपस्थित राहू शकतात.

**प्रकरण क्र. ५४ :-**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे . तसेच स्थायी समितीच्या सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागी प्रकरण २ कलम २३ अन्वये सदस्यांची नेमणूक करणे.**

**ठराव क्र. ५५ :-**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०(३) अन्वये स्थायी समिती सदस्यांपैकी निम्मे (आठ) सदस्य माहे ऑक्टोबर २०१८ च्या पहिल्या तारखेस निवृत्त होत आहेत . करिता दि. २४/०८/२०१८ रोजीच्या स्थायी समितीमध्ये निम्मे आठ सदस्यांची नावे चिठ्ठी काढून निश्चित करण्यात आलेली आहेत . तसेच उर्वरीत आठ सदस्यांपैकी तीन सदस्यांनी आपल्या स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे.**

**निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये भारतीय जनता पार्टीचे ५ व शिवसेना पक्षाचे ३ सदस्य निवृत्त होत आहेत. तसेच भारतीय जनता पार्टी २ व काँग्रेस लोकशाही आघाडीच्या १ सदस्याने स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला आहे . मा. उपसचिव नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र . संकिर्ण२००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवि-२५, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या आठ व राजीनामा दिलेल्या दोन सदस्यांच्या जागी त्याच मान्यता प्राप्त पक्षाचे , नोंदणीकृत पक्षाचे , गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे**

**सर्वपक्षीय गटनेत्यांनी तौलानिक संख्या बळाप्रमाणे सदस्यांच्या नावाची शिफारस केलेनुसार निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०(५) अन्वये आठ सदस्यांची दोन वर्षासाठी व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २३ अन्वये राजीनामा दिलेल्या तीन सदस्यांच्या जागी उर्वरीत कालावधीसाठी तीन सदस्यांची नेमणूक करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पक्ष |
|---|---|---|
| 1 | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | भारतीय जनता पार्टी |
| 2 | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | भारतीय जनता पार्टी |
| 3 | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | भारतीय जनता पार्टी |
| 4 | श्रीम. निला बर्नाड सोन्स | भारतीय जनता पार्टी |
| 5 | श्री. श्रीप्रकाश सिंह (मुन्ना सिंग) | भारतीय जनता पार्टी |
| 6 | श्रीम. अनिता जयवंत पाटील | शिवसेना |
| 7 | श्रीम. दिप्ती शेखर भट्ट | शिवसेना |
| 8 | श्रीम. वंदना विकास पाटील | शिवसेना |
| 9 | श्रीम. वर्षा गिरधर भानुशाली | भारतीय जनता पार्टी (राजीनामा दिलेल्या सदस्याच्या जागी) |
| 10 | श्रीम. वंदना मंगेश पाटील | भारतीय जनता पार्टी (राजीनामा दिलेल्या सदस्याच्या जागी) |
| 11 | श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा | काँग्रेस लोकशाही आघाडी (राजीनामा दिलेल्या सदस्याच्या जागी) |

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५५, **महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत.** प्रकरण क्र. ५ साठी सदस्यांची नावे गटनेत्यांनी कृपया द्यायची आहेत. गोषवारा आपणांस दिलेला आहे. त्याप्रमाणे श्री. हसमुख गेहलोत, गटनेता, भारतीय जनता पार्टी यांनी महिला व बालकल्याण समितीवर १० सदस्यांचे नामनिर्देशन दिलेले आहे. १) श्रीम. दिपीका अरोरा २) श्रीम. वंदना भावसार ३) श्रीम. मेघना रावल ४) श्रीम. सुनिता जैन ५) श्रीम. शिंदे रुपाली वसंत (मोदी) ६) श्रीम. विणा भोईर ७) श्रीम. विविता नाईक ८) श्रीम. हेतल परमार ९) श्रीम. मिना कांगणे १०) श्रीम. सुजाता पारधी. शिवसेनेचे गटनेते श्री. हरिश्चंद्र आमगावकर यांनी महिला बालकल्याण समितीसाठी ३ सदस्यांची नावे दिलेली आहेत. १) श्रीम. अर्चना कदम २) सौ. कुसुम गुप्ता ३) सौ. हेलन जॉर्जी. श्री. जुबेर इनामदार काँग्रेस गटनेता काँग्रेस लोकशाही आघाडी यांनी महिला बालकल्याण समितीसाठी २ सदस्यांची नावे दिलेली आहेत. १) श्रीम. गीता परदेशी २) श्रीम. उमा सपार. महापौरांच्या मते मी ही नावे घोषित केलेली आहेत.

**प्रकरण क्र. ५५ :-**

**महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत.**

**ठराव क्र. ५६ :-**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३०(१) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणे आवश्यक असुन , महानगरपालिकेतील गटाच्या तौलनिक संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची तरतुद आहे. माता व बालकांच्या विविध कल्याणकारी योजना शासकिय धोरणाप्रमाणे राबविणे तसेच यासंबंधी नविन योजना सादर करून शासकिय धोरणाप्रमाणे कार्यान्वित करणे हे या समितीचे कार्यक्षेत्र राहिल.**

**महानगरपालिका सभा कामकाज नियमचे कलम ४ (ब) अंतर्गत महिला व बालकल्याण समिती सदस्य संख्या नऊ इतकी निश्चीत आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३०(१) अन्वये महानगरपालिकेस, वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून (महिला व बालकल्याण समितीसह) विशेष समित्यांची नेमणूक करता येईल अशी तरतुद आहे . मा. महासभा दि. १६/१०/२०१७, ठराव क्र. ०२ अन्वये महिला व बालकल्याण समिती सदस्यांची संख्या १५ इतकी निश्चित करण्यात आली आहे.**

**सर्वपक्षीय गटनेत्यांनी तौलानिक संख्या बळाप्रमाणे सदस्यांच्या नावाची शिफारस केलेनुसार महिला व बालकल्याण समितीवर खालील 15 सदस्यांची 1 वर्षाकरीता नियुक्ती करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पक्ष |
|---|---|---|
| 1 | श्रीम. दिपिका अरोरा | भारतीय जनता पार्टी |
| 2 | श्रीम. वंदना भावसार | भारतीय जनता पार्टी |
| 3 | श्रीम. मेघना रावल | भारतीय जनता पार्टी |
| 4 | श्रीम. सुनिता जैन | भारतीय जनता पार्टी |
| 5 | श्रीम. शिंदे रुपाली वसंत (मोदी) | भारतीय जनता पार्टी |
| 6 | श्रीम. विणा भोईर | भारतीय जनता पार्टी |
| 7 | श्रीम. विविता नाईक | भारतीय जनता पार्टी |
| 8 | श्रीम. हेतल परमार | भारतीय जनता पार्टी |
| 9 | श्रीम. मीना कांगणे | भारतीय जनता पार्टी |
| 10 | श्रीम. सुजाता पारधी | भारतीय जनता पार्टी |
| 11 | श्रीम. अर्चना कदम | शिवसेना |
| 12 | श्रीम. कुसुम गुप्ता | शिवसेना |
| 13 | श्रीम. हेलन गोविंद | शिवसेना |
| 14 | श्रीम. गिता ह. परदेशी | कॉग्रेस लोकशाही आघाडी |
| 15 | श्रीम. उमा वि. सपार | कॉग्रेस लोकशाही आघाडी |

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ५६, **महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत**

धृवकिशोर पाटील :-

**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणा ने त्या प्राधिकरणास ठरविता येईल अशारितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी ५ आणि जास्त १५ व्यक्तींची मिळून बनलेल्या एका वृक्षप्राधिकरणाची रचना करता येईल अशी तरतुद आहे.**

**तसेच प्रकरण २ चा नियम ३(३) अन्वये वृक्षप्राधिकरणेस ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींना वृक्षप्राधिकरणाचे सदस्य म्हणून नामनिर्देशित करुन घेता येईल . हे सदस्य वृक्षप्राधिकरण समिती ठरविल अशारितीने व मुदतीसाठी स्विकृत करण्यात आले पाहिजे. प्रकरण २ कलम ३ (२) नुसार वृक्ष प्राधिकरणाचा अध्यक्ष महानगरपालिका आयुक्त असतील अशी तरतुद आहे.**

**तरी वृक्ष प्राधिकरण समितीची मुदत व महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये महापालिका सदस्यांमधून 9 सदस्य संख्या व ३(३) अन्वये ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींमधून 2 सदस्य संख्या निश्चित करुन वृक्ष प्राधिकरण समिती तसेच प्रकरण २ कलम ३ (२) नुसार वृक्ष प्राधिकरणाचे अध्यक्ष महानगरपालिका आयु क्त असतील अशी 12 सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी व तौलानिक संख्येप्रमाणे पक्षाच्या संख्याबळाप्रमाणे समितीवर सदस्यांची नावे देण्यांत यावी. बिन सरकारी संघटनेचे सदस्य नियुक्तीची कारवाई होईपर्यंत शहरातील शासकीय संस्था उदा. जिल्हा वनअधिक्षक, वनपाल या कार्याती ल वृक्ष संर्वधन झांडाचे आरक्षण व जतन या संबधिचे ज्ञान असलेले सदस्यांची नियुक्ती करावी. जस-जसे बिन सरकारी संघटनेतून सदस्य नियुक्त होतील तस -तसे शासकीय सदस्य कमी करावेत असा मी ठराव मांडत आहे.**

हसमुख गेहलोत :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ५६ :-

**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत**

ठराव क्र. ५७ :-

**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनिय म १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरविता येईल अशारितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी ५ आणि जास्त १५ व्यक्तींची मिळून बनलेल्या एका वृक्षप्राधिकरणाची रचना करता येईल अशी तरतुद आहे.**

**तसेच प्रकरण २ चा नियम ३(३) अन्वये वृक्षप्राधिकरणेस ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींना वृक्षप्राधिकरणाचे सदस्य म्हणून नामनिर्देशित करुन घेता येईल . हे सदस्य वृक्ष प्राधिकरण समिती ठरविल अशारितीने व मुदतीसाठी स्विकृत करण्यात आले पाहिजे. प्रकरण २ कलम ३ (२) नुसार वृक्ष प्राधिकरणाचा अध्यक्ष महानगरपालिका आयुक्त असतील अशी तरतुद आहे.**

**तरी वृक्ष प्राधिकरण समितीची मुदत व महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये महापालिका सदस्यांमधून 9 सदस्य संख्या व ३(३) अन्वये ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींमधून 2 सदस्य संख्या निश्चित करुन वृक्ष प्राधिकरण समिती तसेच प्रकरण २ कलम ३ (२) नुसार वृक्ष प्राधिकरणाचे अध्यक्ष महानगरपालिका आयुक्त असतील अशी 12 सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी व तौलानिक संख्येप्रमाणे पक्षाच्या संख्याबळाप्रमाणे समितीवर सदस्यांची नावे देण्यांत यावी. बिन सरकारी संघटनेचे सदस्य नियुक्तीची कारवाई होईपर्यंत शहरातील शासकीय संस्था उदा. जिल्हा वनअधिक्षक, वनपाल या कार्यातील वृक्ष संर्वधन झांडाचे आरक्षण व जतन या संबधिचे ज्ञान असलेले सदस्यांची नियुक्ती करावी. जस-जसे बिन सरकारी संघटनेतून सदस्य नियुक्त होतील तस -तसे शासकीय सदस्य कमी करावेत असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. हसमुख गेहलोत**

**सर्वपक्षीय गटनेत्यांनी तौलानिक संख्या बळाप्रमाणे सदस्यांच्या नावाची शिफारस केलेनुसार वृक्षप्राधिकरण समितीवर खालील सदस्यांची 1 वर्षाकरीता नियुक्ती करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पक्ष |
|---|---|---|
| 1 | श्रीम. शानु जोरावर गोहिल | भारतीय जनता पार्टी |
| 2 | श्री. विजयकुमार सिस्थन नारायण राय | भारतीय जनता पार्टी |

| | | |
|---|---|---|
| 3 | **श्री. दिनेश तेजराज जैन** | **भारतीय जनता पार्टी** |
| 4 | **श्री. संजय अनंत थेराडे** | **भारतीय जनता पार्टी** |
| 5 | **श्री. दौलत तुकाराम गजरे** | **भारतीय जनता पार्टी** |
| 6 | **श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी** | **भारतीय जनता पार्टी** |
| 7 | **श्री. कमलेश यशवंत भोईर** | **शिवसेना** |
| 8 | **श्री. अनंत गेणू शिर्के** | **शिवसेना** |
| 9 | **श्री. नरेश तुकाराम पाटील** | **काँग्रेस लोकशाही आघाडी** |

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५७, **मिरारोड (पूर्व) रेल्वे स्टेशन समोरील चौकात विकसित करण्यात येणारे वाहतुक बेट / हुतात्मा चौक बांधून त्यांचे शहिद मेजर कौस्तुभ प्रकाश राणे असे नामकरण करणे तसेच मिरारोड आरक्षण क्र. १८७ उद्यानाचे शहिद मेजर कौस्तुभ प्रकाश राणे असे नामकरण करणेबाबत.**

**रोहिदास पाटील :-**

"शहिद मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे" यांचे कुटूंब गेल्या ३० वर्षापासून मिरा भाईंदर शहराचे रहिवासी आहेत. त्यांच्या कुटूंबातील कोणतीही व्यक्ती लष्करात कार्यरत नसताना बालपणापासून त्यांना लष्करात जाण्याची ओढ होती . त्यानुसार सन २००८ मध्ये ते सेना मध्ये ले फ्टनेंट या पदावर रुजू झाले . सन २०११ मध्ये कॅप्टन या पदी नियुक्त झाले व तद्नंतर आता २०१८ साली त्यांना मेजर या पदाने सन्मानित करण्यात आले. तसेच दि.२६ जानेवारी २०१८ रोजी मेजर राणे त्यांना सेना सम्मानाने सम्मानित करण्यात आले.

उत्तर काश्मिरच्या बांदीपोरा जिल्ह्यातील गुरेज सेक्टरमध्ये भारतीय लष्कराने दहशतवाद्यांविरोधात केलेल्या मोठ्या कारवाईत महाराष्ट्राचे सुपुत्र तसेच मिरा भाईंदर महापालिकेच्या मिरारोड येथील रहिवासी मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे हे मंगळवार दि.०७ ऑगस्ट २०१८ रोजी अतिरेक्यांसमवेत लढताना शहिद झाले.

शहरात "शहिद मेजर कौस्तुभ प्रकाश राणे" यांचे नाव शहरवासियांच्या मनात, ह्दयात सदैव जिवंत रहावे व त्यांचा यथायोग्य सम्मान व्हावा याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत मिरारोड (पुर्व) रेल्वे स्टेशन समोर आमदार श्री. नरेंद्र मेहता यांच्या आमदार निधीतून रक्कम रु.२५ लाख इतका निधी वापरुन हुतात्मा स्मारक बांधण्यात यावे व त्यास "शहिद मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे " यांचे नाव देण्यात यावे. तसेच मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र.१८७ येथील उद्यानास शहिद मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे"याचे नाव देण्यास ही महासभा मंजुरी देत आहे.

सदर कुटूंबाची संमती असल्यास त्यांच्या कुटूंबातील एखाद्या व्यक्तीला महापालिका सेवेत रुजू करणेबाबत प्रशासनामार्फत आवश्यक ती पूर्तता करावी व त्यांच्या कुटूंबानी संमती दिल्यास त्यांच्या चिंरजीवास शिष्यवृत्ती देवून पुढील संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी महापालिकेने घ्यावी तसेच त्यांच्या कुटूंबियांना त्यांची समंती असल्यास आर्थिक मदत म्हणून महापालिकेकडून रु.११ लाख रुपये देण्यात यावे.

तसेच केरळ येथे अतिवृष्टी व कर्नाटक येथे झालेल्या भुसंख्खलनामुळे मोठ्या प्रमाणावर प्राणहानी व वित्तहानी झाली आहे त्यामुळे केरळ व कर्नाटक येथील मुख्यमंत्री सहाय्यता निधीकरीता प्रत्येकी रु .११ लाखाची आर्थिक मदत द्यावी असा मी ठराव मांडत आहे.

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम माझी सुचना आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभा ही दि. ४/९/२०१८ ला तहकुब मा. महासभा दि. ५/९/२०१८ सूचना विषय क्र. ५७ विविध ठिकाणी शहीद मेजर कौस्तुभ प्रकाश राणे असे नामकरण करणेबाबत. शहीद मेजर कौस्तुभ प्रकाश राणे यांचे वयाच्या अवघ्या ३२ व्या वर्षी आपणा सर्वांच्या रक्षणासाठी सिमेवर दिलेले. बलिदानाची गणना आपण कशामध्येही करु शकणार

नाही. परंतु त्यांच्या बलिदानाने मिरा भाईंदर शहराचे नाव देखील अभिमानाने पुढे आले. अशा देशभक्ताचे नाव हे वास्तुंना दिलेच पाहिजे. परंतु त्याबरोबर त्यांच्या कौटुंबिक सदस्यांना आधार देणे ही देखील आपली जबाबदारी आहे. फक्त वास्तुंनाच नाव देऊन न थांबता जे त्यांचे घर आहे नावे आहे, त्यांचे कुटुंब राहत आहे. त्या घरावर कर्ज आहे. त्यामुळे त्यांना त्यांचं स्वतःच अद्याप घर नसल्याकारणाने त्यांना त्यांच्या हक्काचे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राच्या वतीने पालिकेच्यामार्फत कमीत कमी हजार स्क्वेअर फुटच घर आपण त्यांना सर्व फॉर्मिलीटी करुन देण्यांत यावे. महानगरपालिकेच्या वतीने देण्यात यावे अशी मी सूचना मांडत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो, ह्या विषयाच्या बाबतीत अपेक्षा ही होती की ह्या विषयाचे शहीद मेजर कौस्तुभ प्रकाश कुमार राणे याने जे देशासाठी बलिदान केले. त्यांनी तिथे राजकारण होऊ नये. धन्यवाद देवून स्थानिक पत्रकारांना की त्यांनी ३-४ दिवसामध्ये जी परिस्थिती हाताळली त्यानंतर सुध्दा कुटुंबाला कमी मानसिक त्रास सहन करावा लागेल. सभागृहनेत्यांनी काल सुध्दा ठराव मांडला. शोकप्रस्ताव आज सुध्दा त्यांनी ठराव मांडला. आपली स्प्रेस नोट निघाली स्टेशनमध्ये होर्डिंग्ज लागले. अकरा लाख देतो, नोकरी देतो. ११ लाख दिले का? ७ ऑगस्टला झालं किंवा तुम्ही महापालिकेच्या प्रशासकीय जबाबदार अधिकाऱ्यांनी जाऊन त्यांच्या कुटुंबासमोर काही प्रस्ताव वगैरे ठेवला का? वाट कोणाची बघत आहोत. आपण फक्त ठरावामध्ये देतो. त्याच्यामध्ये कुठच्याही प्रकारचं राजकारण करायच नाही हे मला फार जवळून त्या फॅमीलीला मी ओळखतो. ती फॅमीली एवढी स्वाभिमानी आहे. तिसऱ्या दिवशी मला त्यांनी सांगितले मा. आयुक्त साहेब सुध्दा भेटायला गेले होते. त्यांनी मा. आयुक्त साहेबांना सुध्दा विनंती केली होती की शहरामध्ये जेवढे कौस्तुभचे होर्डिंग्ज लागलेले आहेत तेवढे काढून घ्या. आमचा मुलगा आम्ही लष्करी सेवेत दाखल केला त्याचे कुठेही मार्केटींग आम्हाला करायची नाही. त्यानंतर मा. आयुक्त साहेबांना फोन लागत नव्हता. आम्ही फोन केला आम्ही सांगितले की सर्व वॉर्ड ऑफिसरला तुम्ही कल्पना द्या आणि काढून घ्या. ह्या शहराला स्वातंत्र सैनिक आणि लष्करीकरांचा फार मोठा इतिहास आहे. आज ह्या शहरामध्ये साडे चारशे लष्करी अधिकारी रिटायर्ड आहेत किंवा काही सर्व्हीसमध्ये आहेत. स्वातंत्र सैनिकांचा इतिहास आहे ह्या शहराला आज आपला विषय वेगळा आहे. काकांनी ठराव दिलेला आहे वेगळा. विषयामध्ये वाहतुक बेट आणि चौक आहे. अमर जवान चौकाची काय परिस्थिती झाली पुनम सागरला बांधलेला आहे. ते आपल्या सर्वांच्या निदर्शनास आहे. रातोरात त्याठिकाणी अमर जवान चौकाचे नाव काढून वेगळेच काहीतरी नाव दिलं गेले. २००७ साली बांधलेला होता. त्यानंतर मला वाटतं २०१० की २०१२ साली आज वाहतुक बेटच्या इथे स्मारक बनवतो. तिथे हुतात्मा चौक म्हटलं. वाहतुक बेट आणि हुतात्मा चौकाला २५ लाख रुपये खर्च येतो. काय बनवणार आहात आपण त्यांनी ठरावामध्ये म्हटलं आहे. वैती साहेब मी सुरुवातीलाच सांगितलं आपल्या ह्या शहराची चांगली जाण आहे. मग एकदा ते क्लिअर करा आणि ते ठरावामध्ये वारंवार त्यांची सहमती असल्यास तुम्ही पाठवाना अधिकारी सभागृह नेत्यांना पाठवा त्या फॅमिली जवळ म्हणजे त्यांच्या मनात काय आहे ते तुम्हाला कळेल. उपमहापौर साहेब आमची अशी सुचना आहे शितल नगरमध्ये तो वाढला, शितल नगरमध्ये तो खेळला. शितल नगरच्या आर.जी अजून ही हॅन्डवर्क करुन घेतलेल्या नाहीत. त्या ठिकाणी आर.जी आहेत. त्या आर.जी मध्ये चांगला सुसज्य असे सैनिक भवन बनवा त्या भवनामध्ये स्वातंत्र्य सैनिक इतर लष्कर अधिकारी ह्या शहरातील त्यांचे जतन करुन ठेवण्यासारखे कॉरसपॉन्डीस असतील स्फुर्ती असतील त्या ठिकाणी ठेवा आणि त्या भवनाला मेजर कौस्तुभ प्रकाश कुमार राणे यांचे नाव द्या. त्या भवनासाठी आम्ही १९ नंबरचे चारही नगरसेवक निधी आणि प्रभाग निधी आम्ही द्यायला तयार आहोत. इतर नगरसेवकांनी सुध्दा मनोगत व्यक्त केले. आम्ही सुध्दा नगरसेवक निधी द्यायला तयार आहोत. अशाप्रकारे चांगली वास्तु म्हणजे तो सर्व स्वातंत्र सैनिकांना आणि सैनिकांना न्याय मिळेल. ही आज गरज आहे आणि त्या फॅमिलीला जाऊन विचारा तसा तुमचा हेतु सुध्दा आहे. मॅडम, त्या ठिकाणी तुम्ही कुठेतरी भाषणामध्ये डिक्लेअर केले की आम्ही महापालिकेच्या वतीने ११ लाख रुपये देणार हरकत नाही. पण त्या दिवसापासून फक्त पेपर बाजी होते, बॅनर बाजी होते. सोशल मिडियावर टेस्ट केली जात आहे. पण त्या फॅमिलीला आपल्या महापालिकेतर्फे कोणी अधिकारी जाऊन भेटले कोणीतरी त्यांचे मनात काय आहे, त्यांना काय पाहिजे आणि माझ्या मते ताईंच्या भावना समजू शकतो की त्यांची अशी परिस्थिती नाही एकदम चांगली परिस्थिती आहे. सुखवस्तु फॅमिली आहे. प्रकाश कुमार राणे हे स्वतः टेलीकॉममध्ये सर्विसला होते ते रिटायर्ड झाले. त्यांची आई प्रिन्सीपल होत्या शाळेमध्ये त्या रिटायर्ड झालेल्या आहेत. त्यांच्या मुलाच्या नावावर घर आहे

आणि त्यांची जी पत्नी आहे त्यांच्या नावावर कर्ज आहे. पण त्यांची तशी अपेक्षा नाही. ठीक आहे तुमच्या भावना चांगल्या आहेत. माझं एकच मत आहे की जबाबदार अधिकारी पाठवा आणि त्यांच काय कन्सल्ट आहे ते बघा आणि त्यानंतर पाऊल उचला आणि ते लवकर उचला.

**मा. उपमहापौर :-**

सावंत साहेब हा आपल्या शहराचा गौरव होते शहीद मेजर कौस्तुभ राणे आणि आपले महापालिकेतून त्या सगळ्या गोष्टींच राजकीय मायलेज नाही घ्यायचं. काही काही व्यवस्था केली, सन्मा. आयुक्त बालाजी खतगांवकर साहेबांनी महापालिकेचे सर्व स्टाफचे मी मनापासून आभार मानुया की त्या प्रत्येक प्रसंगात त्यांनी आपली जबाबदारी पूर्ण ताकदीने पार पाडली. ज्या दिवशी आयुक्त साहेब आणि मी गेलो होतो त्याच दिवशी त्यांच्या मामाने चर्चा केली होती की त्यांच्या नावाची जेवढी फलक आहेत ते काढा, त्यांचा काहीतरी आम्हाला अपमान कोणी केला किंवा त्यांचा अपमान झाला असे वाटायला नको. कुठे कुठे बॅनर तुटलेला वगैरे असतो, महापालिकेने स्वतः जवळ जवळ ४० आसपास होर्डिंग्ज लावले होते. ह्या शहरामध्ये आणि मा. आयुक्त साहेबांनी कमिटमेन्ट दिली होती की सगळे होर्डिंग्ज आम्ही काढू. अजून कोणाच्या निदर्शनास आपल्या नगरसेवकांच्या कुठे होर्डिंग्ज आला तर आपण संबंधित अधिकाऱ्यांना कळवा. तो सन्मानाने काढला जाईल आणि त्याची व्यवस्था काय करायची त्या होर्डिंग्जची ती महापालिका करणार आहे. सावंत साहेब ठरावामध्ये आपण बारकाईने ऐकत होता. माझे लक्ष होतं परंतु त्यांची मर्जी असल्यास किंवा त्यांची संमती असल्यास अस आपण बोलत होतो त्याच्यामागे भूमिका अशी आहे की आमदार साहेब आणि मी गेलो होतो त्यावेळेला त्या परिवाराशी चर्चा केली होती. शहीद पत्नीशी आमचं बोलणं झालं होत. महापौर मॅडम आणि मी गेलो होतो त्या दिवशी ही चर्चा झाली होती आणि त्यानंतर आयुक्त साहेब आणि आम्ही गेलो होतो त्या दिवशी ही चर्चा झाली आणि हे जेवढे मुद्दे आहेत ह्या सर्व मुद्यांवर ती आपण विस्तारांनी त्याची चर्चा केलेली आहे. एक गोष्ट नक्की आहे की त्यांनी कुठचीही गोष्ट नाकारली नाही किंवा त्याच्यात त्यांनी चौकशी केली नाही पण आपली ती जबाबदारी आहे. ज्या-ज्या गोष्टी ठरावात आहेत हे असं की त्यांची संमती असेल असं म्हणण्याचे कारण कुठे त्या स्वाभिमानाला किंवा विश्वासाला तडा जाऊ नये या भावनेतून तो शब्दप्रयोग केला आहे. आपण त्यांना महापालिकेच्या सेवेच्या बाबतीत चर्चा केलेली आहे. शिक्षणासाठी जी नियोजन आहे मुलाच्या त्याच्यात उल्लेख आहे आणि आपण जे बेट सांगतो. वाहतूक बेट तर वाहतूक नव्हे तर स्टेशनच्या बाजूला साधारणपणे २०० मीटरचा परिसर मोकळा आहे आणि त्या ठिकाणी आपण स्टीलच्या पाईपचे बॅरीकेटींग केले म्हणजे त्याठिकाणी वाहनं कमी जाणं शक्य नाही तर त्याठिकाणी ते स्मारक बांधतो. त्या ठिकाणी एक असाच स्तंभ उभारायचे एक नियोजन होतं. आमदार नरेंद्र मेहता साहेबांनी तसे नियोजन केले होते. त्यांचा आमदार निधी दिला होता. परंतु ह्या शहरामध्ये आपल्याला त्यांना कुठेतरी लोकांच्या स्मृतीत चिरंतर जे राहिले पाहिजेत, कायमस्वरुपी जागृत राहिले पाहिजेत त्या जागेवरती गेल्यानंतर कमकुवत मनाचा माणूस किंवा हरलेल्या मनाचा माणूस त्या ठिकाणी उभा राहिल्यानंतर प्रेरणा घेऊन गेला पाहिजे. अशा प्रकारचे स्मारक त्यांच्या नावाने व्हावा म्हणून त्यांनी रुपांतरणाच तो निधी जो आहे स्तंभ बनवायचा त्याचं रुपांतरणाच लेटर दिलेले आहे. आपण त्यांच्या परिवाराच्या हस्ते कोणाला तरी सदस्यांच्या हस्ते भूमिपूजन करणार आहोत. आणि ते स्मारक रेल्वेच्या जे बॅरीकेटींग केलेले आहे. स्टीलच त्याच्यामध्ये आहे आणि जे रिझर्व्हेशन क्र. १८७ मध्ये जे गार्डन आहे जॉगर्स पार्कच त्याला आपण नाव देतोय आणि मिरारोडमध्ये स्मारक होणं ज्या ठिकाणी मोठे झाले ज्या ठिकाणी ते वावरले त्या ठिकाणी होणं हा एक आपल्याला पण गौरवाचा विषय असेल. त्या गार्डनमध्ये माझ्या एक मित्राने सुचना केली होती की भारतीय लष्करातील निवृत्त झालेले एक रणगाडा मागवा आणि तो रणगाडा मागवून लष्काराकडून मागवायचा व त्याची निगा राखायचे काम महानगरपालिकेने करावे. महापालिकेने जबाबदारी घ्यावी आणि तसे मी पत्र देखील महापौर मॅडमला आणि मा. आयुक्त साहेबांना दिले आहे. म्हणजे खरंच तो एक गौरव होईल. तो एक रणगाडा देखील तिथे असेल आणि ह्या सभागृहातून आपण त्यांचा शहीदांसाठी किंवा कुठलेही लष्करी सेवेत असेल त्याला वास्तु बनवण्याचा एक आपण निर्णय घेतलेला आहे. आपले सर्व लोकांच त्याच्यामध्ये कुठच्याही प्रकारचं राजकारण करायचं कारण नाही. विषय ठराव मांडलेला आहे. त्याबद्दल कोणाची हरकत नसावी.

**अनिल सावंत :-**

उपमहापौर साहेब हरकत नाहीच आहे. ठराव बघितल आमचं मत ऐवढच होतं की एक चांगल स्मारक वास्तु उभारा. ज्याच्यामध्ये ज्या स्मृती जतन केल्या जातील. लोकांना वगैरे त्याच्यामधून प्रेरणा मिळेल आणि त्यासाठी आम्ही नगरसेवक निधी पण द्यायला तयार आहोत. तसे आम्ही पत्र देतो.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ५७ :-**

**मिरारोड (पूर्व) रेल्वे स्टेशन समोरील चौकात विकसित करण्यात येणारे वाहतुक बेट / हुतात्मा चौक बांधून त्यांचे शहिद मेजर कौस्तुभ प्रकाश राणे असे नामकरण करणे तसेच मिरारोड आरक्षण क्र . १८७ उद्यानाचे शहिद मेजर कौस्तुभ प्रकाश राणे असे नामकरण करणेबाबत.**

**ठराव क्र. ५८ :-**

"शहिद मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे" यांचे कुटूंब गेल्या ३० वर्षापासून मिरा भाईंदर शहराचे रहिवासी आहेत. त्यांच्या कुटूंबातील कोणतीही व्यक्ती लष्करात कार्यरत नसताना बालपणापासून त्यांना लष्करात जाण्याची ओढ होती . त्यानुसार सन २००८ मध्ये ते सेना मध्ये ले फ्टनेंट या पदावर रुजू झाले . सन २०११ मध्ये कॅप्टन या पदी नियुक्त झाले व तद्नंतर आता २०१८ साली त्यांना मेजर या पदाने सन्मानित करण्यात आले. तसेच दि.२६ जानेवारी २०१८ रोजी मेजर राणे त्यांना सेना सम्मानाने सम्मानित करण्यात आले.

उत्तर काश्मिरच्या बांदीपोरा जिल्ह्यातील गुरेज सेक्टरमध्ये भारतीय लष्कराने दहशतवाद्यांविरोधात केलेल्या मोठ्या कारवाईत महाराष्ट्राचे सुपुत्र तसेच मिरा भाईंदर महापालिकेच्या मिरारोड येथील रहिवासी मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे हे मंगळवार दि.०७ ऑगस्ट २०१८ रोजी अतिरेक्यांसमवेत लढताना शहिद झाले.

शहरात "शहिद मेजर कौस्तुभ प्रकाश राणे" यांचे नाव शहरवासियांच्या मनात, ह्दयात सदैव जिवंत रहावे व त्यांचा यथायोग्य सम्मान व्हावा याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत मिरारोड (पुर्व) रेल्वे स्टेशन समोर आमदार श्री. नरेंद्र मेहता यांच्या आमदार निधीतून रक्कम रु.२५ लाख इतका निधी वापरुन हुतात्मा स्मारक बांधण्यात यावे व त्यास "शहिद मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे " यांचे नाव देण्यात यावे. तसेच मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र.१८७ येथील उद्यानास शहिद मेजर कौस्तुभ प्रकाशकुमार राणे"याचे नाव देण्यास ही महासभा मंजुरी देत आहे.

सदर कुटूंबाची संमती असल्यास त्यांच्या कुटूंबातील एखाद्या व्यक्तीला महापालिका सेवेत रुजू करणेबाबत प्रशासनामार्फत आवश्यक ती पूर्तता करावी व त्यांच्या कुटूंबानी संमती दिल्यास त्यांच्या चिंरजीवास शिष्यवृत्ती देवून पुढील संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी महापालिकेने घ्यावी तसेच त्यांच्या कुटूंबियांना त्यांची समंती असल्यास आर्थिक मदत म्हणून महापालिकेकडून रु.११ लाख रुपये देण्यात यावे.

तसेच केरळ येथे अतिवृष्टी व कर्नाटक येथे झालेल्या भुसंखखलनामुळे मोठ्या प्रमाणावर प्राणहानी व वित्तहानी झाली आहे त्यामुळे केरळ व कर्नाटक ये थील मुख्यमंत्री सहाय्यता निधीकरीता प्रत्येकी रु .११ लाखाची आर्थिक मदत द्यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५८, **वैद्यकिय विभागाकरीता आवश्यक उपकरणे, फर्निचर, औषधे, सर्जिकल मटेरीयल व लॅब मटेरीयल खरेदी करणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

**राजेंद्र जैन :-**

**प्रस्तावना :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाअंतर्गत एकुण १० आरोग्य केंद्र / उपकेंद्र, भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय व भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय कार्यरत आहे. याकरिता आवश्यक औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल करीता नव्याने वार्षिक निविदा मागविणे आवश्यक आहे. तसेच भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय शासनाकडे वर्ग करणेची प्रक्रीया सुरु आहे त्यातील उर्वरीत मॉडयुलर ओ.टी., आय.सी.यु., आय.सी.सी.यु. सुरु करणेकरीता उपकरणे व फर्निचर खरेदी करणेकरीता निविदा मागविणे आवश्यक आहे. याकरीता आवश्यक उप करणे, फर्निचर, औषधे, सर्जिकल मटेरिअल व लॅब मटेरिअल यांची यादी सोबत जोडली आहे.

सन २०१८-१९ या वर्षासाठी औषधे खरेदीकरिता रु.५०,००,०००/- रुग्णालये, लॅब मटेरीअल खरेदी / साहीत्य देखभाल दुरुस्ती कामे करिता रु.१,००,००,०००/- श्वानदंश/ सर्पदंश/ काविळ लस खेरदी करिता रु.२५,००,०००/-, रुग्णालये सर्जिकल व फर्निचर/ उपकरणे खरेदी करणे करिता रु.४,००,००,०००/-अंदाजित खर्च अपेक्षीत आहे.

**ठराव :-**

तरी वैद्यकीय विभागाकरिता आवश्यक उपकरणे, फर्निचर, औषधे, सर्जिकल मटेरिअल व लॅब मटेरिअल इत्यादी निविदा मागवुन खरेदी करणेकरिता मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**स्नेहा पांडे :-**

महापौर मॅडम मुझे एक प्रश्न पुछना है की औषध खरेदी जो हम लोग करते है शहर जनसंख्या दिन पे दिन बढती जा रही है। मैंन पिछले तीन साल का रेकॉर्ड निकाला है तो औषध खरेदी २०१५-१६ में. १ करोड २०१६-१७ में २ करोड, २०१७-१८ में १ करोड तो इस साल पचास लाख की औषध खरेदी क्यों आ रहा है। रोगो की संख्या कम हो गयी है क्या या शहर की जनसंख्या कम हो गयी है। उसपे डॉक्टर साहब जरा खुलासा करेंगे तो अच्छा रहेगा।

**प्रमोद पडवळ :-**

मा. महापौर महोदयांच्या परवानगीने बोलतो ह्यामध्ये ५० लाख रक्कम तुम्ही म्हणता की ह्यावर्षी ही रक्कम कमी वाटते. परंतु आता आपण फेब्रुवारीमध्येच मेडीक्लेम काही खरेदी केलेलं होतं. त्यामुळे ह्यावर्षी जी थोडीसी गरज आपली जेवढी आहे त्याप्रमाणे आपण परवानगी घेत आहोत आणि शासनामार्फत ही वेळोवेळी औषध आपल्याकडे येत असतात. ते सर्व विचारात घेऊन खरेदी करतो त्यामुळे त्या एक्सपेन्डीचरमध्ये ईअर व्हाईज फरक पडू शकतो.

**स्नेहा पांडे :-**

डॉक्टर साहब २०१६-१७ में २ करोड, और इस साल ५० लाख तो ऐसा नही हो की बाद में पेशंट जाए तो मालुम पडे अपनी ओ.पी.डी में दवाईयॉं नही है। सर्व दंश की दवाईयॉं नही है कितनी बार लोगो की कम्पलेंट आती है की कुत्ता काटने का रेबीज का इंजेक्शन अपने आरोग्य केंद्र में नही होता है। ओ.पी.डी. में नही होता है तो ऐसी स्थिती नही आए आगे चलके।

**प्रमोद पडवळ :-**

यस मॅडम त्याची काळजी घेतली जाईल.

**स्नेहा पांडे :-**

एक विषय और पुछना था, डॉक्टर भिमसेन जोशी रुग्णालय अभी चालू हुआ है। उसमें पिछले दो महिने पहिले चार डेथ हुई उस वक्त जब पत्रव्यवहार किया गया तो पानपट्टे साहबने जवाब दिया था की मॅडम वो शासन के अंदर है, अपनी अंदर आता नही। और यहॉं पर उल्लेख किया गया है की उसके लिए उपकरण वगैरे लाना है तो नक्की शासन के पास गया है की अपनी ही अंडर है, इस बात का खुलासा करेंगे तो अच्छा रहेगा।

**प्रमोद पडवळ :-**

रुग्णालयाचे शासनाकडे हस्तांतरण झालेले आहे. परंतु त्या ठिकाणी आपल्याला उर्वरीत काही काम ओ.पी.डी. आहे, आय.सी.सी.यू. आहे हे सर्व बांधकाम करुन द्यायचे आहे आणि त्यानंतर ते करणार त्यांच्याकडून पण ते हातात कागद देण्याची कारवाई चालू आहे. काही टेक्नीकल अडचणीमुळे त्यांनी पूर्ण अजून ताबा घेतलेला नाही. त्यांच्याकडे आपला करारनामा झालेला आहे. कायदेशीररित्या आपण दोन्ही पार्टीने म्हणजे महापालिका आणि महाराष्ट्र शासनाचे झालेले आहे.

**स्नेहा पांडे :-**

अभी उसकी व्यवस्था कौन कर रहे है, राज्य शासन या आप देख रहे है।

**प्रमोद पडवळ :-**

सध्या तर आपणच पाहतो.

**स्नेहा पांडे :-**

जब मैंने पत्र दिया था दो महिने पहिले चार डेथ हुए थे, डॉक्टर के उपर लापरवाई के आरोप लगाए गए थे। न्यूज पेपर में आए थे की बहुत दिनो तक चला था वह विषय उस वक्त ऐसा जवाब दिया गया था की शासन देख रहा है। नक्की जो सही जवाब वही मिले सदस्य को तो अच्छा रहेगा।

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम प्रशासकीय अधिकारी ह्या विषयावर उपस्थित आहेत. अंदाजे काही तरी साडे पाच कोटी, सहा कोटी रुपयांचे उपकरण खरेदी करणार आहोत. घेतले पाहिजे, गरजेचे आहे. शासनाकडे टेंबा

हॉस्पीटल हस्तांतरण करायचं आहे. म्हणजे सध्या तिथे जे असलेले जी सामुग्री आहे ती नादुरुस्त आहे. त्याच्यासाठी स्थायी समिती १२/०२/२०१८ रोजी हा विषय आणला होता.

**राजेंद्र जैन :-**

रेकॉर्डींग अलाऊड है क्या?

**जुबेर इनामदार :-**

खर तर लोकप्रतिनिधी काय आतमध्ये करतात लोकांना जनतेला समजलं तर काय फरक पडतो. अलाऊड नाही असे ही नाही. अलाऊड आहे. पत्रकारांनी रेकॉर्डींग करु शकतात पत्रकार कक्षामध्ये.

**मा. उपमहापौर :-**

आपण ज्या सभागृहात बसलो आहोत ह्या सभागृहात आपण बोललेला प्रत्येक शब्दच्या शब्द लिहिला जातो. आपण जिथे बसलो आहोत ह्या सभागृहात मोठ्या प्रमाणात सी.सी.टी.व्ही चे कॅमेरे आहेत, ह्याच्यामध्ये सगळी रेकॉर्डींग, शुटींग होते आणि आपण लोकसभेचे, विधानसभेचे बघत असतो. आपण काही चुकीचे करत नाही. रेकॉर्डींग करु नये असे संकेत होते पण आता सगळीकडे ती गोष्ट मान्य आहे केली शुटींग तर काही फरक पडत नाही.

**जुबेर इनामदार :-**

डॉक्टर साहेब १२/०२/२०१८ रोजी स्थायी समितीमध्ये एक विषय तुम्ही आणला होता. १२ लाख रुपयाचा त्याच्यामध्ये उपकरणाची नादुरुस्त आहे. त्याच्यात दुरुस्तीचा विषय होता. तो म्हणजे दुसरा महिना १२/०२ आणि आज नववा महिना ह्या विषयाचं काय झालं. कारण हे तुम्ही सहा कोटी रुपयाचे उपकरण खरेदी करणार आणि परत वर्षभरामध्ये ए.एम.सी.,सी.एम.जी. साठी तुम्हाला तुमची कारवाईच पूर्ण होणार नाही. अशी परिस्थिती येता कामा नये ह्याच्या आधी काय झाल त्याचे उत्तर द्या. पुढे त्याच्या तुम्ही काय नियोजन करणार आहेत, तुमचा टेंबा हॉस्पीटल हा तुम्हाला आदेश प्राप्त होऊन किती महिने झाले ती आता पाच सात महिने अजून वाया कशाला घालवलं. तसं करायचं होतं तर तुम्हाला हा विषय आधी आणायला पाहिजे होता ना. विषयपटलावरती दोन विषय एकतर के.एम.सी. चे काय झाले. इंदिरा गांधी रुग्णालयामध्ये अजून एक्सरे मशिनला तीन महिने झालेत. नादुरुस्त आहे इंदिरा गांधी रुग्णालयामध्ये आलेले रुग्ण टेंबामध्ये पाठवले जाते. म्हणजे मिरारोडहून त्यांनी शंभर रुपये खर्च करायचे, मा. आयुक्त महोदय आणि त्यांनी टेंबामध्ये जायचे, म्हणजे डब्बल. एकतर आधी तिथला तो लोभ प्लस इंदिरा गांधी रुग्णालयामधून ही लोक जात आहेत असे दुसरेही बरेच उपकरण नादुरुस्त आहेत. त्याची यादी माझ्याकडे होती वाचत नाही बरेच काही आहे. त्याच्यात १२ लाख रुपयांचा खर्च अंदाजे काहीतरी होता. अजूनपर्यंत का त्याच्यावर कारवाई करण्यात आली नाही त्याची जरा माहिती द्या.

**प्रमोद पडवळ :-**

सध्या त्या ठिकाणच्या उपकरणाबाबत मा. आयुक्तांच्या आदेशाचे माहिती देतो की सदर उपकरण बंद असल्याची मा. आयुक्तांनी दखल घेऊन दोन दिवसांपूर्वीच त्या कंपनीचे यांना ते देण्यासाठी त्यांनी मान्यता दिली आहे मा. आयुक्तांनी.

**जुबेर इनामदार :-**

कुठल्या कंपनीला?

**प्रमोद पडवळ :-**

आपले जे रेट मागवले होते त्यांच्याकडून त्याप्रमाणे............

**जुबेर इनामदार :-**

स्थायी समितीने तुम्हाला तेव्हा असं ठराव करुन दिला होता. वैद्यकिय विभागाने इतर माहिती सादर करुन तद्नंतर सदरचा विषय सादर करावा. परत सादर झालेलाच नाही स्थायी समितीमध्ये.

**प्रमोद पडवळ :-**

याच्यामध्ये सुरुवातीला स्थायी समितीने सविस्तर प्रस्ताव माहिती मागवली. त्यानंतर आपण परत प्रस्ताव दिला परंतु त्यामध्ये त्यांची रेट बद्दल थोडीशी शंका होती. त्याप्रमाणे आपण बाहेरच्या डॉक्टरला, हॉस्पीटलच्या ओनर्सला बोलवून त्यांच्याकडे दुरुस्ती करणारे किंवा ठेकेदार किंवा त्या कंपनीचे प्रतिनिधी त्यांच्याकडे सदर मशिनची पाहणी करुन ते किती रेट देतात ते पाहिले, त्यांचे रेट आणि मग आपण सादर केलेले रेट हे कम्पेअर केले आणि नंतर असे लक्षात आले की आपण जे सुरुवातीला दिलेले रेट योग्य होते तसे आपण स्थायी समितीला दिलेले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय ८ महिने १२/०२/२०१८ पासून आजपर्यंत तो विषय प्रलंबित आहे. म्हणजे लागणारी साहित्य, रुग्णालय हा विषय अतिमहत्वाचा विषय आहे. जो इमीजिएट २४ अवर्समध्ये खरतर

युध्द पातळीवर त्याचा निर्णय घेतला पाहिजे होता. तो परत स्थायी समिती समोर नाही आला. मा. आयुक्तांनी परस्पर केला ना. मार्चपर्यंत का नाही करुन घेतला. माझा तो विषय आहे. ह्याचा अर्थ कुठेतरी प्रशासन का कमी पडतो कामामध्ये. याची जबाबदारी कोणी निश्चित करायची. त्याच्यामुळे लोकांना त्रास होतो. रुग्णांना त्रास होतो. ज्यांच्यासाठी सोयी तयार केल्या त्याचा फायदा काय मग? आणि एवढ्या मोठ्या आपल्याकडे यंत्रणा उपस्थित असतात. डॉक्टर आहेत, टेक्नीकल टिम आहे. बाकीची टीम असताना ते करतात काय. आठ आठ महिने जातात. सभापती महोदय समोर आहेत. त्यांनी हा विषय मांडला योग्य होता. ठीक आहे जास्तीची वाटले तर तुम्ही नविन दर मागवले. नविन दर, जुने दर हे सगळी काही प्रकरण उचलायला आठ महिने जातात. तुमची काम आयुक्त साहेब कशी होतात. सरासरी नियमातले विषय असले तर कसे तातडीने केले जातात. जिथे लोकांचा विषय आला तिथे अशाप्रकारे हलगर्जीपणा ते योग्य नाही. साहेब तुमच्या निदर्शनात आणून दिला हा विषय. ह्याला लवकरात लवकर करा. निविदा काढा आज, आदेश काढा. यंत्रणा सर्व सुरु झाले पाहिजे. सुसज्ज झाले पाहिजे लोकांना त्यांचा उपयोग झाला पाहिजे.

**गणेश भोईर :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की गेल्या हफ्त्यातच आपल्या वॉर्डमध्ये पिसाळलेला कुत्रा चावला होता. तर आपल्या महापालिकेकडे ते इंजेक्शन अव्हेलेबल नव्हते. तर मी स्वतः ॲब्युलन्स करुन के.एम. हॉस्पीटलमध्ये नेलं. तर ती व्यवस्था आपल्याकडे होईल की नाही होणार.

**गिता जैन :-**

साहेब कुत्रा आणि सर्प दंश दोन्ही औषध आपल्याकडे अव्हेलेबल नाहीत आणि आताच नाही सहा महिन्यांपासून एकच जवाब आहे की आमच्याकडे ते अव्हेलेबल नाही. म्हणजे आपल्याला माणसांची किंमतच नाही.

**प्रमोद पडवळ :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की कुत्रा चावल्यावर व्हॅक्सीनचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. तर दोन प्रकारच्या लसी अव्हेलेबल आहेत. एक एम.आर.व्ही. ॲन्टी रेबीज व्हॅक्सीन आपण रुग्णाला देतो. दुसरी आहे की ह्युमोग्लोबीन आहे जे ऑलरेडी त्याच्यामध्ये त्या ॲन्टीबॉडी डेव्हलप झालेल्या असतात. आणि ज्यावेळेस बाईक हा सिरीयस असतो किंवा मोठ्या प्रमाणावर कुत्रा चावलेला असेल, जखमा चेहरा किंवा बॉडीच्या डोक्यावर असतील तर अशा वेळेस तात्काळ इम्युनिटी तयार होणे आवश्यक असते. त्यावेळेस हे हिमोग्लोबिन इंजेक्शन दिले जाते. परंतु आपल्याकडे सुरुवातीपासून आपण ए.आर.व्ही. ठेवतोय. फक्त ए.आर.व्ही हेच औषण आपण उपलब्ध ठेवलं होतं. ह्या वर्षी आपण पहिल्यांदा ह्युमोग्लोबिन हे औषध मागिवलेला आहे. त्याचा स्टॉक पण ११० अव्हेलेबल झालेला आहे आणि दोन्ही रुग्णालयामध्ये तो आपण पुरवलेला आहे. दुसरा मुद्दा आहे की ए.आर.व्ही. मध्ये काही काळ त्याची टंचाई निर्माण झाली होती. पण हे मोठ्या प्रमाणावर सर्वच कंपनीचे उत्पादन थांबवले होते. हे आपल्या परीने सर्व प्रयत्न करुन बघितले होते. पण कुठल्याही आपण घेण्यासाठी हे करत होतो. त्यामुळे आपल्याला अव्हेलेबल होऊ शकले नाही.

**गिता जैन :-**

साहेब सगळे पेशंटला प्रायव्हेट डॉक्टरकडे ते उपलब्ध झालं. जर कंपनीचे काही प्रॉब्लेम होता तर प्रायव्हेटकडे कसं काय उपलब्ध होता.

**प्रमोद पडवळ :-**

प्रायव्हेटमध्ये रेग्युलेटेड कंपन्या आहेत त्याच्याकडे चारशे साडे चारशे रुपयाला ते अव्हेलेबल होते.

**गिता जैन :-**

तुम्हाला वाटत नाही का आपण एवढा खर्च करतो. तर तात्पुरता आपण लहान तरी स्टॉक मागवायला पाहिजे होता.

**प्रमोद पडवळ :-**

मॅडम वेळोवेळी मागवत होतो.

**गणेश भोईर :-**

मला बावीसशे रुपये सांगितले. चारशे रुपये कुठे म्हणतात.

**प्रमोद पडवळ :-**

ह्युमोग्लोबिन वेगळ आहे. मॅडमजी बोलतात ते ए.आर.व्ही हे आपण नॉर्मली तीन किंवा पाच डोस देतो ते एम.आर.व्ही. आर बद्दल आहे.

**गणेश भोईर :-**

साहेब त्याची व्यवस्था होईल का त्याची.

**कुसुम गुप्ता :-**

नवघर रोड के बंदरवाडी स्कुल के वहाँ दो साल के बच्चे को टिका नही मिल पा रहा है। वहाँ से मुझे कम्पलेन्ट आयी की मैं वहाँ पे टिका नही उपलब्ध तो क्या किया जाए। यहाँ पे भी मैं सर को भी बोला है लेकिन अभी तक कुछ पता नही चला फिर से वहाँ से कम्पलेन्ट आ रही है।

**गिता जैन :-**

सर करोडो रुपये का हमारा बजेट और हम ५०० रुपये इंजेक्शन के तुलना में एक इन्सान के जीव की तुलना में ५०० रुपये हम ज्यादा बोल रहे है। हम किस तरफ जा रहे है।

**विनोद म्हात्रे :-**

महापौर मॅडम नगरसेवकांनी जो मुद्दा उपस्थित केला आठ दहा दिवसांपूर्वी जवळ जवळ एकाच दिवशी मोर्वा गावात आठ लोकांना कुत्रा चावला. राई गावात तीन लोकांना कुत्रा चावला. आपल्याकडे टेंबा हॉस्पीटलला औषध उपलब्ध नसल्यामुळे किंवा कमी दर्जाचे औषध असल्यामुळे इथे उपचार करता आले नाही. जयेश भोईर स्वतः ॲब्युलन्स घेऊन नायर हॉस्पीटलला घेवून गेले. परंतु काही लोक प्रायव्हेट हॉस्पीटलला घेऊन गेले. ज्यांना अतिशय खर्च झाला प्रत्येक माणसाला २४,००० ते २५,००० खर्च झाला. तर महानगरपालिका अधिनियम कलम ६४ नुसार जर ह्या शहरातल्या माणसाला एखाद्या कुत्र्यानं दंश दिला त्याला होणारा खर्च महानगरपालिकेचा आहे. परंतु हा वैयक्तिक खर्च केला जातो मला वाटते आजपासून मी सर्वांच्या निदर्शनास आणू इच्छितो की आजपासून असे काही घडलं तर त्या माणसाला आपल्या महानगरपालिकेकडून पूर्ण खर्च दिला गेला पाहिजे नियमानुसार.

**नयना म्हात्रे :-**

महापौर मॅडम तुमच्या परवानगीने बोलते आपण आता कुत्र्यांसाठी डॉक्टर ठेवला. विक्रम म्हणून पण त्याला कशासाठी ठेवले मॅडम म्हणजे खाली फक्त कुत्र्यांच ऑपरेशन करण्यासाठी ठेवले की त्या कुत्र्यांची देखभाल पण झाली पाहिजे नेमक काय? डॉक्टर साहेब उत्तर द्या मला तुम्ही त्याला कशासाठी ठेवले ह्या डॉक्टरांना फक्त कुत्र्यांचे ऑपरेशनसाठी ठेवले की त्यांची देखभाल करण्यासाठी पण ठेवले आहे. आम्ही डॉक्टरांना फोन केले ना तर घेऊन येतात. शिवाय त्या कुत्र्यांना तिकडे ऑपरेशनला घेऊन गेल्यानंतर त्यांना आपण जेवण पण देत नाही. ही खरी गोष्ट आहे. आपल्याला जशी भूक लागते तशी त्यांना पण भूक लागते मॅडम. अक्षरशः आमच्या एरियातले कुत्रे नेलेले असे बारीक होऊन कुत्रे सगळे आलेले म्हणजे याचा अर्थ त्यांची व्यवस्था बरोबर नाही ना आणि कुठून कुठून कुत्रे उचलले आणि सगळी माझ्या गल्लीत सोडले १६-१७ कुत्रे झाले ज्यांच्या एरियाचे आहेत त्यांच्या एरियात सोडा ना. मी माझ्या घराच्या लोकांचे शिव्या खायचे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, आजच्या मिटींगला मा. आयुक्त साहेब नाहीत. आज सर्व बॅटींग उपमहापौर साहेबांना करावी लागते ना. प्रशासन गप्प एकदम ह्या प्रशासनाला मॅडम धाऱ्यावर धरायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

आयुक्त मंत्रालयात गेले आहेत. येत आहेत.

**अनिल सावंत :-**

हे आरोग्य खाते आहे ना सर्वांना घरी बसवा. मार्चमध्ये बजेट झाले. आज सप्टेंबर चालू आहे ६ महिने झाले, ६ महिन्यानंतर महासभेसमोर विषय आणता औषधांचा. ह्या ६ महिन्यामध्ये काय केले त्यांनी. का दुसऱ्या महिन्यात नाही दिला. आज ओ.पी.डी किती चालू आहेत. तुम्ही सांगू शकाल बी.एम.सी. कुठे आहेत फक्त मजा घेतात सदस्यांची साहेब कुत्रा दंशाच. महापौर मॅडम यांच्याकडे कधीच औषध नसतं. कधीही फोन करा यांना आज एवढी लाजीरवाणी परिस्थिती आहे, करोडो रुपये अजून इंदिरा गांधी रुग्णालयावर खर्च करतो. औषध आणि उपकरणांसाठी त्याचा टेक्नॉलॉजीचा रिपोर्ट हॅन्ड राईटिंगमध्ये लिहून देतात. लाज वाटली पाहिजे ह्या लोकांना, सॉफ्टवेअर घ्यायची ऐवढी ऐपत नाही तुमची. ५-५ करोडचा बजेट वर्षाच्या मध्यावर आणायचा नंतर थातूरमातूर करुन गोषवाऱ्यांचा घोळ करायचा, भ्रष्टाचार करायचा आणि नागरिकांना सेवेपासून वंचित ठेवायचे. एक्स रे मशीन किती महिन्यापासून बंद आहे. ते आमचे कमिशनर शिवमुर्ती नाईक साहेब त्यांनी पण दोन तास माणूस ठेवला होता तो कधीच तिथे नसतो. तिथे आहे त्याला सस्पेंड करा. त्याला एवढी वाईट परिस्थिती आज मिरारोडच्या हॉस्पीटलची जाऊन परिस्थिती बघा. केवढी गर्दी असते आणि तिथले डॉक्टर जबाबदारीने आरोप करतो आणि तिथल्या डॉक्टरवर प्रायव्हेट चिठ्ठी लिहून देतात कन्सलेशनला जा म्हणून ५० लाखाची औषध कोणाला देतात तुम्ही,

कुठची औषध देतात तिथे. आयुक्त साहेब ह्या सर्व प्रकरणाची चौकशी करा आणि जबाबदार असेल त्याला घरी बसवा सरळ, इतर ब-याचशा प्रभाग अधिका-यांना जसे तुम्ही इकडे तिकडे हलवता ना तसे ह्या लोकांना पाठवा. फिल्डमध्ये काम करणे म्हणजे कळेल. प्रत्येक वेळा उत्तर द्यायचे की औषध नाहीत.

**दिप्ती भट :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते पडवळ साहेब आपल्या स्टॅन्डिंग कमिटीच्या मिटींगमध्ये बरे आता ८ महिन्यानंतर जागृत झाले आणि आपण हे एक्सरे मशिनसाठी ठेका दिला कारण की आम्ही त्या दिवशी सुध्दा सांगितले. वारंवार सांगते ज्या माणसाला कामासाठी ठेवले. आठ दहा महिन्यापासून तो माणूस एक काम नाही करत त्याला आपण फुकटची सॅलरी द्यायची असेल तर खुप जण आणि गरीब लोकांना विधवा त्यांना द्या. ते दुसरे काही काम पण नाही करत तो खाली बसून राहतो तिथे. साहेब हॉस्पीटलमध्ये कोण पेशंट टिचीससाठी गेले त्याला लागलं त्याला कोण घेऊन गेलं आपली पालिकेकडून ठराव झालेला आहे. त्याच्यात जे तुम्हाला पैसे घ्यायचे ते पैसे घेऊन त्याला टिचीस करुन द्यायचे आहे. पालिकेचे डॉक्टर त्यांना बाहेरचे हॉस्पीटलचे नाव देतात. तर ते टिचीस तुम्हाला १२००,१४०० रुपये आपण ठराव केलेला आहे. तर तुम्ही द्या ना. तुम्हाला सांगितले आहे. त्याच्यासाठी संबंधित नगरसेवकांना म्हणजे आम्हाला फोन करावे लागतात. पेशंटला मग आम्ही डॉक्टरांना फोन करावे लागतात. पेशंटला मग आम्ही डॉक्टरांना फोन करतो का असे सहन करत आहेत मग त्याला टिचिस देतात म्हणजे तुम्ही स्वतःचे काम स्वतः नाही करु शकत.

**मा. महापौर :-**

तिथे जे अधिकारी असतील त्यांच्यावर कारवाई करावी.

**दिप्ती भट :-**

रात्री जर कोणाला पेन झाल्याबरोबर घ्यायला तर आपले डॉक्टर की तिकडची सिस्टर त्यांना बोलले की तुम्ही शताब्दीला जा. म्हणजे शताब्दीला जाण्यापर्यंत तिची काय अवस्था होईल. आणि तिथे असे ज्या दिवशी सांगितलेलं स्टॅन्डिंग कमिटीच्या मिटींगमध्ये सभापती साहेबांनी की आपल्याला आपले नाव हॉस्पीटलमध्ये, शताब्दीमध्ये रजिस्टर झालेले नाही. म्हणून ते शताब्दीवाले आपले पेशंट घेत नाही. वसई विरार त्यांचे नाव त्यांच्या हॉस्पीटलमध्ये ॲड आहे म्हणून शताब्दीवाले तिकडचे पेशंट घेतात. इकडच्या घरगुती महिलांना पाठवता तर घेत नाही तुम्ही ते रजिस्टर करा ना. तुम्हाला काय प्रॉब्लेम आहे. महापौर, आयुक्त साहेबांना सांगा ना. रजिस्टर केलात पैसे बाकीत, पैसे देतील एक लेडीज आम्ही आम्हाला माहिती आहे की काय परिस्थिती होते. त्यावेळेला जर मुलाला किंवा आईला काही झालं तर त्याची जबाबदारी कोण घेणार. ती फॉरमॅलिटी ठेवली नाही. आम्ही फॉरमॅलिटी ठेवली नाही होणार आहे, करणार आहेत म्हणजे ती बाई मरत असेल तर मरु द्या तिला आपण फॉरमॅलिटी करु. दोन वर्ष, चार वर्ष तुम्हाला किती वर्ष पालिकेला झाले हॉस्पीटल उघडून किती वर्ष झाले. तुम्ही शताब्दीमध्ये रजिस्टर करु शकत नाही की आमचे कुठले पण पेशंट आले तर महानगरपालिकेने घेण्यात यावं तुम्ही ते करा ना.

**गिता जैन :-**

साहेब रजिस्ट्रेशन न केल्यामुळे १५ दिवसांसाठी भाईंदर वेस्ट सुदामा नगरकडे एका व्यक्तीचा मृत्यू झाला. ते माहित आहे का आपल्याला रात्री दोन वाजता. शताब्दी आली पण घेऊन गेले नाही पेशंटला. म्हणजे आपल्याला माणसाची काही किंमतच राहीली नाही आता.

**निलम ढवण :-**

सर्व सामान्यांसाठी महानगरपालिकेमध्ये सुविधा नाही आहेत. याचा अर्थ सर्वसामान्य माणसाची कदर नाही कुठच्याच गोष्टीमध्ये.

**दिप्ती भट :-**

आपण मिटींग लावून रजिस्टेशनची काय फॉरमॅलिटी आहे ती पूर्ण करावी. ॲटलिस्ट शताब्दीमध्ये आपले पेशंट तरी घेतील. तीन महिने झाले मी साहेबांना सांगितले. तीन महिन्यांमध्ये टायमिंग नाही.

**मा. उपमहापौर :-**

त्याची उत्तर आपल्याला मिळणार आहेत. परंतु विषय जो आहे ह्या विषयामध्ये आपण ह्या हॉस्पीटल चालवण्यासाठी असमर्थ आहोत असे नाही. परंतु आपल्याकडे नियोजनाचा अभाव आहे. आपण जे मागचे डॉक्टर बाहेरचे आणून डॉक्टरांची मदत घेतली होती. परंतु त्याचाही अनुभव फारसा चांगला राहीला नाही. त्यांनी आपल्याच हॉस्पीटलमध्ये त्यांना शिफारस पण पाहिजे आणि कुत्रा चावल्यानंतर दंश झाल्यानंतर श्वान झाल्याच्या लसी आपल्याकडे कमी होत्या. आज त्या आणलेल्या आहेत. ज्या ठिकाणाहून कुत्रे उचलले जातात फक्त जे वेडे झालेले कुत्रे आहेत किंवा जे जखमी आहेत त्यांनाच फक्त आपण तिथे नेतो बाकी ज्या परिसरातून कुत्रा आपण उचलतो मेल असेल की फिमेल असेल, ज्याचे ऑपरेशन आपण

करतो ते ऑपरेशन ज्या एरियातून कुत्रा उचलला त्याच एरियात सोडतो. एका गावात सोडत नाही आणि आजचा जो विषय आहे तो हॉस्पीटल आपण शासनाच्या ताब्यात देतो. शासनाने काही आपल्याला पूर्तता करायला सांगितल्या आहेत त्या पूर्तता करण्याच्या अनुषंगाने आपण काही मशीनरी आणणार आहोत. ह्या बाबतीमध्ये महापौर मॅडम आदेशीत करतील. डॉक्टरांनी उत्तर द्यावे. परंतु एक विषय आला म्हणून आपल्याला जे आठवले आहे तेच सांगणार.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे आम्ही दिशाभूल करत नाही. आमचा आक्षेप प्रशासनाविषयी आहे. आम्ही दिशाभूल केलीच नाही.

**अनिल सावंत :-**

उपमहापौर साहेब त्यांच्याकडे विषयच नाही. तर भूल कुठे करणार.

**नयना म्हात्रे :-**

महापौर मॅडम माझ्या वॉर्डमध्ये दोन तीन कुत्रे होते. सोळा कुत्रे आले कुठून? माझ्या एरियामध्ये दुसऱ्या एरियातले कुत्रे आले.

**प्रभात पाटील :-**

महापौर मॅडम माझा विषय आरोग्याशी संबंधित आहे. परंतु थोडा वेगळा आहे. आणि मला असं वाटतं प्रविण पाटीलला ह्या विषयी बरचसं माहिती असेल. सध्या काय झाले आहे की ह्या शहरामध्ये साप खूप निघत आहेत. काल माझ्या स्वतःच्या बंगल्याच्या आवारामध्ये दोन वेळा साप आला. मी फोन केला हा विषय थोडा वेगळा वाटेल. परंतु हा विषय सुध्दा आरोग्याशी निगडीत आहे. म्हणून मला बोलावसं वाटते. मी फोन केला आपल्या अग्निशमन दल हे वेस्टला, वेस्टमधून ईस्टमध्ये गाडी येईपर्यंत वेळ जातो तर तो साप काय तिथे बसून राहत नाही. की तू आता मला पकडायला येशील म्हणून. माझ्याकडे कोब्रा पण आलेला गेल्या संकष्टीला. माझ्या घराच्या बाजूला कोब्रा होता. काल एक वेगळा साप आलेला. गाडी पोहचेपर्यंत कोब्रा निघून गेला. काल ही साप निघून गेला तो साप पुन्हा संध्याकाळी ७.३० वाजता आला. पुन्हा फोन अटेंड केला मी प्रत्यक्ष बोराडेंशी बोलली. मी समजू शकते त्यांच्याकडे अंतर जास्त आहे म्हणून यायला वेळ लागला. आपल्याकडे अग्निशमन कनकिया रोडला साप निघाले परंतु त्यांच्याकडे सामुग्री नाही. त्यांच्याकडे पिंजरा नाही आणि त्यांच्याकडे पिंजऱ्याची गाडी पण नाही. माझी प्रशासनाला विनंती आहे आपल्यामार्फत की त्यांनी त्या सुविधा तिकडे उपलब्ध करुन द्याव्यात. ही एक गोष्ट आणि दुसरी गोष्ट आहे की आपण फोन करायला शिकावं मला असं वाटते की प्रविण पाटील तुम्हाला माहित असेल तर तुमच्या वॉर्डमध्ये मागच्या बिल्डींगमध्ये अजगराचे पिल्लू निघालेलं इतके भयानक साप ह्या शहरामध्ये आहेत. तर त्यांची सुध्दा सोय करण्यात यावी म्हणून. सर्प दंशाची लस आहे त्याच्याबरोबर साप चावल्याची जी लस आहे ती सुध्दा आपल्याकडे नियुक्त करण्यात यावी. आणि दुसरी गोष्ट उपमहापौर साहेब मी तुम्हाला सुचना नाही करत मी तुम्हाला विनंती करते की तुम्ही चांगली बॅटींग करता पण बाकी वेळेला अधिकाऱ्यांच्या बरोबर रहा. समर्थन नका करु पोटतिडकीने बोलतात लोक तुम्ही ह्याच्यावर बॅटींग करा.

**मा. महापौर :-**

डॉक्टर साहेबांनी ह्याच्यावर खुलासा द्या.

**प्रमोद पडवळ :-**

सर्वप्रथम लस उपलब्ध नाही याच्याबद्दल मॅडम मला वाटते आपली भेट पण झाली होती. तुम्ही स्वतः येऊन ह्याच्यावर चर्चा केली होती. ह्याच्यामध्ये शासनामार्फत लसी उपलब्ध होत असतात. आणि शासनस्तरावरुन सप्लायमध्ये काही प्रॉब्लेम आला तर तेवढ्या पुरती ती लस आपल्याकडे काही काळासाठी उपलब्ध होत नाही. बाकी आपल्याकडे व्यवस्थित लसी उपलब्ध असतात आणि त्याप्रमाणे लसीकरण लहान मुलांचे केले जाते.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम आपण यांनी लसी उपलब्ध केल्या ह्याला खर मानुया. ते खोटे बोलतात पण खरं मानुया. लस उपलब्ध कुठे करायची आहे. साप चावतो उत्तनला तुमची लस इथे भाईंदरला. साप चावतो चेण्याला तुमची लस भाईंदरला आम्ही त्यांना विनंती केली होती पत्र देऊन की ह्या इमरजन्सी गोष्टी आहेत. ह्यात खर्चाचा भाग नाही, कर्तुत्वाचा भाग नाही, नियोजनाचा भाग आहे. ज्या ठिकाणी साप चावेल अशी जी ठिकाणं आहेत त्याठिकाणी आपले हॉस्पीटल असतील तर तिथे ठेवा. नसतील तर खाजगी हॉस्पीटलमध्ये. डायव्हर्ट करा दोन इंजेक्शन, चार इंजेक्शन त्यांच्या जबाबदारीने आणि अशी सेवा द्यायला लोक तयार आहेत. त्यांनाही हॉस्पीटल चालवायचे आहेत. आपण जर त्यांना दिलीत किंवा पाच इंजेक्शन ही सापाची

आहेत. अमुक इंजेक्शन याची आहेत. जी अलाऊड आहेत ती जी लोकांना आवश्यक आहेत ती त्याच्यात प्रशासनाचा नियोजनाचा प्रश्न आहे. पण कुसेकर साहेब एकदम नाराजीने सांगतो की महापौरांची इच्छा आहे काम करायची, उपमहापौरांची इच्छा आहे काम करायची, सभागृहाची इच्छा आहे की लोकांनी निवडून दिले म्हणून काम करायची इच्छा आहे. आपल्या अधिका-यांची कोणती इच्छा आहे. कशा पध्दतीने काम चालते सभेमध्ये जर असेच होईल तर लोक काय म्हणतील. आपल्याबद्दल किंवा सभागृह काय बोलेल. आपण महापौर आहात, उपमहापौर जसे मॅडमने सांगितलं की तुम्ही बॅटींग करताना त्यांच्यावर बॅटींग करा. आमच्यावर बॅटींग करु नका अशी हिंमतच करु नका तुम्ही नाहीतर आपल्याकडून तुम्हाला कोणीतरी उत्तर देईल. ह्यांच्याकडून काम घ्यायचे आहे तेच काम करुन घ्या. दिवसभर काम करा, रात्रभर काम करा. लोक धन्यवाद देतील अखेर तर त्यांच्यासाठीच मस्टरवर सही करतात. महापौर मॅडम दुसरा एक विषय सांगतो. सहनशक्तीचा त्याच्यात अंत असतो. सामाजिक भावना आहेत काही कशी हिंमत झाली ह्यांना. नारायण मंदिरची जाऊन लाईट कापली. काय उत्तर द्यायचं. दुसरे कोणाला ह्यांनी काही नसेल पण आम्हाला सामाजिक बांधिलकी आहे. काय निगोशिएशन करता येत नाही का. जर काही चुक असेल आमच्या भावनांचा खेळ करण्याची हिंमत करु नका. महापौर मॅडम तुम्हाला विनंती करतो मी तुमच्या अधिकारात ते कनेक्शन चालू करायचे ऑर्डर द्या. ह्याच सभागृहात तुम्ही द्या ते कनेक्शन चालू होईल काही असेल ते पैसे भरायचे असतील धारावी मातेसाठी जे पैसे असतील ते आम्ही भरायला तयार आहोत. सभागृहाचे अनेक नगरसेवक आहेत.

**मा. महापौर :-**

सगळ्यांच्या तक्रारी आहेत ते मागून घ्या. सगळ्यांच तक्रारीचे निवारण करावे.

**राजेंद्र जैन :-**

हम महासभा में बात कर रहे है उसका फायदा क्या होगा। यह सुनने की बात है। क्योंकी आज से दो महासभा पहले मुझे मा. बालाजी खतगांवकर के सामने जो मैंने यहाँ बोला पोर्टीज का विषय उठाया था। आज टेंबा हॉस्पीटल का बेड संख्या है और जो हमारा इजामांडी का इफेक्टींग क्या है उसमें जो हायेस्ट कॉम्पलीकेशन रेट है उनको जो उपर की फॅसिलीटीज चाहिए वह फॅसिलीटी हमारे पास में वहाँ फोर्टीज के अंदर है। ४० टक्के बेड रिझर्व्हे रखने का हमने बंधनकारक बोला था। उस बात को दो महासभा बीत गई अगर डॉ. रमेश जैन का बाय पास हुआ, डॉ. रमेश जैन हमारे भुतपूर्व नगरसेवक सुनिता जैन उनकी वाईफ अभी पहिले नगरसेवक शाम को आठ बजे हार्ट प्रॉब्लेम हुआ मैंने पडवळ साहब को फोन किया की मुझे डॉ. रमेश जैन के लिए हमारा जो गर्व्हेमेंट कोटा है कमिशनर का कोटा है किसी भी कोटे में वहाँ पर आय.सी.सी. में भरती करने का है। पडवळ साहब का जवाब क्या था, वहाँ पर सोलह बेड है, चार नॉन वर्किंग है, १२ वर्किंग है। बेड रिझर्व्ह नहीं है। बेड नही है मतलब की वह हॉस्पीटल ४० टक्के बंधनकारक ४० टक्के बेड हमेशा रखने चाहिए। कोटे के लिए वह फ्री रखता ही नही। तो आपकी सारी प्रॉब्लेम है कुत्ता काटे तो बाहर ले जाते है। अगर छोटासा केस हो तो भी मना कर दे कहाँ अंदर काम होगा। वहाँ चार डेथ की बात करते है। वहाँ प्रॉपर्टी के लिए डेथ तो कहेगी। अल्टीमेटली कहे तो छोड के प्रॉपर्टी देने की बात है। हम कर सकते है ४० टक्के इतना ३ गुण ४ गुना देने के बाद में अगर हम ४० टक्के बेड का फॅसिलिटी नही तो दिया क्यो बात यह है हर सिस्टम हर केअर पुरा पुरा कोर्ट का सिस्टम हमारे पास में है। जो हेल्थ के लिए होता है प्रायव्हेट हेल्थ सेंटर, वेस्टर्न सेंटर उस हाय सेंटर बाद में ॲजस्ट सेंटर.........

**मा. महापौर :-**

राजेंद्र जैनजी आपका जो प्रश्न है वह आप मा. आयुक्त के पास जाके बोलिए।

**गिता जैन :-**

उपमहापौर साहेब आता अजून आरोप केलेला की तिकडे जे डॉक्टर आहेत प्रायव्हेट डॉक्टर जर सेवा द्यायला गेले.

**मा. उपमहापौर :-**

आरोप नाही केला. त्यांच्याकडून दहा शिफारशी जातात.

**राजेंद्र जैन :-**

४० टक्के का क्या किया मॅडम दो सभा पहले बात किया साहबने मुझे ४० टक्के के बारे में क्या ॲक्शन लिया यहाँ आश्वासन दिया गया था की हम ४० टक्के बेड पर कारवाई करेंगे उसमें क्या किया अभी तक। पडवळ साहब जवाब दिजीए।

**गिता जैन :-**

सिनिअर मोस्ट डॉक्टर तुम्ही जसे सांगतात त्यांची प्रॅक्टीस चालू केली आपले सिनिअर मोस्ट डॉक्टर, डॉक्टर अग्रवाल साहेब...........

**मा. उपमहापौर :-**

हे बघा परत एकदा सांगतो प्रॅक्टीस त्यांची झाली असं सांगितले नाही. एक गोष्टीवरती जोर देऊन सांगायचे कारण नाही. आता आपल्या महापालिकेच्या डॉक्टरांची सेवा बरोबर नाही त्याच्यामुळे तुम्ही आम्ही कोणीच समाधानी नाहीत. प्रत्येक जणांनी त्याच्यात नाराजी व्यक्त केली आहे. म्हणून त्यांच्यावरती कठोरता यावी म्हणून बाहेरच्या डॉक्टरांना इथे सेवेसाठी बोलवलं परंतु आमचा अनुभव असा आहे की त्यांच्याकडून इतर ठिकाणच्या शिफारशीच होतात. म्हणून आपण हा निर्णय घेतलेला आहे की हे हॉस्पीटल आपण शासनाने चालवावं. त्याच्यासाठी ज्या-ज्या गोष्टीची पुर्तता करायची आहे. आपल्या जवळ जवळ अर्ध्यापेक्षा अधिकच काम झालेलं आहे आणि त्यामुळे निश्चितपणे हे हॉस्पीटल एकदा इथून सरकारने चालवायला घेतला. त्या शताब्दी हॉस्पीटल गच्चीवरती ह्या शहरामध्ये संपूर्ण कामकाज पूर्णतः सेवा हॉस्पीटलच्या माध्यमातून मिळेलं. ॲज वेल ॲज आता जी आपण सेवा देतो त्या सेवेतून कुठच्या ही मोठ्या सर्जरी महापालिका करत नाही फक्त प्रसुतीगृह आणि मॅन्युफॅक्चर आणि जनरल ओ.पी.डी. एवढेच सध्या काम चालते. जर अधिक गंभीर आजार असेल तर पुढच्या हॉस्पीटलमध्ये शिफारस करत असतो.

**गिता जैन :-**

आपले डॉक्टर अग्रवाल जेव्हा तिथे जात होते तेव्हा त्यांचा अनुभव असा आहे की तिथले डॉक्टर आणि नर्स त्यांना सहकार्य करत नव्हते. मी ते स्पेसीफाय म्हणून केलं कारण त्यांची प्रॅक्टीसला दुसरं काही क्वेशन नाही. इथे मिरा भाईंदरमध्ये कदाचित ते पहिले डॉक्टर होते आणि आज ही अग्रवाल नर्सिंग होमला कुठेही पेशंटची कमतरता नाही. तरी त्यांनी आठवड्यात एक दिवस सेवा देत होते. फ्री ऑफ कॉस्ट पण आपल्याकडे नर्स असहकार करत होते. त्यांना ते मला वाटते जवळ जवळ शंभर पेक्षा जास्त सिजर करुन दिले. फ्री ऑफ कॉस्ट त्यांची सेवा दिलेली आहे. पण आपले नर्स आणि आपले डॉक्टर्स त्यांना सहकार्य करत नाही. ते ही तपासून पहा. मी हे सांगते जरा पूर्ण ऐकून घ्या मी काय बोलते ते तसे ते डॉक्टरला तसे निर्देश द्या असे सिनिअर डॉक्टर तुम्हाला सेवेसाठी भेटतात. १५ डॉक्टर्सची लिस्ट दिलेली ते १५ डॉक्टर्सशी तुम्ही असहकार्य केलं आणि त्यांना काम करु दिले नाही.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**प्रकरण क्र. ५८ :-**

**वैद्यकिय विभागाकरीता आवश्यक उपकरणे, फर्निचर, औषधे, सर्जिकल मटेरीयल व लॅब मटेरीयल खरेदी करणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ५९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाअंतर्गत एकुण १० आरोग्य केंद्र / उपकेंद्र, भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय व भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय कार्यरत आहे. याकरिता आवश्यक औषधे, लॅब मटेरिअल, सर्जिकल मटेरिअल करीता नव्याने वार्षिक निविदा मागविणे आवश्यक आहे. तसेच भारतरत्न पंडीत भिमसेन जोशी रुग्णालय शासनाकडे वर्ग करणेची प्रक्रीया सुरु आहे त्यातील उर्वरीत मॉडयुलर ओ.टी., आय.सी.यु., आय.सी.सी.यु. सुरु करणेकरीता उपकरणे व फर्निचर खरेदी करणेकरीता निविदा मागविणे आवश्यक आहे. याकरीता आवश्यक उप करणे, फर्निचर, औषधे, सर्जिकल मटेरिअल व लॅब मटेरिअल यांची यादी सोबत जोडली आहे.

सन २०१८-१९ या वर्षासाठी औषधे खरेदीकरिता रु.५०,००,०००/- रुग्णालये, लॅब मटेरीअल खरेदी / साहीत्य देखभाल दुरुस्ती कामे करिता रु.१,००,००,०००/- श्वानदंश/ सर्पदंश/ काविळ लस खरेदी करिता रु.२५,००,०००/-, रुग्णालये सर्जिकल व फर्निचर/ उपकरणे खरेदी करणे करिता रु.४,००,००,०००/-अंदाजित खर्च अपेक्षीत आहे.

**सुचक :- डॉ. राजेंद्र जैन** **अनुमोदन :- डॉ. सुशिल अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ५९, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मंजूर केलेली जैसलपार्क घोडबंदर रस्ता व भाईंदर उत्तन रस्ता यामधील टप्पा-२ कामांची अंमलबजावणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे सोपविणेबाबत.**

रुपाली शिंदे :-

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत 'विस्तारीत पायभुत सुविधा प्रकल्पांतर्गत" खालील रस्त्यांची कामे मंजुर करण्यात आलेली आहेत.**

1) **भाईंदर (पश्चिम) सुभाषचंद्र बोस मैदान ते उत्तन गांव रस्त्याचे रुंदीकरण व कॉक्रिटीकरण करणे.**
2) **भाईंदर (पुर्व) जैसलपार्क ते घोडबंदर रस्ता तयार करणे.**
3) **भाईंदर (पश्चिम) सुभाषचंद्र बोस मैदान ते दहिसर (पश्चिम) जोडणारा लिंक रस्ता तयार करणे.**

**उपरोक्त रस्त्याच्या कामापैकी अ.क्र.1 व 2 मधील कामातील टप्पा-1 च्या कामाच्या निविदा प्राधिकरणामार्फत मंजुर केल्या आहेत, त्यापैकी घोडबंदर वेस्टर्न हॉटेल ते घोडबंदरकडे जाणाऱ्या 60 मीटर रुंदीच्या रस्त्याचे काम सुरु देखील करण्यात आलेले आहे. उपरोक्त नमुद अ.क्र.1 व 2 मधील प्राधिकरणाने टप्पा-2 मध्ये खालील कामे केलेली आहेत.**

1) **राई गांव ते उत्तन रस्ता रुंदीकरण व कॉक्रिटीकरण करणे.**
2) **घोडबंदर गांव पाठीमागुन जैसलपार्क कडे येणारा 30 मीटर व 18 मीटर रुंदीचा रस्ता कॉक्रिटीकरणासह तयार करणे.**

**उपरोक्त कामांना सी.आर.झेड प्राधिकरणाच्या दृष्टीने मान्यता प्राप्त झालेली असुन वन विभागाची परवानगी घेण्याची प्रक्रीया सुरु आहे. तद्नंतर सदर रस्त्याखालील जागा विकास हक्क प्रमाणपत्राद्वारे ताब्यात घेता येणार आहे. मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे दि.03/08/2018 रोजी झालेल्या बैठकीत तसेच सदर कामे करण्यासाठी प्राधिकरणामार्फत महानगरपालिकेस निधी उपलब्ध करुन देऊन सदर कामाची पुढील सर्व अंमलबजावणी करण्यासंबंधी मा. आमदार श्री. नरेंद्र मेहता यांनी मौखिक निवेदन केले होते. सदर कामांची अंमलबजावणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत केल्यास रस्त्यातील मुर्धा ते उत्तन पर्यंत जिथे जुनी गावकऱ्यांची घरे रस्त्यामध्ये येत आहेत त्यांचेशी विचार विनीमय करुन त्यांना योग्य मोबदला दिल्यास सदर रस्त्यामधील अतिक्रमणे हटवून महापालिकेस मार्किंग करणे सोयीचे होईल. स्थानिक नागरीकांचे नुकसान होणार नाही व ते स्वखुशीने जागा देण्यास तयार होतील. सदर अतिक्रमणे हटवून व त्यांची पर्यायी व्यवस्था करुन सदर दुसऱ्या टप्प्याची कामे ही जलदगतीने होतील. तसेच भाईंदर उत्तन रस्ता टप्पा - 1 मधील कामाचे देखील प्राधिकरणाने कार्यादेश दिलेले नसल्याने व सदर कामातील अतिक्रमण, बांधकामे इ. मनपामार्फत काढण्याची कामे प्रचलित कार्यपध्दतीनुसार मनपाकडे काम सोपविल्यास सदर काम मनपामार्फत करता येईल.**

**तरी अ.क्र.01 च्या कामातील टप्पा-1 व टप्पा -2 तसेच अ.क्र.02 च्या कामातील टप्पा-2 या कामाची व अ.क्र.3 च्या कामाची अंमलबजावणी करण्याचे काम महानगरपालिकेस देण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठविण्यास ही सभा मान्यता देत आहे.**

संजय थेराडे :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम विषय मुंबई एम.एम.आर.डी.ए प्रादेशिक विकास प्राधिकरण यांच्या माध्यमातून बरीच काही काम ह्या शहरामध्ये करतात चांगली गोष्ट आहे. चांगले काम करतात. एम.एम.आर.डी.ए. आहे. सॅटेलाईट बॉडी, कॉंग्रेसचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख असताना ही तयार करण्यात आली होती. आणि त्या धर्तीवर एम.एम.आर.डी. ने मुंबई आणि त्याला लागून असलेल्या क्षेत्राला लागून असलेले बाकीचे महानगरपालिकेमध्ये ही बरेच काही काम केलेली आहेत आणि ते योग्यरित्या झालेले यशस्वीपणे त्यांनी पूर्ण केलेली विषय एम.एम.आर.डी. ने त्या सभेमध्ये काय सुचना केल्यात गोषवाऱ्यामध्ये खरं तर त्या गोषवारा बरोबर त्या सभेचे मिनिट्स येणे गरजेचे होते. कमीत कमी लोकप्रतिनिधीला तो विषय समजून आला असता की ह्या महानगरपालिकेच्या ह्या धर्तीवर एम.एम.आर.डी.ए. काम काय करणार आहे. रस्ता प्रस्तावित झालेला एम.एम.आर.डी. करणार ती त्याच्या निधी देवून मा. आयुक्त महोदय आपल्याला निधी

महानगरपालिकेला देणार असे त्यांनी सुचित केलं. तुम्ही तुमच्या माध्यमातून त्याचं निविदा प्रक्रिया करा. आपली काम करुन घ्या. आता एम.एम.आर.डी. जेव्हा काम करते तर त्यांची स्वतःची यंत्रणा आहेत. त्यांचे स्वतःचे कन्सलटन्ट आहेत अभियंता आहेत त्यांच्याकडे. काम प्रस्तावित करताना काय त्याचा दर ठरलेला आहे आज. गोषवाऱ्यामध्ये ते ही नमूद केलेलं नाही. आता तो रस्ता करताना मा. महापौर मॅडम, सभागृहनेते साहेब लक्ष वेधू इच्छितो ५०० कोटी रुपये खर्च होणार तो एम.एम.आर.डी. च्या माध्यमातून आपल्याला तो निधी उपलब्ध होईल. एम.एम.आर.डी.ए चे स्वतःचे म्हणणे काय आहे ह्या विषयावर आज ५०० कोटी रुपये खर्च शासन दरपत्रकानुसार ५०० कोटी रुपये खर्च असेल. सभागृहानेताचं वन विभागाची परवानगी, भुसंपादन कायदे, लोकांची जागा जाणार त्यांच्याबरोबर आपल्याला वाटाघाटी बरचं काही करावं लागणार. ह्याला लागणारा अवधी हा काही आजचा प्रवास नाही. दोन वर्ष, पाच वर्ष सुध्दा लागू शकतात. आज तुम्हाला ५०० कोटी रुपये मंजूर केले. तुम्ही हे सगळे आपल्या अंगावर घेतला चालून जाऊन आणि उद्याला ५०० कोटीची. एक हजार कोटी रुपये झाले १० हजार कोटी रुपये झाले तर वरचा ५०० कोटीचा भुर्दंड भरणार कोण? पालिकेची आर्थिक परिस्थिती आहे का? हे सगळ काही करायची ये रे माझ्या मागल्या कशाला पाहिजे. एम.एम.आर.डी.ए काम करणार आहे त्यांना करु द्या त्यांचे कन्सलटन्ट त्यांचे इंजिनिअर, त्यांचे देखरेख सर्व काही त्यांचे पालिकेने शेअर केले पाहिजे. त्याच्यामध्ये काम लवकरात लवकर करुन देण्यासाठी कारण की भुसंपादन तुम्हाला आणि आम्हाला करावा लागेल. आपल्या पालिकेच्या क्षेत्रामध्ये आपल्या धरतीवरती काम होणार आहे. हे सर्व असे स्पष्ट चित्र असताना हा थातुरमातूर गोषवारा प्रशासनाने आपल्याला दिलेला आहे. आम्ही ह्या गोषवाऱ्याला सहमत नाही. आज काय त्याची किंमत आहे. काय खर्च बसणार आहे त्याचा उल्लेख नाही. पुढचा खर्च वाढला तर कोण भुर्दंड भरणार याचा उल्लेख नाही. किती अवधी लागणार ते ही स्पष्ट नाही. अशा परिस्थितीमध्ये मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब आपल्याला खरं तर हे काम होणारच आहे. एम.एम.आर.डी.ए. ने केले तर काय फरक पडतो. त्यांनी आपली सुचना केलेली स्वतःच्या अंगावरचे बोजा काढून दिला. महोदय तुमच्यावरती ढकलून भुयारी गटारची परिस्थिती बघा. पाच हजार कोटी रुपयाची आपली स्कीम होती. आज कुठच्या कुठे गेली आहे. तो भुर्दंड आज महानगरपालिकेला भरावा लागत आहे. हे स्पष्ट चित्र तुमच्या आणि आमच्या समोर आहे. हे सर्व काही असताना परत आपण चुक करायची नाही. प्राधिकरण आहे ना सक्षम आहे करुन देईल. ना आपल्याला काम. चालेल होईल आम्हाला त्रास द्या. असे आम्ही कामाला लागलो. ४० टक्केची तफावत आहे. आपल्या अर्थसंकल्पाच्या जम्याच्या बाजूला ती असताना आपण दरवर्षी ती तफावत वाढणार आहे. कमी होणार नाही. कारण परिस्थिती, आर्थिक परिस्थिती समोर काही खर्च आस्थापनाचा खर्च सर्वच काही वाढत चाललेलं आहे. उत्पन्नाचे स्त्रोत आपल्या पालिकेचे कमी आहेत आणि अशा परिस्थितीमध्ये दुसरं कर्ज बाजारी होण्यापेक्षा एम.एम.आर.डी.ए ने करणे हे योग्य राहिलं ही माझी ह्या सभागृहाला सूचना आहे आणि तसा आम्ही ठराव ही करणार आहोत. तरी ही माझा प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी त्याचा निवेदन करावं ह्या विषयावरती.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम एम.एम.आर.डी. च्या मिटींगमध्ये आपण होत्या. वैती साहेब होते. त्यावेळी तिकडचे आयुक्त राजू साहेब फक्त विरोधी पक्षनेते नव्हते. कारण की त्यांना निमंत्रण नव्हते दिले. एम.एम.आर.डी.ए च्या आयुक्तांनी बोलवल होतं. महापौर मॅडमला यांना आम्ही त्यांच्याबरोबर गेलो होतो आणि त्यावेळी राजू शहा सुध्दा बोलले होते की आमच्याकडे कामाचा व्याप भरपूर आहे. काम पण जास्त आहेत आणि आम्ही तीन रुल तुमच्यासाठी सॅक्शन केले आहेत. आमचे काम चालू आहे. टप्पा क्र. ०१ ची आम्ही निविदा पण काढलेली आहे. आता टप्पा क्र. २ चे आमचं काम प्रोसेसमध्ये आहे. परंतु आमच्याकडे असलेले मॅनपावर उपलब्धता याच्यामुळे आमचा वेळ लागतो. तर मग महापौर मॅडम आणि आमदार साहेबांनी सांगितल नरेंद्र मेहता साहेबांनी की जर तुमच्याकडे जर मॅन पावर कमी असेल आणि तुम्ही थांबल असेल तर तुम्ही आम्हाला द्या. आम्ही काम फास्ट करु आणि त्यांनी पण सांगितल हो तुम्ही जर काम केलं तर तुम्ही फास्ट करु शकाल असे राजन साहेब स्वतः बोलले होते त्याच्यामुळे हा प्रस्ताव प्रशासनाने तुमच्यासमोर दिलेला आहे आणि ह्याच्याबद्दल चूक नाही. जर समजा एम.एम.आर.डी. चे इंजिनिअर त्या लोकांना इकडच्या लोकल परिस्थितीची जाण नाही. लोकल परिस्थिती त्यांना टॅकल करता येत नाही. लोकल प्रॉब्लेम असेल तर तो प्रॉब्लेम तुम्हीच सॉल्व्ह करु शकता. असे स्वतः ते बोलले होते आणि म्हणून प्रशासनातर्फे हा प्रस्ताव दिलेला आहे. ह्याच्यामध्ये दुसरा कोणताही तुमचा दुसरा उद्देश असा काहीच नाही. आमचा उद्देश क्लिअर आहे आणि स्पष्ट म्हटले आहे सदरची कामे जलद गतीने करण्याकरिता हा प्रस्ताव मांडतो. आपल्याला काम करण्याशी मतलब आहे. आपला उद्देश असाच आहे की काम लवकरात लवकर झालं पाहिजे. कारण की लिंक रोड हा पण खूप वर्षापासून मंजूर झालेला आहे.

त्याच्या जे अडथळे येतात ते आपल्याला दूर करायचे आहे. सगळ्या गोष्टी आपल्याला क्लिअर करायच्या आहेत. आपल्याला ते काम जलद गतीने करण्यासाठी प्रशासनाने प्रस्ताव दिलेला आहे. तरी माझी आपणांस विनंती आहे की जो आमचा ठराव आहे त्याच्यामध्ये हे म्हटले आहे की लवकरात लवकर काम करणेकरिता आपण महापालिकेतर्फे केला तर योग्य राहील.

**जुबेर इनामदार :-**

माझे मित्र सन्मा. सभापती धृवकिशोर पाटील साहेब तुमचे निवेदन तो असा काही झालं त्या मिटींगमध्ये तर त्याचे मिनिट्स द्या ना ते असे बोलले की आमच्याकडे भरपूर बोजा आहे आणि आम्ही करु शकत नाही. मेट्रोच्या ह्या.........

**धृवकिशोर पाटील :-**

विश्वास ठेवा ना.

**जुबेर इनामदार :-**

विश्वास कसा ठेवणार.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम आता तिन्ही जी काम आहेत की आता मोठ्या आपल्या महानगरपालिकेने मोठेपणा दाखवला आहे की आम्ही तिन्ही काम करणार आहोत. परंतु असं गेल्या कित्येक वर्षापासून बघतो की ही तिन्ही काम आम्ही कित्येक वेळा बघितलेले आहेत. महानगरपालिका ह्यापूर्वी करणार होती परंतु महानगरपालिकेने अशी असमर्थता दाखवून परत ती एम.एम.आर.डी.ए. कडे पाठवली आहेत. आता परत एम.एम.आर.डी.ए कडून इथे परत आपल्याकडे आली तर नेमकं हे काय चाललय तुमची आर्थिक स्थिती आहे का? ही तिन्ही काम मिरा भाईंदरच्या विकासाच्या दृष्टीकोनातून फार महत्वाचे आहेत आणि जर तुम्ही सांगत असाल का जैसल पार्क पासून ते घोडबंदरपर्यंत रस्ता नाव जैसल पार्क दिल आहे की घोडबंदर दिले आहे तर मधल काम आहे. त्याच्यामध्ये अशी परिस्थिती आहे की तिथे कधीच होऊ शकत नाही. राई गावापासून ते उत्तनपर्यंत रस्ता साहेब तिथे हजारो झाडे आहेत. हजारो गावकऱ्यांची शेकडो घरे आहेत. त्याच्याबद्दल काय करणार तुम्ही? फक्त उगाच आम्ही करणार आम्ही करणार सांगणार आणि निविदा काढणार. आणि दुसरं काही करत बसणार हा उद्देश तुम्ही करुन बघा एम.एम.आर.डी.ए. सक्षम आहे हे करण्यासाठी हे करणार आणि परत ह्या कामाचा बोजा वाढणार.

**मा. उपमहापौर :-**

हे शहर आपलं आहे आणि ह्या जैसल पार्क ते घोडबंदर रसता हा गेल्या अनेक वर्षापासून आपल्या विषयपटलावर आहे. हा नव्याने रस्ता झाला तर ह्या शहराला एक नविन रस्ता उपलब्ध होईल. आतापर्यंत सी.आर.झेड च्या बंधनामध्ये हा रस्ता अडकला होता. मी मागच्या वेळेला २००७ साली उपमहापौर असताना हा विषय चर्चेचा होता तेव्हापासूनचे प्रयत्न होते हा निर्णय आता अंतिम चरणात आला आहे. सुरुवातीच्या वेस्टर्न हॉटेलच्या बाजूने हा ६० मीटरचा रस्ता होतो. मागच्या सभेमध्ये आपण ह्या रस्त्यावरती चर्चा करताना त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला पाच पाच मीटरची गटार मंजूर केलेली आहेत. पुढे आल्यानंतर हा रस्ता जैसल पार्ककडे येताना ३० मीटरचा होतो आणि ही सर्व कामं एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातून करायची आहेत. एम.एम.आर.डी. च्या माध्यमातून काम करताना त्यांना पहिला अडथळा असा होईल की रस्त्यामध्ये बाधीत होणारी जी शेत जमीन आहे ही शेत जमीन ती त्याचा टी.डी.आर देण्याच किंवा त्याच्यावरती जी कायदेशीर प्रक्रिया आहे ती नोटीसा वगैरे बजावणे एम.एम.आर.डी.ए करु शकत नाही. म्हणून कार्पोरेशनच्या मा. आयुक्तांचा एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर, सिटी इंजिनिअर, मा. महापौर, मा. आमदार, सभागृहनेते, स्थायी समितीचे सभापती आम्ही सगळेच गेलो होतो. त्या मिटींगला अपेक्षित आयुक्त, एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर आणि जेवढी अपेक्षित मंडळी होती त्याच्यामध्ये चर्चा झाली आणि आपल्याकडे आपण जे आक्षेप सांगितले एम.एम.आर.डी.ए करु शकत नाही का? तर त्याऐवजी आपण तर ती टिप्पणी व्यवस्थित पाहीलं तर ती टिप्पणी आयुक्तांनी दिलेली आहे. त्यांनी स्पेसिफीक म्हटलेले आहे की त्या चर्चेला आम्ही होतो आणि उत्तनकडून जो मागून जाणारा रस्ता आहे हा पूर्णतः नवा रस्ता आहे आणि एखादी चांगली गोष्ट करताना आम्ही कसं एखादा चांगला निर्णय घेतला की तुम्ही विरोध करता तसे विरोध येतील. परंतु त्याच्यावरती मात करण्याचं काम आम्ही नक्की करु. त्याच्यात झाडे येतात, काय येतात, इच्छा आहे तिथे मार्ग. आमची इच्छा आहे, मार्ग काढण्याची तयारी आहे ह्या शहरामध्ये नविन रस्ता झाला तर चुकीचं होणार नाही.

**प्रविण पाटील :-**

उपमहापौर साहेब आम्ही जे सांगितल तुम्ही वेगळा अर्थ काढला. आम्हाला कामाबद्दल विरोध नाही. काम कोण करणार त्याच्याबद्दल आक्षेप आहे. काम तर करायलाच पाहिजे हे मागणी आमचीही आहे. आता तुम्ही सांगा एम.एम.आर.डी.ए कडे आपल्याकडे मिरा भाईंदर मेट्रोचा प्रश्न होता. त्याच काय झालं. तो आर्थिक बजेटमध्ये पण नाही घेतला तो. मिरा भाईंदर पालिकेचे काम आपण केलेले नाहीत. भुयारी गटाराचं काय झालं. उगाच तुम्ही तुमच्या अंगावर खेचून घ्याल.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

तुम्ही उगाच जी काम जेवढी आहेत ती पूर्ण करा. भुयारी गटाराचे काम अजून पूर्ण नाही केलं आणि उगाच ओढून घेतात तुमच्या अंगावर.

**निलम ढवण :-**

मार्चपर्यंत पूर्ण होणार होतं भुयारी गटाराचे पैसे नाहीत. आता पैसे काढून आणणार ह्याच्यासाठी आधी ते क्लीअर करा.

**सुरेश खंडेलवाल :-**

सन्मा. सदस्य प्रविण पाटील साहेब विषय असा आहे आमच्या निदेर्शनास असे वाटते की आपण गोषवारा वाचलाच नाही. त्याच्यामध्ये स्पष्ट असा उल्लेख आहे.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम आपण महानगरपालिकेने त्यांच्याकडे करणार अशी मागणी केली होती.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम मिरा भाईंदरच्या इतिहासामध्ये पहिल्यांदा असे झाले आहे की एम.एम.आर.डी.ए. आपले जे रस्ते एम.एम.आर.डी.ए फक्त ते हायवे वगैरे तिकडच्या रस्त्यासाठी निधी उपलब्ध करुन देते. हा निधी एम.एम.आर.डी.ए कडून आपल्याला मिळतो.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

खांबित साहेब खुलासा करेंगे आप सभी बैठ जाइए।

**दिनेश नलावडे :-**

घोडबंदर रस्ता तशाच पध्दतीने एम.एम.आर.डी.ए करून घेईल. कारण जैसल पार्क आणि त्याच्यानंतर मिरा भाईंदरची जागा आहे. तिथे बांधकाम झालेला आहे. रस्ता कशा पध्दतीने होईल प्रशासनाने सांगाव.

**दिपक खांबित :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे एम.एम.आर.डी.ए मध्ये येतं. एम.एम.आर.डी.ए हद्दीमध्ये जी कामं होतात त्यासाठी एम.एम.आर.डी. तीन प्रकारे काम करते. एकतर काम ही स्वतः करते त्यांचेकडे उपलब्ध कर्मचारी स्टाफ आहे. त्याच्यामध्ये टेंडर काढून ते करतात. दुसरं कर्ज देतात, तिसरं अनुदान देतात असे तीन प्रकारे काम करण्याची पध्दत आहे. काही कामांना ते ज्या स्थानिक सर्व संस्था असतात त्यांना पैसे देतात की तुम्ही टेंडर काढून तुम्ही काम करा. आता आपली वस्तुस्थिती अशी आहे की ह्याच्यामध्ये सी.आर.झेड ची मंजूरी आपण घेतो. अतिक्रमण आपण काढायचा आहे. त्यामध्ये आपण २०१३ साली हायकोर्टाची परमिशन घेतली. मार्च २०१६ मध्ये आपल्याला सी.आर.झेड ची परमिशन मिळाली. पर्यावरणाची त्याच्यात फक्त आपली कांदळवन कक्षाची परवानगी बाकी आहे आणि ह्यामध्ये प्रत्येकी दोन काम काढली. पहिले वेस्टर्न हॉटेल ते घोडबंदर हा जो ६० मीटरचा रस्ता आहे. ह्याच्यात त्यांनी ६२ कोटीचं टेंडर काढलेलं आहे. कामही सुरु केलं त्याचा पुढचा जो टप्पा आहे. तो कांदळवनची परमिशन नाही आल्यामुळे टेंडर काढलेला नाही आणि उत्तनचा जो रस्ता आहे. त्याच्यामध्ये पहिला जो राईपर्यंत रस्ता आहे. ६२ कोटीचा ते ही टेंडर काढलेलं आहे. परंतु ठेकेदारांना अजून कार्यादेश दिलेले नाही. तिकडे अतिक्रमण आहे. जागा ताब्यात घ्यायची आहे. हे सगळी प्रोसिजर आहे. ह्यामध्ये कसे आहे की ५० टक्के काम आपण करतो. जे ही क्लिअरन्स आपण करतो ह्यावर चर्चा ते म्हणतात की हे तुम्ही करा. आम्ही ५० टक्के तुम्ही अर्ध काम करत आहेत ना तर आम्ही तुम्हाला आणून तुम्ही काम करा. आम्हाला मान्य आहे करायला तयार आहोत. त्यावर ते बोलले की तुम्ही ठराव करुन पाठवा. आम्ही मंजुरी देतो प्राधिकरणने तुम्हाला काम देतो एवढा सिम्पल विषय आहे.

(सभागृहात गोंधळ)

**दिपक खांबित :-**

ह्या कामासाठी जो काही खर्च येणार तो सगळा निधी एम.एम.आर.डी.ए देणार. टेंडर आपण काढणार आपण ठेकेदार नेमून काम करणार आहोत.

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

हे काम आमच्या शहरासाठी शोभिवंत आहे. अभिमान वाटतो परंतु ह्याच्या अगोदर जी आपली जबाबदारी महानगरपालिकेची ते आपण पूर्ण केलेले आहेत का? फक्त आज त्यांनी एम.एम.आर.डी.ए ने भरपूर काम दाखवली. परंतु होतात किती वर्षांनी. किती वर्ष लागेल येतो जो मधला जो काळ आहे. जागा आहे ती सर्व किती समक्ष आहेत. ती आपल्या महानगरपालिकेने त्या लोकांनी काही एम.एम.आर.डी.ए ने काही मागितले. तुम्ही सत्ताधारी म्हणून तुम्ही तिकडे बसतात. जे काही कराल ते तुम्हाला माहिती आहे. आमच्या सभागृहाला ह्याबाबतीत सगळी माहिती नाही. ती सगळी माहिती जर दिली ते हा विषय आणून फायदा आहे. महापौर मॅडम फक्त विषय आम्ही मंजूर केला.

**मा. उपमहापौर :-**

दिनेशजी एम.एम.आर.डी.ए ने २०० मीटर ह्या शहरातला सगळ्यात मोठा रस्ता हा पहिल्यांदा होत आहे. ह्याच्यासाठी एक हजार सातशे ऐंशी मीटरच्या लांबीची निविदा निघालेली आहे. हा संपूर्ण २०० मीटरचा वेस्टर्न हॉटेलपासून चीचबादेवी रोड आहे. रिलायन्सकडचा जो रस्ता आहे त्याला तो रस्ता जॉईंट होत आहे. त्याच्या मधल्या प्रॉपर्टीला डिमार्केशन झालेला आहे. बहुतांश मॅक्झीमम शेती घोडबंदर गावकऱ्यांची आहे. त्यांची मानसिक तयारी आहे. रस्त्याचे काम चालू होते. सी.आर.झेड परमिशन मिळालेली आहे आणि मधल काम जे आहे कांदळवनाचा त्याच्यावरती कामकाज सुरु आहे. आपल्याला वाट बघायची गरज नाही.

**प्रविण पाटील :-**

काम कोण करतो? एम.एम.आर.डी.ए करते ना. निविदा कोणी काढलेली आहे काम कोण करते.

**मा. उपमहापौर :-**

सुरुवातीची निविदा.

**प्रविण पाटील :-**

आमच म्हणणे तेच आहे. एम.एम.आर.डी.ए चे आम्हाला आक्षेप नाही. एम.एम.आर.डी.ए. मार्फतच व्हावी. असा आमचा विषय आहे.

**मा. उपमहापौर :-**

ही काम एम.एम.आर.डी.ए. करणार नाही. काम महापालिकेला करावी लागतील.

**दिनेश नलावडे :-**

अतिक्रमण झालेल आहे. जैसल पार्क ते घोडबंदर रस्त्यासाठी उपमहापौर साहेब बरी याची कल्पना असेल, अर्ध्यापेक्षा जास्त जागा ही अतिक्रमणाने बाधीत झालेली आहे. हा जो रस्ता एम.एम.आर.डी.ए. करुन देत असेल तर आम्ही करतो. आम्ही त्यांच हजार वेळा स्वागत करु. परंतु त्याच्या अगोदर आपल्या ज्या समस्या आहेत त्या अगोदर हल करा. त्याच्यानंतर हा विषय घेणे योग्य आहे. फक्त मंजुरी द्यायची पुन्हा त्यावर बर्डन आमच्या महानगरपालिकेवर येणार. महापौर मॅडम तुम्हाला माहिती असेल आज ह्या शहरामध्ये जे आमच्याकडे छोटी मोठी काम चालतात. त्या ठेकेदारांना आठ आठ महिने झाले अजून पगार जात नाही. ह्या सगळ्या समस्या आपण लक्षात घ्या आणि त्याच्यानंतर अशा पध्दतीचं आपण काम केले तर परत आपल्याला महानगरपालिकेकडे असतील. त्या शहराची काय हालत होईल ते तुम्ही विचार करा.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम आमचे एक स्पष्टीकरण सांगतो. सभागृहाला आमचा रस्त्याला विरोध नाही. विकासकामाला विरोध नाही. एम.एम.आर.डी.ए हे काम करते ते त्यांनीच करावा हा विषय मांडून त्याला कारण पण आम्ही तुम्हाला दिलेली आहेत. मुंबई महानगरपालिकेमध्ये सुध्दा एम.एम.आर.डी.ए. ने बरेच विकासाची काम केलेली आहे. मात्र तिथली जी नुडल एजन्सीमध्ये तिथली महानगरपालिका भूसंपादन करुन तिथे अतिक्रमण हटवून देते जे काही बाकीच्या परवानग्या आहेत तेच प्राप्त करुन देते. महानगरपालिकेची ती जबाबदारी आहे हे काही नविन नाही. आमचे ही तेच मत आहे. उपआयुक्त साहेब ही सगळी जी जबाबदारी आहे ती आपण जलद गतीने युध्दपातळीवर पूर्ण करुन द्यावी. एम.एम.आर.डी.ए ने हा रस्ता ह्याच्यासाठी करावा की आज त्यांनी मंजूरी दिलेल्या निधिला उद्या त्याचा क्रॉस व्हेसकेलेशन ते आज ठरवता येणार नाही. कारण तसा कुठे तुम्ही बोलू शकत नाही. मी बोलू शकत नाही. भूसंपादन विषय

हा एका दिवसामध्ये संपत नाही. आज २०-२० वर्ष झाले निधी संपून आपली निधी २०१७ ला संपली. भूसंपादन करु शकलो नाही. बस आरक्षणाचे म्हणून अशा प्रकारचं जो काही असतो त्याच्यात त्याला विचार करताना एक दुसरा दुरदृष्टीकोन पाहिजे. एम.एम.आर.डी.एन ने जे काम करुन घ्यावं. शहरामध्ये रस्ते झाले पाहिजे, तुम्ही हे विकासाचे कामामध्ये आम्ही काही अडथळा आणत नाही. विषय स्पष्ट आहे. आमची भूमिका एकच आहे. एम.एम.आर.डी.ए च्या माध्यमातून हे काम झालं पाहिजे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम ही परिस्थिती कशी झाली आहे माहिती आहे. स्वतःच झाल ठेंगा आणि गाढवाचं झाल घोडं. महापालिका स्वतःची काम करु शकत नाही. एम.एम.आर.डी.ए चे ओझ घेतात. सोबत खांद्यावर करायला. एम.एम.आर.डी.ए ने ४० लाख शौचालयासाठी निधी दिला होता. आज परिस्थिती बघा. महापालिकेने बांधून घेतलेली आहेत ती शौचालय काय परिस्थिती आहे बघा. एम.एम.आर.डी.ए हे करु शकत नाही हे ऐकून आश्चर्य वाटलं. त्यांच्या जवळ काम जास्त आहेत म्हणून पालिकेवर जबाबदारी देऊन टाकली. उपविभागीय अधिका-यांचे माझ्याजवळ पत्र आहे मा. आयुक्तांना दिलेलं आहे मी थोडस पत्र वाचून दाखवतो. ह्या विषयाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय मुंबई ह्यांच्या सुचनेनुसार उच्च स्तरीय समितीने गठीत करण्यात आलेली उच्च स्तरीय समितीने गठीत करण्यात आलेली, उच्च स्तरीय समितीने, मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील मौजे नवघर तालुका, जिल्हा ठाणे येथील जैसल पार्क चौपाटी, बीच, बोर्ड, चाचा नेहरु बाल उद्यान इतर खेळाचे मैदाने एकूण परिसरात दि. १९/०२/२०१४ रोजी डेफीनेशन त्या ठिकाणी त्यांना खाडी किनारी व कांदळवनालगत अनधिकृत बांधकाम केल्याचे दिसून आलेले आहे. ह्या विषयासंदर्भात आपण पर्यावरणाची हानी आणि कांदळवनाचे नुकसान करायचे हे स्पष्ट होत आहे. त्याबाबत उच्च स्तरीय समितीने तसा मुद्दा उपस्थित केलेला असेल त्याबाबतचा अहवाल मा. उच्च न्यायालयात सादर करण्यात आलेला आहे. त्यासंदर्भात छायाचित्रांची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे. आणि कोर्टाने आदेश दिलेले आहेत. तुम्हाला कोर्टाने असा आदेश दिलेला आहे. पर्यावरण संरक्षण नियम १९८६ कलम ४ नुसार पत्र मिळाल्यापासून २४ तासाच्या आत उपरोक्त मिळकतीमध्ये महानगरपालिकेमार्फत करण्यांत आलेले अनधिकृत बांधकाम त्वरीत निष्कासित करुन सदर जमिनिमध्ये कांदळवनाची झाडे पुर्नःविनियोजित करणेसाठी कार्यवाही करावी. सदर बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडून अवमान याचिका प्रलंबित असून प्रस्तुत प्रकरण मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे तात्काळ अहवाल सादर करण्याचे करायचे असेल विलंब टाळावा. हे जे जैसल पार्क चौपाटी तिथे रोड जाणार आहे ना. तिथले कांदळवनाचे नाश केला म्हणून जनहित याचिका ऑलरेडी दाखल आहे. आणि हे कोर्टाचे निर्देश आहेत. ह्या सर्व बाबींची चर्चा एम.एम.आर.डी.ए च्या अध्यक्षांच्या मिटींगमध्ये झाली का? आम्हाला कळायला पाहिजे ना नाहीतर काहीतरी आमच्या डोक्यावर आणून दाबाल आणि म्हणाल मंजूरी द्या. एम.एम.आर.डी.ए ने हे ओझ महापालिकेकडे का टाकलं. ह्या कायदेशीर बाबी एम.एम.आर.डी.ए पूर्ण करु शकत नाही म्हणून नाहीतर एम.एम.आर.डी.ए सारखी सक्षम प्राधिकरण नाही. परंतु काही वर्षापासून आपल्या महापालिकेमध्ये असे चालू आहे. काम झालं नाही झालं तरी चालेल पण टेंडर मिळायला पाहिजे. टप्पा काम, टप्पा एक पूर्ण झाला अजून वन विभागाची मान्यता प्राप्त नाही. प्रशासनाचा गोषवारा सांगतो आणि परत विधानसभा इलेक्शन येत आहे त्यावेळी नारळ फोडायचा, काम होवो नको होवो. अशा सर्व गोष्टी आहेत आणि ह्या सर्व न्यायालयामध्ये याचिका प्रलंबित आहेत आणि ह्या गोष्टी तुम्ही शासनाच्या निदर्शनास आणून देत नाही आणि एम.एम.आर.डी.ए च्या निदर्शनाला आणून देत नाहीत असे हे प्रस्ताव घेऊन येतात पालिकेमध्ये आणि पास करुन घेतात. बहुमताच्या जोरावर नंतर धोक्यात येतील ना नगरसेवक आणि हा रस्ता एम.एम.आर.डी. ने पालिकेकडे दिला...........

(सभागृहात गोंधळ)

**सुरेश खंडेलवाल :-**

तुम्ही हे सांगत आहेत की आम्ही विकासामध्ये विरोधक नाही नंतर तुम्ही हे पण सांगतात की होणार नाही. एम.एम.आर.डी.ए कडे मिटींग झालेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

फक्त लोकांची दिशाभूल करायची का?

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत 'विस्तारीत पायभुत सुविधा प्रकल्पांतर्गत'' खालील रस्त्यांची कामे मंजुर करण्यात आलेली आहेत.**

1) **भाईंदर (पश्चिम) सुभाषचंद्र बोस मैदान ते उत्तन गांव रस्त्याचे रुंदीकरण व कॉक्रिटीकरण करणे.**
2) **भाईंदर (पुर्व) जैसलपार्क ते घोडबंदर रस्ता तयार करणे.**
3) **भाईंदर (पश्चिम) सुभाषचंद्र बोस मैदान ते दहिसर (पश्चिम) जोडणारा लिंक रस्ता तयार करणे.**

**उपरोक्त रस्त्याच्या कामापैकी अ.क्र.1 व 2 मधील कामातील टप्पा-1 च्या कामाच्या निविदा प्राधिकरणामार्फत मंजुर केल्या आहेत, त्यापैकी घोडबंदर वेस्टर्न हॉटेल ते घोडबंदरकडे जाणाऱ्या 60 मीटर रुंदीच्या रस्त्याचे काम सुरु देखील करण्यात आलेले आहे. उपरोक्त नमुद अ.क्र.1 व 2 मधील प्राधिकरणाने टप्पा-2 मध्ये खालील कामे केलेली आहेत.**

1) **राई गांव ते उत्तन रस्ता रुंदीकरण व कॉक्रिटीकरण करणे.**
2) **घोडबंदर गांव पाठीमागुन जैसलपार्क कडे येणारा 30 मीटर व 18 मीटर रुंदीचा रस्ता कॉक्रिटीकरणासह तयार करणे.**

**उपरोक्त कामांना सी.आर.झेड प्राधिकरणाच्या दृष्टीने मान्यता प्राप्त झालेली असुन वन विभागाची परवानगी घेण्याची प्रक्रीया सुरु आहे. तद्नंतर सदर रस्त्याखालील जागा विकास हक्क प्रमाणपत्राद्वारे ताब्यात घेता येणार आहे. मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे दि.03/08/2018 रोजी झालेल्या बैठकीत सदर कामे करण्यासाठी प्राधिकरणामार्फत महानगरपालिकेस निधी उपलब्ध करुन देऊन सदर कामाची पुढील सर्व अंमलबजावणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत केल्यास सदर कामे ही जलदगतीने होतील. सदर कामाची अंमलबजावणी करण्यासाठी ठराव करुन प्राधिकरणास पाठवावा लागेल. तरी सदर प्रस्तावाबाबत विचार विनिमय होऊन निर्णय होणस प्रशासनाने मंजूरीची शिफारस केलेली आहे.**

**मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने गोषवाऱ्यामध्ये सदर कामासाठी होणाऱ्या खर्चाचा तपशिल दिलेला नाही. सदरचे काम महानगरपालिकेच्या माध्यमातून करावयाचे असल्यास लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक चालु वर्षाच्या शासन दरपत्रकानुसार होण गरजेचे आहे. काम सुरु होण्यास विलंब होणार आहे, वन विभागाची परवानगी, भुसंपादन प्रक्रियेला किती अवधी लागेल हे आज निश्चित करता येत नाही. त्यामुळे कामाच्या खर्चात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सुधारीत दरपत्रकास व वाढीव खर्चास कोण जबाबदार राहिल याबाबतची माहिती प्रशासनाने सादर केलेली नाही. मिरा भाईंदर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती कुमकुवत आहे. या कारणास्तव पडणारा आर्थिक बोजा पालिकेला पेलणार नाही. तरी सदरचा रस्ता मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून विकसित होणे योग्य आहे. सदरच्या विकास कार्याला अंतिम स्वरुप देण्याच्या दृष्टीकोनातून लागणारे श्रम पालिका प्रशासनाने युध्दपातळीवर करावे असा मी ठराव मांडत आहे.**

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५९ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. रुपाली शिंदे (मोदी), अनुमोदन श्री. संजय थेराडे. दुसरा ठराव सुचक श्री. अनिल सावंत, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम दुसरा ठराव मी मतदानास टाकतो. सुचक श्री. अनिल सावंत ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. रुपाली शिंदे(मोदी) ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्रीम. रुपाली शिंदे (मोदी) ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५५, विरोधात २६, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्रीम. रुपाली शिंदे (मोदी) यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. ५९ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मंजूर केलेली जैसलपार्क घोडबंदर रस्ता व भाईंदर उत्तन रस्ता यामधील टप्पा -२ कामांची अंमलबजावणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे सोपविणेबाबत.**

ठराव क्र. ६० :-

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत 'विस्तारीत पायभुत सुविधा प्रकल्पांतर्गत" खालील रस्त्यांची कामे मंजुर करण्यात आलेली आहेत.**

1) **भाईंदर (पश्चिम) सुभाषचंद्र बोस मैदान ते उत्तन गांव रस्त्याचे रुंदीकरण व कॉक्रिटीकरण करणे.**
2) **भाईंदर (पुर्व) जैसलपार्क ते घोडबंदर रस्ता तयार करणे.**
3) **भाईंदर (पश्चिम) सुभाषचंद्र बोस मैदान ते दहिसर (पश्चिम) जोडणारा लिंक रस्ता तयार करणे.**

**उपरोक्त रस्त्याच्या कामापैकी अ.क्र.1 व 2 मधील कामातील टप्पा-1 च्या कामाच्या निविदा प्राधिकरणामार्फत मंजुर केल्या आहेत, त्यापैकी घोडबंदर वेस्टर्न हॉटेल ते घोडबंदरकडे जाणाऱ्या 60 मीटर रुंदीच्या रस्त्याचे काम सुरु देखील करण्यात आलेले आहे. उपरोक्त नमुद अ.क्र.1 व 2 मधील प्राधिकरणाने टप्पा-2 मध्ये खालील कामे केलेली आहेत.**

1) **राई गांव ते उत्तन रस्ता रुंदीकरण व कॉक्रिटीकरण करणे.**
2) **घोडबंदर गांव पाठीमागुन जैस लपार्क कडे येणारा 30 मीटर व 18 मीटर रुंदीचा रस्ता कॉक्रिटीकरणासह तयार करणे.**

**उपरोक्त कामांना सी.आर.झेड प्राधिकरणाच्या दृष्टीने मान्यता प्राप्त झालेली असुन वन विभागाची परवानगी घेण्याची प्रक्रीया सुरु आहे. तद्नंतर सदर रस्त्याखालील जागा विकास हक्क प्रमाणपत्राद्वारे ताब्यात घेता येणार आहे. मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे दि.03/08/2018 रोजी झालेल्या बैठकीत तसेच सदर कामे करण्यासाठी प्राधिकरणामार्फत महानगरपालिकेस निधी उपलब्ध करुन देऊन सदर कामाची पुढील सर्व अंमलबजावणी करण्यासंबंधी मा. आमदार श्री. नरेंद्र मेहता यांनी मौखिक निवेदन केले होते. सदर कामांची अंमलबजावणी मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत केल्यास रस्त्यातील मुर्धा ते उत्तन पर्यंत जिथे जुनी गावकऱ्यांची घरे रस्त्यामध्ये येत आहेत त्यांचेशी विचार विनीमय करुन त्यांना योग्य मोबदला दिल्यास सदर रस्त्यामधील अतिक्रमणे हटवून महापालिकेस मार्किंग करणे सोयीचे होईल. स्थानिक नागरीकांचे नुकसान होणार नाही व ते स्वखुशीने जागा देण्यास तयार होतील. सदर अतिक्रमणे हटवून व त्यांची पर्यायी व्यवस्था करुन सदर दुसऱ्या टप्प्याची कामे ही जलदगतीने होतील. तसेच भाईंदर उत्तन रस्ता टप्पा - 1 मधील कामाचे देखील प्राधिकरणाने कार्यादेश दिलेले नसल्याने व सदर कामातील अतिक्रमण, बांधकामे इ. मनपामार्फत काढण्याची कामे प्रचलित कार्यपध्दतीनुसार मनपाकडे काम सोपविल्यास सदर काम मनपामार्फत करता येईल.**

**तरी अ.क्र.01 च्या कामातील टप्पा-1 व टप्पा -2 तसेच अ.क्र.02 च्या कामातील टप्पा-2 या कामाची व अ.क्र.3 च्या कामाची अंमलबजावणी करण्याचे काम महानगरपालिकेस देण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठविण्यास ही सभा मान्यता देत आहे.**

**सुचक :- सौ. रुपाली वसंत शिंदे (मोदी)        अनुमोदक :- श्री. संजय थेराडे**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | निरंक |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | ढवण निलम हरिश्चंद्र | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | नलावडे दिनेश दगडु | |
| ६ | जैन गीता भरत | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | पाटील प्रभात प्रकाश | ७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | सिंह मदन उदितनारायण | ८ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ९ | भानुशाली वर्षा गिरधर | ९ | सावंत अनिल दिवाकर | |
| १० | यादव मिरादेवी रामलाल | १० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ११ | शाह रिटा सुभाष | ११ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| १२ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | १२ | पाटील अनिता जयवंत | |
| १३ | गोहिल शानू जोरावर सिंह | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १४ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १५ | भोईर सुनिता शशिकांत | १५ | भट दिप्ती शेखर | |
| १६ | पाटील वंदना मंगेश | १६ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १७ | रावल मेघना दिपक | १७ | भोईर भावना राजू | |
| १८ | जैन सुनिता रमेश | १८ | शेख रुबीना फिरोझ | |
| १९ | अरोरा दीपिका पंकज | १९ | सपार उमा विश्वनाथ | |
| २० | नाईक विविता विवेक | २० | परदेशी गिता हरीश | |
| २१ | भावसार वंदना संजय | २१ | पाटील नरेश तुकाराम | |
| २२ | बेलानी हेमा राजेश | २२ | शेख अमजद गफार | |
| २३ | भोईर विणा सुर्यकांत | २३ | पाटील वंदना विकास | |
| २४ | सोनार सुरेखा प्रकाश | २४ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| २५ | मुखर्जी अनिता बबलू | २५ | अहमद साराह अकरम | |
| २६ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २६ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २७ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २८ | म्हात्रे परशुराम पदमाकर | | | |
| २९ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३० | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३१ | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| ३२ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| ३३ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३४ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३५ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३६ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३७ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३८ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३९ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ४० | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ४१ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४२ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ४३ | थेराडे संजय अनंत | | | |
| ४४ | जैन राजेंद्र भवरलाल | | | |
| ४५ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४६ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४७ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४८ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४९ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **५०** | **दुबे मनोज रामनारायण** | | | |
| **५१** | **व्यास रवि वासुदेव** | | | |
| **५२** | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | | | |
| **५३** | **पांडेय पंकज सूर्यमणि** | | | |
| **५४** | **भोईर गणेश गजानन** | | | |
| **५५** | **पारधी सुजाता यशवंत** | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

सही/-
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६०, **डॉ. पंजाबराव देखमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत नोंदणीकृत संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी जागा भाड्याने देणेबाबत.**

**वर्षा भानुशाली :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र मुंबई महानगर क्षेत्रात मोडत असून शहर मुंबई महानगरपालिकेलगत वसलेले आहे. त्यामुळे मुंबई मध्ये कामधंद्या निमित येणारे नागरीक रहिवांसासाठी मोठया प्रमाणावर मिरा -भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात येतात . त्यामुळे मिरा -भाईंदर शहरांचे झपाट्याने नागरीकरण झालेले असून शहराची लोकसंख्या प्रचंड वेगाने वाढलेली आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेतंर्गत नोंदणीकृत संस्थाना वस्तीगृह चालविण्यासाठी शासकीय व इतर इमारती भाडयाने देणेबाबत, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र . संकिर्ण -२०१८/प.क्र.२४९/१८/तांशि-४ दि.१३/०७/२०१८ अन्वये नोंदणीकृत संस्थानी वस्तीगृह चालविण्याचा निर्णय शासनाने केली आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडून रेंटल हाऊसिंग स्कीम या योजनेतंर्गत तीस वर्षाच्या भाडे तत्वावर एस .के.डी. इमारतीमधील ५०५ सदनिका मिरा -भाईंदर महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या आहेत . सदर सदनिकेला मासिक भाडे रु.३०००/- प्रति सदनिका असे मा. महासभा ठराव क्र.९२ दि.०१/०३/२०१४ रोजी निश्चीत केलेले आहे. सदर सदनिका ह्या धोकादायक इमारती , रस्ता रुंदीकरण, बी.एस.यु.पी. प्रकल्पातंर्गत बाधीत लाभार्थ्यांना तात्पुरत्या स्वरुपात संक्रमण शिबीर म्हणुन वापर सुरु आहे. सदर एस.के.डी. इमारतीमधील ५०५ सदनिका पैकी १५ सदनिका मुले व मुलींसाठी वस्तीगृह सुरु करण्यासाठी शासनाने डॉ.पंजाबराव देशमुख वस्तीगृह निर्वाह भत्ता योजनेतंर्गत नोंदणीकृत संस्थाना वस्तीगृह चालविण्यासाठी भाडयाने देण्याकरीता मा .जिल्हाधिकारी, ठाणे यांनी समक्ष कळविलेले आहे . वरील वस्तुस्थीती पाहता सदर "भाडे तत्वावरील घरे" मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण रेंटल हाऊसिंग स्कीम या योजनेतंर्गत भाडयाने महानगरपालिकेस दिल्याने सदर योजनेसाठी देण्यासाठी मा. महानगर, आयुक्त यांच्याकडून प्रस्तावीत सदनिकाची मंजुरी घेण्यासाठी महानगरपालिकेमार्फत पत्र व्यवहार केलेला आहे.

मनपा क्षेत्रातील मध्यवर्ती ठिकाणी ज्या ठिकाणी सर्व बाजुने पोहोच रस्ता असेल अशा वास्तुमध्ये प्रायोगिक तत्वावर महापालिकेने १० रुममध्ये मनपाच्या समाजविकास विभागामार्फत ०१ वर्षाकरिता वसतीगृह सुरु करावे त्या वसतीगृहाला आवश्यक तेवढे विद्यार्थी उपलब्ध होत आहेत किंवा कसे याबाबत अंदाज घेऊन खरोखर बाहेरील विद्यार्थी त्यांचा उपभोग घेत असतील तर पुढील वर्षाकरिता महापालिकडे प्र स्ताव सादर करुन मान्यतेने डॉ.पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजनेतंर्गत नोदंणीकृत संस्थांना मुला मुलीचे वस्तीगृह चालविण्यासाठी आवश्यक जागा भाडयाने जागा देण्यास ही सभा मान्यता द्यावी असा मी ठराव मांडत आहे.

**मिरादेवी यादव :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम हा जो प्रस्ताव आलेला आहे आयुक्त साहेब हा नक्की काय प्रस्ताव आहे? पाच रुम आपण घ्यायचे भाड्याने द्यायचे आपण द्यायचे की एन.जी.ओ. ला द्यायचे आहेत. एन.जी.ओ. ला देते वेळी

टेंडर काढणार आहात की, काय करणार आहात त्याच्यामध्ये मुलामुलींसाठी वेगळे आहेत की त्या ५ रुममध्ये मुले मुली राहणार आहोत की कुठले मुल मुली राहणार आहेत. कारण तुमचा जो गोषवारा आहे तो संदिग्ध आहे.

**मा. उपमहापौर :-**

शासनाचे एक परिपत्रक आहे आणि शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे आपल्याला ते डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह भत्ता जी योजना आहे विद्यार्थ्यांसाठी आपण व्यवस्था करणार आहोत.

**अनिल सावंत :-**

बरोबर आहे ती योजना पंजाबराव देशमुख योजना आहे.

**मा. उपमहापौर :-**

तमाम महापालिकांना हा निर्णय त्यांनी लागु केलेला आहे.

**अनिल सावंत :-**

हरकत नाही आपण पण करु पण ती योजना काय आहे?

**मा. उपमहापौर :-**

त्याचा प्रशासनाने खुलासा करावा.

**अनिल सावंत :-**

प्रशासनाने जर सांगितले तर बरे होईल.

**दिपक खांबित :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो राज्यशासनाने डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना सुरु करण्यासाठी एक जी.आर. काढलेला आहे. त्याअनुषंगाने आपल्याकडे वसतिगृह सुरु करणेकरिता जागा मागितलेली आहे. तर आपल्याकडे जागा सध्या उपलब्ध नाही. आपल्याकडे एम.एम.आर.डी.ए. ची एक बिल्डींग आलेली आहे. भाडेतत्वावरील तर त्याच्यामध्ये काही रुम त्यांना आपण देऊ शकतो ते सुध्दा एम.एम.आर.डी.ए. च्या परवानगीने तर आपण एम.एम.आर.डी.ए. ला प्रस्ताव दिलेला आहे. जर एम.एम.आर.डी.ए. ने परवानगी दिली तर याच्यातुन १० रुम तिकडे आपण मुले आणि मुलींना तिकडे फक्त भाड्याने जागा द्यायची आहे. करायचे त्यांनी आणि चालवायचे सगळे कलेक्टर कडे आहे.

**अनिल सावंत :-**

१५ रुम आपण कोणाला द्यायचे?

**दिपक खांबित :-**

कलेक्टर साहेबांना.

**अनिल सावंत :-**

कलेक्टर साहेबांना हॅन्डओव्हर करुन टाकायचे.

**दिपक खांबित :-**

हो.

**अनिल सावंत :-**

नंतरची जबाबदारी त्यांची.

**दिपक खांबित :-**

त्यांची.

**अनिल सावंत :-**

आपण करणार आहोत एम.एम.आर.डी.ए ने ज्या हॅन्डओव्हर सदनिका केलेल्या आहेत.

**दिपक खांबित :-**

त्याने आपल्याला भाड्यावर दिलेल्या आहेत ३० वर्षासाठी. त्यामुळे आपण त्यांना कायमस्वरुपी देऊ शकत नाही.

**अनिल सावंत :-**

आपण कलेक्टरकडून भाडे घेणार आहोत का? पालिका नाही. नोंदणीकृत संस्थांना भाडे ठरविलेले आहे. गोषवाऱ्यामध्ये सांगितले आहे.

**दिपक खांबित :-**

हो भाड्याने द्यायचे आहेत.

**अनिल सावंत :-**

कलेक्टर आपल्याला भाडे देईल.

**दिपक खांबित :-**

देणार.

**अनिल सावंत :-**

त्याठिकाणी कुठच्या मुलामुलींना प्रवेश मिळणार?

**दिपक खांबित :-**

कलेक्टर स्वतः बोलले ते संस्थेने भरावेत.

**अनिल सावंत :-**

ते कलेक्टर देणार आहेत. आपण नाही देणार.

**दिपक खांबित :-**

हो योजना आहे डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत.

**अनिल सावंत :-**

कारण महापौर मॅडम हा मुद्दा याच्यासाठी मी उपस्थित केला की हा गोषवारा सुध्दा संदिग्ध आहे. याच्यामध्ये मुलींना सुध्दा आपण देणार आहोत. शेवटी महापालिकेची वास्तु आहे. एम.एम.आर.डी.ए. ने आपल्याला जे हॅन्डओव्हर केलेले आहेत रुम ते महापालिकेच्या हॅन्डओव्हर आहेत. तुम्हाला कधी वेळ मिळाला तर लोढा ॲक्वा जो हायवेला प्रोजेक्ट झालेला आहे. एम.एम.आर.डी.ए चा मगाशी एक मुद्दा उपस्थित झाला की एम.एम.आर.डी.ए. आपल्याला देत आहे. एवढा निधी देत आहे तर आपण विकास कामांना का विरोध करायचा. एम.एम.आर.डी.ए. आपल्याला देत आहे. म्हणजे काय मेहेरबानी करत नाही. ४ एफ.एस.आय जवळ जवळ १० प्रोजेक्ट एम.एम.आर.डी.ए. चे शहरामध्ये चालु आहेत. ४ एफ.एस.आय. आपण

त्यांना देत आहोत. तर उद्या मुलामुलींना हे १५ रुम कलेक्टर देणार आहे ती वास्तु महापालिकेची असणार आहे. आज तिथे जाऊन बघा झोपडपट्टीपेक्षा वाईट परिस्थिती आहे. एम.एम.आर.डी.ए ने जे आपल्याला रुम हॅन्डओव्हर केलेले आहेत. त्या ४ फ्लोअर, ५ फ्लोअरला दुकाने लागली आहेत. गॅलरीमध्ये टपऱ्या लागलेल्या आहेत. एवढी वाईट परिस्थिती आहे. लिफ्ट कधी चालू नसते. तर अशावेळी पालिकेने फक्त कलेक्टरला देऊन पालिकेची जबाबदारी संपणार नाही. उद्या काही वाईट परिस्थिती उद्‌भवली तर सर्व दोष पालिकेचा असणार आहे. त्यामुळे निर्णय घेतेवेळी विचारांनी निर्णय घ्यावा हीच माझी विनंती आहे.

**जुबेर इनामदार :-**

काही तुम्ही जागा बदललेली आहे त्या ठरावामध्ये.

**मा. महापौर :-**

नाही. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ६० :-**

**डॉ. पंजाबराव देखमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत नोंदणीकृत संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी जागा भाड्याने देणेबाबत.**

**ठराव क्र. ६१ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र मुंबई महानगर क्षेत्रात मोडत असून शहर मुंबई महानगरपालिकेलगत वसलेले आहे. त्यामुळे मुंबई मध्ये कामधंद्या निमित येणारे नागरीक रहिवांसासाठी मोठया प्रमाणावर मिरा -भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात येतात . त्यामुळे मिरा -भाईंदर शहरांचे झपाट्याने नागरीकरण झालेले असून शहराची लोकसंख्या प्रचंड वेगाने वाढलेली आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेतंर्गत नोंदणीकृत संस्थाना वस्तीगृह चालविण्यासाठी शासकीय व इतर इमारती भाडयाने देणेबाबत, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र . संकिर्ण -२०१८/प.क्र.२४९/१८/तांशि-४ दि.१३/०७/२०१८ अन्वये नोंदणीकृत संस्थानी वस्तीगृह चालविण्याचा निर्णय शासनाने केली आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडून रेंटल हाऊसिंग स्कीम या योजनेतंर्गत तीस वर्षाच्या भाडे तत्वावर एस .के.डी. इमारतीमधील ५०५ सदनिका मिरा -भाईंदर महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या आहेत . सदर सदनिकेला मासिक भाडे रु.३०००/- प्रति सदनिका असे मा. महासभा ठराव क्र.९२ दि.०१/०३/२०१४ रोजी निश्चीत केलेले आहे. सदर सदनिका ह्या धोकादायक इमारती , रस्ता रुंदीकरण, बी.एस.यु.पी. प्रकल्पातंर्गत बाधीत लाभार्थ्यांना तात्पुरत्या स्वरुपात संक्रमण शिबीर म्हणुन वापर सुरु आहे. सदर एस.के.डी. इमारतीमधील ५०५ सदनिका पैकी १५ सदनिका मुले व मुलींसाठी वस्तीगृह सुरु करण्यासाठी शासनाने डॉ.पंजाबराव देशमुख वस्तीगृह निर्वाह भत्ता योजनेतंर्गत नोंदणीकृत संस्थाना वस्तीगृह चालविण्यासाठी भाडयाने देण्याकरीता मा .जिल्हाधिकारी, ठाणे यांनी समक्ष कळविलेले आहे . वरील वस्तुस्थीती

पाहता सदर "भाडे तत्वावरील घरे" मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण रेंटल हाऊसिंग स्कीम या योजनेतंर्गत भाडयाने महानगरपालिकेस दिल्याने सदर योजनेसाठी देण्यासाठी मा. महानगर, आयुक्त यांच्याकडून प्रस्तावीत सदनिकाची मंजुरी घेण्यासाठी महानगरपालिकेमार्फत पत्र व्यवहार केलेला आहे.

मनपा क्षे त्रातील मध्यवर्ती ठिकाणी ज्या ठिकाणी सर्व बाजुने पोहोच रस्ता असेल अशा वास्तुमध्ये प्रायोगिक तत्वावर महापालिकेने १० रुममध्ये मनपाच्या समाजविकास विभागामार्फत ०१ वर्षाकरिता वसतीगृह सुरु करावे त्या वसतीगृहाला आवश्यक तेवढे विद्यार्थी उपलब्ध होत आहेत किंवा कसे याबाबत अंदाज घेऊन खरोखर बाहेरील विद्यार्थी त्यांचा उपभोग घेत असतील तर पुढील वर्षाकरिता महापालिकडे प्रस्ताव सादर करुन मान्यतेने डॉ.पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजनेतंर्गत नोदंणीकृत संस्थांना मुला मुलीचे वस्तीगृह चालविण्यासाठी आवश्यक जागा भाडयाने जागा देण्यास ही सभा मान्यता द्यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. वर्षा भानुशाली अनुमोदन :- सौ. मिरादेवी यादव**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६१, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुविधांच्या विकासासाठी विशेष अनुदान या योजनेअंतर्गत समितीने केलेल्या कामांसाठी महानगरपालिकेच्या ५०% हीश्याची रक्कम उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेबाबत.**

**प्रशांत दळवी :-**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खा लील कामांना विभागीय आयुक्त , कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखालील समितीने "महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुविधांच्या विकासासाठी विशेष अनुदान " या योजनेअंतर्गत दि.12/02/2016 रोजीच्या बैठकीत प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु प्रशासनाने**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १) | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट रस्त्यावर न्यु गोल्डन नेस्ट येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| २) | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट रस्त्यावर इंद्रलोक फेस-२ गेट जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ३) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील बालाजी हॉस्पिटल जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ४) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील नक्षत्र टॉवर जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ५) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील तुंगा हॉस्पिटल जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ६) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील चैतन्य हॉस्पिटल (टाटा डोकोमो) जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ७) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील शिवार गार्डन येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ८) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील बेवर्ली पार्क (मॅकडॉनल्ड नाका) जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ९) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील एस.के.स्टोन सिग्नल येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १०) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील सुंदर नगर येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ११) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील सिल्वर पार्क येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १२) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील हटकेश (मारुती सुझुकी शोरुम) येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १३) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील आशिष पटेल बंगल्याशेजारी येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १४) | मिरारोड (पूर्व) कनकिया रस्त्यावरील कनकिया पोलिस चौकी जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| १५) | भाईंदर (पूर्व) गौरव गार्डन, शुभम बार समोर बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १६) | हटकेश येथील १५ नं. बस स्टॉप येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १७) | हटकेश येथील २२ नं. शेवटचा बस स्टॉप (शांतीनगरी) बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| | एकूण | रु.८५,००,०००/- |

**सदर कामांसाठी 50% निधी हा महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार असे नमुद केले आहे. परंतु सदर कामाकरीता कोणत्या लेखाशिर्षाखाली किती निधीची तरतुद आहे याची सविस्तर माहिती दिलेली नसल्याने सदरचा विषय फेरसादर करावा असा ठराव मांडत आहे.**

**मनोज दुबे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर पुढचा विषय घ्या.

**जुबेर इनामदार :-**

साहेब मला तुम्ही ठराव वाचायला दिला तुम्ही मगाशी तो विषय वसतिगृहाच्या तुमच्याच ठरावामध्ये जागा बदलली. महापालिका क्षेत्रातील मध्यावरती ठिकाणी ज्याठिकाणी सर्व बाजूने तोच रस्ता असेल अशा वस्तुमध्ये प्रायोगिक तत्वावर महापालिकेने १० रुममध्ये महापालिका समाज विकास विभागामार्फत एक वर्षाकरिता वसतिगृह सुरु करावे. ह्या वसतिगृहाला आवश्यक ते नागरिक उपलब्ध होत आहेत किंवा कसे याबाबत अंदाज घेऊन खरोखर बाहेरील नागरिक त्याचा उपभोग घेत असतील तर पुढील वर्षाकरिता महापालिका प्रस्ताव सादर करुन मान्यतेने डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना अंतर्गत नोंदणिकृत संस्था मुलामुलींना वसतिगृह चालविण्यासाठी आवश्यक जागा भाड्याने देण्यासाठी ही सभा मान्यता देत आहे. आता तुम्ही बोलत आहात त्याच जागेवरती ठराव केला तो दुसऱ्या जागेचा पुन्हा तोच विषय ठराव दुसरा वाचला. आमचे लक्ष होते ठरावावर मग याचे करायचे काय द्यायचे आहे की नाही द्यायचे आहे. आपली इच्छा आहे का नाही द्यायची. प्रायोगिक तत्वावर कुठे?

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम सन्मा. सदस्य जुबेरजी याच्यात आपण म्हटले आहे की, जिथे सेंट्रल क्लोज असेल सगळीकडे ॲप्रोच झोन असतील त्याठिकाणी त्यांनी १५ डिमांड केल्या आपण फक्त १० सांगितले आहेत. आणि हा प्रायोगिक तत्वावरती महापालिकेची कर्मचाऱ्यांतर्फे आपण चालवायचा आणि कलेक्टरने असे कुठले सांगितले नाही. त्यांनी काय सांगितले की पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत नोंदणीकृत संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी शासकीय इतर इमारती भाड्याने देणेबाबतचा निर्णय आहे. तो निर्णयाची इम्पलीमिंटेशन तयार करण्याची आयुक्तांना दिलेली आहे. आणि म्हणून आपण हा विषय घेतलेला आहे की १५ पैकी फक्त आपण १० करावेत आणि १० आपल्या महापालिका कर्मचारी देऊन देखरेख करावी. आणि जर ते सक्सेस झाले असेल तरच तो निर्णय आयुक्तांचा असेल त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी.

**जुबेर इनामदार :-**

तुमच्याकडे संधी आहे. तुमच्याकडे सदनिका आहेत. त्याच्यातुन द्यायच्या असतील तर कलेक्टरला द्या तसे काही तिथे होणार नाही............

**धृवकिशोर पाटील :-**

कलेक्टरने स्वतः मागितलेले नाही तुम्ही गोषवारा निट वाचा.

**जुबेर इनामदार :-**

कलेक्टरने नाही मागितले ना कोणाला सांगितले आता खांबित साहेब बोलले जिल्हाधिकारीकडे आपल्याला सोपवायचे आहेत. ते जिल्हाधिकारी संस्थेला देतील खरी परिस्थिती काय आहे कशाला दिशाभुल करत आहे ते आहे तुमचा काही व्यक्तीगत इंट्रेस्ट आहे का?

**धृवकिशोर पाटील :-**

अजिबात नाही. महापौर मॅडम गोषवाऱ्यामध्ये क्लिअर कट म्हटलेले आहे की प्रशासनाने शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय त्याची अंमलबजावणी करावी. तो जो निर्णय झालेला आहे निर्णयाची अंमलबजावणी करावी आणि म्हणून आयुक्तांनी हा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याच्यामध्ये आम्ही म्हटलेले आहे की कोणत्याही संस्थेला देणे ऐवजी आमचे मित्र अनिल सावंत बोलले की तिथे बरोबर अरेंजमेंट होत नाही आता जे तुम्ही म्हटले घोळ झालेला आहे आणि प्लानिंग बरोबर नाही.

**जुबेर इनामदार :-**

सभापती महोदय आताची रेकॉर्डींग मागवा. सन्मा. कार्यकारी अभियंता दिपक खांबित साहेबांनी आता जे निवेदन केले ते आम्हाला परत ऐकायचे आहे. बरोबर आहे शासन निर्णय आपल्याला मान्य करावे लागेल. कुणाचे शासन असले तरी किती पारदर्शक नसले तरी आम्ही मान्य करु. मात्र आता जे निवेदन त्यांनी केले ते शासनाचे निर्णयामध्ये तो काय निर्णयाच्या बरोबर तुम्ही जोडला का नाही. दिपक खांबित साहेब बोलले जिल्हाधिकारीच्या ताब्यात द्यायची आहेत जिल्हाधिकाऱ्याने मग त्याला कुठल्याही संस्थेला द्यायचे असेल द्यावे. भाडे कोण देईल ते ठरलेले नाही. तुम्ही हा उगाच महापालिकेच्या उरावर कशाला भुर्दंड घेता.

**धृवकिशोर पाटील :-**

गोषवाऱ्यामध्ये लिहीलेले आहे सध्या इमारतीमधील ५०५ सदनिकांपैकी १५ सदनिका मुले व मुलींसाठी वसतिगृह सुरु करण्यासाठी शासनाने डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत नोंदणीकृत संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी भाड्याने देणेकरिता मा. जिल्हाधिकारी ठाणे यांनी समक्ष कळविले आहे.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाकडून उत्तर मागतो किती सदनिका मागितल्या? त्या शासन निर्णयामध्ये असे आहे का इतकी स्क्वेअर फुट जागा आम्हाला द्या तेवढे तुम्ही गुणीले १५ केले असेल तुम्ही १५ सदनिका ठरविल्या असतील. ते तरी उत्तर देऊ द्या. प्रशासनाचे उत्तर तुम्ही देऊन कसे चालेल. प्रशासनाला देऊ द्या काय खरे आहे काय स्कीम आहे. असेल देऊ चांगले आहे अभ्यासासाठी मुले बाहेरुन येत असतील त्यांना पण मदत केली पाहिजे खर काय आहे.

**दिपक खांबित :-**

साहेब कलेक्टर साहेबांनी ३/८/२०१८ रोजीचे पत्र आहे हा जो जी.आर आहे त्याच्या अनुषंगाने की आपल्या हद्दीमध्ये ज्या जागा आहेत. त्याच्या बाबतीत अशा पडीत जागा किंवा आपल्याला ज्या जागा ह्या वसतिगृहाला देता येत असतील.

**जुबेर इनामदार :-**

किती सदनिका?

**दिपक खांबित :-**

याबाबत मा. आयुक्तांचे समक्ष चर्चा झाली साहेब इलेक्शनला आले होते त्याच्यात प्रत्यक्ष चर्चा झाली ते बोलले ठिक आहे. आम्हाला ह्या इमारतीमधील १५ रुम द्या आम्ही तिकडे वसतिगृह सुरु करु. म्हणून हा गोषवारा दिला. जागा शेवटी त्यांना द्यायची आहे वसतिगृह त्यांना चालवायचे आहे.

**जुबेर इनामदार :-**

कोण चालवणार?

**दिपक खांबित :-**

जिल्हाधिकारी आणि त्यांची संस्था.

**जुबेर इनामदार :-**

निर्णय कोण घेणार जिल्हाधिकारी.

**दिपक खांबित :-**

कंट्रोल हा तंत्रशिक्षण विभागाचा राहील.

**जुबेर इनामदार :-**

आम्हाला तुम्ही अर्धवट माहिती दिली आम्हाला तुम्ही याच्याबरोबर तो जी.आर जोडून दिला असता तर आम्ही वाचला असता थोडा अभ्यास आमचा झाला असता आता सन्मा. सदस्य आमचे बोलले आम्ही आपली जागा दुसरी कुठली तरी नविन द्यायला निघाले जिल्हाधिकारीचे म्हणणे काय आहे. किती जगा तुम्हाला पाहिजे किंवा शासनाचे काय धोरण आहे की ह्या शहरासाठी ह्या लोकसंख्येप्रमाणे इतकी जागा द्या.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम इथे असे म्हटलेले आहे की नोंदणीकृत संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी भाड्याने द्या. पण कलेक्टर साहेबांना द्यायची असेल तर मग नोंदणीकृत संस्थांना द्यायची गरज काय? प्रशासनाच्या गोषवाऱ्यामध्ये पण असे आहे आता खांबित साहेब बोलले की कलेक्टरला द्यायचे आहे. इथे म्हटलेले आहे की नोंदणीकृत संस्थाना वसतिगृह द्या.

**दिपक खांबित :-**

त्यांना ते देणार आहेत साहेब नोंदणीकृतला कलेक्टर देणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

संस्था नोंदणीकृत पाहिजे बरोबर आहे.

**दिपक खांबित :-**

त्याच्यावरती कंट्रोल प्राचार्य तंत्रशिक्षण विभाग जे आहे त्यांचे राहणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

सर्व मान्य आहे. तुम्ही मला सांगा आता जी.आर माझ्याकडे नाही. शासन निर्णयामध्ये जिल्हाधिकारी हा नोडल एजन्सी आहे का?

**दिपक खांबित :-**

ते तसेच झाले.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

जिल्हाधिका-यांचे जे पत्र आहे त्याच्यामध्ये लिहिलेले आहे व्यवसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह बांधण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील जिल्ह्यासाठी ५ कोटी इतके अनुदान नोंदणीकृत संस्थांना देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. त्याअनुषंगाने उच्च व तंत्रशिक्षण विभागातील शासन निर्णय दि. २२/२/२०१८ अन्वये नोंदणीकृत संस्थांनी वसतिगृह चालवण्याची तरतुद शासनाने केलेली आहे. परंतु सदर प्रस्तावाला अंतिम स्वरुप येण्यासाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे हे तात्पुरत्या स्वरुपात हे जिल्हाधिका-यांकडून उपलब्ध करुन द्यायचे आहे. ज्यावेळी शासन निर्णय करेल त्यावेळेस मग ते त्याठिकाणी सुरु होईल.

**जुबेर इनामदार :-**

५ कोटी रुपये आपल्याला शासन देणार आहे ह्या विषयावर.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

आपल्याला नाही. नोंदणीकृत संस्थांना देणार आहे शासन अनुदान. ती योजना सुरु होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात आपल्याकडे सुरु करायचे आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम शासनाचा जी.आर आहे. आता आयुक्त साहेबांनी सांगितले उच्च शिक्षण घेणारे जे विद्यार्थी विद्यार्थीनी आहेत त्यांच्यासाठी वसतिगृह चालू करायचे शासनाचा निर्णय आहे. आपण ठराव काय करतो. एक वर्षाकरिता ते वसतिगृह सुरु करावे त्या वसतीगृहाला आवश्यक तेवढे नागरीक उपलब्ध होत आहेत किंवा कसे. नागरिकांना तुम्ही कसे देणार.

**जुबेर इनामदार :-**

विद्यार्थी त्यांचा शब्द चुकला असेल आपण तेवढे ॲडजस्ट करु.

**अनिल सावंत :-**

साहेब नागरिकांना तुम्ही कसे देणार.

**मा. उपमहापौर :-**

त्यात सुधारणा करुन घेऊ. शासनाला स्वयंस्पष्ट निर्णय आहे. हा निर्णय १३/७/२०१८ रोजी झालेला आहे. आणि शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २१८/प्र.क्र.२४९/२०१८/ताशि-४ दि. १३/७/२०१८ शासनाचा जी.आर आहे. डॉ. पंजाबराव देशमुख योजनंअंतर्गत विद्यार्थ्यांना वसतिगृह उपलब्ध व्हावे त्याच्यासाठी कलेक्टर साहेबांकडे आदेश आले. कलेक्टर साहेब जेव्हा आपल्याकडे आले त्यावेळेला निवडणुका चालू होत्या प्रभाग समितीच्या त्यावेळेला कलेक्टर साहेबांबरोबर आयुक्त साहेबांची चर्चा झाली होती. आता त्यांच्याकडे आलेली जबाबदारी आपल्याकडे सोपविलेली आहे आणि कलेक्टरने असे पत्र लिहिलेले आहे की याला कालावधी जाणार आहे. शासनाचे धोरण निश्चित झालेले नाही मग तोपर्यंत ही जबाबदारी महापालिका आपले १० रुम देत असेल तर त्यात चुकीचे काही असायचे कारण नाही किंवा ह्याच्यामध्ये नफा तोट्याचा प्रश्न करु नका. हा मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासनाने जो निर्वाह भत्ता ठेवलेला आहे त्या योजना डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भता तर त्या योजनेअंतर्गत हे आहे आपण थोडेसे सहकार्य करुया.

**अनिल सावंत :-**

साहेब आम्ही त्या विरोधात ठराव करत नाही.

**मा. उपमहापौर :-**

ठराव नाही चर्चा करायचेच कारण नाही. नागरिकांच्या ऐवजी विद्यार्थी करा.

**अनिल सावंत :-**

त्याच्यामध्ये असे आहे जागा बदलली कार्यकारी अभियंता हे सांगत आहेत....

**मा. उपमहापौर :-**

हे बघा आयुक्तांना वाटले तो त्यांनी निर्णय दिला. आपण महासभेमध्ये निर्णय घेत आहो.

**धृवकिशोर पाटील :-**

साहेब थोडीशी प्रशासनाची पण चूक झाली आहे. गोषवारा वाचा मिरा भाईंदर महापालिका क्षेत्र मुंबई महापालिका क्षेत्रात शहर मुंबई महापालिका के लगत वसलेले आहे. त्यामुळे मुंबईमध्ये कामधंद्यानिमित्त देणारे नागरिक रहिवाससाठी मोठ्या प्रमाणावर मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रात येतात. प्रशासनाची एक ओळ चुकलेली आहे. विषय एकदम सिम्पल आहे की उच्च व तंत्रशिक्षण विभागाने एक अध्यादेश काढला आहे. त्याच्यात असे म्हटलेले आहे की मुले मुली मुंबईमध्ये शिक्षणाकरिता येत आहेत त्यांच्या राहण्याची सोय वसतिगृह करायची आहे. त्याच्यासाठी प्रस्ताव विचाराधीन आहे. त्याला आपण ५ कोटी रुपये नोंदणीकृत संस्थांना प्रस्ताव देणार आहोत. तर स्टॉक दॅट अरेंजमेंट करायची आहे तरी तुमच्या महापालिकेतर्फे तुम्ही काही करु शकता का? आता मागे आपण रात्रनिवारा केंद्र दिले होते. प्रत्येक संस्थेला त्याच्यात काय झाले. संस्थेने बरोबर काम केले नाही म्हणून आम्ही ठराव काय मांडला की सुरुवातीला मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत काही २-३ कर्मचारी उपलब्ध करुन ते वसतिगृह सुरु करावे. आणि जर तिथे विद्यार्थी संख्या जास्त झाली आणि रिस्पॉन्स भेटला तर मग आपण त्या नोंदणीकृत संस्थांना द्यावा असा आमचा शुध्द आणि स्पष्ट विचार आहे.

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्र मुंबई महापालिका क्षेत्रात मोडत आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

त्याच्यात प्रशासनाची थोडी चूक झालेली आहे. ती चुक आपण दुरुस्त करुया.

**जुबेर इनामदार :-**

ते आपल्या मिरा भाईंदरसाठी नाही फक्त मुंबईसाठी.

**धृवकिशोर पाटील :-**

नाही कसे आहे, मुंबई परिसरामध्ये ह्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये जी लोक जे विद्यार्थी शिक्षणासाठी येत आहेत. त्या विद्यार्थ्यांसाठी आपण स्टॉक दॅट अरेंजमेंट करत आहेत.

**मा. उपमहापौर :-**

सुधारणा काय असेल ते करुन घ्या. त्याच्यात चर्चा करायचे कारण नाही.

**प्रकरण क्र. ६१ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुविधांच्या विकासासाठी विशेष अनुदान या योजनेअंतर्गत समितीने केलेल्या कामांसाठी महानगरपालिकेच्या ५०% हीश्याची रक्कम उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेबाबत.**

**ठराव क्र. ६२ :-**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील कामांना विभागीय आयुक्त , कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखालील समितीने 'महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सुविधांच्या विकासासाठी विशेष अनुदान " या योजनेअंतर्गत दि.12/02/2016 रोजीच्या बैठकीत प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु प्रशासनाने**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १) | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट रस्त्यावर न्यु गोल्डन नेस्ट येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| २) | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट रस्त्यावर इंद्रलोक फेस-२ गेट जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ३) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील बालाजी हॉस्पिटल जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ४) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील नक्षत्र टॉवर जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ५) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील तुंगा हॉस्पिटल जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ६) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील चैतन्य हॉस्पिटल (टाटा डोकोमो) जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ७) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील शिवार गार्डन येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ८) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील बेवर्ली पार्क (मॅकडॉनल्ड नाका) जवळ बस थांबा | रु.५,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | बसविणे. | |
| ९) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील एस.के.स्टोन सिग्नल येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १०) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील सुंदर नगर येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| ११) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील सिल्वर पार्क येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १२) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील हटकेश (मारुती सुझुकी शोरुम) येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १३) | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील आशिष पटेल बंगल्याशेजारी येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १४) | मिरारोड (पूर्व) कनकिया रस्त्यावरील कनकिया पोलिस चौकी जवळ बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १५) | भाईंदर (पूर्व) गौरव गार्डन, शुभम बार समोर बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १६) | हटकेश येथील १५ नं. बस स्टॉप येथे बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| १७) | हटकेश येथील २२ नं. शेवटचा बस स्टॉप (शांतीनगरी) बस थांबा बसविणे. | रु.५,००,०००/- |
| | एकूण | रु.८५,००,०००/- |

**सदर कामांसाठी 50% निधी हा महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार असे नमुद केले आहे. परंतु सदर कामाकरीता कोणत्या लेखाशिर्षाखाली किती निधीची तरतुद आहे याची सविस्तर माहिती दिलेली नसल्याने सदरचा विषय फेरसादर करावा असा ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. मनोज दुबे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६२, **महापालिकेची भोगवटा दाखला (ओ.सी.) देणेबाबत अभय योजना लागु करणे.**

**प्रभात पाटील :-**

मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र . ६(७)(८) प्रमाणे शहरामधील इमारतीसाठी भोगवटा दाखला देण्याची कार्यवाही करणेत येत असून मिरा भाईंदर शहरामधील भोगवटा न घेता वापर सुरु असलेल्या व ५ वर्षापुर्वी नोंदणी झालेल्या गृहनिर्माण संस्थेसाठी भोगवटा दाखला देणेबाबत विशेष सवलत मोहिम राबविणेसाठी दि.२३/०३/२०१५ रोजीच्या मा. महासभेने ठराव क्र. ७२ अन्वये अटीशर्तींच्या आधारे दि.३१/०३/२०१६ पर्यंत मान्यता दिलेली आहे.

सदर मोहिमे अंतर्गत भोगवटा दाखला मिळणेकामी दाखल झालेल्या अर्जापैकी बहुतांश प्रकरणाम ध्ये आवश्यक कागदपत्राची पुर्तता नसल्यामुळे प्राप्त अर्ज नामंजूर करणेत आलेली असल्यामुळे व सदर योजनेचा लाभ अधिकाधिक लोकांना होणेच्या दृष्टीकोनातून सदर मोहिमेसाठी दि.२८/०६/२०१६ (दि.०७/०५/२०१६ रोजीची तहकूब मा. महासभा) रोजी मा. महासभेने ठराव क्र . २२ अन्वये दि .३१/०३/२०१८ रोजी पर्यंत मुदतवाढ मंजूर केलेली आहे . जिल्हा उपनिंबधक यांच्याकडून दि .३१/०३/२०१५ पुर्वी नोंदणी झालेल्या इमारतींना भोगवटा दाखला देणेबाबतची अभय योजनेची मुदत दि.३१/१२/२०१९ पर्यंत वाढविणेस मंजुरी देण्यात येत आहे . सदर बाबीची मा.आयुक्तांनी शहरामध्ये होर्डींग लाऊन व अन्य मार्गाने जाहिर प्रसिध्दी देऊन सदरची बाब सर्व नागरिकांकडे पोहचेल , त्यामुळे नागरिक जास्तीतजास्त या योजनेचा लाभ घेतील याची खबरदारी घ्यावी. मुदतवाढ दिलेल्या कालावधीमध्ये आलेले अर्ज निकाली काढावेत.

तसेच अनधिकृत बांधकामे अधिकृत करणेबाबतची शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी करणेबाबत दि.१५/०९/२०१८ मुदत दिलेली आहे त्या मुदतीमध्ये आलेल्या अर्जावर विचार करुन लवकरात लवकर जी प्रकरणे अधिकृत करणे योग्य आहेत ती तात्काळ अधिकृत करावी व या योजनेची मुदत दि . ३१/१२/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यास मंजुरी देत आहे. तसेच बहुतांश विकासक भोगवटा दाखला न घेता इमारत रहिवास व्याप्त करीत असल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे दि.०१/१०/२०१८ पासुन जे विकासक विनाभोगवटा दाखला इमारतीचा वापर करणेस सुरुवात करतील त्यांना

भोगवटा दाखल्याच्या प्रस्तावाची वाट न पाहता त्याच वेळेस विकासकाकडून दं डनीय शुल्काची आकारणी करण्यात यावी व जे विकासक दंडाची रक्कम भरणार नाहीत त्यांचे नावाने इतर प्रकरणात दंडाची रक्कम भरल्याशिवाय त्याचे नविन बांधकामास मंजुरी देण्यात येवू नये असा मी ठराव मांडत आहे.

**दिपिका अरोरा :-**

माझे अनुमोदन आहे.

**स्नेहा पांडे :-**

महापौर मॅडम इस सभागृह में बहुत सारे सदस्य नए है। जिनको यह जानकारी नही है की यह अभय योजना के अंतर्गत क्या-क्या आता है। कैसे उन बिल्डींगो को ओ.सी. मिल सकती है। अभय योजना के अंतर्ग तो एक बार इसकी जानकारी अगर सभागृह में पहले देंगे अभय योजना के अंतर्गत कौनकौनसी बिल्डींगो को ओ.सी. मिल सकती है तो अच्छा रहेगा।

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम प्रथमतः ही जी अभय योजना आहे माझ्या माहितीप्रमाणे यापूर्वी देखील या योजनची मुदत संपल्यानंतर पुन्हा वाढवली होती जसे आता ठरावात सांगितल्यानुसार परंतु हे भोगवटा दाखल्याची अभय योजना ही नक्की कुणासाठी आहे?

**नगररचनाकार :-**

अभय योजना ही ज्या इमारती बांधकाम नकाशा मंजुरीप्रमाणे तयार झालेली आहेत. परंतु त्याची ओ.सी. घेतलेली नाही त्या बिल्डरने भोगवटादाराला ती बिल्डींग हॅन्ड ओव्हर केलेली आहे. पण ओ.सी. झालेली नाही. अशा बिल्डींगसाठी ही अभय योजना आहे. अभय योजनेसाठी आपल्या २०१५ एकदा ठराव झालेला होता. त्याची मुदत आपला २०१६ पर्यंत होती. त्यानंतर त्याला मुदतवाढ झाली ती ३१/३/२०१८ पर्यंत केलेली होती. ह्या अभय योजनेअंतर्गत दाखल होणारे प्रस्तावामध्ये बांधकाम हे सी.सी. प्रमाणे झालेले असावे. त्या सोसायट्या ५ वर्षाआधी रजिस्टर झालेल्या असाव्यात किंवा तिथे त्यांनी टॅक्स भरलेला असावा. त्या सी.सी. मध्ये ज्या अटी आहेत त्या अटींची पूर्तता त्या बिल्डींग करत असाव्यात. आणि रेग्युलर बिल्डींगला जो बीना भोगवटा वापर चालू आहे. त्याला ४०० रुपये दंड आहे. अभय योजनेअंतर्गत ५० टक्के म्हणजे २०० रु. चौ.मी. दंड आकारलेला आहे. अशा इमारतीला आपण अभय योजनेअंतर्गत भोगवटा प्रमाणपत्र देतो.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम आपल्या निदर्शनास आणुन देऊ इच्छिते की ही जेव्हा अभय योजना चालू केली होती. सुरुवातीला तेव्हा देखील हा मुद्दा मांडलेला होता. कारण भाईंदर पूर्वेच्या ज्या इमारती आहेत त्या ग्रामपंचायत काळातल्या आहेत आणि त्यावेळी त्यांना म्हणजे जवळ जवळ ९८-९९ टक्के बिल्डींगना ओ.सी. नाही. परंतु ही अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी जेव्हा आपण त्यांच्या समोर देखीलही योजना आपण ठेवलेली आहे. परंतु त्याच्यामध्ये एवढ्या अटीशर्ती आहेत आता देखील नविन बिल्डर जर बिल्डींग बांधत असेल तर त्या सगळ्या अटीशर्ती तो देखील करत नाही आणि तिथे उपलब्ध होत नाही. तर त्यावेळी ग्रामपंचायती काळातल्या बिल्डींग आहेत. मग त्यांच्यासाठी आपण काय करणार आहोत. कारण त्याच्यामध्ये सोलर सिस्टम, ग्राऊंड माळा किंवा इतर बऱ्याचशा अटी आहेत की त्या तुमच्या पूर्ण करु शकत नाही. म्हणजे ज्या पूर्वीच्या बिल्डींग आहेत त्यांना त्याचा लाभ मिळू शकत नाही. त्याच्यासाठी पहिला काहीतरी योजना करा. त्याच्यामध्ये तरतुदीत जाचक अटी आहेत त्या मागच्या याच्यासाठी कमी करा. ठिक आहे ह्या ज्या अटी आहेत त्या तुम्ही नविन कंन्स्ट्रक्शनसाठी ठेऊन द्या. त्या आवश्यक आहेत. परंतु ज्यांना अजिबात ज्ञान नाही त्यांच्यामुळे त्यांना कन्व्हेन्स होत नाही. त्यांच्यासाठी तुम्ही वेगळी एक काही तरी आताच पर्याय घ्या की महासभेत तो ठराव होऊ शकेल आणि ह्या योजनेचा लाभ त्या लोकांना देखील मिळू शकेल.

**नगररचनाकार :-**

अभय योजनेअंतर्गत ज्यावेळेस त्याला सी.सी. दिलेली आहे त्यामध्ये जर ह्या अटी असतील सोलर आणि याच्या तर त्याची पुर्तता करतो पण त्यावेळी त्या अटी नसतील तर त्याची मागणी आपण आता करत नाही. त्यामध्ये फक्त स्ट्रक्चरल अॅबीलीटी आणि अॅफेडिव्हीटचे कम्पलीशन इतकच होत आहेत.

**निलम ढवण :-**

पण त्यांना ओ.सी. कुठे मिळते. त्यांना तेच सांगतात मागच्या महासभेत जो ठराव झालेला त्यामध्ये ज्या अटीशर्ती आहेत त्या जर पूर्ण कन्व्हेन्स होतात त्यानंतर आयुक्तांना त्यावेळी भेटले होते. त्यावेळी गिते साहेब होते. त्यावेळी देखील त्यांनी सांगितले जे महासभेत झालेले आहे ते सर्व मंजुर केले पाहिजे हे कसे

शक्य आहे. मग हा लॉट आता नविन जे कंन्स्ट्रक्शन चाललेले आहेत त्या बिल्डरांसाठी आहे की कसे काय?

**नगररचनाकार :-**

ताई हे जुन्या बिल्डींगकरिता आहे. त्यावेळी त्यांच्या सी.सी. मध्ये ॲड असेल तर आपण त्याला कम्पलशन करत नाही.

**निलम ढवण :-**

त्यावेळी कुठची तुमची बिल्डींगचे प्लानिंग होते त्यावेळी ग्रामपंचायत काळात असे काही प्लानिंग होते का कन्स्ट्रक्शन चालू होते तेव्हा?

**गिता जैन :-**

त्याला कधीच विचारले नाही पहिला ही विचारले नाही.

**निलम ढवण :-**

पण मॅडम त्यांना ओ.सी. देत नाहीत.

**गिता जैन :-**

ओ.सी. नाही देत ते कारण वेगळे आहे. साहेब मला एक सांगा आतापर्यंत अभय योजनेमध्ये आपण किती ओ.सी. दिल्या.

**नगररचनाकार :-**

आजपर्यंत दाखल झालेल्या प्रकरणपैकी ६ प्रकरणांना अभय योजनेअंतर्गत आपण मंजुरी दिलेली आहे.

**गिता जैन :-**

बरोबर आहे बाकीच्यांना आपण कशाला नाकारतो.

**नगररचनाकार :-**

जे महासभेने ठरविलेल्या अटीशर्ती आहेत.

**गिता जैन :-**

मला फक्त एक सांगा बिल्डर ओ.सी. का घेत नाही. कुठे ना कुठे इललिगल एस्ट्रा बांधकाम केले आहे. म्हणून आता ६ प्रकरणांमध्ये दोन प्रकरणाचे काय केले आहे. तिथे राहणाऱ्या रहिवाशांकडून टी.डी.आर खरेदी करुन लावलेली आहे. आणि त्याला आपण रेग्युलराईज केलेले आहे. पण सगळीच बिल्डींग काही ते टी.डी.आर खरेदी करु शकते का? म्हणजे कुठेतरी आपण ते बघा त्या बिल्डरकडून तुम्ही कसे वसुली करु शकाल मी त्याच्या अगेन्स्ट नाही. अभय योजना इज मोस्ट वेलकम. पण प्रॉब्लेम काय असते कुठली बिल्डींगला ओ.सी. मिळत नाही तर ते कुठे ना कुठे बिल्डरने असे काही केले आहे म्हणून ओ.सी. भेटत नाही. मग त्यावर तुम्ही लावत नाही का आणि रहिवाशांना कम्पलसरी टी.डी.आर खरेदी करुन मग ती ओ.सी. घ्यावी लागते. हे दोन प्रकरण मीच आणलेले आणि तुम्हाला माहित आहे इथले टी.डी.आर खरेदी करुन ती माणसं बसली आहेत.

**नगररचनाकार :-**

चटई क्षेत्राच्या अनुज्ञेय बसत नसेल तर त्याला टी.डी.आर शिवाय पर्याय नाही. तर चटई क्षेत्र त्याने उपलब्ध करुन घ्यावे. दुसरे हे अनधिकृत बांधकाम त्यांनी केलेली आहेत आणि त्याच्यामुळे त्यांना ओ.सी. मिळत नाही. तर त्याच्यासाठी आता कम्पाऊंडींग स्ट्रक्चर गर्व्हमेंटने जो जी.आर. काढलेला आहे त्याच्या अंतर्गत तेथे जे दाखल करावे आणि त्या त्या कम्पाऊंडींग स्ट्रक्चरमध्ये ते बसत असेल तर त्या योजनेअंतर्गत त्याने रेग्यलराईज करुन घ्यावे.

**गिता जैन :-**

माझा सांगायचा अर्थ तोच आहे साहेब कारण त्याला तो जो खर्च आहे तिथल्या बिल्डींगचे रहिवासी तेवढे सहन करु शकत नाही. आपल्याला अभय योजना आणायची आहे. तर काही तरी तुम्ही सवलती द्या नाहीतरी त्यांना परवडेल तसे अभय योजना द्या.

**निलम ढवण :-**

परवडेल आणि त्यांना शक्य होईल अशा पध्दतीने तुम्ही अभय योजना दिली पाहिजे. अभय याला म्हणतात त्यानुसार त्यांना द्या.

**नगररचनाकार :-**

दंडाची रक्कम महासभेनेच ठरविलेली आहे. याबाबत जे काही धोरण अवलंबवायचे आहेत. याबाबत आम्ही अभय योजनेची मुदत वाढीसाठी हा प्रस्ताव दिलेला आहे. त्या मुदतवाढीमध्ये जर अजून काही शिथीलता द्यायची असेल तर ते महासभेमध्ये सुचवावे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**निलम ढवण :-**

मॅडम जुन्या बिल्डींगसाठी आपण प्रामुख्याने विचार करा. कारण त्यांचे कनव्हेन्स होत नाही त्यामुळे अडलेल आहे आणि तसा विषय घेऊन पुन्हा तुम्ही विचार विनिमय करुन त्याच्यावर मार्ग द्या.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम टाऊन प्लानिंगला मी एक विचारतो तुम्ही असा सर्व्हे केलेला आहे का अशा किती बिल्डींग आहेत. ज्यांनी ओ.सी. घेतलेल्या आहेत आणि लोक राहत आहेत.

**नगररचनाकार :-**

नाही अशा प्रकारचा सर्व्हे कंडक्ट आतापर्यंत झालेला नाही.

**अनिल सावंत :-**

मुंबईसारखी वाट बघत आहेत की काय? रविवारी झाले विदाऊट ओ.सी. राहायला गेलेले तिथे आग लागली त्याची मिरा भाईंदरमध्ये वाट बघत आहात की काय?

**नगररचनाकार :-**

ही यंत्रणा टाऊन प्लानिंगकडे नाही मला वाटते प्रभाग आणि टाऊन प्लानिंग असे जॉईंट.

**अनिल सावंत :-**

आता जॉईंट करा महानगरपालिकेतुन.

**नगररचनाकार :-**

कारण आपण आलेल्या प्रकरणाची ओ.सी बाबत छाननी करतो.

**अनिल सावंत :-**

ते बरोबर आहे.

**नगररचनाकार :-**

विदाऊट ओ.सी. ज्या आहेत त्या वापरल्या जातात.

**अनिल सावंत :-**

विदाऊट ओ.सी. च्या ज्या बिल्डींग आहेत आता जो वरळीला प्रकार घडला. फायर फाईटींग यंत्रणा कार्यन्वीत नव्हती. ५ वर्षापासून लोक राहत होते. ओ.सी. नव्हती त्यामुळे तो शॉर्टसर्किट घडला मग अशा आपल्या महापालिका क्षेत्रामध्ये काही इमारती आहेत का? याचा तुम्ही सर्व्हे वगैरे केला आहे की करणार केलेला नसेल तर करणार आहात की नाही?

**नगररचनाकार :-**

विदाऊट ओ.सी. ज्या ॲक्युपाय होतात त्या अनधिकृत मध्येच गणल्या जातात. आणि अनधिकृतच्या सर्व्हे करणे त्याच्यावर कारवाई करणे हे प्रभागमार्फत करणे अपेक्षित आहे.

**गिता जैन :-**

आयुक्त साहेब मी आपल्याला विचारते काम प्रभागने करायचे मग इथे प्रभाग अधिकारींना बोलवा.

**अनिल सावंत :-**

कोणती तरी कारवाई केली पाहिजे. तुम्ही जबाबदारी झटकली. तुमचे काम फक्त परमीशन देणे आणि दुसरे मला सांगा ओ.सी. देण्यासाठी जे नॉर्म्स आहेत ते महापालिकेला अधिकार आहेत का त्याच्यामध्ये चेंजेस करायची शासनाचे त्याच्यामध्ये डायरेक्शन आहेत.

**नगररचनाकार :-**

हे रिलॅक्सेशनचे चाललेले आहे.

**अनिल सावंत :-**

रिलॅक्सेशन म्हणजे कुठच्या बाबतीत?

**नगररचनाकार :-**

ज्या बेसिक गोष्टी आहेत सी.सी. प्रमाणे बांधकाम नसेल तर त्याला रेग्युलराईज करण्यासाठी काय करावे लागते आणि अनधिकृत बांधकाम रेग्युलराईज होऊ शकतात का.

**अनिल सावंत :-**

तुम्ही परत परत जे सांगत आहेत महासभेत ठराव झाला म्हणून कार्यवाही होऊ शकली नाही. जे जे नॉर्म्स आहेत ते राज्य शासनाने ठरविलेले आहेत. ह्या ह्या गोष्टी पाहिजेत.

**नगररचनाकार :-**

राज्यशासनाने कम्पाऊंडींग स्ट्रक्चर बाबत ठरविलेले आहे. ओ.सी च्या बाबतीत.....

**धृवकिशोर पाटील :-**

साहेब तुम्ही दोन गोष्टी मिक्स करत आहात. ओ.सी. चे प्रकरण वेगळे आहे. कम्पाऊंडींग स्ट्रक्चरचे प्रकरण वेगळे आहे. साहेब आता आमची जी विचारपूस चालू आहे ती फक्त ओ.सी. मध्ये काय रिलॅक्सेशन आहे आणि ह्या अभय योजनेमध्ये किती लोकांनी त्याचा लाभ घेतलेला आहे. आणि आपण याच्यात आणखीन काही रिलॅक्सेशन करु शकत असेल तर तसे तुम्ही आम्हाला गाईड करा. नंबर २ निलम ताईंनी विचारले की ज्या जुन्या बिल्डींग आहेत त्या जुन्या बिल्डींगला ओ.सी. देण्याबाबत काय करावे लागेल तुम्ही सांगा की राज्य शासनाने जे कम्पाऊंडींग स्ट्रक्चर हे लिगल इललिगल बिल्डींगला आपण लिगल करु शकतो. तर त्याच्यात आणखीन किती प्रपोजल सबमिट झालेले आहेत आणि असे किती प्रपोजल तुम्ही किती मंजुर केलेले आहेत किती नामंजुर केलेले आहेत. त्याची तुमच्याकडे फिगर आहे का? ती फिगर सभागृहापुढे द्या शासनाने चांगली योजना आणली आहे की जे अनधिकृत बांधकामात जे लोक राहतात त्या लोकांचे बांधकाम नियमित करण्याकरिता त्यांना चान्स दिलेला आहे. १५ सप्टेंबर ही लास्ट डेट आहे. ह्या १५ सप्टेंबरपर्यंत तुमच्याकडे किती लोक आली आहेत आणि तुम्ही किती वाईट पब्लीसीटी केली आणि किती लोकांना माहिती आहे. आणि त्याची किती प्रकरणे तुम्ही निकाली काढली हे तुम्ही सांगा.

**नगररचनाकार :-**

आपण कम्पाऊंडींग स्ट्रक्चरचे महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवलेले होते. आपण त्याची राज्यशासनाप्रमाणे मान्यता घेतली. राज्यशासनाने सांगितल्याप्रमाणे आपण त्याला पेपर प्रसिध्दी दिलेली आहे. आपली प्रसिध्दी हे आपण आपल्या ऑफिसमध्ये ही केलेले आहे. येणाऱ्या आर्किटेक्ट आणि यांना त्या सुचनेवरुन बरीचशी कल्पना आलेली आहे. अशा परिस्थितीत आपल्याकडे आतापर्यंत १५ ते २० प्रकरणे दाखल झालेली आहेत. आता त्याबाबत शासनाकडून नविन क्लेरिफिकेशन आलेले आहे आणि ही मुदत २-१९ पर्यंत वाढविण्याचे शासनाने निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे आम्ही हा ठराव आपल्यापुढे आणत आहोत आणि यापुढे प्रसिध्दीसाठी आपण काय करता येईल याच्यावर आम्ही विचार विनिमय करु.

**धृवकिशोर पाटील :-**

सर तुम्ही त्याच्यामध्ये एक मुद्दा विसरलात की १५ ते २० प्रकरणे तुमच्याकडे आलेली आहेत. त्याच्यातुन तुम्ही किती प्रकरणे निकाली काढली आहेत. त्याचे एक्झाम्पल घ्या. समजा काकांचे एक बांधकाम असेल त्याला रेग्युलराईज केले तर काका मला सांगतील अरे माझे बांधकाम लिगल झाले. तुम्ही आणखीन ४ लोकांना सांगणार. तुमच्याकडे प्रस्ताव भरपूर येतील. पण तुम्ही ह्या १५ प्रस्तावामध्ये एक प्रस्ताव तुम्ही जर निकाली काढला नाही तर साहेब कसे होईल आणि हा संपूर्ण अधिकार तुमच्या डिपार्टमेंटचा आहे. राज्य शासनाचा नाही राज्य शासनाने तुम्हाला एक टाईम बाऊंड प्रोग्राम दिलेला आहे. तुम्हाला सांगितलेला आहे तुम्हाला गाईड लाईन दिलेली आहे. तुम्हाला तो जी.आर दिलेला आहे. त्या जी.आर प्रमाणे तुम्हाला ॲक्ट करायचे आहे. आणि तो निर्णय तुमचा आहे.

**नगररचनाकार :-**

आजपर्यंत आलेले अर्ज आपण घेतलेले आहेत आणि कुठले कम्पाऊंड सध्या डिक्लेरेशन करायचे आहे याची आमची छाननी चालु आहे.

**गिता जैन :-**

आता आपण अभय योजना ओ.सी. चे सांगत आहेत.

**नगररचनाकार :-**

अभय योजनेच्या डिस्कशनमध्ये जे जास्तीचे बांधकाम केले त्याबद्दल हा विषय आलेला आहे.

**गिता जैन :-**

समजा जास्तीचे बांधकाम आहे.

**नगररचनाकार :-**

जास्तीचे बांधकाम आहे ते अभय योजनेमध्ये आपल्याला रेग्युलराईज करता येणार नाही. अभय योजनेमध्ये जे सी.सी. प्रमाणे बांधकाम आहे तेच आपल्याला करायचे आहे. त्यातल्या मिनिमम कंडीशन शासनाच्या आहेत. त्या आपल्याला फॉलोअप करायच्या आहेत इथे फक्त त्यांना आपण जो दंडात्मक शुल्क त्यांना लागतो त्यातले रिलॅक्सेशन महासभेने ठेवलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

मॅडम मला एक सांगा मी ठराव मांडला. तुम्ही म्हणाले की काही अटीशर्ती मागच्या ठरावामध्ये म्हणजे याच्या आधी हा विषय आला होता त्याच्यामध्ये महासभेने ठराव केले आणि त्याच्यामध्ये काही गोष्टी आल्या त्या आता इम्पलीमेन्ट करायला नागरीकांना म्हणा किंवा बिल्डरला म्हणा त्या जाचक ठरत

आहेत. आज आपण जो ठराव केला मी वाचला. तुम्ही ऐकला मग आजच्या ठरावामध्ये तुम्हाला इम्पलीमेंटेशन करायला किंवा नागरिकांना दिलासा देण्याच्या अशा काही घटना आहे का मग हाच ठराव त्याच धर्तीवर जात असेल तर आपला हा ठराव आजचा काही कामाचा नाही. तुम्ही हा ठराव जो वाचला त्याच्यावर असे म्हणा की आजचा ठराव आमच्या अभय योजनेला पुरक आहे किंवा नाही तुम्ही पुन्हा पुन्हा तो विषय आणु नका कारण आपल्याकडे वेळ कमी आहे. ते म्हणतात की तुमच्यासाठी मग आता केलेला ठरावाच्या अटीशर्तीमध्ये राहून आपल्याला ते करता येत नाही.

**अनिल सावंत :-**

त्याच्यामध्ये असे आहे महापौर मॅडम ताई कसे आहे हा जो गोषवारा दिलेला आहे फक्त मुदतवाढ म्हणजे यांनी स्पष्ट धोरण प्रशासनाला दिलेले नाही की कशाप्रकारे आम्हाला पाहिजे काय केले तर आपल्याला जास्त लोकांना ओ.सी आपण देऊ शकू.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर मॅडम अगर सी.सी. है और सी.सी. के हिसाब से बांधकाम हुआ है और सारी फॅसिलिटी बिल्डरने दिया हुआ है तो वैसे ही उनको ओ.सी. मिलेगी। तो यह योजना का क्या फायदा है।

**सुरेश खंडेलवाल :-**

मा. महापौर मॅडम अभी मैं बोलता हूँ लास्ट में विषय ऐसा है की सब सदस्यो ने जो भी सवाल पुछे तो अभय योजना का जो मतलब है ना जो नॉन ऑक्युपेन्सी चार्ज और जो ओपन लॅन्ड टॅक्स इसके अंदर जो नॉन ऑक्युपेन्सी चार्ज होता है वह लाखो में होता है और साहब का कहना यह है की सी.सी के अंदर जो भी कंडीशन होगी चाहे वह फायर की हो, सोलर की हो, रेन वॉटर की हो बिल्डींग एक्सपर्ट प्लान हो यह तो कम्पलसरी होना ही चाहिए। अभय योजना मतलब सिर्फ इतना है की सारी चीज सही है तो उसको नॉन ऑक्युपेन्सी चार्ज सोसायटी को लाखो में लगता है वह नही लगेगा। ओपन टॅक्स है अभय योजना मतलब सिर्फ इतना है उसके अलावा बाकी की चीजे कमी पडेगी यह सभी डी.सी. रुल्स के अंदर उसके उपर जा भी नही सकते। यदी बिल्डींग एक माला बढा है या उसके अंदर सी.सी. की जो कंडीशन है उसमें भी फुलफिल नही हुआ है तो इनके अधिकार क्षेत्र में नही है और महासभा यदी पास भी कर दे तो भी साहब क्लिअर कट बोलते है तो करना इनके अधिकार क्षेत्र में नही आता है इसके लिए सिर्फ अभय योजना में सिर्फ उनका नॉन ऑक्युपेन्सी चार्ज ओपन लॅन्ड टॅक्स उसके अंदर लेक्चर मा. महासभा में दिया है। सिर्फ उतना ही उनको मिल सकता है। दॅट इज द फायनल रिझल्ट.

**नगररचनाकार :-**

कम्पाऊंडींग स्ट्रक्चर याचे मराठीत म्हणजे मराठीत संरक्षण संच ज्या कामाला सी.सी. दिलेली आहे. मंजुर प्लॅन आहे पण मंजूर प्लानमध्ये काही ठराविक टॉलरर्स लिमीट्समध्ये जर व्हायोलेशन झाले असेल तर ते किती टॉलरेस झाले आहे यावर शासनाने जी.आरमध्ये दिलेले आहे. त्यामध्ये साईट मार्जिंग पार्किंग एफ. एस.आय. कन्झमशन याबाबत टॉलरर्स लिमिटमध्ये असेल तर ते कम्पाऊंडिंग स्ट्रक्चर म्हणून डिक्लेअर करावे आणि त्याच्यासाठी आवश्यक फी जी शासनाने ठरवून दिलेली आहे ती भरुन घेऊन त्याला रेग्युलराईज करावे. दॅट इज द कम्पाऊंडींग स्ट्रक्चर.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम यांच्या बोलण्यातून ह्या योजनेतून ह्या शहरातले ५.० काम होऊ शकते. १ टक्के नाही ५.९ कारण तशा बिल्डींग जाऊ द्या आपला जो प्रश्न आहे शहराचा जो प्रश्न आहे सामान्य नागरीकांचा जो प्रश्न आहे ज्या ग्रामपंचायत काळापासून बनलेल्या आहेत. त्या कशा सुटतील त्यांच्यासाठी काय प्रयत्न करता येईल.

**निलम ढवण :-**

त्याच्यावर पर्याय काढा ना. हे लाभ कोणाला मिळणार आहेत मग ह्या लोकांनी काय करायचे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हाला अधिकार नाही तर तुम्हाला कोणता अधिकार पाहिजे. शासनाकडे काय मागायला पाहिजे आमदार मागतील. विषय मांडतील आपण उगाच काहीतरी ढोल वाजवत आहेत असे होईल.

**निलम ढवण :-**

अभय फक्त वरच्या लोकांसाठी आहे धनाढ्यांसाठी आहे.

**रोहिदास पाटील :-**

सभागृहात आणुन महत्व काय आधी ६ मिळाल्या आता ३ पण मिळणार नाहीत. आपली गरज काय आहे साहेब की इथे जे लोक दुःखी आहेत जे अडलेले आहेत ज्या बिल्डींग तुटल्या त्या बनतच

नाही. तुम्ही तुमच्या माध्यमातून सांगा. आम्ही प्रयत्न करु. महापौरकडे पत्र देतील. आयुक्त तसे लिहितील तुम्ही तसे सांगा तुम्ही तो मार्ग सांगायला पाहिजे.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम विषय ऐसा है की यह ठराव को मेरे खयाल से ३ साल उपर हो गए और ६ सोसायटीयो को इसका फायदा हुआ है। ३ साल में इसकी जो रेट है वह ६ सोसायटीओ को फायदा हुआ है ठिक है वह मार्च १८ में पुरा हो गया उसके बाद में उसको ॲक्सेशन दिया है। और जितना जिसको लाभ मिलेगा वह मिलेगा विषय ऐसा है मॅडम अभी आपने जो बोला की ऑक्युपेशन सर्टिफिकेट ओ.सी. के लिए आपने जो बोला सोसायटीयो को कन्व्हेन्स नही होता है मैं जानकारी के लिए बताता हूँ की जो पहले डिम कन्व्हेन्स की जो कंडीशन थी उसमें ओ.सी. कम्पलसरी थी। उसके बाद में जब यह प्रस्ताव राज्य शासन के पास गया की मॅक्झीमम सोसायटीयो को ओ.सी. नही है। इसके लिए डिम कन्व्हेन्स का जो प्रोसिजर है उसमें भी सफलता नही मिल रही थी। इसके लिए उसके बाद शासनने ओ.सी. से लेके उसमें जो कई कंडीशन थी। उसको हटा दिया अभी सिर्फ ७ या ८ डॉक्युमेंट लगते है। उसके अंदर ओ.सी. नही लगती है। इसके लिए डिम कन्व्हेन्स सब सोसायटीयो का हो सकता है। यदी आप करेंगे तो वह भी हो जाएगा।

**निलम ढवण :-**

डिम कन्व्हेन्स हो गया तो इसिलिए उनको ओ.सी. जरुरी नही है।

**सुरेश खंडेलवाल :-**

ओ.सी. कम्पलसरी है उसके अंदर बहुत सारी क्लॉजेस है। यदी यह सबको जानकारी होना मॅडम तो इसका काफी फायदा लोगो को मिलेगा मैंने लास्ट टाईम पे भी कहाँ था सभी नगरसेवको को इसके बारे में टोटल जानकारी मिलनी चाहिए तो इसको लिए आप थोडा डायरेक्शन दिजीए। इंस्ट्रक्शन दिजीए कम्पाऊंडींग स्ट्रक्चर का जो डेट है १५ सप्टेंबर का उसको ३० डिसेंबर उसका थोडा टाईम पिरेड बढाईए ताकी लोग उसका फायदा ले सके।

**निला सोंस :-**

महापौर मॅडम यह विषय को लेके एक गंभीर सवाल है इस विषय को लेके मैं कहना चाहूँगी की अभी खंडेलवालजीने बताया की ओपन लॅन्ड टॅक्स अगर पेंडींग है उसके कारण ओ.सी. पेंडींग होती है और ओपन लॅन्ड टॅक्स वास्तविक रुप से बिल्डरो द्वारा पेड किया जाता है। नागरिकाद्वारा नही तो नागरिकोंको हम राहत दे रहे है लेकिन हम उस चिज को राहत दे रहे है जिसके लिए बिल्डर जिम्मेदार है। तो बात होती है प्रशासन की लापरवाही और बिल्डरकी धोकाधडी इसका शिकार नागरिक बन रहे है। तो मेरा विषय यह है की मेरे प्रभाग में कई सोसायटी है उनका ओपन लॅन्ड टॅक्स नही भरा गया है। इसलिए उनके पास ओ.सी. नही है और मेरा सवाल यह है की उसके बाद भी उन्ही बिल्डरो का काम चालु भी है तो प्रशासन की लापरवाही के लिए हम राहत दे रहे है। अभय योजना द्वारा बहुत अच्छी बात है। लेकिन बात यह है की हम राहत किसमें दे रहे है। इसका जिम्मेदार कौन है। इसका जिम्मेदार बिल्डर है और उसका जिम्मेदार इनडायरेक्टली प्रशासन है उन्होंने लापरवाही की तो उन पर हम क्या कारवाई कर रहे है। आज ओपन लॅन्ड टॅक्स लाखो रुपये में है सोसायटीओ को बोला गया है लेकिन वह नही पे कर सकते है। हम राहत दे रहे है लेकिन समाधान नही निकाल रहे है। तो समाधान के लिए हम कार्य करे और प्रशासन से मेरा विशेषकर सवाल है की वह बिल्डर जिनका ओपन लॅन्ड टॅक्स बाकी है वही बिल्डर और भी कही बिल्डींगे बना रहा है तो क्यों ऐसा कनेक्टीव्हीटी नही है की उन पे हम कारवाई कर सके और उस टॅक्स को वसुली कर सके आज मुझे लगता है की इतने सारे बिल्डरो को पकडे तो एक करोडो में होगा तो इसपे हम क्या कदम उठा रहे है। यह जरुरी है आय एक्सपेक्टेड रिप्लाय फ्रॉम द प्रशासन मुझे लगता है सभी को जानकारी मिलेगी तो प्रशासन इसका जवाब दे।

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम २०१५ मध्ये अभय योजना ही महापालिकेने लागु केली. आम्ही ठराव करुन दिला होता. त्याच्यामध्ये विकासकाने ४०० रुपये भरायचे संस्था नोंदणी झाली असेल संस्थेने पालिकेकडे भोगवटा दाखला घेणेसाठी अर्ज केला असेल तर २०० रुपये त्यांना खर्च आला असेल. आता विकास नियंत्रण नियमावलीमध्ये ज्या अटीशर्ती असतात त्याला तुम्ही सोडून तुम्ही काही करु शकत नाही. एका बाजूला पाप कोणी करायची आणि भरायचे कोणी हा विषय झाला. विकासकाचे काम आहे त्याने भोगवटा दाखला घेतला पाहिजे. तो घेत नाही. कारण त्याला बेटरमेन चार्जेस भरायचे असतात. सोलार द्यायचे रेनहार्वेस्टींग करायचे आहे. हा बाकीचा खर्च तो वाचविण्यासाठी लोकांना ऑक्युपेन्सी देतो आणि माणुसकीच्या नात्याने खरतर पालिका त्याच्यावरती कारवाई करत नाही. आपण त्यांना पाणी देतो, विज पुरवठा होतो. मोकळ्या

जागेवरच्या करचा विषय असा होतो सी.सी टू ओ.सी. तर ओ.सी. नाही घेतली तरी टॅक्स लागला कर आकारणी केली की तो मोकळ्या जागेचा कर बाजूला ठेवला जातो. नविन कर जो आहे त्याप्रमाणे ती कारवाई आजही पालिकेमध्ये सुरु आहे. तुम्ही माहिती मागवली तर किती तरी इमारती असतील. सदनिका असतील साहेब त्यांना मोकळ्या जागेचा कर अजून बाकी आहे. आता नविन कर आकारणी करण्यात आली आहे. कारण ती संस्था की ती इमारत त्या बिल्डींगची लोक ती त्या मोकळ्या जागेचा कर भरु शकत नाही. दुसऱ्या बाजूला आम्ही २०० रुपये ही जी फी आकारली आहे. साहेब २० हजार स्क्वेअर फुटची जागा असली म्हणजे २ इंची इमारत चार माळ्याची २० हजार स्क्वेअर फुट अंदाजे मला वाटते याच्यामध्ये बसते. त्याला मीटरमध्ये रुपांतर केले की ५ हजार स्क्वेअर फुटवर कमीत कमी आपल्याला खर्च येतो. ५ हजार स्क्वेअर फुटला २०० रुपये आपण गुणीले केले तर १० लाख रुपये काका ह्या संस्थेकडे ओ.सी. नाही. बाकीची पुर्तता पालिकेची करायची आहे. आणि त्याच्यावर त्याला २०० रुपये भुर्दंड भरायचा आहे. भुर्दंड कशाला भरायचा आहे. विकासक पाप करुन गेला अधिकाऱ्यांनी त्याला मदत केली तेव्हा ती इमारत तयार झाली. पालिकेने त्याला पाणी दिले म्हणून लोक राहायला आली. विज पुरवठा झाला म्हणून लोक राहायला आली आणि तो भुर्दंड भरायला त्या गोरगरिब लोकांनावर आले. ग्रामपंचायत काळापासून साहेब ह्या शहरामध्ये इमारतीत त्यांनी व्हॉयुलेशन केली नाही. त्यांना तुम्ही ओ.सी. कधीच देऊ शकणार नाही. मग अशाप्रकारे अभय योजना आणायच्या असल्या तर प्रशासनाने खरोखर काकाने हा विषय मांडला बरोबर आहे. विषय तसा आणा आपण सहाय्यक संचालक आहात. साहेब तुम्हाला भरपूर अनुभव आहे. शासनाकडून आपल्याला काय मदत घेता येईल ह्या विषयावर नियमावलीमध्ये काय बदल करता येईल त्याच्यासाठी आपण रोज ३७ खाली व्यक्तीगत मी तर बोलेन कुठेतरी कोणाचा काय त्याच्यामध्ये स्वार्थ असेल बऱ्याचदा प्रयत्न करत असतो. तो ठराव करुन पाठवतो. आज एक एम.एम.आर.डी.ए चा ठराव केला असे ३७ खाली का येत नाहीत. ते आणता आले पाहिजे ते करता आले पाहिजे. ते करणे आपल्याला भाग आहे आपले कर्तव्य आहे. साहेब कम्पाऊंडींग स्ट्रक्चरचा विषय आला तुमच्याकडे मगाशी चर्चा झाली कम्पाऊंडींग स्ट्रक्चर २०१८ मध्ये याचा निर्णय शासनाने दिला की तुम्हाला ६ महिने पुढचे तुमची पसंतीचा नंतरचे ६ महिने ते १५ सप्टेंबरला संपत आहे. त्याच्यामध्ये तुमचा अधिकार नाही त्याला परत मुदतवाढ द्यायची आहे. खरतर हा महिना लागु झाला ९ वा महिना सप्टेंबरचा.

**नगररचनाकार :-**

याच्याबाबत परत गर्व्हमेंटचे क्लेरीफिकेशन आलेले आहे. त्याच्याकडून वाढीव मुदतीचे आलेले आहे मी तुम्हाला देतो.

**जुबेर इनामदार :-**

आलेले आहे का?

**नगररचनाकार :-**

आलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

तशी माहिती आम्हाला द्या. लोकप्रतिनिधींना माहिती नाही. सामान्य नागरिकांना कसे माहिती पडेल. कम्पाऊंडींग स्ट्रक्चर एक चांगली योजना आहे. त्याला प्रिमियम किती भरायचा आहे. तो अजून निश्चित नाही.

**नगररचनाकार :-**

तो प्रिमीयम शासनाने निश्चित केलेला आहे. जी.आर मध्ये ते मेन्शन केलेले आहे. तो जी.आर आपण प्रसिध्द केलेला आहे. त्यामध्ये उपस्थित होणारे मुद्दे आणि त्याची उत्तरे हे सुध्दा आपण प्रसिध्द केलेले आहेत. जे वारंवार प्रश्न विचारले जात आहेत त्या प्रश्नासंबंधीतच एक निवेदन आपण आपल्या वेबसाईटवर प्रसिध्द केलेले आहे. आपल्या माहितीसाठी ते परत प्रश्न आणि उत्तरे आणि तो जी.आर प्रत्येक सदस्याला पुरवण्याची व्यवस्था करेल.

**जुबेर इनामदार :-**

तुम्हाला प्रिमीयमची थोडी माहिती असेल तर सांगा.

**नगररचनाकार :-**

प्रत्येक गोष्टीचा वेगवेगळा प्रिमीयम आहे. पार्किंगचा वेगळा आहे. एफ.एस.आय. वेगळा आहे. आता आज माझ्याकडे तो जी.आर नाही तो जी.आर मी आपल्याला देतो.

**जुबेर इनामदार :-**

माझे तेच मत आहे एफ.एस.आय. व्हॉयुलेशन झालेले आहे. म्हणून लोक तुमच्याकडे येतील. साहेब त्या प्रिमीयमच्या विषयामध्ये असे झालेले आहे की जे असे लोक तुमच्याकडे येण्यासाठी त्यांची इच्छा जरी

असली तर ते पैसे किती होतील. लाखो रुपये जात आहेत. ते करु शकतील का ते संस्थेचे लोक कारण परत त्यांना आर्किटेक्चरकडे जायचे आहे. आर्किटेकची फी भरायची आहे. परत त्यांना त्याचा सर्व्हे करायचा आहे. स्ट्रक्चरचा रिपोर्ट पाहिजे. ऑडिट पाहिजे हे सगळी काही पुर्तता करायला साहेब त्यांना कमीत कमी ५ ते १० लाख रुपये खर्च दुसरा येत आहे. त्याच्यानंतर ते प्रिमीयम भरू शकले नाही तर ते १० लाख रुपये वाया गेले. तुमच्याकडे समोरुन लोक चालून येत आहेत. कम्पाऊंडींग स्ट्रक्चरसाठी मात्र आपल्याकडे पालिका माहिती पुरवत नाही. कारण साहेब हा इंट्रेस्ट याच्यामध्ये विकासक नाही आता इंट्रेस्ट फक्त सोसायटींचा आहे. म्हणून त्यांना ती मदत केली पाहिजे. ती केली जात नाही साहेब हा माझा स्पष्ट आरोप आहे आम्ही व्यक्तीगत तुमच्यावर आरोप करत नाही. तुमच्या कार्यालयामध्ये तुम्ही प्रमुख आहात. तुमच्या अभियंत्यांना सांगा की आलेल्या लोकांना परिपूर्ण माहिती द्या. उद्या १० लाख रुपये खर्च करुन तुम्ही १ कोटी रुपये भरायला सांगितले. कुसेकर साहेब तुमच्याकडची सोसायटी भरु शकते का? कोणी भरु शकत नाही. ह्या विषयावर प्रशासन स्पष्ट भुमिका का घेत नाही. चांगली योजना शासनाने आणलेली आहे. नगरपरिषद नगरपालिकापासून लोक तुमच्याकडे येऊ शकतात. आपल्या कम्पाऊंडींग स्ट्रक्चरच्या विषयाबाबत त्याच्यासाठी आपली पारदर्शकता ह्या कामाची महत्वाची आहे. साहेब तुम्ही याच्यावरती विशेष लक्ष द्या.

**नगररचनाकार :-**

हो.

**जुबेर इनामदार :-**

अभय योजनेमध्ये तुमच्याकडे लोक येणार नाहीत. कारण ते बरोबर होत नाही. नियमावलीचा विषय तुमचा आहे. नियमाची पायमल्ली करुन तुम्ही त्यांना ओ.सी. देऊ शकत नाही.

**नगररचनाकार :-**

कम्पाऊंडींग स्ट्रक्चर बाबत आपण व्यापक प्रसिध्दी देऊ आणि आपण काही सेशन अरेंज करु. आर्किटेक्ट, बिल्डर आणि जनतेसाठी याद्वारे आपण त्यांना माहिती देता येईल. काही पेपरला प्रसिध्दी देऊन त्याचे स्पष्टीकरण आपण करु या. त्या द्वारे त्यांना माहिती देऊया आणि लोक त्याला रिस्पॉन्स करतील.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**रिटा शहा :-**

महापौर मॅडम, सबसे पहले तो नगररचना विभागाने मतलब प्रशासनने जो अभय योजना का हमारे पास जो प्रकरण लाया है वह सही माईने में अभय योजना आम नागरिक के लिए नही है। यह अभय योजना उन बिल्डरो के लिए है जो यहाँ बिल्डींग बांधके निकल गए और लाखो रुपये हमारे उपर ओपन लॅन्ड और हमारे बाकी जो एन.ओ.सी. निकालनी पडती है ओ.सी के लिए वह सारा पैसो का भार हमारी आम पब्लीक के उपर छोडके निकल गए और आज यह अभय योजना उनको सवारने के लिए उनको संभालने के लिए यह अभय योजना का बहाना करके हम नागरिको के सरके उपर हम और लाद रहे है। दुसरी बात मॅडम एक नगररचना विभाग को प्रश्न पुछना चाहती हूँ की जो बिल्डर यहाँ से आपको ओपन लॅन्ड टॅक्स और ओ.सी. वगैरे नही करके यहाँ से चले गए तो उन्होंने पझेशन दे दिया है ऐसे कितने बिल्डर है आपने ब्लॅक लिस्टेड किया है? ऐसे कितने बिल्डर आपने वापस दुसरे प्लान नही सॅक्शन किया है। आपने किया है आपने एक भी बिल्डर को ब्लॅक लिस्टेड किया नही। आज भी इस तरह का कारभार आपके उधर चल रहा है। यह अभय योजना के अंतर्गत में ऐसी सुचना करती हूँ की, ऐसे जितने भी बिल्डर है जिन्होंने ओ.सी. नही लिया है उनको पहिले ब्लॅक लिस्टेड किया जाए और उनका दुसरा प्लान सॅक्शन नही किया जाए तभी यह सारी चिजे अटकेगी और प्रशासन और शासन के बीच में यह वादावाद हम जो निर्माण करते है। उसके लिए टोटली प्रशासन जबाबदार है। आप लोगो ने नगररचना विभाग में किया क्या है। ज्युनिअर इंजिनिअर कम पडते थे हमने और कॉन्ट्रॅक्ट बेसीस के उपर उनको इधर लाया पब्लीक का पैसा और खर्चा और बढा है। लेकिन नगररचना विभाग ने किया क्या आज भी मुझे एक भी बिल्डर का नाम दे दो आपने किसीको ब्लॅक लिस्ट किया है। जिनका लाखो रुपये का ओपन लॅन्ड टॅक्स बाकी है हमने क्या किया उनको सहुलत दे दी। उसको अगर हमने टॅक्स नही लगाके दिया होता अगर हमने उनको पानी नही दिया होता तो पब्लीक का मोर्चा उनके पास जाता तो बिल्डरो को झक मारके ओ.सी. करनी पडती थी लेकिन प्रशासन ने उनको क्या कर दिया बारी दे दी विंडो दे दी। जो ॲज पर प्लान है उन बिल्डींग को टॅक्स लगाओ। टॅक्स लगा दिया तो उनको पानी भी दे दो और बोला क्या जाता है पब्लीक के लिए किया जाता है। पब्लीक के लिए एक भी काम नही किया जाता एक भी ठराव नही

होता यह सारा काम होता है। प्रशासन द्वारा बिल्डरो को बचाने के लिए बिल्डरो का पैसा बचाने के लिए इसलिए यहाँ जितने भी बिल्डर के लिए इसलिए यहाँ जितने भी बिल्डर है मेरी सुचना है की जिनके उपर ओपन लॅन्ड टॅक्स बाकी है जिन्होने ओ.सी. नही दिया है उनको ब्लॅक लिस्टेड करो और उनका तब तक दुसरा प्लान सॅक्शन मत करो।

**नगररचनाकार :-**

सुचना स्वागतार्ह आहे मी आयुक्तांकडे प्रपोजल ठेवतो.

**स्नेहा पांडे :-**

नए बिल्डर जो आऐंगे उनका जब तक ओपन लॅन्ड टॅक्स नही दिया रहेगा तब तक सी.सी. पास मत किजीए।

**नगररचनाकार :-**

मान्य आहे ओपन लॅन्ड टॅक्स बाबतचा आमची तपासणी चालू आहे. ज्याच्याकडे बाकी आहे त्याचे रेग्युलर वसुली आमची चालु आहे आणि आपण त्याचा पुढचा प्लान पास न करण्याबाबत.............

**स्नेहा पांडे :-**

सी.सी. पास करु नका. ते बिल्डर येतात सी.सी. पास होते. काम करतात आणि निघुन जातात. सी.सी. पास करु नका जोपर्यंत ओपन लॅन्ड टॅक्स पूर्ण भरणा केला नाही.

**नगररचनाकार :-**

बिल्डरांची पूर्ण माहिती घेऊन त्याप्रमाणे कारवाई करावी लागेल.

**मा. महापौर :-**

ठिक है।

**राजेंद्र जैन :-**

महापौर मॅडम अभय योजना के अंतर्गत माहिती के मदत के लिए आप उनको यह ओ.सी. दे देंगे। उनको दंडात्मक शुल्क कम करके लेकिन सब बिल्डरोने पुरा काम नही किया है। उसपर सजा का प्रावधान चालू रहेगा की नही रहेगा की अभय है उसको लागु हो जाएगी।

**नगररचनाकार :-**

बिल्डर लोकांसाठी अभय योजना नाही.

**राजेंद्र जैन :-**

में जो पुछ रहा हूँ उसका हा या ना बताईए। सोसायटीको अभय योजना दे दी उसको ओ.सी. हो गया पर ओ.सी. क्यों नही हुआ क्योंकी बिल्डरने नही लिया था। बिल्डर ओ.सी. नही लिया तो उसपर सजा का प्रावधान है तो अभय योजना से सोसायटी को ओ.सी. दे दिया तो क्या बिल्डरो को भी अभय योजना मिल गई है बिल्डर इसमें भी ब्लॅक लिस्ट हो गया है। यह पुछ रहा हूँ।

**नगररचनाकार :-**

बिल्डरसाठी अभय योजना नाही आहे. मला तुमची सुचना समजलेली आहे. त्याप्रमाणे प्रस्ताव येत नाहीत आणि ओ.सी.............

**राजेंद्र जैन :-**

साहेब एक बताईए एक बिल्डींग सोसायटी को अभय योजना अंतर्गत ओ.सी. दे दी। बराबर है उसको तकलीफ थी दंडात्मक शुल्क कम कर दिया उसको ओ.सी. दे दी पर जिस बिल्डरने ओ.सी. लेनी चाहिए थी उसने कानुन का उल्लंघन किया उसको ब्लॅकलिस्ट करेंगे की नही करेंगे?

**नगररचनाकार :-**

यांची आता हिच सुचना होती त्या बाबतचा प्रस्ताव आम्ही आयुक्तांकडे ठेवतो ज्यांनी ती विदाऊट ओ.सी. दिलेली आहे. त्यावर काय कारवाई करता येईल याचा आम्ही प्रस्ताव ठेवतो.

**राजेंद्र जैन :-**

सर आपके डी.सी. रुल में बिल्डरो को ब्लॅक लिस्ट करने का प्रावधान है ना इसको आयुक्त की जरुरत नही है। आपके डी.सी. रुल में अगर बिल्डर ओ.सी. नही लेता है तो उनको ब्लॅक लिस्ट करने का या सजा देने का प्रावधान है की नही है। हा या ना उत्तर दिजीए।

**नगररचनाकार :-**

ज्यांनी एखाद्या गोष्टीचे व्हॉयुलेशन केले तर त्याच्यावर कारवाई करता येईल.

**राजेंद्र जैन :-**

ओ.सी. नही लिया तो व्हॉयुलेशन हो गया सर।

**नगररचनाकार :-**

ओ.सी. न घेता राहायला जाणे हे सुध्दा भोगवटा करणार. हे सुध्दा अनधिकृत आहे.

**राजेंद्र जैन :-**

मुझे यह बताइए बिल्डरने ओ.सी. नही लिया और आपने बिल्डर को अलग सोसायटी वाले को ओ.सी. दिया तो बिल्डरने ओ.सी. नही लिया तो बिल्डर फॉल्टी हुआ की नही हुआ?

**नगररचनाकार :-**

जो फॉल्टी झालेला आहे. त्याच्यावर कारवाई करायचा प्रस्ताव..........

**राजेंद्र जैन :-**

यह योजना के अंतर्गत लेने के बाद भी।

**मा. महापौर :-**

अशा प्रकारचे कृत्य ज्यांनी केलेले आहे त्यांच्यावर कारवाई करा.

**नगररचनाकार :-**

ठिक आहे.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ६२ :-**

**महापालिकेची भोगवटा दाखला (ओ.सी.) देणेबाबत अभय योजना लागु करणे.**

**ठराव क्र. ६३ :-**

मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र . ६(७)(८) प्रमाणे शहरामधील इमारतीसाठी भोगवटा दाखला देण्याची कार्यवाही करणेत येत असून मिरा भाईंदर शहरामधी ल भोगवटा न घेता वापर सुरु असलेल्या व ५ वर्षापुर्वी नोंदणी झालेल्या गृहनिर्माण संस्थेसाठी भोगवटा दाखला देणेबाबत विशेष सवलत मोहिम राबविणेसाठी दि.२३/०३/२०१५ रोजीच्या मा. महासभेने ठराव क्र. ७२ अन्वये अटीशर्तीच्या आधारे दि.३१/०३/२०१६ पर्यंत मान्यता दिलेली आहे.

सदर मोहिमे अंतर्गत भोगवटा दाखला मिळणेकामी दाखल झालेल्या अर्जापैकी बहुतांश प्रकरणामध्ये आवश्यक कागदपत्राची पुर्तता नसल्यामुळे प्राप्त अर्ज नामंजूर करणेत आलेली असल्यामुळे व सदर योजनेचा लाभ अधिकाधिक लोकांना होणेच्या दृष्टीकोनातून सदर मोहिमेसाठी दि.२८/०६/२०१६ (दि.०७/०५/२०१६ रोजीची तहकूब मा. महासभा) रोजी मा. महासभेने ठराव क्र . २२ अन्वये दि .३१/०३/२०१८ रोजी पर्यंत मुदतवाढ मंजूर केलेली आहे . जिल्हा उपनिंबधक यांच्याकडून दि .३१/०३/२०१५ पुर्वी नोंदणी झालेल्या इमारतींना भोगवटा दाखला देणेबाबतची अभय योजनेची मुदत दि.३१/१२/२०१९ पर्यंत वाढविणेस मंजुरी देण्यात येत आहे . सदर बाबीची मा.आयुक्तांनी शहरामध्ये होर्डींग लाऊन व अन्य मार्गाने जाहिर प्रसिध्दी देऊन सदरची बाब सर्व नागरिकांकडे पोहचेल , त्यामुळे नागरिक जास्तीतजास्त या योजनेचा लाभ घेतील याची खबरदारी घ्यावी. मुदतवाढ दिलेल्या कालावधीमध्ये आलेले अर्ज निकाली काढावेत.

तसेच अनधिकृत बांधकामे अधिकृत करणेबाबतची शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी करणेबाबत दि.१५/०९/२०१८ मुदत दिलेली आहे त्या मुदतीमध्ये आलेल्या अर्जावर विचार करुन लवकरात लवकर जी प्रकरणे अधिकृत करणे योग्य आहेत ती तात्काळ अधि कृत करावी व या योजनेची मुदत दि . ३१/१२/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यास मंजुरी देत आहे. तसेच बहुतांश विकासक भोगवटा दाखला न घेता इमारत रहिवास व्याप्त करीत असल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे दि.०१/१०/२०१८ पासुन जे विकासक विनाभोगवटा दाखला इमारतीचा वापर करणेस सुरुवा त करतील त्यांना भोगवटा दाखल्याच्या प्रस्तावाची वाट न पाहता त्याच वेळेस विकासकाकडून दंडनीय शुल्काची आकारणी करण्यात यावी व जे विकासक दंडाची रक्कम भरणार नाहीत त्यांचे नावाने इतर प्रकरणात दंडाची रक्कम भरल्याशिवाय त्याचे नविन बांधकामास मंजुरी देण्यात येवू नये असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात प्रकाश पाटील अनुमोदन :- सौ. दिपीका अरोरा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ६३, **आरक्षित जागा अदलाबदल करणेबाबत धोरण ठरविणे.**

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम ठराव व्हायच्या आधी प्रशासनाने याचे थोडे निवेदन करावे. निवेदन झाल्यानंतर कदाचित आम्ही विरोधात ठराव करणार नाही. निवेदन झाले की आमच्या लक्षात येईल नक्की काय आहे. त्याच्यात काय लागणार आम्ही स्पष्ट उपस्थित करु ना.

**मा. महापौर :-**

ठराव वाचा.

सुरेश खंडेलवाल :-

**मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार महापालिका क्षेत्रा त दाखल होणा-या विकास प्रस्तावांतर्गत 2 हेक्टर वरील रहिवास विभागातील क्षेत्राकरिता मंजूर नियमावली नुसार 5% सुविधा भूखंड महापालिकेस देणे आवश्यक आहे . तसेच विकास प्रस्तावांतर्गत जमिनीचे औद्योगिक ते रहिवास अथवा वाणिज्य वापरामध्ये रुपांतरण करणांना मंजूर नियमावली मधील तरतूदीनुसार महापालिकेस सुविधा भूखंड देणे आवश्यक आहे . महापालिकेकडे प्राप्त होणा -या सुविधा भूखंडावर परिसरातील नागरी सुविधांची आवश्यकता विचारात घेऊन वापर निश्चित करण्याचे अधिकार मा . आयुक्त सो. यांना आहेत.**

**विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार व शासनाने मंजूर केलेल्या टि .डी.आर. बाबत अधिसूचनेमध्ये भूखंडधारक / विकासक यांनी नियोजन प्राधिकरणास हस्तांतरीत केलेल्या आरक्षित भूखंड / सुविधा भूखंडावर सदर भूखंडधारक / विकासक यांचेकडून कन्स्ट्रक्शन टि.डी.आर. च्या मोबदल्यात बांधिव सुविधा विकसीत करुन घेणेबाबत तरतूद असू न, त्या तरतूदीनुसार महानगरपालिकेमार्फत काही प्रस्ताव विकसीत करुन घेण्यात आलेले आहे. तरी भूखंडधारक / विकासक यांनी हस्तांतरीत केलेले आरक्षित भूखंड / सुविधा भूखंड मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अटी / शर्तीनुसार भूखंडधारक / विकासक यांना पुर्नखरेदी करुन विकसीत क रुन देण्यासाठी इच्छुक असणा -या भूखंडधारक / विकासक यांना सदर जागा वितरीत करणेसाठी धोरण निश्चित करणे आवश्यक आहे . महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 नुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकती बाजारभावानुसार वितरीत करण्याची तरतूद आहे**

**याप्रमाणे विकासक यांनी हस्तांतरीत केलेला / करण्यात येणा -या सुविधा भूखंड तसेच महापालिकेच्या ताब्यातील आरक्षित भूखंड परत मिळणेकरिता भूखंडधारक / विकासक यांनी मागणी केल्यास, अटीशर्तीवर विकसनास उपलब्ध करुन देणेबाबत ठाणे महानगरपालिकेने धोरण निश्चित केलेले आहे. तसेच मंजूर विकास योजनेतील आरक्षणाखालील भूखंड जे विकास हक्क प्रमाणपत्रान्वये / अतिरिक्त चटईक्षेत्रान्वये महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे व अद्यापपर्यंत महानगरपालिके मार्फत विकसीत करण्यात आलेले नाहीत . असे भूखंड मोकळ्या स्वरुपात राहिल्यास त्यावर भविष्यात अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

**यास्तव सदर बाबत मिरा भाईंदर शहरासाठी धोरण निश्चित करणे आवश्यक असल्यामुळे महानगरपालिकेच्या ताब्यातील मालकीच्या आरक्षणाने बाधीत जागा विकासकास / जागामालकास परत देणेबाबत खालीलप्रमाणे धोरण निश्चित करणेत येत आहे.**

1) **मिरा भाईंदर महानगरपालिके च्या मंजूर विकास योजनेमध्ये विविध प्रयोजनासाठी सार्वजनिक वापराची आरक्षणे प्रस्तावित असून सदर आरक्षणे विकसीत करणेचा पहिला अधिकार महानगरपालिकेचा आहे . यास्तव मंजूर विकास योजनेतील आरक्षण विकसीत करणेस मंजूरी देणेपुर्वी मा. महासभेची मान्यता घेण्यात यावी.**
2) **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 नुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकती बाजारभावानुसार वितरीत करण्याची तरतूद असल्याने , भूखंडधारक / विकासक यांनी महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेला मंजूर विकास योजनेतील आरक्षित भूखंड विकासकास विकासासाठी द्यावयाच्या झाल्यास भूखंडधारक / विकासक यांना महाराष्ट्र शासनाच्या रेडी रेकनर**

**मधील जमिनीच्या दराच्या 110% प्रमाणे आकारणी करुन व महापालिकेच्या अटी / शर्ती नुसार देण्यात याव्यात.**

3) **विकासक / जागामालक यांनी आरक्षणाखालील महानगरपालिकेच्या मालकीच्या / ताब्यातील जमिनीची मागणी करतांना 10% प्रमाणेच्या रक्कमेचा भरणा करणे आवश्यक असेल . त्यानंतर सदर मागणीबाबत मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी त्यांच्या अभिप्रायासह प्रकरण मा. महासभेस मान्यतेसाठी सादर करावे.**

4) **प्राप्त प्रस्तावासाठी मा . महासभेच्या मंजूरीनंतर विकासक / जागामालक यांनी संबंधित आरक्षण विकसीत करणेसाठी प्रस्ताव सादर केल्यानंतर त्याप्रस्तावासाठीच्या विकास आकार व इतर शुल्काच्या रक्कमेसह विकासक / जागामालक यांचेकडून उर्वरीत 90% प्रमाणेच्या रक्कमेचा भरणा करुन घ्यावा व आरक्षण विकसीत करणेस परवानगी देतांना महानगरपालिकेस हस्तांतरीत होणा रे बांधकाम प्रथम सुरु करणेची व हस्तांतरीत करणेची मुदत नमुद करुन अट नमुद करावी**

5) **समावेशक आरक्षणाच्या तरतूदी अन्वये विकसीत करणे परवानगी देतांना आरक्षणाच्या हेतूमध्ये बदल होणार नाही, याची दक्षता प्रशासनाने घ्यावी.**

6) **मंजूर विकास योजनेमधील आरक्षणाने बाधीत क्षेत्र विकासकांनी 110% प्रमाणेच्या रक्कमेचा भरणा करुन भूखंड प्राप्त करुन घेतल्यानंतर आरक्षित भूखंडाच्या क्षेत्राच्या शासन निर्णयाप्रमाणे बांधिव क्षेत्राचे बांधकाम महानगरपालिकेकडे विनामोबदला हस्तांतरण करणे भूखंडधारक / विकासक यांचेवर बंधनकारक करावे. तसेच शासनाने समावेशक आरक्षणाच्या तरतूदी अन्वये विकसनाकरिता धोरण निश्चित केलेल्या सदर धोरणाप्रमाणे व मंजूर नियमावलीप्रमाणे संबधित आरक्षणाचा विकास करणे विकासकावर बंधनकारक करावे.**

7) **मंजूर विकास योजनेमधील आ .क्र. 214 (बगीचा) हे आरक्षण सामावेशक आरक्षणाच्या तरतूदी अन्वये विकसीत करणेस विकासकास मंजूर देणेकरिता दि .18/07/2018 रोजी मा. महासभा ठराव क्र. 34 अन्वये मान्यता देण्यात आलेली असून सदर आरक्षणामधील महानगरपालिकेच्या ताब्यातील / मालकीची जागा संबंधित विकासकास या धोरणाप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या रेडी रेकनरचा मधील जमिनीच्या दराच्या 110% प्रमाणेची रक्कमेचा भरणा करुन घेवून देण्यात यावी.**

8) **विकासकांनी महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेल्या सुविधा भूखंडापैकी 300 चौ.मी. क्षेत्राच्या मर्यादित क्षेत्राचा भूखंड विकासकांनी मागणी केल्यास महाराष्ट्र शासनाच्या रेडी रेकनर मधील जमिनीच्या दराप्रमाणे आकारणी करुन विकासकास परत देण्यात यावा.**

9) **विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार सुविधा भूखंडातील वापर निश्चित करण्याचे अधिकार मा. आयुक्त सो . यांना असल्याने 300 चौ.मी. क्षेत्रापेक्षा जास्तीच्या भूखंडासाठी विकासकांनी मागणी केल्यास महाराष्ट्र शासनाच्या रेडी रेकनर मधील जमिनीच्या दराप्रमाणे रक्कमेची आकारणी करुन भूखंड विकासकास परत देणेसह सदर भूखंडावर मा . आयुक्त सो. यांनी निश्चित केलेल्या वापरानुसार विकासक यांनी सुविधा भूखंडाच्या 40% क्षेत्राचे बांधीव क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे आवश्यक असेल व सदर बांधीव क्षेत्रा साठी विकासकास मंजूर तरतूदीप्रमाणे विकास हक्क प्रमाणपत्र देण्यात यावे.**

**सदर धोरणाची अंमलबजावणी करणेत यावी, असा मी ठराव मांडत आहे.**

**दिनेश जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम मगाशी टाऊन प्लानिंग बाबत निला सोंस मॅडमने विचारले होते. त्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. हे नक्की आहे काय? हा प्रकार काय आहे. जरा टाऊन प्लानिंगने खुलासा करावा.

**नगररचनाकार :-**

विभागाने सादर केलेला गोषवाऱ्यात स्वयंस्पष्ट आहे.

**अनिल सावंत :-**

स्पष्ट नाही.

**नगररचनाकार :-**

त्यातील स्पष्टता आपल्याला जे आवश्यक आहे ते मी करतो. आपल्या मंजुर विकास योजनेमध्ये आरक्षण प्रस्तावित केलेले असतात. विकास नियंत्रण नियमावलीनुसार एखादे रेखांकन विकसित करताना किंवा रेसिडेन्शीअल जागा विकसित करताना त्यामध्ये काही ठराविक क्षेत्राच्या वेळी दोन हेक्टरच्यावर गेले की ५ टक्के सुविधा क्षेत्र ठेवावे लागते. त्याशिवाय आय टू आर ह्या धोरणानुसार ठराविक क्षेत्रनिहाय ॲमिनिटी स्पेस ठेवावे लागते ते ॲमिनिटी स्पेस महापालिकेला हस्तांतरीत होणे अपेक्षित आहे. त्याप्रमाणे हस्तांतरीत केले जाते. विकास योजनेतले आरक्षण आहेत ते महापालिकेने ॲक्वायर करुन घेणे आणि ते विकसित करणे आपल्याला अपेक्षित आहे. काही ठिकाणी आरक्षणातला काही भाग हा महापालिकेकडे हस्तांतरीत केला जातो. काही भाग हा विकासकाकडून राहिला जातो. विकास योजनेचा मुळ उद्देश आहे की आरक्षण विकसित होऊन सार्वजनिक सुविधा ही जनतेसाठी उपलब्ध व्हावी. महापालिकेकडे जी आर्थिक हित पाहता शासनाला ऑकोपिटेशन रिझर्व्हेशन टी.डी.आर यापरिस्थितीत दिलेले आहे की त्याच्यावर फायनान्शीअली लोड हा महापालिकेवरील कमी व्हावा जी आरक्षण आपल्याकडे पार्टनिस्ट उपलब्ध झालेली आहेत आणि समोरचा विकासक तो समावेशक आरक्षणातले विकसित करु इच्छितो तर त्याबद्दलची कुठली पॉलिसी आपल्याकडे आजपर्यंत नव्हती. ही आहे ती बाय बॅक पॉलिसी आहे. आपल्याकडे असलेली जागा त्याच वापराकरिता जर त्या मिळकत धारकाला आपण दिली तर तो पूर्ण क्षेत्राचा एक प्लान तयार करु शकेल. रिझर्व्हेशन डेव्हलप करु शकेल आणि तो जनतेसाठी खुले करु शकेल त्याबदली त्याला समावेशक आरक्षणाच्या नियमानुसार जो अनुज्ञेय शासनाने केलेला आहे तो लाभ मिळेल. आपल्यातच हस्तांतरीत झालेली जागा ही कलम ७९ प्रमाणे बाजार भावाप्रमाणे आपण ती हस्तांतरीत करु शकतो. तोच ॲमिनिटी मापाचा आहे. त्या ॲमिनिटी आपण हॅन्ड ओव्हर करुन घेतो. पण ॲमिनिटी बांधण्यासाठी आपल्याला वेळ लागतो किंवा आपल्याकडचे फायनान्शीअल बर्डन कमी करण्याच्या हिशोबाने ती ॲमिनिटी स्पेस ज्याने मागणी केली आहे त्याच विकासाला बाय बॅक पध्दतीने द्यायचे आणि त्या पध्दतीमध्ये त्याच्याकडून ४० टक्के जसे ऑक्युमेन्डेशन मध्ये आहेत त्याच पध्दतीने ४० टक्के क्षेत्रावर ॲमिनिटी महापालिका करुन येणार आणि याच्यामधली जी रक्कम गोषवा-यामध्ये दिलेली आहे. बाय बॅक पॉलिसीला ती रेडीरेकनर पेक्षा १२५ टक्केने पैसे भरुन ती जागा हस्तांतरीत करण्यात आली. ह्या गोषवा-यात आम्ही हा हेतू साध्य करायचा प्रयत्न केला की त्या जागेच्या बदलीची किंमत महापालिकेला मिळेल आणि ते आरक्षण किंवा सुविधा बिल्डरमार्फत उपलब्ध होऊन ती समाजासह उपयोगात येईल.

**अनिल सावंत :-**

एखादे जागेचे आरक्षण आहे महापालिकेने ताब्यात घेतली मग परत तुम्ही त्या ओनरला देणार. तुमच्या गोषवा-याप्रमाणे १२५ टक्के भरु.

**नगररचनाकार :-**

आरक्षणातल्या पार्टली ज्या जागा आहेत.

**अनिल सावंत :-**

पार्टली नाही एखादे आरक्षण आहे २ हजार चौ.मी. आहे. तो महापालिकेच्या ताब्यात आहे ते परत तुम्ही बिल्डरला द्यायचे आहे. मग तुम्ही १२५ च्या रेटने येत आहेत जास्त पैसे भरुन रेडी रेकनरपेक्षा जास्त पैसे भरुन घेणार का तुम्ही.

**नगररचनाकार :-**

आपण इथे जी पॉलिसी ठेवलेली आहे ते मिळकत धारकाकडे काही क्षेत्र आहे आपल्याकडे काही क्षेत्र आहे संपूर्ण आरक्षण आपल्याकडे जर हॅन्डओव्हर झाले असेल तर ते आपण पूर्णपणे त्याला देत नाही. आपण पार्टली ॲक्वायर झाले आहे आणि पार्टली झालेली नाही. अशा परिस्थितीत जे ॲक्वायर झालेली नाही त्याचे मिळकत धारक जर तो समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकसित करु इच्छितो तर त्याला आपल्याकडचा भाग त्याला बाय बॅक पॉलिसीने देत आहोत. पूर्ण आरक्षण आपल्या ताब्यात आले असेल तर आपण त्याला देणार नाही.

**अनिल सावंत :-**

एखादे आरक्षण समजा २ हजार चौ.मी. माझा मुद्दा तोच आहे समजा त्याचे हजार चौ.मी. तुमच्या ताब्यात आलेले आहे मग हजार चौ.मी. तुम्ही त्या बिल्डरला देणार का? काय करणार.

**नगररचनाकार :-**

तोच प्रस्ताव आहे. हजार चौ.मी आपल्याकडे आरक्षण आहे ते १२५ टक्केने त्याला आपण पुर्ण खरेदी देणार.

**अनिल सावंत :-**

परत त्यालादेऊन टाकणार?

**नगररचनाकार :-**

आपण त्यालाच देणार.

**अनिल सावंत :-**

कारण त्याला ऑलरेडी तुम्ही टी.डी.आर दिलेला आहे.

**नगररचनाकार :-**

नाही ह्या जागेचा टी.डी.आर आपण दुसऱ्याला दिलेला आहे तो मोबदला रक्कम म्हणून दिलेला आहे.

**अनिल सावंत :-**

तेच पालिकेने घेतले म्हणून मोबदला दिला.

**नगररचनाकार :-**

आपल्या मालकीची जी जागा झालेली आहे आपल्या मालकीची जागा आपण त्याला पुर्नःखरेदी करुन देत आहोत.

**अनिल सावंत :-**

परत करुन देणार?

**नगररचनाकार :-**

परत त्याला देणार आणि त्याच्यातून शासनाच्या नियमाप्रमाणे त्याच्याकडून बांधुन घेणार.

**अनिल सावंत :-**

शासनाच्या नियमाप्रमाणे किती टक्के तुम्ही बांधुन घेणार?

**नगररचनाकार :-**

समावेशक आरक्षणात प्रत्येक आरक्षण व्हाईज टक्केवारी दिलेली आहे.

**अनिल सावंत :-**

इथे तुम्ही ४० टक्के म्हटलेले आहे.

**नगररचनाकार :-**

४० टक्के आपण हे ॲमिनिटीसाठी म्हटलेले आहे.

**अनिल सावंत :-**

ॲमिनिटीसाठी बांधून देणार आहेत.

**नगररचनाकार :-**

ॲमिनिटी स्पेस वेगळ.

**अनिल सावंत :-**

ॲमिनिटीसाठी ४० टक्के बांधून घेतल्यानंतर त्या बिल्डरला महापालिका टी.डी.आर कुठच्या रेटने देणार आहे?

**नगररचनाकार :-**

कन्स्ट्रक्शन टी.डी.आर चा जो शासनाचा निर्णय आलेला आहे त्या रेटने आपण त्याला टी.डी.आर देणार कन्स्ट्रक्शनचा.

**अनिल सावंत :-**

कन्स्ट्रक्शन कॉस्टचा.

**नगररचनाकार :-**

कन्स्ट्रक्शन कॉस्टचा.

**अनिल सावंत :-**

कन्स्ट्रक्शन कॉस्टचा तुम्ही टी.डी.आर देणार आहात. ही विल डिसाईड टू कॉस्ट.

**नगररचनाकार :-**

हो तो शासनाने क्लेरीफाय केलेले आहे. त्याच्यामध्ये कन्स्ट्रक्शन स्ट्रॉंग डिव्हाईडेड बाय दी लॅन्ड रेट इन टू १.२

**अनिल सावंत :-**

आता याच्याप्रमाणे महापौर मॅडम हा जो विषय आहे. ह्या शहराचे डेव्हलपमेंट प्लान बनलेले आहे. त्यावेळी मला वाटते ७-८ लाख पॉप्युलेशन ठरविण्यात आली असेल की ह्या शहराची एवढी वाढ होईल. त्या हिशोबाने काही आरक्षणे ठेवण्यात आली की ज्या आरक्षण ज्याच्यामध्ये खेळाची मैदाने, ग्राऊंड, बगीचा

बरीचशी आरक्षणे आहेत. त्यातली काही महापालिकेने ताब्यात घेतलेली आहेत. काही डेव्हलप केली ३११ आरक्षणे होती. आता काही पार्टली ताब्यात घेतलेली काही आरक्षणे आहेत त्याचा टी.डी.आर दिलेला आहे त्या मोबदल्यात कुंपण भिंत आणि माती भराव याचे पैसे पालिकेजवळ जमा झालेले आहेत. टी.डी.आर देतेवेळी मुख्य कंडीशन आहे. प्रशासनाने काय केले तिथे कुंपण भिंत आणि माती भरावाचे पैसे घेतले बिल्डरला टी.डी.आर दिला आणि त्या आरक्षणाची जागा वाऱ्यावर सोडून दिली. आज भिती घालत आहेत की त्याच्यावर अतिक्रमण होण्याची शक्यता आहे. म्हणजे प्रशासनाने आपले हात सरळ झटकायचे आहेत ती आरक्षण विकासकाला परत विकायची हा ठराव झालेला नाही. त्या ठरावामध्ये एक नमुद आहे. गोडदेवचे आरक्षण त्या विकासकाला विकुन टाकायचे. अशा प्रकारे ह्या शहराचा जो प्राणवायु आहे. तोच विकायला तुम्ही काढला. आज शहराची लोकसंख्या १५ लाख आहे. मग आपली किती टक्क्यावर असतील आरक्षणे आणि तुमचे डेव्हलपमेंट...............

**नगररचनाकार :-**

गार्डनसाठी आरक्षण असेल.

**सुरेश खंडेलवाल :-**

गार्डनसाठी आरक्षण आहे गार्डनच होणार आहे.

**अनिल सावंत :-**

गार्डनसाठी आरक्षण २ हजार चौ.मी आहे. त्यातले हजार चौ.मी. तुमच्या जवळ आलेले आहे. तो तुम्ही त्याला परत देणार आहात. मग त्या २ हजार चौ.मी मध्ये तो बिल्डर गार्डन बनविणार आहे का?

**सुरेश खंडेलवाल :-**

त्याला २ हजार चौ.मी. मध्ये गार्डन बनवावे लागेल.

**अनिल सावंत :-**

काय बनविणार आहेत जरा विचारा. आम्हाला टाऊन प्लानिंगकडून उत्तर पाहिजे.

**नगररचनाकार :-**

आरक्षणाखालची जागा ज्या आरक्षणाच्या हेतुसाठी आहे. त्या आरक्षणाचे क्षेत्र पूर्ण डेव्हलप होण्यासाठी आपण आपल्या ताब्यातली जागा पूर्ण खरेदी करुन घेतली त्यामुळे त्या आरक्षणाचा हेतुत बदल होत नाही. त्याच्या वापरात बदल होत नाही. ही जी योजना आहे ती मी ठाण्याच्या धर्तीवर केलेले आहे. ठाणेकडून ती बाय बॅक पॉलिसी यशस्वीरित्या त्यांनी आता चालू केलेली आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब तुम्ही फक्त सिम्पल सांगा मी जास्त वेळ घेत नाही. २ हजार चौ.मी. आरक्षण आहे. खेळाचे मैदान हजार चौ.मी उदा. मी विकासक आहे. हजार चौ.मी मी पालिकेला दिलेले आहे. हजार चौ.मी माझ्या जवळ आहे. पालिकेने मला हजार चौ.मी. दिल्यानंतर त्याच्यामध्ये खेळाचे मैदान किती चौ.मी मध्ये होणार आहे.

**नगररचनाकार :-**

पूर्ण आरक्षणाचे जेवढे क्षेत्र आहे तेवढेच खेळाचे मैदान मिळणार ते पण समावेशक आरक्षणातले जितके टक्केवारी जे शासनाने दिलेले आहे. तेवढेच त्याला टक्के त्याला मिळेल जस ७०-३० गार्डनला आहे. त्याप्रमाणातच त्याला करावे लागणार.

**अनिल सावंत :-**

तुम्ही मला असे सांगा खेळाचे मैदानासाठी ७० टक्के तो पालिकेला देणार डेव्हलप करु.

**नगररचनाकार :-**

तो आपल्याला डेव्हलप करुन देणार त्या टक्केवारीमध्ये.

**अनिल सावंत :-**

३० टक्के मध्ये काय करणार?

**नगररचनाकार :-**

३० टक्के तो त्याचा वापर करणार.

**अनिल सावंत :-**

तो आपण काय करणार आहोत?

**नगररचनाकार :-**

रेसिडेन्शीअल करु शकेल किंवा त्याचा प्रस्ताव जो आलेला आहे.........

**अनिल सावंत :-**

तुमची अपेक्षा अशी आहे की ३० टक्के जो रेसिडेन्शीयल वापर होणार आहे तो पब्लीकसाठी ७० टक्के खेळाचे मैदान आहे ते पब्लीकसाठी वापरता येईल? तिथे रेसिडेन्शीअल बिल्डर सोसायटी बांधणार आहे. त्या सोसायटीवाले पहिला क्लेम करतील.

**नगररचनाकार :-**

समावेशक आरक्षणाचा जो हेतु आपला आहे. तो आपल्याकडे नसणार आणि विकासाकडे असते आणि त्याला समावेशक आरक्षणात आपल्याकडे टाकले असते. तो आपण दिला असता. द्यावा लागला असता. त्याच नियमाप्रमाणे फक्त.........

**अनिल सावंत :-**

हे ठाणे महापालिकेचे तुम्ही बाय बॅक पॉलिसीचे जे तुम्ही धोरण आणलेले आहे ते सुध्दा अर्धवट आणलेले आहे. पूर्ण माहिती दिलेली नाही. याप्रमाणे कराल तर तुम्ही पूर्ण शहराची वाट लावून टाकाल. ह्या शहराची लोकसंख्या एवढी झालेली आहे. पूर्ण इन्फ्रास्ट्रक्चर बोंबललेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब हा विषय तुमच्या एक्सपरीत मधून हा विषय आलेला आहे. विषय असा आरक्षित जागा अदलाबदल करणे धोरण ठरविणे विषय आणि गोषवारा सुसंगत आहे. याच्यामध्ये अदलाबदल काय होणार. थोडक्यात बोललो तर असे व्हायला पाहिजे महानगरपालिकेची जागा विकासकाच्या घशात खरी परिस्थिती आहे साहेब ठाणे महानगरपालिकेचे क्षेत्र तिथे आणि मिरा भाईंदर महापालिकेचे क्षेत्र इथे ७९ स्क्वेअर कि.मी. मध्ये सी.आर.झेड फॉरेस्ट्री बाकीचा सर्व काही बाजूला केले तर २५ स्क्वेअर कि.मी. आपल्याकडे शेती शिल्लक नाही आणि ८०० टक्केने लोकसंख्येची वाढ आहे ह्या शहराची. १९९७ साली जेव्हा विकास आराखडा तयार झाला तेव्हाही लोकसंख्या १.५ लाख होती. १ लाख ५० हजार होती आणि आज ही लोकसंख्या १२ लाखाच्या वर पोहोचली आहे. ८०० टक्केची वाढ क्षेत्र तितकाच आयुक्त महोदय क्षेत्र तितकाच आहे. लोकसंख्या वाढत चालली. आपल्याला ही जागा स्वतःसाठी पाहिजे ही आपल्या स्वतःसाठी असलेली जागा कशाला कोणाला द्यायची. त्याला काहीतरी कारण असायला पाहिजे. ठोस रिझन व्हाईज वॉन्ट टू बिल. विकासकाला फक्त त्याने बाय बॅक पॉलिसी आपण तयार करायची आणि ॲमिनिटी ओपन स्पेसमध्ये म्हणजे २० हजार चौ.मी जागेमधून आपल्याला १ हजार चौ.मी. जागा ॲमिनिटी ओपन स्पेसमध्ये प्राप्त होणार. शहर वेगाने वाढत चाललेले आहे. आपल्याला बाजार पाहिजे. एका बाजूला फेरिवाल्यांचा विषय आपल्याकडे रोज गाजतो. गरजा वाढत चाललेली आहे. आपल्याला जागा पाहिजे. आपली पालिकेची आर्थिक परिस्थिती कमकुवत स्वतः आपण बांधू शकत नाही. सुविधा भुखंडामध्ये आहे. आम्हाला ही वस्तु आज बांधून मिळते. त्याचा मोबदला म्हणून टी.डी.आर आपण त्यांना आधीच देणार. हे सगळ काही स्पष्ट असताना साहेब अशाप्रकारे तुमची खरतर भावना असायला पाहिजे होती की आज जे आरक्षण आहेत त्यांना आम्ही स्वतः पालिकेने विकसित करुन घेतले पाहिजे. एकतर साहेब ॲमिनिटी तुम्ही सुविधा भुखंड जोपर्यंत तो भुखंडाला २ हेक्टर जागेचा सर्वच जागा मालक एकत्र येत नाही तोपर्यंत ते आरक्षण डेव्हलप होईल का? होऊ शकतो का साहेब? एकतर ते प्रथमतः होऊ शकत नाही. कसे होणार साहेब कुणाची जागा किती असा नियमावली मधला मला नियम दाखवायला आणि महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमामध्ये मला हा आणुन दाखवायचे. साहेब जोपर्यंत तुमची सर्व जागा मालक एकत्र एका प्लॅटफॉर्मवर येत नाही तोपर्यंत तुमची सुविधा जी ॲमिनिटी आहे ती तुमची डेव्हलप होत नाही. हा तुमचा मोठा इश्यु आहे. आणि हे सगळे करताना साहेब नियमावलीमध्ये बदल होणार परत आपली जागा कुणाला परत विकतो. पालिकेच्या महापालिका अधिनियमामध्ये १९७९ मध्ये त्याची तरतुद आहे. पण त्याला नियम आहे. तुमच्या समोर नियमावली आहे.

**नगररचनाकार :-**

नियमावलीनुसार रेडी रेकनरची किंमत देणे आपल्याला बंधनकारक आहे त्याला त्याच्या खाली आपल्याला देता येणार नाही या पॉलिसीच्या आपण थोडा वाढीव रेट टाकू.

**जुबेर इनामदार :-**

आता आपण रेडी विकास नियमावर येऊ कारण तुम्ही तो विषय काढला. साहेब ह्या शहरामध्ये २० टक्के जागा रेडी रेकनरपेक्षा बाजार भाव सुध्दा बाहेर चाललेला आहे. बाहेर ५०० रुपयेचे रेडी रेकनरचे १०० रु. ८० टक्के जागा असेल २० टक्के जागा अशी असेल ती रेडी रेकनरला कुठेतरी सुसंगत असावी. याचा अर्थ असा आहे पालिकेने बाजा भाव सोडून रेडी रेकनरकडे आपले भुखंड काका विकायला काढलेले आहेत आणि प्रशासनाने १२५ टक्के केले होते. ठरावामध्ये ११० आले आहे. म्हणजे अजून १५ टक्के कमी. मग कोणासाठी हे चाललेले आहे? याच्यामध्ये कोणाचा रेस्टेड इंट्रेस्टेड आहे विकासकांचा.

फक्त विकासकांना डोळ्याचे समाधान व्हावे अशा प्रकारचे विषय आणता. प्रशासनाने साहेब असे विषय दिले नाही पाहिजे. हा व्यक्तीगत वेस्टेड इंट्रेस्ट याच्यामध्ये क्रिएट होतो. ॲमिनिटी स्पेस आपल्या मालकीची असायला पाहिजे का आम्ही देणार तुम्ही एका बाजूला ३०० चौ.मी. मागितले त्यात काय नाही. त्याच्यापुढे गेल्यावर आपण ४० टक्के त्याच्याकडून घेऊ. आणि परत त्याला ६० टक्के देताना १०० टक्के त्याला बेनिफट देऊ. साहेब तुम्ही गोषवारा वाचला तर १०० ॲन्ड वन परसन्ट फक्त विकासकाला अजून किती जास्त आर्थिक फायदा होईल त्या दृष्टीकोनातून हा आहे का साहेब आमच्या शहरामध्ये तितकी जागा आमच्याकडे नाही. आमची शहराची भौगोलिक रचना काही वाढणार नाही. लोकसंख्या वाढत चालली आहे. वी आर गेटिंग ॲनिवेटेड वरती चाललो आहोत. शासनाने रोज नविन धोरण येते वन इज टू फोर येते २.५ येतो पुढे नाही तरी नविन येतील ही डेव्हलपमेंट सर्वांत मोठा विषय हा रिडेव्हपलमेंटचा विषय काका पुर्नविनियोजनचा ह्या पूर्ण शहराचा विकास जर झाला तर ही संख्या तुमची कुठे जाईल. आज आपल्याकडे तसे २.५ चे आलेलेच आहे. जी.आर ८५ चा तो आणून पुढे गेला तर तुमचा हा नवघर पट्टा भाईंदर ईस्ट किती वेगाने वाढेल. त्या लोकसंख्येला कुठे ॲडजस्ट कराल. त्या लोकसंख्येसाठी ॲमिनिटी स्पेस तुम्हालानको आहे का? तुम्हाला जागा नाही हक्काचा भुखंड नको पालिकेची हक्काची जागा नको? वास्तु नको तुम्हाला बाजार पाहिजे. अग्निशमनचे तुम्हाला केंद्र उभे करावे लागतील. पालिकेसाठी तुम्हाला वेगवेगळे प्रभाग कार्यालय उभे करावे लागणार आहेत. तर तुम्ही कुठून आणणार. साहेब नको ते कशाला विषय आणता. आमचा स्पष्ट विरोध आहे. ह्या विषयावर असे कुठलेही विषय घ्यायचे नाही. जेणेकरुन शहराचे आर्थिक नुकसान होईल. आर्थिक नैसर्गिक असे कुठलेही नुकसान होणार असा आम्हाला कुठलाही विषय नको आहे. आमचा विरोध आहे.

**दिप्ती भट :-**

महापौर मॅडम सरांना जरा प्रश्न विचारायचा होता की हम लोग बिल्डर ने प्लॅन बनाया प्लान में जो जगह छोडा और वह जगह हमको ॲग्रीमेन्ट बनाके पालिका को दे दिया अब यह पालिका डेव्हलप करने के लिए आप बोल रहे हो की अब हम लोग बिल्डर को वापस दे आप वापस देंगे अभी जुबेर इनामदारजी बोले ऑलरेडी किसी ना किसी ॲग्रीमेंट हुआ है की कही मैं सातबारा है और मैंने उनको डेव्हलप करने के लिए दिया है। लेकिन मेरा और इनके बीच का ॲग्रीमेंट खत्म हो गया है। कम्पलीट हो गया है अभी में मालक हू तो आप वह सातबारा ओनर को देंगे या बिल्डर को देंगे। बनाने अगर आपने दिया ऑलरेडी जो यहाँ बिल्डींग गिर चुकी है धोकादायक में आपने गिरा दिया है। वह बिल्डींगवाले का जब कही ना कही उनका भी हिस्सा उसमें लगता है तो उसका हिसाब कौन देगा।

**निला सोंस :-**

मा. महापौर जैसा की हम यहाँ पे आरक्षित जगह की बात कर रहे है तो मुझे लगता है की यह विषय अलग है। तो में सिर्फ यह जानना चाहता हूँ की आज टिचर डे भी है और इसी महासभा में हम सभीने १० स्कुल रिझर्व्हेशन को भी मान्यता दि थी की उसके लिए हम संस्था को बुलाऐंगे। शैक्षणिक संस्थाओ को जो महापालिका के पास कही स्कुल पेंडींग है और उनके ताबे में कुछ आ चुकी है और कुछ नही आए है। तो इस पध्दती में क्या हो सकता है की बिल्डर बाय बॅक कर ले और वह जो ठराव था वह मुझे लगता है की वह फिर फेल हो जाए ऐसा होनेवाला है। वह १० आरक्षण वही के वही सुरक्षित है।

**मा. महापौर :-**

ऐसा नही होगा आप बैठ जाइए।

**निला सोंस :-**

नही होगा ठिक है।

**अनिल सावंत :-**

जरा टाऊन प्लानिंगला उत्तर देऊ देत.

**मा. महापौर :-**

अभी आपका ठराव मांडीए।

**नगररचनाकार :-**

ज्या जागा ताब्यात आलेल्या आहेत ते आरक्षण आहेत त्याच्यात बाय बॅक पॉलिसी होणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

ॲमिनिटी विषय आहे ना नागरिक सुविधा भुखंड त्याच्यामध्ये असतील. नागरिक सुविधा क्षेत्र तुमचा तोच विषय आहे. तुमच्या गोषवाऱ्यामध्ये त्याचे बाय बॅक तुम्ही प्रोव्हिजन ठेवलेले आहे. ॲमिनिटी ओपन स्पेसचे प्रोव्हिजन ठेवलेले आहे ना साहेब बाय बॅकचा?

**नगररचनाकार :-**

ॲमिनिटी ओपन स्पेसमध्ये पण आपण ते ठेवलेले आहे.

**मा. उपमहापौर :-**

इनामदार साहेब मी काही खुलासा देऊ इच्छितो हा जो विषय आहे की आपण एक ठराव केला इनामदार साहेब तुम्ही जो आक्षेप नोंदविला की १२५ च्या ऐवजी आपण ११० टक्के केला ह्या शहरामध्ये जे आरक्षण आहेत त्या आरक्षणामधला काही भाग विकसित झालेला आहे काही भाग आपल्या हातातच घ्यायचा आहे. त्याच्यावरती अजून विकासकाने कुठलाही टी.डी.आर घेतलेला नाही. परंतु हा विषय आणताना आपण कान देऊन ऐकत होते माझे लक्ष होते. जेव्हा बाय बॅकचा प्रश्न येईल हे सर्वाधिकार आयुक्तांना आहेत. पण जेव्हा बाय बॅकचा प्रश्न येईल तेव्हा पुन्हा तो विषय महासभेसमोर आणावा आणि नंतर निर्णय घ्यावा. असे धोरण ठरविलेले आहे. एकमात्र आणला निश्चित इंट्रेस्ट आहे की ज्या ठिकाणी आरक्षणाचे दोन तीन भाग झालेले आहेत ते आरक्षण आपल्याला विकसित करता यावे किंवा त्या विकासकाला किंवा आपण टी.डी.आर दिलेला आहे आणि त्याच्याकडून त्या संपूर्ण रिझर्व्हेशनचे जे काय डेव्हलपमेंट आहे. जे आपल्या पध्दतीत आपण ठरवू तसे त्याला एखादे खेळाचे मैदान सांगितले म्हणजे त्याने माती टाकुन लेव्हल केली आणि तारेचे कम्पाऊंड घेतले असे मैदान कोणी घेणार नाही. त्या-त्या वेळेला त्याला एक नियोजित आराखडा तयार करुन दिला जाईल आणि त्या पध्दतीने करीन मात्र बाय बॅकचा जो प्रश्न आहे. ते धोरण पुन्हा महासभेसमोर आयुक्तांकडे ह्या महासभेसमोर आणायचे आहे. त्याच्यामुळे ह्या ठरावानंतर बाय बॅकचा निर्णय कोणाला तसा घेता येणार नाही. अधिकाऱ्यांना पण देता येणार नाही. तर ते महापालिकेसमोर त्याचे धोरण निश्चित होईल.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम आता उपमहापौर साहेबांनी सांगितले की कोणाला बाय बँक करता येणार नाही ठराव अजून झालेला नाही. अजून मंजूर व्हायचा आहे. त्या ठरावामध्ये त्याने त्यांनी इन्क्लुड केलेले आहे. गोडदेवचे आरक्षण विकासकाला देऊन टाकले. कधी आले हे महापालिकेसमोर ठराव बघा त्यांनी काय केला आहे. ठराव वाचा. गोडदेव आरक्षण विकासकाला देऊन टाकणार आणि उपमहापौर सांगत आहेत की तो महासभेसमोर येणार.

**मा. उपमहापौर :-**

बाय बॅक करताना महासभेसमोर घेणार.

**अनिल सावंत :-**

मग हे बाय बॅकचे देऊन टाकणार आहात ना साहेब.

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव असेल तर ठराव मांडा.

**अनिल सावंत :-**

मॅडम ठराव द्यायचा काय ठराव वाचा म्हणजे काय ही सभागृहाची दिशाभूल आहे. टाऊन प्लानिंग काय सांगत आहे उपमहापौर काय सांगत आहेत ठराव बघा आणि ठराव काय होत आहेत, कसे काय तुम्ही हे करु शकता? म्हणजे सर्वच गोष्टींच्या बाबतीत एखाद्याच्या वेस्टेज इंट्रेस्ट असेल तर ९५ नगरसेवकांना तुम्ही गृहित धरणार का? ठराव वाचा म्हणजे काय? विषय काय, गोषवारा काय, ठराव काय आणि उपमहापौर स्पष्टीकरण काय देत आहेत.

**दिप्ती भट :-**

महापौर मॅडम देशमुख साहेबांनी उत्तर दिलेले नाही.

**अनिल सावंत :-**

ठराव करतात महासभेसमोर येणार आणि त्या ठरावामध्ये आरक्षण विकुन टाकतात.

**दिप्ती भट :-**

साहेब आपण उत्तर दिलेले नाही. माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही.

**नगररचनाकार :-**

मला आपला प्रश्न नाही समजला. अजून एकदा रिपीट करा.

**दिप्ती भट :-**

साहेब स्टार्टींगला मी एक बिल्डर आहे. मी एक प्लान दिलेला आहे. त्याच्यामधून मी २० वर्षानंतर आपल्याला सर्व जागा सोपविल्या. महापालिकेला ॲग्रीमेंट करुन मी जो भुखंड होता तो संपविला आता त्या भुखंडामध्ये तुम्ही बोलत आहात की मी परत घेऊ शकतो. मी त्याच्यामधून परत घेतले पण त्याच्या अगोदर मला पण कोणी सातबारा आणून दिला असेल त्याने मला बनवायला दिले होते. माझे आणि त्याचे ॲग्रीमेंट

संपले तर तुम्ही तो मालकाला बनवायला देणार की त्या सातबारा ओनरला बनवायला देणार? जब बिल्डींग गिर जाती है और बिल्डर लोग रि-डेव्हलपमेंट के लिए हम लोग आते है तो आप बोलते हो की गार्डन की जगह में ही आपका टी.डी.आर है वहाँ जगह है वह आप गिनके आओ आप जग ऐसी बात करते है मॅडम जिसकी बिल्डींग गिर गयी और ७ साल, १० साल बाहर रहे उसको मालुम पडेगा। देशमुख साहेब आपण उत्तर द्या.

(सभागृहात गोंधळ)

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम इस विषय पे बहुत खुलासा हो चुका है।

**जुबेर इनामदार :-**

**मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदी नुसार महापालिका क्षेत्रात दाखल होणा-या विकास प्रस्तावांतर्गत 2 हेक्टर वरील रहिवास विभागातील क्षेत्राकरिता मंजूर नियमावली नुसार 5% सुविधा भूखंड महापालिकेस देणे आवश्यक आहे . तसेच विकास प्रस्तावांतर्गत जमिनीचे औद्योगिक ते रहिवास अथवा वाणिज्य वापरामध्ये रुपांतर ण करणांना मंजूर नियमावली मधील तरतूदीनुसार महापालिकेस सुविधा भूखंड देणे आवश्यक आहे . महापालिकेकडे प्राप्त होणा -या सुविधा भूखंडावर परिसरातील नागरी सुविधांची आवश्यकता विचारात घेऊन वापर निश्चित करण्याचे अधिकार मा . आयुक्त सो. यांना आहेत.**

**तसेच मंजूर विकास योजनेती ल आरक्षणाखालील भुखंड जे विकास हक्का प्रमाणपत्रान्वये / अतिरिक्त चटईक्षेत्रान्वये महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे व अद्यापपर्यंत महानगरपालिकेमार्फत विकसित करण्यात आलेले नाहीत असे भूखंड मोकळ्या स्वरुपात राहिल्यास त्यावर भविष्यात अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव महापालिकेच्या महानरगरपालिकच्या ताब्यातील सदर आरक्षित भूखंडाचे आरक्षणाच्या वापरानुसार विकसन होणे आवश्यक आहे.**

**विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार व शासनाने मंजूर केलेल्या टि .डी.आर. बाबत अधिसूचनेमध्ये भूखंडधारक / विकासक यांनी नियोजन प्राधिकरणास हस्तांतरीत केलेल्या आरक्षित भूखंड / सुविधा भूखंडावर सदर भूखंडधारक / विकासक यांचेकडून कन्स्ट्रक्शन टि.डी.आर. च्या मोबदल्यात बांधिव सुविधा विकसीत करुन घेणेबाबत तरतूद असून , त्या तरतूदीनुसार महानगरपालिकेमार्फत काही प्रस्ताव विकसीत करुन घेण्यात आलेले आहे. तरी भूखंडधारक / विकासक यांनी हस्तांतरीत केलेले आरक्षित भूखंड / सुविधा भूखंड मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अटी / शर्तीनुसार भूखंडधारक / विकासक यांना पुर्नखरेदी करुन विकसीत करुन देण्यासाठी इच्छुक असणा -या भूखंडधारक / विकासक यांना सदर जागा वि तरीत करणेसाठी धोरण निश्चित करणे . महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 नुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकती बाजारभावानुसार वितरीत करणे तसेच ठाणे महानगरपालिकेने या धर्तीवर धोरण निश्चित केल्याचे उल्लेख प्रशासनाने गोषवाऱ्यामध्ये नमुद केले आहे . तसेच परिच्छेद 1-5 नुसार अटीशर्तींचे उल्लेख करुन विषय धोरणात्मक निर्णयासाठी प्रस्तावित केले आहे.**

**प्रशासनाच्या गोषवाऱ्यामध्ये उल्लेखित त्रुट्या दिसून येतात.**

1) **आरक्षित भूखंड विकासकास मोबदल्याच्या स्वरुपात द्यायचा असल्यास मिरा भाईंदर महानगरपालिका विकास नियंत्रण नियमाव ली / महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 तरतुदीचा उल्लेख केलेला नाही.**
2) **आरक्षित भूखंड विकासासाठी द्यावयाचे झाल्यास भूखंडधारक / विकासक यांना महाराष्ट्र शासन रेडी रेकनरमध्ये जमेच्या दरामध्ये 125 टक्के प्रमाणे आकारणी करुन महानगरपालिकेच्या अटीशर्तीनुसार देण्याचे प्रस्तावित आहे. परंतु मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सध्या बाजार भावापेक्षा निम्म्या कमी किमतीचे शासनाच्या रेडी रेकनरचे दर असल्यामुळे पालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे. त्याचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे.**
3) **सुविधा भूखंडधारक / विकासक यांना हस्तां रीत केल्यास त्याचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही व पालिकेचे नियंत्रण ठेवणे शक्य होणार नाही.**

4) **प्रशासनाने गोषवारा प्रकरण 63 आरक्षित जागा अदलाबदल करणेबाबत धोरण ठरविणे हा विषयपत्रिकेवरचा विषय व गोषवाऱ्यामधला मजकूर सुसंगत नाही**

**तरी प्रकरण क्र. 63 गोषवारा सदोष असल्याने फेटाळण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव महोदय दोन ठराव आलेले आहेत. मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६३ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. सुरेश खंडेलवाल, अनुमोदन श्री. दिनेश जैन. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम दुसरा ठराव मी मतदानास टाकतो. सुचक श्री. जुबेर इनामदार ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक सुरेश खंडेलवाल ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्री. सुरेश खंडेलवाल ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ५१, विरोधात २२, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्री. सुरेश खंडेलवाल यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

**दिप्ती भट :-**

साहेब तुम्ही उत्तर देणार होते.

**मा. उपमहापौर :-**

ह्या प्रश्नाच्या मागे दुसरे कोणी प्रश्न विचारु नका आणि पुढचा खुलासा त्यांच्याकडून करुन घ्या. प्रश्नाला प्रतिप्रश्न नको. सभागृहासमोर बरेच विषय आहेत.

**दिप्ती भट :-**

साहेब आम्ही १० वर्षापासून ह्या सभागृहात बसतो. महापौर बरोबर बोलताना महापौर, उपमहापौर आणि प्रशासन कोणाची पर्सनल जाहिरात नाही म्हणून कोणी आमच्यावर वागावे नाही. माझा प्रश्न याला लागुन आहे.

(सभागृहात गोंधळ)

**गणेश भोईर :-**

साहेब आम्ही एक प्रश्न तीन तीन वेळा ऐकला तुम्ही एकदाच ऐकून उत्तर द्या.

**दिनेश जैन :-**

महापौर मॅडम इसी विषय के लिए मैं क्लेरीफिकेशन दे रहा हूँ की यह लोग सुनते नही और सब खडे हो जाते है। इसके लिए में आपको क्लेरीफिकेशन दे रहा हूँ क्योंकी इनको सुनना चाहिए की वह क्या बोल रहे है।

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश जैन :-**

हा माझ्या वॉर्डचा विषय आहे. जो दिप्ती बहन बोलत आहेत ते आर.जी च्या खाली बोलत आहे आणि विषय आरक्षणाचा चालू आहे.

**दिप्ती भट :-**

आरक्षणाचाच आहे.

**दिनेश जैन :-**

याचा विषय आर.जी चा आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सर्व बसून जा.

**दिप्ती भट :-**

साहेब आरक्षण आणि आर.जी पण आरक्षण असते. का वेगळ असते? मी काय बोलते माझ्या वॉर्डमध्ये शांतीनगर सेक्टर १ ते ११ आहे. आर.जी त्याच्यामध्ये शाळेचे आरक्षण आहे. त्या आरक्षणामध्ये त्याला बिल्डींग बांधली. आपण त्यांना ओ.सी. पण देणार आहोत. ते पण जाऊ द्या. पण आता त्या डेव्हलपर्सने ती जागा आपल्याला दिली २०१४ मध्ये आता त्या जागेमध्ये १० वर्ष झाली. आपण एक बिल्डींग तोडून टाकली. धोकादायक म्हणून लोकांना बेघर केले. सेक्टर ४ सी टँक आकाश शांती नगर त्यांनी कनव्हेन्स घेऊन त्या बिल्डींगवाल्यांनी त्या जागेचा सातबारा स्वतःच्या नावावरती केले. आता त्या बिल्डरने तिथे आरक्षणाची दुसरी जागा आहे. त्याच्यामध्ये जाऊन मागणी केली की मला इथे तुम्ही डेव्हलप करायला द्या. मग त्याला आपण देणार ना?

**नगररचनाकार :-**

जे डी.पी. चे आरक्षण आहेत आणि जे ॲमिनिटी स्पेसेस महापालिकेला हॅन्ड ओव्हर झालेले आहेत त्याच्यावर महापालिकेचे नाव आहे आणि जी महापालिका लिगली पुर्नखरेदी करुन देऊ शकते. आज जर ती जागा महापालिकेच्या नावावर नसेल तर ती पुर्नखरेदी करुन देणार नाही.

**दिप्ती भट :-**

महापालिकेने ॲग्रीमेंट करुन घेतला. मग पालिकेने डेव्हलप पण केलेला आहे. काही डेव्हलपमेंट बाकी आहे. जर कोणी डेव्हलपमेंट करायला मागितले बिल्डराने.

**नगररचनाकार :-**

अशा पध्दतीने देता येणार नाही. आपण मोकळी जागा पुर्नःखरेदी करुन देणार.

**दिप्ती भट :-**

साहेब मी हा विषय घेऊन तुमच्याकडे दोनदा आली.

**नगररचनाकार :-**

आज मी ह्या पॉलिसी बद्दल बोलत आहे.

**दिप्ती भट :-**

मी पॉलिसी बद्दल बोलत आहे. तेव्हा तुम्ही सातबारा ओनरला बनवायला देणार त्याने मागितली त्याला देणार की विकासकाला देणार?

**नगररचनाकार :-**

आपण माझ्याकडे ज्या प्रश्नासाठी आल्या होत्या मी आज पॉलिसी बद्दल बोलत आहे. जर माझे ह्याबद्दल बोलणे झाले असेल तर ह्या प्रश्नावर आपण बसु या याची टेक्नीकल बाबी बघुया.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ६३ :-**

**आरक्षित जागा अदलाबदल करणेबाबत धोरण ठरविणे.**

**ठराव क्र. ६४ :-**

**मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार महापालिका क्षेत्रात दाखल होणा-या विकास प्रस्तावांतर्गत 2 हेक्टर वरील रहिवास विभागाती ल क्षेत्राकरिता मंजूर नियमावली नुसार 5% सुविधा भूखंड महापालिकेस देणे आवश्यक आहे . तसेच विकास प्रस्तावांतर्गत जमिनीचे औद्योगिक ते रहिवास अथवा वाणिज्य वापरामध्ये रुपांतरण करणांना मंजूर नियमावली मधील तरतूदीनुसार महापालिकेस सुविधा भूखंड देणे आवश्यक आहे . महापालिकेकडे प्राप्त होणा -या सुविधा भूखंडावर परिसरातील नागरी सुविधांची आवश्यकता विचारात घेऊन वापर निश्चित कर्ण्याचे अधिकार मा . आयुक्त सो. यांना आहेत.**

**विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार व शासनाने मंजूर केलेल्या टि .डी.आर. बाबत अधिसूचनेमध्ये भूखंडधारक / विकासक यांनी नियोजन प्राधिकरणास हस्तांतरीत केलेल्या आरक्षित भूखंड / सुविधा भूखंडावर सदर भूखंडधारक / विकासक यांचेकडून कन्स्ट्रक्शन टि.डी.आर. च्या मोबदल्यात बांधिव सुविधा विकसीत करुन घेणेबाबत तरतूद असून , त्या तरतूदीनुसार महानगरपालिकेमार्फत काही प्रस्ताव विकसीत करुन घेण्यात आलेले आहे. तरी भूखंडधारक / विकासक यांनी हस्तांतरीत केलेले आरक्षित भूखंड / सुविधा भूखंड मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अटी / शर्तीनुसार भूखंडधारक / विकासक यांना पुर्नखरेदी करुन विकसीत करुन देण्यासाठी इच्छुक असणा -या भूखंडधारक / विकासक यांना सदर जागा वि तरीत**

करणेसाठी धोरण निश्चित करणे आवश्यक आहे . महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 नुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकती बाजारभावानुसार वितरीत करण्याची तरतूद आहे.

याप्रमाणे विकासक यांनी हस्तांतरीत केलेला / करण्यात येणा -या सुविधा भूखंड तसेच महापालिकेच्या ताब्यातील आरक्षित भूखंड परत मिळणेकरिता भूखंडधारक / विकासक यांनी मागणी केल्यास, अटीशर्तीवर विकसनास उपलब्ध करुन देणेबाबत ठाणे महानगरपालिकेने धोरण निश्चित केलेले आहे. तसेच मंजूर विकास योजनेतील आरक्षणाखालील भूखंड जे विकास हक्क प्रमाणपत्रान्वये / अतिरिक्त चटईक्षेत्रान्वये महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे व अद्यापपर्यंत महानगरपालिके मार्फत विकसीत करण्यात आलेले नाहीत. असे भूखंड मोकळ्या स्वरुपात राहिल्यास त्यावर भविष्यात अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यास्तव सदर बाबत मिरा भाईंदर शहरासाठी धोरण निश्चित करणे आवश्यक असल्यामुळे महानगरपालिकेच्या ताब्यातील मालकीच्या आरक्षणाने बाधीत जागा विकासकास / जागामालकास परत देणेबाबत खालीलप्रमाणे धोरण निश्चित करणेत येत आहे.

5) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमध्ये विविध प्रयोजनासाठी सार्वजनिक वापराची आरक्षणे प्रस्तावित असून सदर आरक्षणे विकसीत करणेचा पहिला अधिकार महानगरपालिकेचा आहे. यास्तव मंजूर विकास योजनेतील आरक्षण विकसीत करणेस मंजूरी देणेपुर्वी मा. महासभेची मान्यता घेण्यात यावी.
6) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 नुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकती बाजारभावानुसार वितरीत करण्याची तरतूद असल्याने , भूखंडधारक / विकासक यांनी महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेला मंजूर विकास योजनेतील आरक्षित भूखंड विकासकास विकासासाठी द्यावयाच्या झाल्यास भूखंडधारक / विकासक यांना महाराष्ट्र शासनाच्या रेडी रेकनर मधील जमिनीच्या दराच्या 110% प्रमाणे आकारणी करुन व महापालिकेच्या अटी / शर्ती नुसार देण्यात याव्यात.
7) विकासक / जागामालक यांनी आरक्षणाखालील महानगरपालिकेच्या मालकीच्या / ताब्यातील जमिनीची मागणी करतांना 10% प्रमाणेच्या रक्कमेचा भरणा करणे आवश्यक असेल . त्यानंतर सदर मागणीबाबत मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी त्यांच्या अभिप्रायासह प्रकरण मा. महासभेस मान्यतेसाठी सादर करावे.
8) प्राप्त प्रस्तावासाठी मा. महासभेच्या मंजूरीनंतर विकासक / जागामालक यांनी संबंधित आरक्षण विकसीत करणेसाठी प्रस्ताव सादर केल्यानंतर त्याप्रस्तावासाठीच्या विकास आकार व इतर शुल्काच्या रक्कमेसह विकासक / जागामालक यांचेकडून उर्वरीत 90% प्रमाणेच्या रक्कमेचा भरणा करुन घ्यावा व आरक्षण विकसीत करणेस परवानगी देतांना महानगरपालिकेस हस्तांतरीत होणारे बांधकाम प्रथम सुरु करणेची व हस्तांतरीत करणेची मुदत नमुद करुन अट नमुद करावी.
9) समावेशक आरक्षणाच्या तरतूदी अन्वये विकसीत करणे परवानगी देतांना आरक्षणाच्या हेतूमध्ये बदल होणार नाही, याची दक्षता प्रशासनाने घ्यावी.
10) मंजूर विकास योजनेमधील आरक्षणाने बाधीत क्षेत्र विकासकांनी 110% प्रमाणेच्या रक्कमेचा भरणा करुन भूखंड प्राप्त करु न घेतल्यानंतर आरक्षित भूखंडाच्या क्षेत्राच्या शासन निर्णयाप्रमाणे बांधिव क्षेत्राचे बांधकाम महानगरपालिकेकडे विनामोबदला हस्तांतरण करणे भूखंडधारक / विकासक यांचेवर बंधनकारक करावे. तसेच शासनाने समावेशक आरक्षणाच्या तरतूदी अन्वये विकसनाकरिता धोरण निश्चित केलेल्या सदर धोरणाप्रमाणे व मंजूर नियमावलीप्रमाणे संबधित आरक्षणाचा विकास करणे विकासकावर बंधनकारक करावे.
11) मंजूर विकास योजनेमधील आ .क्र. 214 (बगीचा) हे आरक्षण सामावेशक आरक्षणाच्या तरतूदी अन्वये विकसीत करणेस विकासकास मंजूर देणेकरिता दि .18/07/2018 रोजी मा. महासभा ठराव क्र. 34 अन्वये मान्यता देण्यात आलेली असून सदर आरक्षणामधील महानगरपालिकेच्या

ताब्यातील / मालकीची जागा संबंधित विकासकास या धोरणाप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या रेडी रेकनरचा मधील जमिनीच्या दराच्या 110% प्रमाणेची रक्कमेचा भरणा करुन घेवून देण्यात यावी.

12) विकासकांनी महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेल्या सुविधा भूखंडापैकी 300 चौ.मी. क्षेत्राच्या मर्यादित क्षेत्राचा भूखंड विकासकांनी मागणी केल्यास महाराष्ट्र शासनाच्या रेडी रेकनर मधील जमिनीच्या दराप्रमाणे आकारणी करुन विकासकास परत देण्यात यावा.

13) विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार सुविधा भूखंडातील वापर निश्चित करण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना असल्याने 300 चौ.मी. क्षेत्रापेक्षा जास्तीच्या भूखंडासाठी विकासकांनी मागणी केल्यास महाराष्ट्र शासनाच्या रेडी रेकनर मधील जमिनीच्या दराप्रमाणे रक्कमेची आकारणी करुन भूखंड विकासकास परत देणेसह सदर भूखंडावर मा. आयुक्त सो. यांनी निश्चित केलेल्या वापरानुसार विकासक यांनी सुविधा भूखंडाच्या 40% क्षेत्राचे बांधीव क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे आवश्यक असेल व सदर बांधीव क्षेत्रासाठी विकासकास मंजूर तरतूदीप्रमाणे विकास हक्क प्रमाणपत्र देण्यात यावे.

सदर धोरणाची अंमलबजावणी करणेत यावी, असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदक :- श्री. पंकज पांडेय

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ४ | ढवण निलम हरिश्चंद्र | |
| ५ | पाटील प्रभात प्रकाश | ५ | नलावडे दिनेश दगडु | निरंक |
| ६ | सिंह मदन उदितनारायण | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | यादव मिरादेवी रामलाल | ७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ८ | शाह रिटा सुभाष | ८ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ९ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | ९ | सावंत अनिल दिवाकर | |
| १० | गोहिल शानू जोरावर सिंह | १० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ११ | भोईर सुनिता शशिकांत | ११ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| १२ | पाटील वंदना मंगेश | १२ | पाटील अनिता जयवंत | |
| १३ | सोन्स निला बर्नाड | १३ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १४ | रावल मेघना दिपक | १४ | भट दिप्ती शेखर | |
| १५ | मोकाशी दिपाली आनंदराव | १५ | भोईर भावना राजू | |
| १६ | जैन सुनिता रमेश | १६ | शेख रुबीना फिरोझ | |
| १७ | अरोरा दीपिका पंकज | १७ | सपार उमा विश्वनाथ | |
| १८ | नाईक विविता विवेक | १८ | परदेशी गिता हरीश | |
| १९ | भावसार वंदना संजय | १९ | पाटील नरेश तुकाराम | |
| २० | बेलानी हेमा राजेश | २० | पाटील वंदना विकास | |
| २१ | भोईर विणा सुर्यकांत | २१ | अहमद साराह अकरम | |
| २२ | सोनार सुरेखा प्रकाश | २२ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २३ | मुखर्जी अनिता बबलू | | | |
| २४ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २५ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २६ | **म्हात्रे परशुराम पदमाकर** | | | |
| २७ | **शाह राकेश रतिशचंद्र** | | | |
| २८ | **सिंग श्रीप्रकाश जिलेदार** | | | |
| २९ | **तिवारी अशोक सूर्यदेव** | | | |
| ३० | **भूप्ताणी रक्षा सतीश (शाह)** | | | |
| ३१ | **शाह सीमाबेन कमलेश** | | | |
| ३२ | **रकवी वैशाली गजेंद्र** | | | |
| ३३ | **कांगणे मीना यशवंत** | | | |
| ३४ | **परमार हेतल रतिलाल** | | | |
| ३५ | **दळवी प्रशांत ज्ञानदेव** | | | |
| ३६ | **म्हात्रे विनोद काशिनाथ** | | | |
| ३७ | **म्हात्रे नयना गजानन** | | | |
| ३८ | **भोईर जयेश भानुदास** | | | |
| ३९ | **शेट्टी गणेश गोपाळ** | | | |
| ४० | **थेराडे संजय अनंत** | | | |
| ४१ | **राय विजयकुमार सिस्थन नारायण** | | | |
| ४२ | **जैन राजेंद्र भवरलाल** | | | |
| ४३ | **जैन दिनेश तेजराज** | | | |
| ४४ | **गजरे दौलत तुकाराम** | | | |
| ४५ | **मांजरेकर आनंद दत्ताराम** | | | |
| ४६ | **कासोदारिया अश्विन शामजीभाई** | | | |
| ४७ | **व्यास रवि वासुदेव** | | | |
| ४८ | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | | | |
| ४९ | **पांडेय पंकज सूर्यमणि** | | | |
| ५० | **भोईर गणेश गजानन** | | | |
| ५१ | **पारधी सुजाता यशवंत** | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

सही/-

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ६४, **वसई-विरार व मिरा भाईंदर पुढे मुंबईस जोडण्यासाठी रेल्वेच्या पश्चिम बाजूस बृहंमुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील दहिसर लिंक रस्त्यास जोडणारा ४५ मिटर रुंद रस्ता विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये दर्शविणेबाबत.**

**मदन उदित नारायण सिंह :-**

वसई विरार व मिरा भाईंदर पुढे मुंबईस जोडण्यासाठी रेल्वेच्या पश्चिम बाजूस बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील दहिसर लिंक रस्त्यास जोडणारा , ४५.०० मी. रुंद रस्ता वि कास योजनेत म .प्र. व न. अ. १९६६ चे कलम ३७ अन्वये दर्शविणेबाबत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने पत्र क्र .मनपा/साबा/४११९/२०१८-१९ दि.०६/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेच्या नगररचना विभागास कळविलेले आहे . तद्अनुषंगाने उपरोक्त प्रकरणातील वस्तुनिष्ठ अहवाल खालील प्रमाणे सादर करणेत येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना (वगळलेला भाग सोडून ) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि .१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे . वगळलेल्या भागाची विकास योजना दि .२५/०८/२०००

रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/ प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) मार्फत विस्तारित पायाभूत प्र कल्पाअंतर्गत वसई भाईंदर खाडी पुलाचे काम हाती घेण्यात येणार असून त्या पुलासाठी पुरक ठरणारा -दहिसर भाईंदर जोड रस्ता (रेल्वेच्या पश्चिम बाजूस वसई विरार महानगरपालिका क्षेत्रापासून वसई खाडीवर पुल बांधून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून पुढे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील दहिसर लिंक रोडला जोडणारा ४५.०० मी. रुंद रस्ता) तयार करणेचे प्रस्तावित आहे.

सदर रस्त्यापैकी वसई खाडी ते सुभाषचंद्र बोस मैदान पर्यंतचा रस्ता विकास योजनेत दर्शविणेस मा. महासभा, दि.०१/०७/२०१५, ठराव क्र. २८ अन्वये मंजूरी देण्यात आलेली असून सदरचा महाराष्ट्र प्रांतिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) चा फेरबदल प्रस्ताव शासनास पत्र क्र .मिभामनपा/नर/३६४८/२०१६-१७ दि.१६/११/२०१६ अन्वये सादर करणेत आला आहे. सदरचा फेरबदल प्रस्ताव शासनाने पत्र क्र .टिपीएस-१२१६/३१७१/प्रक्र.२२८/१७/नवि-१२ दि.३१/०१/२०१८ च्या पत्रान्वये पत्रात नमुद बाबींच्या पुर्ततेसह सादर करणेस कळविले आहे.

मंजूर विकास योजनेत प्रस्तावित फेरबदला पुढील मिरारोड पश्चिमेकडे दर्शविलेला विकास योजना रस्ता काटकोनी वळणाचा असल्याने त्याऐवजी सुधारीत सरळ आखणी प्रस्तावित करण्याची सूचना सी .आर.झेड. प्राधिकरणाकडील स्टेट लेव्हल एक्सपर्ट अप्रेझल कमिटीने (SEAC-I) केली आहे. त्याप्रमाणे नव्याने सुधारीत आखणी दर्शविणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव मा. महासभेपुढे ठेवणेस महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविले आहे.

वरील स्थितीत मंजूर विकास योजनेत सुभाषचंद्र बोस मैदान ते मौजे भाईंदर, स.क्र. (६२५)१५१ पर्यंत दर्शविलेला ४५.०० मी. रुंद विकास योजना रस्ता हा मौजे भाईंदर, स.क्र. (६५०)२२६ पर्यंत कायम ठेवून त्या पुढील ४५.०० मी. रुंद विकास योजना रस्ता वगळून सदर विषयांकित रस्ता सोबतच्या नकाशात दर्शविलेनुसार नव्याने दर्शवावा लागणार आहे.

प्रस्तावित फेरआखणीनुसार नव्याने दर्शविलेला रस्ता मौजे भाईंदर, स.क्र. (६५१)२४, (६५०)२२६, (६४०)२२५, (६४१)२२४, (६४२)१९७, (६३५)१९९, (६३७)१९०, (७४९)१८९, (६३४)१८८, (७५०)१८७, (६३६), (७५१)१८७, (६३१)१८५, (६२२)१८१, (६२३)१८२, (६२५)१५१, (६१७)१४६, (७६३)१४७, (२६१)२४, (१९२)२२ या जागेतून जाणार आहे. प्रस्तावित रस्त्याखालील जागा CRZ बाधीत क्षेत्रामधील आहे.

शासनाचे दि.३१/०१/२०१८ रोजीच्या पत्रातील मुद्दा क्र. "ड" नुसार वसई विरार, मिरा भाईंदर व बृ हन्मुंबईस जोडणारा जोड रस्ता हा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विकसीत करणेत येणार असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सदर रस्त्याच्या रुपरेषेच्या सुसंगतीबाबत मु .म.प्र.वि. प्राधिकरणाकडील अभिप्राय मिळणेसाठी पत्र देण्यात आलेले आहे. सदरचा रस्ता ४५.०० मी रुंदीएवजी ६०.०० मीटरचा करण्यात यावा.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडील अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर रस्त्याच्या रुपरेषेत फेरबदल असल्यास त्याप्रमाणे रस्त्याची रुपरेषा निश्चित करुन फेरप्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करणेत यावा.

**हेतल परमार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ६४ :-**

**वसई-विरार व मिरा भाईंदर पुढे मुंबईस जोडण्यासाठी रेल्वेच्या पश्चिम बाजूस बृहंमुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील दहिसर लिंक रस्त्यास जोडणारा ४५ मिटर रुंद रस्ता विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये दर्शविणेबाबत.**

**ठराव क्र. ६५ :-**

वसई विरार व मिरा भाईंदर पुढे मुंबईस जोडण्यासाठी रेल्वेच्या पश्चिम बाजूस बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील दहिसर लिंक रस्त्यास जोडणारा, ४५.०० मी. रुंद रस्ता विकास योजनेत म .प्र. व न. अ. १९६६ चे कलम ३७ अन्वये दर्शविणेबाबत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने पत्र क्र .मनपा/साबा/४११९/२०१८-१९ दि.०६/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेच्या नगररचना विभागास कळविलेले आहे. तद्अनुषंगाने उपरोक्त प्रकरणातील वस्तुनिष्ठ अहवाल खालील प्रमाणे सादर करणेत येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि .२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि .१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/ प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) मार्फत विस्तारित पायाभू त प्रकल्पाअंतर्गत वसई भाईंदर खाडी पुलाचे काम हाती घेण्यात येणार असून त्या पुलासाठी पुरक ठरणारा -दहिसर भाईंदर जोड रस्ता (रेल्वेच्या पश्चिम

बाजूस वसई विरार महानगरपालिका क्षेत्रापासून वसई खाडीवर पुल बांधून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून पुढे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील दहिसर लिंक रोडला जोडणारा ४५.०० मी. रुंद रस्ता) तयार करणेचे प्रस्तावित आहे.

सदर रस्त्यापैकी वसई खाडी ते सुभाषचंद्र बोस मैदान पर्यंतचा रस्ता विकास योजनेत दर्शविणेस मा . महासभा, दि.०१/०७/२०१५, ठराव क्र. २८ अन्वये मंजूरी देण्यात आलेली असून सदरचा महाराष्ट्र प्रांतिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) चा फेरबदल प्रस्ताव शासनास पत्र क्र .मिभामनपा/नर/३६४८/२०१६-१७ दि.१६/११/२०१६ अन्वये सादर करणेत आला आहे . सदरचा फेरबदल प्रस्ताव शासनाने पत्र क्र .टिपीएस-१२१६/३१७१/प्रक्र.२२८/१७/नवि-१२ दि.३१/०१/२०१८ च्या पत्रान्वये पत्रात नमुद बाबींच्या पुर्ततेसह सादर करणेस कळविले आहे.

मंजूर विकास योजनेत प्रस्तावित फेरबदला पुढील मिरारोड पश्चिमेकडे दर्शविलेला विकास योजना रस्ता काटकोनी वळणाचा असल्याने त्याऐवजी सुधारीत सरळ आखणी प्रस्तावित करण्याची सूचना सी .आर.झेड. प्राधिकरणाकडील स्टेट लेव्हल एक्सपर्ट अप्रेझल कमिटीने (SEAC-I) केली आहे. त्याप्रमाणे नव्याने सुधारीत आखणी दर्शविणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव मा . महासभेपुढे ठेवणेस महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविले आहे.

वरील स्थितीत मंजूर विकास योजनेत सुभाषचंद्र बोस मैदान ते मौजे भाईंदर , स.क्र. (६२५)१५१ पर्यंत दर्शविलेला ४५.०० मी. रुंद विकास योजना रस्ता हा मौजे भाईंदर , स.क्र. (६५०)२२६ पर्यंत कायम ठेवून त्या पुढील ४५.०० मी. रुंद विकास योजना रस्ता वगळून सदर विषयांकित रस्ता सोबतच्या नकाशात दर्शविलेनुसार नव्याने दर्शवावा लागणार आहे.

प्रस्तावित फेरआखणीनुसार नव्याने दर्शविलेला रस्ता मौजे भाईंदर, स.क्र. (६५१)२४, (६५०)२२६, (६४०)२२५, (६४१)२२४, (६४२)१९७, (६३५)१९९, (६३७)१९०, (७४९)१८९, (६३४)१८८, (७५०)१८७, (६३६), (७५१)१८७, (६३१)१८५, (६२२)१८१, (६२३)१८२, (६२५)१५१, (६१७)१४६, (७६३)१४७, (२६१)२४, (१९२)२२ या जागेतून जाणार आहे. प्रस्तावित रस्त्याखालील जागा CRZ बाधीत क्षेत्रामधील आहे.

शासनाचे दि .३१/०१/२०१८ रोजीच्या पत्रातील मुद्दा क्र . "ड" नुसार वसई विरार , मिरा भाईंदर व बृहन्मुंबईस जोडणारा जोड रस्ता हा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विकसीत करणेत येणार असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सदर रस्त्याच्या रुपरेषेच्या सुसंगतीबाबत मु .म.प्र.वि. प्राधिकरणाकडील अभिप्राय मिळणेसाठी पत्र देण्यात आलेले आहे. सदरचा रस्ता ४५.०० मी रुंदीएवजी ६०.०० मीटरचा करण्यात यावा.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडील अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर रस्त्याच्या रुपरेषेत फेरबदल असल्यास त्याप्रमाणे रस्त्याची रुपरेषा निश्चित करुन फेरप्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करणेत यावा.

**सुचक :- श्री. मदन उदितनारायण सिंह अनुमोदन :- श्रीम. हेतल परमार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६५, **उत्तन येथील "कुंभार्डा रोड " येथील विका स आराखड्यामध्ये रस्त्याच्या डिमार्केशनमध्ये बदल करणे.**

**गणेश भोईर :-**

**महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या महसुली गावासाठी "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" यांनी तयार करण्यात आलेली विकास योजना (वगळलेला भाग सोडून) मा. शासनाने दि.13/05/2013 अन्वये मंजूर केलेली आहे . तसेच वगळलेल्या भागासाठी दि .03/06/2016 रोजी मंजुरी आहे.**

**सोबतच्या मोजणी नकाशावर हिरव्या रंगाने दर्शविण्यात आलेले "क ते ड " रस्ता उक्त मंजूर विकास योजनेत 12.00 मी. रुंदीचा विकास योजना रस्ता (D.P. Road) म्हणून दर्शविण्यात आलेला आहे. तसेच याच नकाशावर तपकिरी रंगाने दर्शविण्यात आलेला "अ ते ब " रस्ता विद्यमान रस्ता (Existing Road) म्हणून दर्शविण्यात आलेला आहे.**

**उक्त 12.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याच्या आखणीत ("क ते ड ") विद्यमान घरे व झाडे अस्तित्वात असून नियोजित रस्त्या खालील जागा उंच -सखल स्वरुपाची आहे . तसेच "अ ते ब " प्रमाणे दर्शविण्यात आलेला विद्यमान रस्ता कच्च्या स्वरुपाचा आहे. या रस्त्याच्या पश्चिमेकडील बाजूस विद्यमान कुंपण भिंत / भूखंड अस्तित्वात आहेत. तसेच पूर्वकडील बाजूस मिठागर (Salt Pan) खालील जागा आहे.**

**विकास योजना अंतर्गत रस्ता सद्स्थितीत नियोजनाच्या दृष्टीने विकसित करणे शक्य होणार नसल्यामुळे विद्यमान रस्त्याच्या (अ ते ब) मध्यापासून दोन्ही बाजूस समान 6.00 मीटर अंतरावर (एकूण 12.00 मी. रुंद) रुंदीकरण दर्शवून प्रस्तावित 12.00 मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित करुन पुढे तो विकास योजने प्रमाणे कायम ठेवण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) नुसार मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदल करणेसाठी व सदर फेरबदलाच्या अनुषंगीक सर्व आवश्यक कार्यवाही पुर्ण करुन अंतिम मंजूरीसाठी प्रस्ताव शासनास सादर करणेचे सर्व अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना देणेसाठी हि सभा मंजूरी देत आहे.**

**विनोद म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ६५ :-**

**उत्तन येथील "कुंभार्डा रोड" येथील विकास आराखड्यामध्ये रस्त्याच्या डिमार्केशनमध्ये बदल करणे.**

ठराव क्र. ६६ :-

**महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत डोंगरी, तारोडी, चौक, पाली व उत्तन या महसुली गावासाठी "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" यांनी तयार करण्यात आलेली विकास योजना (वगळलेला भाग सोडून) मा. शासनाने दि.13/05/2013 अन्वये मंजूर केलेली आहे. तसेच वगळलेल्या भागासाठी दि .03/06/2016 रोजी मंजुरी आहे.**

**सोबतच्या मोजणी नकाशावर हिरव्या रंगाने दर्शविण्यात आलेले "क ते ड" रस्ता उक्त मंजूर विकास योजनेत 12.00 मी. रुंदीचा विकास योजना रस्ता (D.P. Road) म्हणून दर्शविण्यात आलेला आहे. तसेच याच नकाशावर तपकिरी रंगाने दर्शविण्यात आलेला "अ ते ब" रस्ता विद्यमान रस्ता (Existing Road) म्हणून दर्शविण्यात आलेला आहे.**

**उक्त 12.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याच्या आखणीत ("क ते ड") विद्यमान घरे व झाडे अस्तित्वात असून नियोजित रस्त्याखालील जागा उंच -सखल स्वरुपाची आहे. तसेच "अ ते ब" प्रमाणे दर्शविण्यात आलेला विद्यमान रस्ता कच्च्या स्वरुपाचा आहे. या रस्त्याच्या पश्चिमेकडील बाजूस विद्यमान कुंपण भिंत / भूखंड अस्तित्वात आहेत. तसेच पूर्वकडील बाजूस मिठागर (Salt Pan) खालील जागा आहे.**

**विकास योजना अंतर्गत रस्ता सद्स्थितीत नियोजनाच्या दृष्टीने विकसित करणे शक्य होणार नसल्यामुळे विद्यमान रस्त्याच्या (अ ते ब) मध्यापासून दोन्ही बाजूस समान 6.00 मीटर अंतरावर (एकूण 12.00 मी. रुंद) रुंदीकरण दर्शवून प्रस्तावित 12.00 मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित करुन पुढे तो विकास योजने प्रमाणे कायम ठेवण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) नुसार मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदल करणेसाठी व सदर फेरबदलाच्या अनुषंगीक सर्व आवश्यक कार्यवाही पुर्ण करुन अंतिम मंजूरीसाठी प्रस्ताव शासनास सादर करणेचे सर्व अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना देणेसाठी हि सभा मंजूरी देत आहे.**

सुचक :- श्री. गणेश भोईर अनुमोदन :- श्री. विनोद म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ६६, **बी.एस.यु.पी. प्रकल्पातंर्गत जनता नगर येथील इमारत क्र. ०१ येथील गृहनिर्माण संस्थेस नाव देणेबाबत.**

**ज्योत्सना हसनाळे :-**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये जनतानगर येथे बी.एस.यु.पी. प्रकल्पाचे काम सुरु असून सदर प्रकल्पाची जे-३ पॅकेजमधील इमारत क्र.०१ चे काम पुर्ण झालेले आहे. सदर इमारतीमध्ये १७९ सदनिका व २१ दुकाने आहेत. सदर सदनिका मध्ये लाभार्थ्यांना स्थलांतरीत करण्यात आले आहे.

सदर इमारतीतील लाभार्थ्यांना गृहनिर्माण संस्थेची नोंदणी करुन द्यावयाची आहे. तरी सदर गृहनिर्माण संस्थेस **जनता नगर इमारत क्र.०१** असे नाव देण्यात यावे तसेच भविष्यात होणाऱ्या सर्व इमारतींना जनता नगर असे नाव देवून इमारत क्रमांक देण्यात यावे अशी ही सभा मंजुरी देत आहे.

**मिरादेवी यादव :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ६६ :-**

**बी.एस.यु.पी. प्रकल्पातंर्गत जनता नगर येथील इमारत क्र . ०१ येथील गृहनिर्माण संस्थेस नाव देणेबाबत.**

**ठराव क्र. ६७ :-**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये जनतानगर येथे बी.एस.यु.पी. प्रकल्पाचे काम सुरु असून सदर प्रकल्पाची जे-३ पॅकेजमधील इमारत क्र.०१ चे काम पुर्ण झालेले आहे. सदर इमारतीमध्ये १७९ सदनिका व २१ दुकाने आहेत. सदर सदनिका मध्ये लाभार्थ्यांना स्थलांतरीत करण्यात आले आहे.

सदर इमारतीतील लाभार्थ्यांना गृहनिर्माण संस्थेची नोंदणी करुन द्यावयाची आहे. तरी सदर गृहनिर्माण संस्थेस **जनता नगर इमारत क्र.०१** असे नाव देण्यात यावे तसेच भविष्यात होणाऱ्या सर्व इमारतींना जनता नगर असे नाव देवून इमारत क्रमांक देण्यात यावे अशी ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे अनुमोदन :- श्रीम. मिरादेवी यादव**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६७, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एल.ई.डी. दिवे बसविणेबाबत.**

विविता नाईक :-

**मिरा भाईंदर शहरात एल .ई.डी दिवे लावणेबाबत प्रस्तावावर मा .पदाधिकारी, मा.आयुक्त, गटनेते, यांची बैठक आयोजित करुन त्या बैठकीमध्ये रिलायंन्स इंडस्ट्रीचे अधिकारी ESL कंपनीचे अधिकारी व इतर इच्छुक कंपन्याचे अधिकारी यांची महापौरांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करुन समितीच्या निर्णयानुसार पुढील सर्व कार्यवाहीचे निर्णय घेण्याचे अधिकार मा . आयुक्त यांना प्रदान करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.**

**वंदना भावसार :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

त्याच्यामध्ये ते रिलायन्सचे नाव चेंज करा. गेले रिलायन्स आता आजारी झाले.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ६७ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एल.ई.डी. दिवे बसविणेबाबत.**

ठराव क्र. ६८ :-

**मिरा भाईंदर शहरात एल .ई.डी दिवे लावणेबाबत प्रस्तावावर मा .पदाधिकारी, मा.आयुक्त, गटनेते, यांची बैठक आयोजित करुन त्या बैठकीमध्ये रिलायंन्स इंडस्ट्रीचे अधिकारी ESL कंपनीचे अधिकारी व इतर इच्छुक कंपन्याचे अधिकारी यांची महापौरांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करुन समितीच्या निर्णयानुसार पुढील सर्व कार्यवाहीचे निर्णय घेण्याचे अधिकार मा . आयुक्त यांना प्रदान करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.**

सुचक :- श्रीम. विविता नाईक अनुमोदन :- श्रीम. वंदना भावसार

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६८, **भाईंदर (पूर्व) जैसलपार्क चौपाटी देखभाल व दुरुस्ती कामांबाबत.**

**शानु गोहिल :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत भाईंदर (पुर्व) येथे मौजे नवघर सर्व्हे क्र.15 मधील जागा आरक्षण क्र.122 अ "भाईंदर चौपाटी" साठी आरक्षित आहे. मा. जिल्हाधिकारी ठाणे यांनी सदर जागेपैकी 14.00 हेक्टर क्षेत्र विकसित करण्यासाठी विनामुल्य दि.1 मार्च 2018 रोजीच्या आदेशान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे सोपविलेले आहे. सदर जागेवर तत्कालिन नगरपरिषद असल्यापासुन विविध धर्मियांकडुन साजरे केले जाणाऱ्या उत्सवा दरम्यान मुर्तीचे विसर्जन करण्यात येते. सदर जागा ही सागरी नियंत्रण क्षेत्र (CRZ) ने बाधित होत आहे. सदर जागेत मोठया प्रमाणावर नागरीक / रहीवाशी फिरावयास येत असुन महानगरपालिकेमार्फत सक्षम प्राधिकरणाच्या मान्यता घेऊन विविध सुविधा तसेच सोयी सुरक्षेच्या दृष्टीने तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आलेल्या आहेत. सदर जागेवरील सोयी सुविधांची दैनंदिन देखभाल, वृक्षप्राधिकरण, आरोग्य, बांधकाम, आस्थापना या विभागामार्फत व सुरक्षेवर मोठया स्वरुपात खर्च होत असतो. त्यापुढे सदर जागा जाहिरातीच्या मोबदल्यात खाजगी संस्थाना देखभाल व दुरुस्ती साठी दिल्यास महानगरपालिकेचा देखभालीवर होणारा खर्च वाचु शकेल. सदर ठिकाणी दैनदिन साफसफाई, वीजबिल, पाणीबील यांचा खर्च मनपामार्फत करण्यात येईल. सदर ठिकाणी झाडांची छाटणी, उद्यानातील साफसफाई, देखभाल दुरुस्ती व चौपाटीवरील किरकोळ दुरुस्तीची कामे, झाडे लावणे ही कामे नेमण्यात येणा-या संस्थेमार्फत करण्यात येईल. सदर जागेवर असलेल्या बालाजी खेल मैदानावरील परवानग्या मनपाच्या दरानुसार धार्मिक व सार्वजनिक वापरासाठी संस्थेमार्फत देण्यात येतील. सदर ठिकाणी जाहीरातीचे फलक बसविण्याच्या जागा निश्चित करुन चालविण्यात यावे. तसेच एका फुड स्टॉलची जागा निश्चित करुन सदर खाजगी संस्थेस देण्यास त्यांचेकडून महापालिकेस किती देणार वा किती घेणार असा देकार मागवून व त्या मोबदल्यात सदर चौपाटीचे देखभाल, दुरुस्ती करण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे. सदर कामासाठी अटीशर्ती मा. आयुक्त यांनी ठरवून वरीलप्रमाणे करण्यांत यावी असा मी ठराव मांडत आहे.**

**मदन उदित नारायण सिंह :-**

माझे अनुमोदन आहे.

**स्नेहा पांडे :-**

महापौर मॅडम अभी तक चौपाटी पर महापालिका के माध्यम से बहुत खर्च किया गया है। बहुत अच्छी तरह से डेव्हलप किया गया है। तो कोई संस्था चलाने के लिए ले रहा है इसमें उनका कुछ ना कुछ आर्थिक या किसी भी तरह का कुछ फायदा रहेगा इसिलिए वह ले रहे है। जैसे की ॲड से वह पैसे निकालेंगे या फीर बाद में गार्डन वगैरे इसमें से चार्जेस लगाऐंगे बच्चों को खेलने के लिए ग्राऊंड देने के लिए या गार्डन में जाने के लिए तो जिस तरह से वह संस्था देखभाल कर सकती है उसी तरह से नगरपालिका देखभाल कर सकती है क्या? संस्था ॲड देगी लोगो से उसके पैसे लेगी उसी पैसे से देखभाल दुरुस्ती करेगी तो क्या नगरपालिका के हमारे अधिकारी सक्षम नही है की इस तरह से ॲड से पैसे निकाले जाए और देखभाल दुरुस्ती पालिका के माध्यम से हो। जैसे वर्धमान का हुआ था दो रुपयो में लोगो के लिए सुविधा लेकिन २ रुपये में सिर्फ गेट खुलता है। उसके बाद अंदर जाने के बाद नगरपालिका का कुछ भी नही रह जाता है। तो इस तरह का यहाँ चौपाटी पर ना हो इसलिए मैं इसका विरोध करती हूँ की किसी भी संस्था को ना दिया जाए। कोशिश करके किसी भी तरह का उत्पन्न का साधन बनाके पालिका के द्वारा ही चौपाटी की देखभाल किया जाए।

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**अनिल सावंत :-**

तुम्ही चौपाटी विकायला काढली सर्वच विकायला काढले आहे.

**मा. महापौर :-**

तुम्हारे तरफ से उत्तर नही मांगा।

**अनिल सावंत :-**

आम्हाला उत्तर पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

ते आपल्याला जाहिरात करतील आणि जाहिरातीच्या बद्दल आपल्याला ते डेव्हलप करुन देतील. परंतु त्यांना कुठल्याही प्रकारे फीज वगैरे गार्डनमध्ये चार्ज करता येणार नाही. आपले कसे आहे आपण बऱ्याच वेळेला काही गार्डन वगैरे डेव्हलप करतो मग तिथे आपले दुर्लक्ष म्हणा किंवा लोकांनी जाणीवपूर्वक केलेल्या चुका म्हणा परंतु त्याचा त्रासच होते अशा लोकांना दिले तर ते मेन्टनन्सची पूर्ण जबाबदारी ते करतील आणि त्याच्यावरती मॉनेटरींग आपले राहणार आहे. त्या ठिकाणी कुठल्याही गोष्टीची कमतरता असेल ती आपल्याला ताबडतोब करता येईल.

**अनिल सावंत :-**

साहेब अशाच प्रकारे सेव्हन वंडर्स तुम्ही दिले वर्धमान फॅन्टासीला आज काय परिस्थिती आहे.

**मा. उपमहापौर :-**

वर्धमान फॅन्टासीला तसे नाही दिले.

**अनिल सावंत :-**

जॉगर्स पार्कमध्ये तिथे आपण चालू शकत नाही. तिथ जॉगिंगला जाऊ शकत नाही.

**मा. उपमहापौर :-**

आपण गार्डन चालविण्यासाठी देत नाही. त्याची मोफतमध्ये व्यवस्था जी आपली आहे जनतेसाठी नागरिकांसाठी ते कायमस्वरुपी खुले असणार. त्याठिकाणी तो त्याची जाहिरात करणार आणि आपले हे प्रायोगिक तत्वावरती होत आहे. जर त्याला जाहिरातीत किती सपोर्ट मिळतो ते आपण बघुया. परंतु हे करायला हरकत नाही आणि स्टॉल.......

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

स्टॉलचा किती आकडा आहे.

**मा. उपमहापौर :-**

स्टॉल असे नाही स्टॉल नाही.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम मी विनंती करतो आपल्या व प्रशासनाला मॅडम एक मिरा भाईंदरची शान आहे. जैसल पार्क चौपाटी उपमहापौर साहेब मी महापालिकेकडेच चालवायला ठेवा. एवढे आपण सक्षम आहोत कारण एकच चौपाटी भाईंदर पूर्वेला आहे. तीची शान वाढवा कारण त्याठिकाणी सर्वसामान्य मुले खेळायला जातात. चौपाटीला फिरायला जातात. मुले, मुली, सिनियर सिटीजन. लोक त्याठिकाणी बसायला जातात. आनंद घेत आहेत. उद्याला जर आपल्या एखाद्या एन.जी.ओ. ला किंवा कुठल्याही संस्थेला तुम्ही चालवायला देणार ते निश्चितपणे निर्बंध पाडणार याच्यावरती आणि याचा परिणाम आपल्या मिरा भाईंदरला होणार.

**मा. महापौर :-**

हम फिरसे ठराव करके हम फिरसे उनको पराजित कर सकते है।

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

जैसल पार्क परिसरातून आमच्या पक्षाचे चारही नगरसेवक निवडून आलेले आहेत. आम्हाला जर याच्यामध्ये कुठच्याही प्रकारचा धोका वाटत असला तर आम्ही हा विषय घेतला नसता आणि संपूर्ण आपल्याअंती चांगला विषय आहे. लोकांना चांगले गार्डन उपलब्ध होणार आहे. आणि छोट्या छोट्या गोष्टींचा देखील त्याच्यावर विचार केला आहे. आपल्याला कुठच्याही प्रकारचे पैसे लावायचे नाहीत आणि त्याच्याशी आपला करार होईल तो ही तसा स्वयंस्पष्ट असेल.

**दिनेश नलावडे :-**

उपमहापौर साहेब नागरिकांच्या बाबतीत चांगली भुमिका रहावी. एक जैसल पार्कची चौपाटी आहे त्याच्यावरती लोकांना आनंद मिळाला पाहिजे. जो हवा आहे तो अशाप्रकारे आपण एन.जी.ओ. ला चालवायला देणार.

**जुबेर इनामदार :-**

आपली भुमिका चांगली आहे. काय झाल ह्या सभागृहामध्ये आता अशा प्रकारे तुमची फसवणूक झाली करा ना ॲमिनिटी ओपनसाठी तुम्हीच बोललात सभागृहाच्या समोर आम्ही हा विषय परत आणू सभागृहासमोर तुम्हाला न सांगता घेऊन आले. तुमचीच फसवणूक झाली.

**दिनेश नलावडे :-**

सर्व विषय अशाच पध्दतीने आणायचे लोकांना आपण स्वतंत्र देणार काय? उपमहापौर माझ्या प्रभाग क्र. ३ मध्ये कम्युनिटी हॉल आहे. एका उदाहरण म्हणून मी आपल्याला सांगतो त्या ठिकाणी रोज प्रत्येक दिवशी कार्यक्रम असतात. पहिल्या माळ्यावरती एक दिवस खाली जात नाही. पाहिजे तेवढे भरमसाठ भाडेवाढ केलेली आहे. पण लोकांना जेवण बनविण्यासाठी जागा उपलब्ध नाही. त्याठिकाणी देखभाल करायला महापालिका नाही. उपमहापौर साहेब नोकरासारखे त्याठिकाणी आम्ही लक्ष देतो. त्याठिकाणी लाईट गेली आम्ही बघायचे, पाईप लाईन बंद झाली आम्ही बघायचे, पाणी नाही आले आम्ही बघायचे लॉक तुटले आम्ही बघायचे तिथे सिक्युरीटीवाले जे आहेत बाऊन्सर ते लोक रात्री हॉल साफ करण्यासाठी ३००,४००-५०० रुपये किंवा १००० रुपये घेतात. मी ही तक्रार कमिशनर साहेबांना केली. बांधकाम डिपार्टमेंटला दिलेली आहे. जबाबदारी कोणाची आहे? जबाबदारी कोणीच घेत नाही मग तिथे आपण देत नाही. चालवायला आणि चौपाटीसारखे आपण लोकांना फिरण्यासाठी आहे. सिनिअर सिटीजन लोकांना आहे असे आपण चालवायला देतो. खांबित साहेबांच्या इथे मी रोज जातो त्या कम्युनिटी हॉलसाठी त्या लोकांना तिथे पाणी वेळेवर मिळत नाही. साफसफाई होत नाही. लाईट नसते, पंखे बंद आहेत आणि आजूबाजूचा परिसर संपूर्ण दुर्गंधी आहे. रोज तिकडे बांधकाम डिपार्टमेंटला पत्र जाते.

**दिपक खांबित :-**

मॅडम तिकडे नळ लाईट आहे. फक्त तिकडे सिक्युरिटीची थोडी अडचण आहे आणि साफसफाई जी आहे एस.आय. लोकांना आम्ही पत्र दिलेले आहे. एस.आय. म्हणतात की आम्हाला माणसे कमी आहेत तर त्यासाठी आम्ही आरोग्य विभागाकडे आणि आस्थापनेला पत्र दिलेले आहे आणि आम्ही लवकरच ती व्यवस्था करुन देऊ.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम पहिल्या माळ्याचे बांधकाम हे माझ्या वॉर्डात आहे म्हणून मी सांगत नाही. पहिला बांधकाम आर.सी.सी. चे तेव्हापासून प्लान तयार आहे. बजेट नाही शेवटी आमदार प्रताप सरनाईक साहेबांकडून २५ लाख रुपये त्या निधीसाठी घेतले आणि बाकीचे कमिशनर साहेब बोलले आम्ही महापालिकेमार्फत करतो. ती लोकांच्या सुविधेसाठी आहे. ती आमच्या सुविधेसाठी नाही. अनेक लोकांना जर एवढे देत नसतील त्याच्यात पाणी वाढ केलेली आहे. आपण नागरिकांना काय सुविधा देणार.

**मा. महापौर :-**

उधर की सब सुविधा देने के लिए मैंने बोला है।

**निला सोंस :-**

मा. महापौर मॅडम कहना चाहूँगी की हम सभी जनप्रतिनिधी है और जनता के जरीए तरफ हमारा ध्यान जाता है।

**मा. महापौर :-**

आपका मुद्दा है वह बोलिए।

**निला सोंस :-**

मैं बता रही हूँ की जैसल पार्क चौपाटी किसी प्रभाग तक सिमीत नही है पुरे मिरा भाईंदर का शान है और उस विषय मे मैं कहना चाहूँगी की जो हमने इसमें स्टॉल का डाला है गोषवारे में स्टॉल कही लिखा नही है लेकिन ठराव में कुछ स्टॉल बोला गया है। तो मैं कहना चाहूँगी की लास्ट टर्म के जो रिप्रेझेन्टेटिव्ह थे लास्ट टर्म में भी जैसल पार्क चौपाटी पे स्टॉल की व्यवस्था का ठराव था और वहाँ फुड स्टॉल भी लगाया गया था जो की महापालिका द्वारा था। तो भी वहाँ की पब्लीकने आम जनता ने उसे उठाके फेका था और हम तो सभी खाजगी को दे रहे है। जो चीज जनता चाहती ही नही है और मिरा भाईंदर की प्रॉपर्टी को नुकसान दे सकती है तो यह खाजगी के लिए तो और जादा रोष रहेगा तो मुझे लगता है हमें जनता के नजरीए से सोचना चाहिए और उनकी नजरी का ध्यान देना चाहिए की वहाँ फुड स्टॉल मेरे हिसाब से नही होने चाहिए क्योंकी वहाँ की जनता को यह नही चाहिए। अगर हम संस्था को दे रहे है तो में कहना चाहूँगी की हम कही संस्थाओ में जुडे है जो संस्थाए होती है वह कमाने के उद्देश से नही आती है वह सेवा के उद्देश से आती है तो फुड स्टॉल कोई उनके लिए माईने नही रखती है वह सेवा के लिए आती है।

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम मी एक विचारतो काही धार्मिक कार्यक्रमांना परवानगी दिली जाते की परवानगी महापालिका देते याच्यापुढे कोण देणार आहे?

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

आता ठरावामध्ये वाचले की ती संस्था परमिशन देईल. साहेब आता जो ठराव वाचला त्याच्यामध्ये त्यांनी तेच लिहिलेले आहे की जी संस्था चालवणार ती परमिशनपासून सर्व देणार.

**मदन उदित नारायण सिंह :-**

महापालिकेने ठरविलेल्या ठरावानुसार देणार.

**जुबेर इनामदार :-**

मालमत्ता पालिकेची.

**दिनेश नलावडे :-**

वहाँ के स्थानिक नगरसेवक आपको तकलिफ होगी आपने इसको विरोध करना चाहिए था।

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम सगळीकडे ठेकेदारासाठी जबरदस्ती का पण सगळीकडे ठेकेदार कशाला पाहिजे? पालिकेमध्ये स्टाफ नाही का?

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

पालिकेमध्ये स्टाफ नसेल तर भरती करा.

**जयंतीलाल पाटील :-**

महापौर मॅडम माझा असा उद्देश आहे संस्था आणणे जरुरी आहे का? पुढे मिरा भाईंदर हे आपल्याला संस्थेला द्यायचे आहे का? जी भाईंदरची चौपाटी आहे ती एकमेव राहिलेली आहे. तिथे लोक वॉकिंग करतात, जॉगिंग करतात, क्रिकेट खेळतात, ज्येष्ठ नागरिक तिथे येत असतात. असे जर तुम्ही करत असाल जर पूर्ण मिरा भाईंदर संस्थेला द्यायचे आहे तर हे योग्य आहे का?

**मा. महापौर :-**

ते घेणार नाही. हे चौपाटी पुरता आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम या चौपाटीचे सुशोभिकरण करण्यासाठी ३ करोड ६० लाख रुपयाचे टेंडर काढण्यात आले. त्याचे काम अजून चालू आहे. ३ करोड ६० लाख रुपये महापालिका खर्च करत आहे. सुशोभिकरणासाठी आणि हे सुशोभिकरण करुन कुठच्याही संस्थेला आपण दान देत आहोत. याच्यापूर्वी सुध्दा पालिकेचे एवढे ३ करोड ६० लाख रुपये वेस्ट नाही केले जे दुसऱ्याला द्यायचे होते. तर हे पैसे वेस्ट का केले? एकीकडे २-२ लाखाची कामे होत नाही नगरसेवकांची आयुक्त साहेब २००८ साली महापालिकेचे असे धोरण ठरविण्यांत आले की हे जे गार्डन आहेत ते ॲडव्हटाईजसाठी मेन्टनन्ससाठी देऊन टाकायची ८ गार्डनसाठी टेंडर निघाले. एन.जी.ओ. ने ८ गार्डनसाठी टेंडर भरले आणि ड्राफ्ट भरले. ते चालवून देण्यासाठी काहीतरी ठराविक रक्कम चालू केली होती आणि महापालिकेवर अशी परिस्थिती ओढवली की तीन महिन्यानंतर त्याने ते सर्व ड्राफ्ट रिटन करावे लागले. कारण का तर त्या जागा ताब्यात नव्हत्या. इथे तर सी.आर.झेड आहे. सी.आर.झेड वर बांधकाम केले. कुंपण भिंत घातली म्हणून अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल झालेले आहेत. कोकण आयुक्तांनी तसे निर्देश दिलेले आहेत. कलेक्टरने निर्देश दिलेले आहेत आणि आजही चौपाटी आपण दुसऱ्याला द्यायला लागलो म्हणजे हलवाईच्या घरावर तुळशी पत्र परस्पर जाऊ दे. काय करत आहात एकमेव चौपाटी एवढे निसर्ग सौंदर्य मिळालेले आहे. त्या उत्तनची घनकचरा प्रकल्पामुळे कशी वाट लागली. सेव्हन वंडर्स त्याठिकाणी लोक जॉगिंगला जायचे सकाळी ते जाऊ शकत नाही. तिथे पैसे भरावे लागतात आणि असे प्रस्ताव तुम्ही घेऊन येतात आता शेवटची चौपाटी शिल्लक राहिली ज्या ठिकाणी आमदार मुजफर हुसैन यांचे ५० लाख रुपये आमदार निधी लागला होता. डेव्हलप करण्यासाठी आणि आता ते रेडिमेड तुम्ही दुसऱ्याला देऊन टाकत आहेत. ह्या प्रस्तावाला आमचा स्पष्ट विरोध आहे. तेथील नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन अजिबात तिथे फुड स्टॉल वगैरे चालू करु नये ह्या चौपाटीवर फुड स्टॉल चालू केल्यानंतर काय परिस्थिती होते ती दादर आणि जुहू चौपाटीवर जाऊन बघा.

**जयंतीलाल पाटील :-**

कुठल्याही संस्थेला देऊ नये अशी माझी विनंती आहे.

**वंदना पाटील :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते जी आपण आता जैसल पार्क चौपाटी देणार आहोत. त्याच्यात विधी शेड आहे, त्याचे तुम्ही काय करणार?

**जयंतीलाल पाटील :-**

धृवकिशोर पाटील साहेब मला असे वाटते हा ठराव रद्द करावा.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम एक चांगला उद्देश घेऊन हा प्रस्ताव प्रशासनाने दिलेला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

जैसल पार्क चौपाटी एका संस्थेला देणे हा एक चांगला उद्देश होता. महापालिकेचा होणारा जो खर्च आहे हा वाढत चालला होता आणि तो कमी करण्याकरिता आपण ते करत आहोत. आता नुकतेच सावंत साहेब बोलले की ३ करोड ६० लाख रुपये चौपाटीच्या सुशोभिकरण करणेकरिता खर्च करतो आहे. कोणाकरिता करतो पब्लीक करिता करतो ना. पब्लीक करिता एक चांगली संस्था झाली आणि तिथे जर चांगली सोय करेल तर त्यात काय वाईट आहे. तुम्ही आता ही जाऊन बघा तिथे अनेक फेरिवाले अनधिकृतपणे धंदा करत आहेत. ते सगळ्यांना चालते आणि तिथे एखादा जर फुड स्टॉल जर ठेवला तो चालत नाही. फुड स्टॉल आपण का ठेवतो ते बघा जर आपण तिथे चौपाटीवरती मुलांना घेऊन गेलो तिथे आज चौपाटीवरती ठेवणार होतात तिथे पण स्नॅक्ससाठी थोडेसे फुड स्टॉल असावा म्हणून आणि हा जर फुड स्टॉल तिथे जर दिला तर ती संस्था ते अनधिकृत फेरिवाल्यांवरती ॲक्शन घेईल तिथे येण्यासाठी प्रतिबंध करेल. साहेब चांगला उद्देश आहे समजा जर हा उद्देश सफल झाला नाही तर आपण पुन्हा तिथे खर्च करुन पुन्हा करु आणि राहिली ती मंडळाची गोष्ट आणि हा जैसल पार्क चौपाटी याच्यामध्ये भरपूर फरक आहे. कारण की सेव्हन वंडर्स हे विकासकाने डेव्हलप केलेले आहे. जैसल पार्क चौपाटी ही महापालिकेने डेव्हलप केलेली आहे ही फक्त देखरेख करण्याकरिता आपण त्या संस्थेला देत आहोत. बाकी दुसरे काहीच नाही. थोडासा खर्च महापालिकेला वाचेल आणि हा आमचा स्पष्ट उद्देश आहे. बाकी काही नाही तुमच्या सगळ्या विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर दिलेले आहे आणि वंदना पाटील मॅडमने सांगितले की विधी शेड हे विधी शेड ॲज इट इज जसे आता चालु आहे तसेच चालू राहील आणि दुसरी गोष्ट तिथे कुठलीही परमिशन जर द्यायची असेल. तर त्या परमिशन महापालिकेने आखलेल्या अटीशर्तीनुसार आणि महापालिकेने आखलेल्या दरानुसार दिले जातील. त्याबद्दल काही दुमत नाही. जर समजा ती महापालिका देईल पुन्हा त्या संस्थेला महापालिका कॅशलेस होतील आणि पुन्हा वाद निर्माण होतील आणि म्हणून ते दिलेले आहे आणि आपण १-२ वर्षे ट्राय करु.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम त्यांनी चांगले प्रवचन केले.

**मा. महापौर :-**

प्रवचन केले नाही.

**जुबेर इनामदार :-**

एक नटसम्राट नाटक आले होते त्याच्यामध्ये घरे देता का घरे हा एक शब्द होता. सातत्याने पालिका देता का भाड्यावर. पूर्ण पालिका भाड्यावर द्या ना काय शिल्लक राहिले. स्वतःची पालिकेची मालमत्ता तो दुसऱ्या माळ्यावर देईल. आणि आपण फेरिवाले नाही काढू शकतो. त्या संस्थेचा फुड स्टॉल आला तर तो फेरिवाला हटवेल. हे काय आहे.

**मा. महापौर :-**

आपका विरोध होगा तो आप बोलीए।

(सभागृहात गोंधळ)

**जयंतीलाल पाटील :-**

महापौर मॅडम तुम्ही कुठल्या संस्थेला देणार आहात?

**दिनेश नलावडे :-**

स्टॉल लावण्यासाठी ३ वेळेस विषय आले होते पण तिथल्या अगोदरच्या नगरसेवकांनी त्या स्टॉल्साठी विरोध केलेला होता आणि आज परत तोच विषय ह्या ठिकाणी स्टॉलच्या संदर्भात एन.जी.ओ मार्फत येत आहे त्या ठिकाणी मा. आमदार मुजफ्फर हुसैन साहेबांचा देखील निधी आलेला आहे. आपण स्वतःच्या पैसे वाचविण्यासाठी आपण ही चौपाटी कुणाच्या तरी स्वाधीन करतो. एवढी मोठी संपत्ती आपण

तिथे जमविलेली आहे. ती नाममात्र पैशांसाठी महापौर मॅडम अजून विचार करा ते योग्य होणार नाही. आम्ही पण बाजूला आहोत तर हा विषय तुम्ही अगोदरच ठराव मांडून मोकळे होत आहेत.

**स्नेहा पांडे :-**

महापौर मॅडम वह चौपाटी पर भारी संख्या में धार्मिक कार्यक्रम भी होते है। गणपती विसर्जन, नवरात्री विसर्जन, छट पुजा तो उसकी परवानगी कौन देगा संस्था के मार्फत ही उसका देखरेख किया जाएगा या कैसे होगा? वह पालिका करेगी या संस्था करेगी?

**मा. महापौर :-**

पालिका करेगी।

**जयंतीलाल पाटील :-**

महापौर मॅडम तुम्ही कुठल्या संस्थेला देणार आहात?

**मा. महापौर :-**

आता येणार.

**प्रविण पाटील :-**

मिरा भाईंदरमध्ये एकमेव चौपाटी असलेली जैसल पार्क चौपाटी आज तुम्ही हा निर्णय घेतलेला आहे. खरे तर गेल्या वेळेला स्टॉलचा विषय होता. त्यावेळेला स्थानिक नागरिकांनी विरोध केला. स्थानिक लोकांनी विरोध केला आज आम्ही तिथे नेहमी जातो बघतो तिथे नेहमी कार्यक्रम होतात. आज तिथे कुठल्याही प्रकारची कमतरता नाही. मी मान्य करतो तिथे स्थानिक नगरसेवक आहेत. रोहिदास काकांचे तिथे चांगले योगदान आहे. आज तिथे आमची विधी शेड आहे. आज तिथे खेळाचे मैदान आहे. आज तिथे कुठल्याही प्रकारची कमतरता नाही आणि काही गरज पण नाही. मग हे नविन ठेकेदाराचे भुत तुम्ही कुठल्या हेतुपुरस्कृत आणलेले आहे ती एकमेव अशी चौपाटी आहे ते एकमेव असे ठिकाण आहे की मिरा भाईंदरमधून कुठलाही नागरिक तिथे गेला की तिथे शांतता भेटते. आज ठेकेदाराचा अनुभव तुम्ही स्पोर्टस कॉम्पलेक्सला बघा किंवा आपले सेवन वंडर्सला बघा. तिथे आपण स्विमिंग पुल करणार आहोत.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

मॅडम स्पोर्टस कॉम्पलेक्स ज्या वेळेला आपले एकमेच स्विमींग पुल होते ज्या वेळेला ह्या सभागृहात त्या स्विमिंग पुलची चर्चा झाली त्याचा रेट ठरविण्यात आला. त्याचा जो उद्देश होता त्या स्पोर्टस कॉम्पलेक्सच्या स्विमींगपुलसाठी सर्वसामान्य नागरिकांसाठी खुले असेल आपण ठराव ही तसा केला तसे रेट ही ठरविलेले आहेत. परंतु आज तुम्ही तिथे जाऊन त्याचे रेट बघा. सर्वसामान्य नागरिक त्या स्विमींग पुलमध्ये जाऊ शकत नाही. आज तिथे कॅटींग आपण परवानगी दिली. तिथे मोठे आलिशान हॉटेल झालं. पब्लीकसाठी सेवन वंडर्स मला आठवते मॅडम ह्याच सभागृहात चालू झाले तेव्हा सेवन वंडर्स आणि शिवार गार्डनचे आपण विरोध केला. त्यावेळी २ रुपये रेटने आणून देत आहे. दोन रुपये रेट एकूण आपण त्याचा ठराव केला आता तिथे पूर्णपणे विवाह चालतो मोठमोठे. शॉपचे धाबे बनतात. ती परिस्थिती ..............

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

वर्धमान फॅन्टासीमध्ये महापौर मॅडम कमीत कमी ५०० रुपये खर्च येत आहे.

**प्रविण पाटील :-**

मॅडम ठेकेदारांचा अनुभव आपल्याकडे फार मोठा खराब आहे. आम्ही याच्यामध्ये कुठल्याही प्रकारचे राजकारण आणत नाही. कारण खर आहे तिथे कुठल्याही प्रकारे ठेकेदार गेला आज तिथे आमच्या आगरी समाज किंवा मराठी माणसाचे सर्व धर्माचे विधी शेड आहे. आज भविष्यामध्ये तिथे जाण्यासाठी आम्हाला मोठ्या प्रमाणात अडचण येईल वंदना पाटीलांनी जो प्रश्न उपस्थित केला की तिथे आमचे विधी शेड आहे. आमचे तिथे १० ते १२ वे चे मोठ्या प्रमाणात जवळ जवळ दशक्रिया विधी होते. म्हणजे दहिसर बोरीवली पासून तिथे लोक येतात तर त्याचेही तुम्ही ठेकेदारामार्फत भाडे आकाराल. भविष्यामध्ये आज परवानगीचा प्रश्न आहे. सर्वधर्मीयांचे गार्डनचे परवानग्या असतील किंवा त्या ठेकेदाराला तुम्ही कुठल्या कंडीशन टाकणार आहात. माझी महापौर मॅडम विनंती आहे की हा जो प्रस्ताव आहे याच्यावर तुम्ही विचार करावा आणि कृपया हा तुम्ही मागे घ्यावा अशी तुम्हाला विनंती करतो.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम मला सुध्दा असे वाटत आहे की हा प्रस्ताव तुम्ही मागे घ्यावा कारण ह्या ठिकाणी त्या संस्थेला एकदा परवानगी दिली की तिथे होणारे सर्वधर्माचे कार्यक्रम तिथे होतात. उद्या एखाद्या संस्थेची मोनोपॉली झाली तर जातीय सलोखा बिघडण्याची संभावना आहे आणि एखाद्या संस्थेला तुम्ही

दिल्यानंतर त्याच्या मनाप्रमाणे तो परमिशन देईल. त्याला वाटेल की ह्या संस्थेला ह्या समाजाला नाही द्यायचे वरुन कुठून तरी प्रेशर येईल. ह्या समाजाला देऊ नकोस मला फोन केल्याशिवाय अशी परिस्थिती आणि राहिली. दुसरी गोष्ट हे सरळसरळ तुम्ही राज्य शासनाचे नियमाचे उल्लंघन करतात. मा. सी.ए. साहेबांनी ज्यावेळी या शहराला आठ भूखंड दिले हॅन्ड ओव्हर केले त्याच्यात जैसल पार्क सुध्दा होता. त्याच्यात एक स्पष्ट कंडीशन आहे. कुठच्याही संस्थेला, एन.जी.ओ. ला तूम्ही ते आरक्षण देऊ शकत नाही ही कंडीशन आहे. त्याच्यामध्ये आणि त्या कंडीशनचे उल्लंघन करुन एखाद्या संस्थेला वाटते म्हणून ते भाड्याने देतात. जैसल पार्क चौपाटी हे फार चुकीचे आहे. चुकीचा पायंडा तुम्ही ह्या शहरामध्ये पाडत आहेत. मागच्या वेळी त्या ठिकाणी स्टॉल बांधले म्हणून तिथल्या लोकांनी मोर्चा काढला होता. या पालिकेवरती आला होता त्यावेळी गिते साहेब होते म्हणून त्यांच्या मार्गदर्शनाखाली ते स्टॉल काढले गेले आणि आता परत तुम्ही सोडतोडची परमिशन देत आहात. महापौर मॅडम तुमच्या अधिकारात हा प्रस्ताव मागे घ्या.

**धृवकिशोर पाटील :-**

मॅडम एक अच्छा प्रस्ताव दिया है। एक अच्छा प्रोजेक्ट है रही फुड स्टॉल की बात वहाँ पे फुड स्टॉल सिर्फ एकही रहेगा अनेक फुड स्टॉल नही रहेंगे। आणि ऑलरेडी तिकडे भरपुर असे अनधिकृत फेरिवाले बसलेले आहेत आणि ते पाणीपुरी, भेलपुरी असे किती जण विकत आहेत. तर त्याला ऑब्जेक्शन नाही आणि एका फुडस्टॉलला फक्त हे प्रॉब्लेम आहे.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम आपण प्रयत्न करुया. सक्सेस होत असेल तर ठिक आहे. नाहीतर पुढच्या वर्षी आपण कॅन्सल करुया.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

महापालिकेने इतका अवाढव्य खर्च तिकडे केलेला आहे. तिथे २५ गाड्या लागतात. ठेकेदार तुमचे आहेत. वसुली जास्त करायची आहे. महापालिकेला पैसे द्यायचे आहेत. ठेकेदार आहेत तेच गाड्या लावतात.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

अपने को लगा बराबर नही चल रहा है तो हम फिरसे उसको............

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

वैती साहेब मगास पासून एखादा महत्वाच्या विषयावर चर्चा चालू असताना तेव्हा आपल्या सदस्यांनी ऑब्जेक्शन घेतले महत्वाचा विषय चालू असताना चर्चा करताना देखील आपले सदस्य डिस्टब करत होते आणि इथे फक्त ठेकेदाराला अपॉईंट करण्यासाठी एवढ्या सदस्यांनी आपली मते मांडल्यानंतर देखील त्याबाबतीत इतका वेळ ह्या विषयावर चर्चा करण्यामागे आपला उद्देश काय आहे. तो कळत नाही. फक्त ठेकेदार ह्या विषयावर एवढी चर्चा करणे गरज पण नाही. जर एवढ्या सदस्यांचा विरोध आहे तर आपण त्याच्यावर निर्णय घेऊ शकतो आणि मगाशी महत्वाच्या विषयावर बोलत असताना आमच्या लोकांना डिस्टब करत होते.

**जयंतीलाल पाटील :-**

तिथे प्रत्येक धर्माच्या लोकांचा प्रोग्राम होत असतो. छटपुजा वगैरे सर्व होते. प्रत्येक धर्माच्या लोकांना तुम्ही नाराज करता. मला असे वाटते माझे एकच म्हणणे आहे हा सर्वानुमते एक ठराव होऊन जाऊ द्या. हा ठराव रद्द करु शकता.

**मा. उपमहापौर :-**

धृवकिशोर पाटील साहेब आपण ठराव केला त्याच्यामध्ये आपली सर्वांची सुचना लक्षात घेऊन मला असे वाटते की निर्णय घेण्याचे अधिकार महापालिकेकडेच पाहिजेत तसा सुझाव करा.

**निलम ढवण :-**

ठेका देणार म्हणजे ठराव करणार. मेजोरीटीनुसार तुम्ही तुमच्या मतानुसार ठेकेदाराला अपॉईंट करणार. हे फाईनल आहे.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

ठेकेदारच कशाला पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

आता त्या विषयात एक महत्वाचा बदल करण्यात आलेला आहे. सर्व परवानग्या देण्याचा अधिकार महापालिकेच्या हातात आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

परवानग्या महापालिकेच्या धार्मिक व सार्वजनिक वापरासाठी संस्थेला देण्यात येतील याचा निर्णय महापालिका घेईल.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

ठेकेदार नाही मुळात डोक्यातून ठेकेदार काढून टाका.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

संस्थेला तर देणार ना.

**मा. उपमहापौर :-**

संस्था लिहीले आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

खाजगी संस्था असली तरी तो संस्थेच्या ताब्यात देणार आहेत ना ती चौपाटी आमचा असा विषय आहे ती चौपाटी महापालिकेच्या ताब्यात रहावी.

**मा. उपमहापौर :-**

तुम्हाला जर त्या विषयात ठराव घ्यायचा असेल तर ठराव घ्या.

**प्रविण पाटील :-**

मग तुम्ही त्या संस्थेला काय देणार आहात.

**मा. उपमहापौर :-**

तो नंतरचा विषय आहे.

**प्रविण पाटील :-**

नेमका विषय तरी काय आहे. तो तरी सांगा.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

त्या मागचा हेतू काय आहे.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

साफसफाई करायला आपली पालिका सर्व व्यवस्थित असताना प्रॉब्लेम काय आहे?

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

ठराव नसेल तर महापौर मॅडम यांचा विरोध नोंदवून घ्या. तुमचा आम्ही विरोध नोंदवितो.

**प्रविण पाटील :-**

विरोध तर आहेच.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

चौपाटीवर काही घटना घडते महापालिका हॅन्डल करु शकत नाही आणि ते संस्थेला द्यायला लागले. असा कोणता विषय तिथे झालेला आहे. तुम्हाला संस्थेला द्यायचे आहे असा तिथे काय प्रॉब्लेम आहे.

**स्नेहा पांडे :-**

साफसफाई डिपार्टमेंट अपने पास है। प्राधिकरण डिपार्टमेंट गार्डन माली अपने पास है फिर चौपाटी महापालिका को देखभाल करने में क्या प्रॉब्लेम है। हर चिज के लिए सिक्युरीटी का टेंडर निकलताही है वहाँ भी तो बैठेंगे।

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम ह्या पध्दतीचा ठराव झाला तर शिवसेना आंदोलन करणार. उद्यापासून चौपाटीवरती.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम ठराव झालेला आहे.

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव वाचा.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम मी जे दोन प्रश्न विचारले त्याचे प्रशासनाने उत्तर द्यावे. मग मी ठराव मांडत नाही. समजा राज्यशासनाने निर्बंध घातले आहेत का कुठच्याही एन.जी.ओ. ला आरक्षण देता येणार नाही. सी.एम. साहेबांनी हॅन्ड ओव्हर केलेले आहे पालिकेला त्यामध्ये जैसल पार्क आहे त्यांनी उत्तर द्यावे त्यांनी जर सांगितले की देता येऊ शकते तर मग ठिक आहे. राज्य शासनाचे आपल्याला पत्र आलेले आहे का की हे आरक्षण एन.जी.ओ ला देता येणार नाही. कुठल्याही संस्थेला किंवा कुठल्याही ठेकेदाराला मुख्यमंत्री साहेबांनी जे आपल्या दिलेले आरक्षण आहे. जी जागा दिली त्यामध्ये जैसल पार्क चौपाटी पण आहे ना?

**दिपक खांबित :-**

आहे.

**अनिल सावंत :-**

ती कुठल्याही संस्थेला देता येणार नाही. असे त्यांचे निर्देश आहेत. त्या टर्म ॲन्ड कंडीशनमध्ये.......

**दिपक खांबित :-**

असे आहे की प्रधान कडील जमीन ही अन्य खाजगी व्यक्तीस संस्था अन्य शासकीय विभागास महसुल विभागाचे पुर्व परवानगी शिवाय हस्तांतरण अथवा विक्री करता येणार नाही. इथे आपण हस्तांतरण करत नाही आणि विक्रीही करत नाही.

**अनिल सावंत :-**

फक्त हॅन्ड ओव्हर करत आहोत.

**दिपक खांबित :-**

हा विषय असा आहे साहेब चौपाटी वरती ते फेरिवाले एवढे लागतात तर एक ठिकाणी थोडे थोडे ठिकाणी करायचे आणि बाकीच्या ठिकाणी जाहिरातीचे आपण जागा निश्चित करुन द्यायची त्यांनी जाहिरात करायची आणि त्याच्या बदल्यात तिकडे जी गार्डन आहेत.......

**अनिल सावंत :-**

साहेब आपल्या महापालिकेची काय परिस्थिती आहे. मॅक्सेस मॉलचे गार्डन घेते वेळी काय काय आपल्याला करावे लागले. तरी सुध्दा ते पब्लीकसाठी उपलब्ध होऊ शकले नाही.

**दिपक खांबित :-**

साहेब हे शॉर्ट टर्मस आहे.

**अनिल सावंत :-**

शॉर्ट टर्म काही नसते इथे परमनन्ट असते. शॉर्ट टर्म काही नाही. बाकीचे सोडून द्या फक्त जॉगर्स ट्रॅकसाठी लोकांना पैसे भरावे लागतात. सकाळी चालायला जायला पैसे भरावे लागत आहेत.

**मा. महापौर :-**

आपल्याला उत्तर मिळालेले आहे. तुमचा विरोध असेल तर ठराव मांडा.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

जैसल पार्कमध्ये कांदळवणाच्या बाबतीत तोडफोड दाखल आहे. अधिका-यांच्या विरोधात गुन्हे दाखल आहेत. तरी सुध्दा तुम्ही दुस-याला हॅन्ड ओव्हर करत आहेत. कोर्ट मॅटर असताना सुध्दा.

**दिपक खांबित :-**

हॅन्ड ओव्हर करत नाही साहेब फक्त देखभाल दुरुस्ती.

**अनिल सावंत :-**

पालिका करणार नाही?

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम तो विभाग सी.आर.झेड ने बाधीत आहे. मा. कलेक्टरने ती जागा दिलेली आहे........

**दिनेश नलावडे :-**

देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली उपमहापौर साहेब कोणाच्या घशामध्ये आपण चौपाटी देत आहोत. ते आज नमुद करा.

**धृवकिशोर पाटील :-**

तोच विषय पुन्हा पुन्हा रिपीट होत आहे.

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव मांडा.

**प्रविण पाटील :-**

ठराव मांडतो त्याआधी एक स्पष्ट करा.

(सभागृहात गोंधळ)

**सुरेश खंडेलवाल :-**

ते आरक्षण ठेकेदाराला देत नाही. फक्त देखभालसाठी संस्थेला आणि ते पण टेम्पपरी.............

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

आमची धारणा आहे की त्याचा उपयोग चांगला व्हावा एकाच व्यक्तीने सातत्याने तिथे कांदळवन करुन लोकांना त्रास द्यायचे काम केले अधिकाऱ्यांना त्याच्यावरती गुन्हे दाखल करायला लावले बाकी न्यायालयीन दावा नाही. त्याच्यामध्ये कांदळवनाचे गुन्हे अधिकाऱ्यांवर दाखल आहेत. आपले जैसल पार्कचे मैदान आहे. एवढे वर्ष लोक वापर करतात त्या मातीचा माती खाली बसली थोडी माती टाकली. थोडी दुरुस्ती केली १२ व्या च्या दशक्रियेला शेडला थोडे पत्रे लावले.......

**जयंतीलाल पाटील :-**

आपली पालिका करु शकत नाही का?

**मा. उपमहापौर :-**

याच्यामधले सर्व अधिकार महापालिकेचे आहेत.

**जयंतीलाल पाटील :-**

आपण आतापर्यंत ५ करोड रुपये खर्च केलेला आहे.

**मा. उपमहापौर :-**

तुमचा ठराव असेल तर मांडा.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

ज्या जागेवर कलेक्टरच्या जागेवर गुन्हे दाखल असताना ते गुन्हे कोणी दाखल केले त्याच्याबद्दल नाही पण नियम काय बोलत आहे. नियमाप्रमाणे तिथे गुन्हे दाखल आहेत. हे मान्य करता का तुम्ही? मॅंग्रोज आहे, सी.आर.झेड बाधीत आहे. गुन्हे दाखल आहेत आणि आज तुम्ही तिथे ठेकेदाराला ठेका देता.

**मा. उपमहापौर :-**

आम्ही जबाबदारीने वागतो. तुम्ही फार काळजी करु नका.

**मा. महापौर :-**

आपका विरोध होगा तो आपका ठराव मांडीए।

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

आमचा त्याला १०० टक्के विरोध आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रविण पाटील :-**

हा विषय भावनेच्या दृष्टीकोनातून मॅडम होत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

तिथे मॅंग्रोज होते. तिथे सी.आर.झेड ने कलेक्टरने स्पष्ट निर्देश दिलेले आहेत की ती जागा देखभाल दुरुस्तीसाठी.......

**सुरेश खंडेलवाल :-**

सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

**प्रविण पाटील :-**

३७ हेक्टर फक्त देखभाल दुरुस्तीसाठी दिलेले आहे. तुम्हाला ठेका द्यायला नाही दिली महापालिकेला.

अनिल सावंत :-

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत भाईंदर (पुर्व) येथे मौजे नवघर सर्व्हे क्र.15 मधील जागा आरक्षण क्र.122 अ "भाईंदर चौपाटी" साठी आरक्षित आहे. मा. जिल्हाधिकारी ठाणे यांनी सदर जागेपैकी 14.00 हेक्टर क्षेत्र विकसित करण्यासाठी विनामुल्य दि.1 मार्च 2018 रोजीच्या आदेशान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे सोपविलेले आहे. सदर जागेवर तत्कालिन नगरपरिषद असल्यापासुन विविध धर्मियांकडुन साजरे केले जाणाऱ्या उत्सवा दरम्यान मुर्तीचे विसर्जन करण्यात येते. सदर जागा ही सागरी नियंत्रण क्षेत्र (CRZ) ने बाधित होत आहे. सदर जागेत मोठया प्रमाणावर नागरीक / रहीवाशी फिरावयास येत असुन महानगरपालिकेमार्फत सक्षम प्राधिकरणाच्या मान्यता घेऊन विविध सुविधा तसेच सोयी सुरक्षेच्या दृष्टीने तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आलेल्या आहेत. सदर जागेवरील सोयी सुविधांची दैनंदिन देखभाल, वृक्षप्राधिकरण, आरोग्य, बांधकाम, आस्थापना या विभागामार्फत व सुरक्षेवर मोठया स्वरुपात खर्च होत असतो. त्यापुढे सदर जागा जाहिरातीच्या मोबदल्यात खाजगी संस्थाना देखभाल व दुरुस्ती साठी दिल्यास महानगरपालिकेचा देखभालीवर होणारा खर्च वाचु शकेल. सदर प्रस्तावाबाबत धोरणात्मक निर्णय झाल्यास सदर जागा निविदा मागवून सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने खाजगी संस्थांना करारनामा करुन हस्तांतरीत करता येईल. तरी सदर प्रस्तावाबाबत धोरणात्मक निर्णय होणेस शिफारस आहे असा विषय मंजूरीसाठी प्रस्तावित केला आहे. भाईंदर चौपाटी महापालिकेच्याच वतीनेच देखरेख करावे. खाजगी संस्थेला दिले तर त्याचा गैरवापर होऊ शकतो. तरी सदरचा गोषवारा फेटाळण्यात येत आहे. राज्य शासन व कोर्ट मॅटरचा अवमान करुन सदर चौपाटी कुठच्याही संस्थेला संस्थेला देण्यात येऊ नये असा मी ठराव मांडत आहे.**

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६८ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. शानु गोहिल, अनुमोदन श्री. मदन उदित नाराण सिंग. दुसरा ठराव सुचक श्री. अनिल सावंत, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम दुसरा ठराव मी मतदानास टाकतो. सुचक श्री. अनिल सावंत ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. शानु गोहिल यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्रीम. शानु गोहिल यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४१, विरोधात २२, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. श्रीम. शानु गोहिल यांचा ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ६८ :-**

**भाईंदर (पूर्व) जैसलपार्क चौपाटी देखभाल व दुरुस्ती कामांबाबत.**

ठराव क्र. ६९ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत भाईंदर (पुर्व) येथे मौजे नवघर सर्व्हे क्र.15 मधील जागा आरक्षण क्र.122 अ "भाईंदर चौपाटी" साठी आरक्षित आहे. मा. जिल्हाधिकारी ठाणे यांनी सदर जागेपैकी 14.00 हेक्टर क्षेत्र विकसित करण्यासाठी विनामुल्य दि.1 मार्च 2018 रोजीच्या आदेशान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे सोपविलेले आहे. सदर जागेवर तत्कालिन नगरपरिषद असल्यापासुन विविध धर्मियांकडुन साजरे केले जाणाऱ्या उत्सवा दरम्यान मुर्तीचे विसर्जन करण्यात येते. सदर जागा ही सागरी नियंत्रण क्षेत्र (CRZ) ने बाधित होत आहे. सदर जागेत मोठया प्रमाणावर नागरीक / रहीवाशी फिरावयास येत असुन महानगरपालिकेमार्फत सक्षम प्राधिकरणाच्या मान्यता घेऊन विविध सुविधा तसेच सोयी सुरक्षेच्या दृष्टीने तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आलेल्या आहेत. सदर जागेवरील सोयी सुविधांची दैनंदिन देखभाल, वृक्षप्राधिकरण, आरोग्य, बांधकाम, आस्थापना या विभागामार्फत व सुरक्षेवर मोठया स्वरुपात खर्च होत असतो. त्यापुढे सदर जागा जाहिरातीच्या मोबदल्यात खाजगी संस्थाना देखभाल व दुरुस्ती साठी दिल्यास महानगरपालिकेचा देखभालीवर होणारा खर्च वाचु शकेल. सदर ठिकाणी दैनदिन**

साफसफाई, वीजबिल, पाणीबील यांचा खर्च मनपामार्फत करण्यात येईल. सदर ठिकाणी झाडांची छाटणी, उद्यानातील साफसफाई, देखभाल दुरुस्ती व चौपाटीवरील किरकोळ दुरुस्तीची कामे, झाडे लावणे ही कामे नेमण्यात येणा-या संस्थेमार्फत करण्यात येईल. सदर जागेवर असलेल्या बालाजी खेल मैदानावरील परवानग्या मनपाच्या दरानुसार धार्मिक व सार्वजनिक वापरासाठी संस्थेमार्फत देण्यात येतील. सदर ठिकाणी जाहीरातीचे फलक बसविण्याच्या जागा निश्चित करुन चालविण्यात यावे. तसेच एका फुड स्टॉलची जागा निश्चित करुन सदर खाजगी संस्थेस देण्यास त्यांचेकडून महापालिकेस किती देणार वा किती घेणार असा देकार मागवून व त्या मोबदल्यात सदर चौपाटीचे देखभाल, दुरुस्ती करण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे. सदर कामासाठी अटीशर्ती मा. आयुक्त यांनी ठरवून वरीलप्रमाणे करण्यांत यावी असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. शानू गोहिल अनुमोदक :- श्री. मदन सिंह

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजू यशवंत | निरंक |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ४ | ढवण निलम हरिश्चंद्र | |
| ५ | सिंह मदन उदितनारायण | ५ | नलावडे दिनेश दगडु | |
| ६ | यादव मिरादेवी रामलाल | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | शाह रिटा सुभाष | ७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ८ | गोहिल शानू जोरावर सिंह | ८ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ९ | भोईर सुनिता शशिकांत | ९ | सावंत अनिल दिवाकर | |
| १० | पाटील वंदना मंगेश | १० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ११ | रावल मेघना दिपक | ११ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| १२ | मोकाशी दिपाली आनंदराव | १२ | पाटील अनिता जयवंत | |
